सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९**

# महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२

( दिनांक ११ ऑक्टोबर, २००६ पर्यंत सुधारित )

## Maharashtra Act No. IX of 2005

# The Maharashtra Value Added Tax Act, 2002

( *As modified upto 11th October 2006* )

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ याच्याद्वारे प्रकाशित

२००७

[ **किंमत :** रु. ३४ ]

अधिक संदर्भ : www.mahavat.gov.in

# महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२

## अनुक्रमणिका

उद्देशिका.

कलमे.


### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

### प्रकरण दोन

### कराचा भार व कर बसविणे

३. कराचा भार.

४. देय असलेले कर.

५. विवक्षित मालावर कर न बसविता येणे.

६. अनुसूच्यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालावर विक्रीकर बसवणे.

७. आवेष्टनासाठी वापरण्यात येणाऱ्या सामग्रीवरील कराचा दर.

८. विवक्षित विक्री व खरेदी करासाठी पात्र नसणे.

९. अनुसूचीमध्ये सुधारणा.

### प्रकरण तीन

### विक्रीकर प्राधिकारी व न्यायाधिकरण

१०. विक्रीकर प्राधिकारी.

११. न्यायाधिकरण.

१२. तापदायक आदेश किंवा बुद्धिपुरस्सर न्यूननिर्धारण, इत्यादी याबद्दल एखाद्या प्राधिकाऱ्याविरुद्ध कारवाई.

१३. कलम १० अन्वये नेमलेल्या व्यक्ती व न्यायाधिकरणाचे सदस्य लोकसेवक असणे.

१४. न्यायाधिकरणाचे व आयुक्ताचे अधिकार.

१५. क्षतिपूर्ति.

प्रकरण चार

**नोंदणी**

१६. नोंदणी.

१७. नवीन नोंदणी.

१८. धंद्यामधील बदल इत्यादीसंबंधी माहिती पुरविणे.

१९. व्यापाऱ्याने धंद्याच्या व्यवस्थापकाचे नाव आणि स्थायी खाते क्रमांक जाहीर करणे.

प्रकरण पाच

**विवरणे, निर्धारण इत्यादी**

२०. विवरणे व स्वयं-निर्धारण.

२१. विवक्षित प्रकरणांमध्ये निर्धारण करण्यासाठी नोटीस न पाठविणे.

२२. लेखापरीक्षा.

२३. निर्धारण.

२४. चुकांची दुरुस्ती.

२५. पुनर्विलोकन.

२६. अपिले.

२७. उच्च न्यायालयाकडे अपील करणे.

२८. उलाढालीचे वर्गीकरण.

प्रकरण सहा

**शास्ती व व्याज**

२९. विवक्षित प्रसंगी शास्ती लादणे.

३०. व्यापारी किंवा व्यक्तीकडून देय असलेले व्याज.

प्रकरण सात

**कराचे प्रदान आणि वसुली**

३१. मूळ स्त्रोतातून कराची वसुली.

३२. कराचे प्रदान, इत्यादी.

३३. वसुलीची विशेष पद्धत.

३४. कराची वसुली जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे करण्यासंबंधीचे विक्रीकर प्राधिकाऱ्याचे विशेष अधिकार.

३५. विवक्षित प्रकरणी महसुलाचे संरक्षण करण्यासाठी तात्पुरती जप्ती.

३६. वसुलीची विवक्षित कार्यवाही चालू ठेवणे व विधिग्राह्य असणे.

३७. या अधिनियमाखालील दायित्व हा प्रथम भार असणे.

३८. महसूल चुकविण्यासाठी केलेले हस्तांतरण निरर्थक असणे.

३९. कर इत्यादींची रक्कम पुर्णांकात भरणे.

४०. कोणत्याही प्रदानाचे समायोजन करणे.

४१. सूट व परतावा.

४२. कराचा आपसमेळ.

४३. या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीस या अधिनियमाच्या किंवा पूर्वीच्या कोणत्याही कायद्याच्या सर्व तरतुदी लागू असणे.

४४. विवक्षित प्रकरणी कर देण्याच्या दायित्वासंबंधी विषेश तरतूद.

४५. प्रकर्त्याच्या वतीने केलेल्या विक्रीवर कर देण्यास विवक्षित अभिकर्ते पात्र असणे.

४६. भागीदारी संस्थांचे व भागीदारांचे दायित्व.

४७. नियत दिनांकाच्या नंतर संमत केलेल्या कंपन्यांचे एकत्रीकरण किंवा विलगीकरण.

## प्रकरण आठ

### वजावट, परतावा इत्यादी

४८. वजावट, परतावा इत्यादी.

४९. आंतरराज्य व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात विकलेल्या घोषित मालावरील कराचा परतावा.

५०. जादा प्रदानाचा परतावा.

५१. तात्पुरता परतावा.

५२. परताव्याच्या रकमेवरील व्याज.

५३. उशिरा दिलेल्या परताव्यावरील व्याज.

५४. विवक्षित प्रकरणात परतावा रोखून ठेवण्याचा अधिकार.

## प्रकरण नऊ

### कार्यवाही

५५. आगाऊ अधिनिर्णय देणे.

५६. विवादग्रस्त प्रश्नांचा निर्णय करणे.

५७. अधिनियमांचा उद्देश व प्रयुक्ती विफल करण्यासाठीचा करार शून्यवत असणे.

५८. एका वर्षापेक्षा कमी किंवा अधिक कालावधी संबंधातील सांविधिक आदेशांबाबत विशेष तरतुदी.

५९. कार्यवाही हस्तांतरित करण्याचा अधिकार.

६०. विवक्षित प्रकरणांमध्ये कराच्या रूपाने किंवा कराच्या ऐवजी रकमा वसूल करण्यास मनाई.

६१. विवक्षित प्रकरणी लेख्यांची लेखापरीक्षा करणे.

६२. निर्धारणाची कार्यवाही, इत्यादी विवक्षित कारणांमुळे विधिअग्राह्य न ठरणे.

प्रकरण दहा

**हिशेब इत्यादी सादर करण्याचे दायित्व**

६३. हिशेब.

६४. हिशेब व कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी आणि जागेची झडती.

६५. व्यवहारांची उलटतपासणी करणे.

६६. सर्वेक्षण.

६७. तपासणी चौक्यांची व नाक्यांची स्थापना करणे.

६८. राज्यातून रस्त्याने मालाची ने-आण करणे आणि ने-आण पास देणे.

६९. स्वयंचलन.

प्रकरण अकरा

**आकडेवारी**

७०. आकडेवारी गोळा करण्याचा अधिकार.

७१. लोकसेवकाने माहिती उघड करणे.

७२. कलम ७२ अन्वये आवश्यक असलेली माहिती उघड करणे व त्या कलमान्वये माहिती किंवा विवरण पुरविण्यात कसूर करणे.

७३. व्यापारी व इतर व्यक्ती यांच्या संबंधीचा तपशील लोकहितार्थ प्रसिद्ध करणे व उघड करणे.

प्रकरण बारा

**अपराध व शास्ती**

७४. अपराध व शास्ती.

७५. व्यवसाय युनिटांनी केलेले अपराध.

७६. अपराधांची दखल.

७७. अपराधांचे अन्वेषण.

७८. अपराध आपसात मिटविणे.

## प्रकरण तेरा

### संकीर्ण

७९. अपील आणि अन्य विवक्षित अर्ज यांवरील फी.

८०. मुदत अधिनियमाची कलमे ४ व १२ लागू असणे.

८१. विवक्षित बाबतीत मुदत वाढविणे.

८२. कार्यवाहीमध्ये कोणत्याही प्राधिकरणापुढे हजर राहणे.

८३. नियम करण्याचा अधिकार.

८४. नियत दिवशी ताब्यात असलेला मालाचा साठा घोषित करणे.

८५. विवक्षित कार्यवाहीस रोध.

८६. कराचे बीजक आणि विक्रीचे किंवा खरेदीचे ज्ञापन.

८७. विनिर्दिष्ट दिनांकास आणि त्या दिनांकानंतर विवक्षित विहित नमुने विहित प्राधिकाऱ्याकडून मिळविणे.

## प्रकरण चौदा

### सामूहिक प्रोत्साहन योजना

८८. प्रकरण चौदाखालील व्याख्या.

८९. हक्कविषयक प्रमाणपत्र देणे.

९०. हक्कविषयक प्रमाणपत्र रद्द करणे.

९१. प्रोत्साहनाच्या स्वरूपात बदल.

९२. सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उपलब्ध करून द्यावयाच्या लाभावरील वार्षिक कमालमर्यादा.

९३. विवक्षित आकस्मिक खर्चामध्ये पात्र युनिटाला प्रमाणानुसारी लाभ.

९४. मानीव प्रदान.

## प्रकरण पंधरा

### निरसन व व्यावृत्ती

९५. निरसन.

९६. व्यावृत्ती.

९७. निरसन केलेल्या कोणत्याही कायद्यातील अधिकारी, प्राधिकारी इत्यादींच्या निर्देशांचा अर्थ लावणे.

९८. अडचणी दूर करणे.

अनुसूची क

अनुसूची ख

अनुसूची ग

अनुसूची घ

अनुसूची ङ

# सन २००५ चा अधिनियम क्रमांक ९[1]

(माननीय राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " भाग चार मध्ये दिनांक ९ मार्च, २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

या अधिनियमात, पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत : ––

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३@ (९-३-२००५)*

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (१-४-२००५)*

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमाक ३२ (५-८-२००६)

**महाराष्ट्र राज्यातील विवक्षित मालाची विक्री किंवा खरेदी यांवर कर बसविण्यासंबंधीचे व वसूल करण्यासंबंधीचे कायदे एकत्रित करून ते सुधारण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील विवक्षित मालाची विक्री किंवा खरेदी यांवर कर बसविण्यासंबंधीचे व वसूल करण्यासंबंधीचे कायदे एकत्रित करून ते सुधारणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,**भारतीय गणराज्याच्या त्रेपन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :––

[1]उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता, महाराष्ट्र शासन राजपत्र, २००२, सर्वसाधारण भाग पाच-अ, पृष्ठे ४९७-४९९ पहा.

@ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ४ द्वारे, महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ निरसित करण्यात आला.

*हे चिन्ह अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२,असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

[१][(३) तो, दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी अंमलात येईल.]

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,––

(१) '' कृषि '' या शब्दप्रयोगाचे सर्व व्याकरणिक फेरफार व तत्सम शब्दप्रयोग यासह, त्यामध्ये पुष्पसंवर्धन, फलोत्पादन, पिके, गवत किंवा बागायती उत्पादन काढणे आणि तसेच, गुरे चारणे, यांचा समावेश आहे ; परंतु त्यात, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, पशुपैदास आणि केवळ लाकडे तोडणे किंवा गवत कापणे, फळे गोळा करणे, मनुष्यनिर्मित वने वाढविणे किंवा बीजरोपे किंवा रोपे वाढविणे यांचा समावेश होत नाही ;

**स्पष्टीकरण**.––हा खंड व खंड (४) यांच्या प्रयोजनार्थ, '' वन '' या शब्दप्रयोगाचा अर्थ, भारतीय वन अधिनियम, १९२७ हा महाराष्ट्र राज्याला लागू असताना तो ज्या वनाच्या संबंधात लागू असेल, ते वन, असा आहे ; (१९२७ चा २६.)

(२) '' शेतकरी '' याचा अर्थ, शेतीच्या प्रयोजनाकरिता व्यक्तिशः जमीन कसणारी व्यक्ती, असा आहे ;

[२][(३) '' नियत दिवस '' यांचा अर्थ, दिनांक १ एप्रिल , २००५, असा आहे ;]

[३][(३-क) '' व्यापारनाम '' ही संज्ञा जेव्हा अनुसूचीमध्ये वापरण्यात आली असेल तेव्हा तिचा अर्थ, व्यापारनाम (मग ते नोंदणीकृत असो वा नसो) म्हणजेच एखादे संकेतचिन्ह, आद्याक्षरमुद्रा, खूणचिठ्ठी, स्वाक्षरी, कल्पित शब्द किंवा कोणताही लिखित मजकूर ज्याचा, एखाद्या उत्पादनाच्या संबंधात नाव अथवा चिन्ह म्हणून आणि ते उत्पादन व असे नाव किंवा चिन्ह वापरणारी व्यक्ती यांचा व्यापाराच्या ओघात येणारा संबंध, त्या व्यक्तीची ओळख सूचित करून किंवा सूचित न करता दर्शवण्यासाठी किंवा दर्शवला जाईल अशा प्रकारे वापर करण्यात येतो असे नाव किंवा चिन्ह, असा आहे ;]

(४) '' धंदा '' यामध्ये,––

(क) कोणतीही सेवा ;

(ख) कोणताही व्यापार, वाणिज्य किंवा निर्मितीकार्य ;

(ग) सेवा, व्यापार, वाणिज्य, किंवा निर्मितीकार्य यांच्या स्वरूपातील कोणताही उपक्रम किंवा संस्था,

यांचा समावेश होतो,–– मग अशी सेवा, व्यापार, वाणिज्य, निर्मितीकार्य, उपक्रम किंवा संस्था यातील कामधंदा लाभ किंवा नफा मिळण्याच्या उद्देशाने करण्यात आलेला असो वा नसो आणि अशी सेवा, व्यापार, वाणिज्य, निर्मितीकार्य, उपक्रम किंवा संस्था यांपासून कोणताही लाभ किंवा नफा उपार्जित होत असो किंवा नसो.

**स्पष्टीकरण**.––या खंडाच्या प्रयोजनार्थ,––

(एक) मनुष्यनिर्मित वने वाढवणे किंवा बीजरोपे किंवा रोपे वाढविणे, ही कामे धंदा असल्याचे मानण्यात येतील ;

(दोन) अशी सेवा, व्यापार, वाणिज्य, निर्मितीकार्य, उपक्रम किंवा संस्था यांच्या संबंधातील भांडवली मत्तेच्या विक्रीचा किंवा खरेदीचा कोणताही व्यवहार हा, धंद्यामध्ये समाविष्ट असलेला व्यवहार असल्याचे मानण्यात येईल ;

(तीन) ज्याची किंमत लेखांकनाच्या दुहेरी नोंद पद्धतीनुसार धंद्याच्या नफा व तोटा खात्याच्या जमा खाती किंवा, यथास्थिती, खर्चखाती टाकण्यात येते अशा कोणत्याही मालाची विक्री किंवा खरेदी हे धंद्यामध्ये समाविष्ट असलेले व्यवहार असल्याचे मानण्यात येईल;

---

[१]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १४, कलम २ द्वारे, हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२]वरील अधिनियमाच्या कलम ३(१) द्वारे, हा खंड दाखल करण्यात आला.

[३]सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३२, कलम ३७(क) द्वारे, खंड (३) नंतर हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(चार) धंद्यांचा प्रारंभ किंवा समाप्ती यासंबंधातील कोणताही व्यवहार हा, धंद्यामध्ये समाविष्ट असलेला व्यवहार असल्याचे मानण्यात येईल ;

१९६१ चा ४३. (५) '' भांडवली मत्ता '' याला, आयकर अधिनियम, १९६१ मध्ये वेळोवेळी, जो नेमून देण्यात आला असेल, तोच अर्थ असेल परंतु उक्त शब्दप्रयोगात, व्यक्तिगत वापरासाठी घेतलेले दागदागिने किंवा धंद्याशी संबंधित नसलेली मालमत्ता यांचा समावेश असणार नाही.

(६) '' आयुक्त '' याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता विक्रीकर आयुक्त म्हणून नेमलेली व्यक्ती, असा आहे ;

(७) '' व्यक्तिशः जमीन कसणे '' याचा, त्याचे व्याकरणिक फेरफार व तत्सम शब्दप्रयोग यासह अर्थ, एखाद्याने स्वतःहून,––

(क) त्याच्या स्वतःच्या अंगमेहनतीने, किंवा

(ख) त्याच्या स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तीच्या अंगमेहनतीने, किंवा

(ग) त्याच्या स्वतःच्या अथवा स्वतःच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली, रोख रकमेत किंवा मालाच्या स्वरुपात (परंतु पिकाच्या हिश्श्याच्या स्वरुपात नव्हे) द्यावयाच्या मजुरीवर ठेवलेल्या नोकरांकरवी किंवा भाड्याने लावलेल्या मजुरांकरवी ज़मीन कसणे, असा आहे.

**स्पष्टीकरण एक.**––विधवा स्त्री किंवा अज्ञान व्यक्ती किंवा कोणतेही शारीरिक किंवा मानसिक दौर्बल्य जडलेली व्यक्ती, किंवा संघराज्याच्या सशस्त्र दलात नोकरी करणारी व्यक्ती ही, आपली जमीन आपल्या नोकरांकरवी किंवा भाड्याने लावलेल्या मजुरांकरवी कसत असेल तर, ती, अशी जमीन व्यक्तिशः कसते असे मानले जाईल ;

**स्पष्टीकरण दोन.**—अविभक्त हिंदू कुटुंबाच्या बाबतीत, जर जमीन अशा कुटुंबातील कोणतीही व्यक्ती व्यक्तिशः कसत असेल तर, ती जमीन व्यक्तिशः कसण्यात येते, असे मानले जाईल ;

(८) '' व्यापारी '' याचा अर्थ, जी व्यक्ती आपल्या धंद्याच्या प्रयोजनार्थ, किंवा त्यातील त्याच्या कामधंद्याच्या परिणामी किंवा त्यासंबंधात किंवा त्याअनुषंगाने किंवा धंदा करीत असताना, अडतीवर, पारिश्रमिक घेऊन किंवा इतर रीतीने राज्यात माल विकत घेत असेल किंवा विकत असेल, अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि त्यात,––

(क) धंद्याच्या प्रयोजनार्थ किंवा त्यातील त्याच्या कामधंद्याच्या परिणामी किंवा [१][त्यासंबंधात किंवा त्या अनुषंगाने किंवा] धंद्याच्या ओघात जो एखाद्या प्रकर्त्याच्या किंवा प्रकर्त्यांच्या वतीने जाहीर केलेला किंवा न केलेला कोणताही माल विकत घेतो, विकतो, असा वखारिया (फॅक्टर), दलाल, अडत्या, आश्वासक अभिकर्ता किंवा अन्य कोणत्याही नावाने ओळखला जाणारा इतर कोणताही व्यापारी अभिकर्ता ;

(ख) [२][जो लिलावकर्ता अभिकर्ता म्हणून किंवा अन्य रीतीने काम करताना, कोणत्याही प्रकर्त्याच्या मालकीच्या जाहीर केलेल्या वा न केलेल्या मालाची विक्री किंवा लिलाव करतो, किंवा त्याला मालाची विक्री करण्याचा प्राधिकार असो वा नसो–मालाच्या विक्रीची व्यवस्था करतो किंवा लिलाव आयोजित करतो] मग इच्छुक खरेदीदाराने देऊ केलेली किंमत स्वतः त्या लिलावकर्त्याने स्वीकारलेली असो वा प्रकर्त्याने स्वीकारलेली असो अथवा प्रकर्त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने स्वीकारलेली असो, असा लिलावकर्ता ;

[१]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३ (२) (क) द्वारे समाविष्ट करण्यात आला.

[२]वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) (ख) द्वारे, '' जो लिलावकर्ता '' या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि '' किंवा लिलाव करतो '' या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

(ग) जो धंद्याच्या प्रयोजनार्थ किंवा [१][त्यातील त्याच्या सहभागाच्या परिणामी किंवा त्या संबंधात किंवा त्या अनुषंगाने किंवा त्याच्या ओघात] राज्यात माल विकत घेतो किंवा विकतो, असा अनिवासी व्यापारी, किंवा, यथास्थिती, अशा अनिवासी व्यापाऱ्याचा राज्यात राहणारा अभिकर्ता ;

(घ) आपल्या सदस्यांकडून माल विकत घेणारी किंवा सदस्यांना माल विकणारी कोणतीही सोसायटी, क्लब किंवा व्यक्तींचा अन्य संघ ; यांचा समावेश होतो.

**स्पष्टीकरण.**——या खंडाच्या प्रयोजनार्थ, पुढीलपैकी जी प्रत्येक व्यक्ती, जे प्रत्येक मंडळ, जी प्रत्येक संस्था, लिलावाद्वारे असो किंवा अन्य रीतीने असो, थेट किंवा एखाद्या अभिकर्त्यामार्फत रोख रकमेच्या बदल्यात किंवा विलंबित प्रदानाच्या बदल्यात किंवा इतर कोणत्याही मौल्यवान मोबदल्यासाठी, [२][कोणत्याही मालाची विक्री करते] ती व्यक्ती, ते मंडळ आणि ती संस्था खंड (४) मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,——

(एक) सीमाशुल्क अधिनियम, १९६२ याचे प्रशासन करणारा भारत सरकारचा सीमाशुल्क विभाग ; १९६२ चा ५२.

(दोन) केंद्र सरकारचे विभाग आणि कोणत्याही राज्य शासनाचा कोणताही विभाग ;

(तीन) स्थानिक प्राधिकरणे ;

(चार) पोर्ट ट्रस्ट ;

[३][ (चार-क) सार्वजनिक धर्मादाय विश्वस्तव्यवस्था ;]

(पाच) भारतीय रेल्वे अधिनियम, १९८९ आणि कोकण रेल्वे महामंडळ मर्यादित याअन्वये व्याख्या केल्याप्रमाणे रल्वे प्रशासन ; १९८९ चा २४.

(सहा) विधि संस्थापित केलेली किंवा विधि संस्थापित न केलेली सोसायटी, क्लब किंवा व्यक्तींचा इतर संघ ;

(सात) विमा व वित्तीय महामंडळे, संस्था किंवा कंपन्या आणि भारतीय रिझर्व 'बँक अधिनियम, १९३४ याच्या दुसऱ्या अनुसूचीत समाविष्ट केलेल्या बँका ; १९३४ चा २.

(आठ) मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५० अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ; १९५० चा ६४.

(नऊ) नौभरण आणि बांधकाम कंपन्या, हवाई वाहतूक कंपन्या, हवाई मार्ग आणि जाहिराती संस्था ;

(दहा) केंद्र सरकारच्या कोणत्याही, राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीचे किंवा त्यांच्याकडून स्थापन करण्यात आलेले, किंवा त्याच्या प्रशासकीय नियंत्रणाधीन असलेले अन्य कोणतेही महामंडळ, कंपनी, निकाय किंवा प्राधिकरण व्यापारी असल्याचे मानण्यात येईल.

[४][ * * * * ]

**अपवाद एक.**——जो शेतकरी केवळ त्याने स्वतः कसलेल्या जमिनीत पिकवलेला माल विकतो, तो या खंडाच्या अर्थानुसार व्यापारी असल्याचे मानले जाणार नाही.

---

[१]सन २००५ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३ (२) (ग) द्वारे " त्यातील त्याच्या कामधंद्याच्या परिणामी किंवा धंद्याच्या ओघात," या मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

[२]वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) (घ) (एक) " मागणी न केलेला " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " कोणताही माल निकालात काढील " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[३]वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) (घ) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४]वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) (घ) (तीन) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

**अपवाद दोन.**—एखादी शैक्षणिक संस्था, आपली उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने, आपली कामे पार पाडताना, निर्मिती करण्याचे, माल खरेदीचे किंवा विक्रीचे कार्य करीत असेल तर, त्याबाबतीत तिला या खंडाच्या अर्थान्तर्गत व्यापारी मानण्यात येणार नाही.

१९८८ चा ५९. **अपवाद तीन.**—मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये भाड्यासाठी किंवा बक्षिस देण्यासाठी (for hire or reward) वापरला जातो किंवा वापर करण्यासाठी वाहनांच्या (वारींसह) बाबतीत अशा वाहतूकदाराला, अशा परिवहन वाहनांची किंवा त्यांच्या भागांची, घटकांची किंवा त्यातील उपसाधनांची विक्री किंवा खरेदी यांच्या संबंधात या खंडाच्या अर्थांतर्गत, व्यापारी म्हणून मानण्यात येणार नाही.

१९५६ चा ७४. (९) '' घोषित केलेला माल '' याचा अर्थ, केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ यात व्याख्या केल्याप्रमाणे, वेळोवेळी, घोषित केलेला माल, असा आहे ;

२००२ चा १६. [१][ (१०) '' दस्तऐवज '' यामध्ये माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००२ मध्ये व्याख्या केलेल्या इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचा अंतर्भाव होतो ;]

(११) '' पूर्वीचा कायदा '' याचा अर्थ, पुढील कायद्यांपैकी कोणताही कायदा असा आहे,—

१९५८ चा ६६. (एक) मुंबई मोटार स्पिरिट विक्री कराधान अधिनियम, १९५८,

१९५९ चा मुंबई ५१. (दोन) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९,

[२][ * * * * ]

१९८५ चा महा. १८. (चार) महाराष्ट्र कोणताही माल कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्याच्या हक्काच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५, आणि

१९८९ चा महा. ३६. (पाच) महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित) अधिनियम, १९८९,

यांपैकी प्रत्येकात वेळोवेळी सुधारणा करण्यात आली असून त्यात, वर नमूद केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही गोष्ट ज्या अधिनियमांन्वये विधिग्राह्य करण्यात आली असेल त्या अधिनियमांचा समावेश होतो ;

(१२) '' माल '' याचा अर्थ, वृत्तपत्रे, कारवाईयोग्य दावे, पैसा, रोखे, शेअर, कर्जरोखे किंवा लॉटरीची तिकिटे नसणारी प्रत्येक प्रकारची जंगम मालमत्ता, असा आहे आणि त्यात, पशुधन, विक्रीपूर्वी किंवा विक्रीच्या संविदेनुसार जी तोडण्याबाबत संमती दिली असेल अशी लागवड केलेली पिके, गवत आणि झाडे व झुडपे त्यांच्या उत्पादनासह जमिनीशी संलग्न असलेल्या किंवा तिचा भाग असणाऱ्या अशा मालातील मालमत्तेचा समावेश होतो ;

(१३) '' आयातकर्ता '' याचा अर्थ, जो व्यापारी राज्यात कोणताही माल आणतो किंवा ज्याच्याकडे राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून माल पाठवण्यात येतो, असा व्यापारी, असा आहे ;

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३ (३) द्वारे हा खंड दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ (४) द्वारे मूळ मजकूर वगळण्यात आला.

(१४) '' विधिविषयक प्रतिनिधी '' यास, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या कलम २ च्या खंड (१) मध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल, तोच अर्थ असेल ; १९०८ चा ५.

(१५) '' निर्मितीकार्य '' या शब्दप्रयोगाचे व्याकरणिक फेरफार व तत्सम शब्दप्रयोग यात, कोणत्याही मालाचे उत्पादन करणे, तो तयार करणे, त्याचा अर्क काढणे, त्यात फेरफार करणे, तो सुशोभित करणे, त्याचे परिष्करण करणे, किंवा अन्य प्रकारे संस्करण करणे, प्रक्रिया करणे किंवा तो अनुकूल करून घेणे यांचा समावेश होतो ;

(१६) '' अनिवासी व्यापारी '' याचा अर्थ, जो राज्यामध्ये कोणत्याही मालाची खरेदी किंवा विक्री घडवून आणतो, परंतु ज्याचे राज्यामध्ये धंद्याचे किंवा निवासाचे निश्चित असे ठिकाण नाही, असा व्यापारी, असा आहे ;

(१७) '' व्यक्ती '' यात, कोणत्याही व्यक्तीचा, कोणत्याही राज्य शासनाचा, केंद्र सरकारचा, कोणत्याही कंपनीचा किंवा सोसायटीचा किंवा क्लबचा किंवा संघाचा किंवा व्यक्तींच्या संघाचा-मग तो कायद्याने संस्थापित असो वा नसो आणि तसेच अविभक्त हिंदू कुटुंबाचा, भागीदारी संस्थेचा आणि स्थानिक प्राधिकरणाचा आणि कोणत्याही पूर्ववर्ती वर्णनात न बसणाऱ्या प्रत्येक विधिकल्पित व्यक्तीचा समावेश होतो ;

(१८) '' धंद्याचे ठिकाण '' यात, वखार, गोदाम किंवा ज्या ठिकाणी व्यापारी आपला माल साठवून ठेवतो असे इतर ठिकाण आणि जेथे व्यापारी आपली लेखापुस्तके ठेवतो असे कोणतेही ठिकाण, यांचा समावेश होतो ;

(१९) '' विहित '' याचा अर्थ, नियमांद्वारे किंवा कोणत्याही अधिसूचनेद्वारे विहित केलेला, असा आहे ;

(२०) '' खरेदी किंमत '' याचा अर्थ, मालाच्या वाहतुकीसाठी उतरवलेल्या विम्याचा खर्च किंवा उभारण्याचा खर्च जेव्हा वेगळा आकारण्यात येत असेल तेव्हा अशा खर्चाव्यतिरिक्त तो माल स्वाधीन करताना किंवा त्यापूर्वी, त्या मालाच्या संबंधात विक्रेत्याने केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल जी कोणतीही रक्कम आकारण्यात आली असेल ती रक्कम धरुन, मालाच्या केलेल्या कोणत्याही खरेदीबद्दल एखाद्या व्यक्तीने दिलेली किंवा तिच्याकडून देय असलेली मौल्यवान मोबदल्याची रक्कम, असा आहे.

**स्पष्टीकरण एक.**—केंद्रिय उत्पादन शुल्क अधिनियम, १९४४ किंवा सीमाशुल्क अधिनियम, १९६२ किंवा मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ या अन्वये मालावर आकारण्यात आलेली किंवा आकारणीयोग्य असलेली शुल्काची रक्कम ही, अशा मालाच्या खरेदीचा एक भाग असल्याचे मानण्यात येईल—मग अशी शुल्काची रक्कम विक्रेत्याकडून किंवा खरेदीदाराकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून अथवा त्यांच्यावतीने भरलेली असो किंवा देय असो. १९४४ चा १. १९६२ चा ५२. १९४९ चा मुंबई २५.

**स्पष्टीकरण दोन.**—खरेदी किंमतीत, अशा कोणत्याही खरेदीच्या संबंधात एखाद्या व्यक्तीकडून देण्यात आलेल्या किंवा देय असलेल्या कराचा समावेश होणार नाही ;

**स्पष्टीकरण तीन.**—खरेदी किंमतीत, उक्त मालाच्या खरेदीशी संबंधित असलेली किंवा आनुषंगिक किंवा सहाय्यकारी असलेली जी रक्कम ठेवीच्या रूपाने-मग ती परतावायोग्य असो वा नसो-खरेदीदाराने दिलेली आहे व जी रक्कम-मग ती वेगळ्या कराराच्या रूपाने असो किंवा नसो-देण्यात आलेली असेल, यांचा समावेश होईल ;

[१][ **स्पष्टीकरण चार.**—अनुसूची ' ग ' च्या नोंद २९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या औषधिद्रव्यांच्या खरेदीसाठी व्यापाऱ्याने भरलेल्या किंवा त्याच्याकडून देय असलेल्या योग्य किमतीच्या मोबदल्याची रक्कम ही, त्या ओषधिद्रव्यांच्या पाकिटावर छापलेली कमाल किरकोळ किंमत असेल ; ]

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३७ (ख) द्वारे, हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

(२१) '' नोंदणीकृत व्यापारी '' याचा अर्थ, या अधिनियमान्वये नोंदणी केलेला व्यापारी, असा आहे ;

(२२) '' फेरविक्री '' याचा अर्थ, खरेदी केलेल्या मालाची,—

(एक) ज्या स्वरुपात माल खरेदी करण्यात आला असेल त्याच स्वरुपात, किंवा

(दोन) अशा मालावर ज्यामुळे, ती निर्मिती ठरेल किंवा त्याची परिणती निर्मितीमध्ये होईल असे काहीही न करता,

अशा खरेदी केलेल्या मालाची विक्री करणे असा आहे ; आणि '' फेरविक्री करणे '' या शब्दाचा त्याप्रमाणेच अर्थ लावण्यात येईल ;

(२३) '' नियम '' याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे ;

(२४) '' विक्री '' याचा अर्थ, रोख रकमेच्या किंवा विलंबित प्रदानाच्या बदल्यात किंवा इतर कोणताही मौल्यवान मोबदला घेऊन राज्यात केलेली मालाची विक्री, असा आहे ; परंतु त्यात, गहाण, तारणगहाण, भार किंवा तारण यांचा समावेश होत नाही ; आणि '' विकणे '', '' विकत घेणे '' व '' खरेदी करणे '' या शब्दांचा व्याकरणिकदृष्ट्या त्यात होणारे सर्व फेरफार व तत्सम संज्ञा धरून, त्याप्रमाणेच अर्थ लावण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ,—

(क) राज्यातील विक्रीत, केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ याचे कलम ४ यात निर्दिष्ट केलेल्या तत्त्वांप्रमाणे, जी विक्री राज्यात झालेली विक्री आहे असे ठरविण्यात आले असेल, त्या विक्रीचा समावेश होतो ; १९५६ चा ७४.

(ख) (एक) रोख रक्कम, विलंबित प्रदान किंवा इतर मौल्यवान मोबदला यांसाठी कोणत्याही मालातील मालमत्तेचे, कंत्राटाला अनुलक्षून असेल ते खेरीजकरून, हस्तांतरण ;

(दोन) [१][कार्यकंत्राट म्हणजे रोख रक्कम, विलंबित प्रदान किंवा इतर किंमतयोग्य मोबदला यांच्या बदल्यात कोणत्याही जंगम वा स्थावर मालमत्तेचे बांधकाम, उभारणी (Construction), निर्मिती, संस्करण, रचना, उभारणी (Installation), स्थापना, जोडणी, सुधारणा, फेरबदल, दुरूस्ती अथवा कार्यान्वयन इत्यादी कामे पार पाडण्याकरिता करण्यात आलेला कोणताही करार याच्या] अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील (मालाच्या स्वरुपातील असो किंवा अन्य स्वरुपातील असो) मालमत्तेचे हस्तांतरण ;

(तीन) भाडेखरेदी तत्त्वावर किंवा हप्त्यांनी रक्कम देण्याच्या कोणत्याही पद्धतीने केलेला मालाचा बटवडा ;

(चार) रोख रक्कम, विलंबित प्रदान किंवा इतर मौल्यवान मोबदला यांसाठी (विनिर्दिष्ट कालावधीसाठी असो अथवा नसो) कोणत्याही प्रयोजनाकरिता कोणत्याही मालाच्या वापराच्या हक्काचे हस्तांतरण ;

(पाच) रोख रक्कम, विलंबित प्रदान किंवा इतर मौल्यवान मोबदला यांसाठी, कोणत्याही संघटनेने किंवा विधिसंस्थापित असलेल्या वा नसलेल्या, व्यक्तींच्या निकायाने तिच्या सदस्याला केलेला मालाचा पुरवठा ;

(सहा) कोणत्याही सेवेच्या स्वरुपात किंवा कोणत्याही सेवेचा भाग म्हणून किंवा इतर कोणत्याही रीतीने अन्नपदार्थ किंवा मानवी वापरासाठी असलेली इतर कोणतीही वस्तू किंवा कोणतेही पेय (मग ते मादक असो अथवा नसो) असलेल्या वस्तूंचा केलेला पुरवठा किंवा दिलेली सेवा, जेव्हा रोख रकमेसाठी, विलंबित प्रदानासाठी किंवा इतर मौल्यवान मोबदल्यासाठी दिलेली असेल तेव्हा असा पुरवठा ;

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३७ (ग) द्वारे, '' कार्यकंत्राटाच्या '' या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][ * * * * * ]

या बाबी विक्री असल्याचे मानण्यात येईल.

(२५) " विक्री किंमत " याचा अर्थ, मालाच्या वाहतुकीसाठी उतरवलेल्या विम्याचा खर्च किंवा मांडणी खर्च जेव्हा वेगळा आकारण्यात येत असेल तेव्हा अशा खर्चाव्यतिरिक्त, तो माल स्वाधीन करण्याच्या वेळी किंवा त्यापूर्वी त्या मालाच्या संबंधात विक्रेत्याने केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल जी कोणतीही रक्कम आकारण्यात आली असेल ती रक्कम धरुन, मालाच्या केलेल्या कोणत्याही विक्रीबद्दल व्यापाऱ्यास दिलेली किंवा देय असलेली मौल्यवान मोबदल्याची रक्कम, असा आहे.

**स्पष्टीकरण एक.**---केंद्रीय उत्पादन शुल्क अधिनियम, १९४४ किंवा सीमाशुल्क अधिनियम, १९६२ किंवा मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ यांन्वये मालावर आकारण्यात आलेली किंवा आकारणीयोग्य असलेली शुल्काची रक्कम ही अशा मालाच्या विक्रीच्या किंमतीचा एक भाग असल्याचे मानण्यात येईल--मग अशी शुल्काची रक्कम विक्रेत्याने किंवा खरेदीदाराने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने अथवा त्यांच्यावतीने भरलेली असो किंवा त्यांच्याकडून देय असो. १९४४ चा १. १९६२ चा ५२. १९४९ चा मुंबई २५.

**स्पष्टीकरण दोन.**---विक्री किंमतीत, त्या विक्रीच्या संबंधात [2][विक्रेत्याला] दिलेल्या किंवा देय असलेल्या विक्रीकराचा समावेश होणार नाही.

**स्पष्टीकरण तीन.**---विक्री किंमतीमध्ये, विक्रेत्याला ठेव म्हणून मिळालेल्या रकमेचा,---मग ती परतावायोग्य असो किंवा नसो--जी रक्कम मालाच्या उक्त विक्रीच्या संबंधात, अनुषंगाने किंवा सहाय्यभूत म्हणून मिळालेली असेल--मग ती स्वतंत्र कराराच्या मार्गाने मिळालेली असो वा नसो--त्या रकमेचा समावेश असेल ;

[3][**स्पष्टीकरण चार.**---अनुसूची 'ग' मधील नोंद २९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या औषधिद्रव्यांच्या विक्रीबद्दल व्यापाऱ्याला चुकती केलेली किंवा देय असलेली, समूल्य मोबदल्याची रक्कम ही, औषधिद्रव्ये असलेल्या वेष्टनावर छापलेली कमाल किरकोळ किंमत असेल.]

(२६) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(२७) " सेवा " याचा अर्थ, राज्य शासन, **राजपत्रात** वेळोवेळी अधिसूचित करील अशी कोणतीही सेवा, असा आहे ;

(२८) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(२९) " कर " याचा अर्थ, या अधिनियमान्वये बसविण्याजोगा किंवा, यथास्थिती, देय असलेल्या विक्रीवर [4][ * * ], असा आहे आणि यात आपसमेळाच्या स्वरूपात देय असलेल्या कोणत्याही रकमेचा समावेश होतो ;

(३०) " करमुक्त माल " याचा अर्थ, अनुसूचीमध्ये ज्या मालाच्या समोर विक्रीकराचा दर " काहीही नाही " असा दर्शविलेला असतो असा माल आणि " करपात्र माल " याचा अर्थ, करमुक्त मालाव्यतिरिक्त इतर माल, असा आहे ;

(३१) " न्यायाधिकरण " याचा अर्थ, कलम ११ अन्वये घटित केलेले महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, असा आहे ;

(३२) " खरेदीची उलाढाल " याचा अर्थ, दिलेल्या मुदतीत व्यापाऱ्याने केलेल्या मालाच्या कोणत्याही खरेदीच्या संबंधात त्याने दिलेल्या व देय असलेल्या खरेदी किंमतीच्या एकूण रकमेतून---

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३ (५) द्वारे परिच्छेद सात वगळण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३ (६) (क) द्वारे " व्यापाऱ्याला " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३ (६) (घ) द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३ (७) द्वारे " किंवा खरेदीदार " हा मजकूर वगळण्यात आला.

(क) विक्रेत्याकडून खरेदी केलेल्या व विहित मुदतीत त्यास परत केलेल्या कोणत्याही मालाच्या बाबतीत, विक्रेत्याने व्यापाऱ्यास परत केलेली, कोणतीही असल्यास, खरेदीची किंमत; आणि

(ख) व्यापाऱ्याकडून खरेदी केलेल्या कोणत्याही मालाच्या बाबतीत, विक्रेत्याने व्यापाऱ्याला विहित मुदतीत परत केलेली, कोणतीही असल्यास, ठेवीची रक्कम ;

वजा करुन शिल्लक राहिलेली रक्कम असा आहे.

**स्पष्टीकरण एक.**——भाडे-खरेदी पद्धतीने किंवा हप्त्याने भरणा करावयाच्या कोणत्याही पद्धतीने बटवडा केलेल्या मालाच्या बाबतीत किंवा कोणताही माल कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्याच्या अधिकाराचे हस्तांतरण करण्याच्या बाबतीत, (विनिर्दिष्ट कालावधीसाठी असो अगर नसो) दिलेल्या कालावधीत चुकती केलेली किंवा देय असलेली खरेदीच्या किमतीची रक्कम याचा अर्थ, उक्त कालावधीमध्ये चुकती केलेली किंवा, यथास्थिती, देणे असलेली व देय रक्कम, असा आहे.

[१][ * * * * * ]

(३३) '' विक्रीची उलाढाल '' याचा अर्थ, दिलेल्या मुदतीत, केलेल्या मालाच्या कोणत्याही विक्रीच्या संबंधात व्यापाऱ्यांला मिळालेल्या व मिळावयाच्या विक्रीच्या किंमतीच्या एकूण रकमेतून,—

(क) खरेदीदाराने खरेदी केलेल्या व विहित मुदतीत परत केलेल्या कोणत्याही मालाच्या बाबतीत विक्रेत्याने खरेदीदारास परत केलेली, कोणतीही असल्यास, विक्रीची किंमत; आणि

(ख) व्यापाऱ्याने विकलेल्या कोणत्याही मालाच्या बाबतीत, विक्रेत्याने खरेदीदाराला विहित मुदतीत परत केलेली, कोणतीही असल्यास, ठेवीची रक्कम,

वजा करून शिल्लक राहिलेली रक्कम ; असा आहे.

**स्पष्टीकरण एक.**——भाडे-खरेदी पद्धतीने किंवा हप्त्याने भरणा करावयाच्या कोणत्याही पद्धतीने बटवडा केलेल्या मालाच्या बाबतीत किंवा कोणताही माल कोणत्याही प्रयोजनासाठी (विनिर्दिष्ट कालावधीसाठी असो अगर नसो) वापर करण्याच्या अधिकाराचे हस्तांतरण करण्याच्या बाबतीत, दिलेल्या कालावधीत मिळालेली किंवा देय असलेली, विक्रीच्या किमतीची रक्कम याचा अर्थ, उक्त कालावधीमध्ये मिळालेली किंवा, यथास्थिती, देणे असलेली व देय असलेली रक्कम, असा आहे.

[२][ * * * * * ]

**स्पष्टीकरण तीन.**——नोंदणी प्रमाणपत्र रद्द झाले असेल त्याबाबतीत, रद्द करण्याच्या दिनांकापूर्वी केलेल्या विक्रीबाबत, त्या दिनांकानंतर मिळालेल्या किंवा मिळावयाच्या विक्रीच्या किंमतीच्या रकमा, दिलेल्या कालावधीतील विक्रीच्या उलाढालीमध्ये अंतर्भूत करण्यात येतील.

[३][(३४) '' वाहन '' यामध्ये, मोटार वाहन अधिनियम, १९८८ यात व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे असलेल्या माल वाहनाचा समावेश होतो; आणि] १९८८ चा ५९.

(३५) '' वर्ष '' याचा अर्थ, वित्तीय वर्ष, असा आहे.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३(८) द्वारे मूळ मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ (९) द्वारे मूळ मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ (१०) द्वारे हा खंड दाखल करण्यात आला.

## प्रकरण दोन

### कराचा भार व कर बसवणे.

कराचा भार. **३.** (१) नियत दिवसाच्या लगतपूर्वी पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये वैध किंवा परिणामकारक नोंदणी प्रमाणपत्र वा लायसन धारण करणारा अथवा नियत दिवसाच्या लगतपूर्वी समाप्त होणाऱ्या वर्षात, पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये कर भरण्यास पात्र असलेला प्रत्येक व्यापारी, उक्त वर्षातील त्याच्या खरेदी विक्रीची उलाढाल अशा कोणत्याही पूर्वीच्या कायद्यानुसार [१][पाच लाख रुपयांहून] अधिक होत असेल किंवा, यथास्थिती, उक्त वर्षात जो आयातकर्ता असताना [२][उक्त वर्षातील त्याची विक्रीची किंवा खरेदीची उलाढाल] एक लाख रुपयांहून अधिक झाली असेल तर, असा व्यापारी नियत दिवसापासून त्या अधिनियमाखाली, प्रमाणपत्र किंवा लायसन रीतसर रद्द करण्यात येईपर्यंत, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार कर भरण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**––या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, '' विक्रीची उलाढाल '' '' खरेदीची उलाढाल '' व '' आयातकर्ता '' या शब्दप्रयोगांना, पूर्वीच्या संबद्ध कायद्यान्वये नेमून दिलेले ते ते अर्थ असतील.

(२) ज्या व्यापाऱ्यास पोट-कलम (१) लागू होत नाही आणि ज्याची नियत दिनांकास सुरु होणाऱ्या वर्षात किंवा त्याच्या नंतरच्या कोणत्याही वर्षात [३][ सर्व विक्रीची उलाढाल] पोट-कलम (३) अन्वये असे दायित्व बंद होईपर्यंत, पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संबंधित मर्यादेपेक्षा प्रथमतः अधिक होईल तो व्यापारी, उक्त त्या त्या वर्षाच्या १ एप्रिलपासून या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असेल :

परंतु, उक्त त्या त्या वर्षाच्या १ एप्रिलपासून सुरु होणाऱ्या आणि उक्त त्या त्या वर्षाच्या १ एप्रिलपासून संगणना केल्यानुसार एखाद्या व्यापाऱ्याची विक्रीची उलाढाल [४][* * *] ही त्यास पोट-कलम (४) अन्वये लागू असलेल्या संबंधित मर्यादेपेक्षा जोपर्यंत अधिक होणार नाही तोपर्यंतच्या मुदतीत झालेल्या [५][विक्रीच्या] संबंधात, असा व्यापारी कर भरण्यास पात्र असणार नाही.

(३) या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र झालेला प्रत्येक व्यापारी, त्याची नोंदणी रीतसर रद्द करण्यात येईपर्यंत, अशा रीतीने कर भरण्यास पात्र असण्याचे चालू राहील ; आणि अशा रीतीने नोंदणी रद्द झाल्यावर, जो कोणताही कर अगोदरच आकारण्यात आला असेल किंवा आकारणीयोग्य असेल अशा कराव्यतिरिक्त इतर कर भरण्याचे त्याचे दायित्व, जोपर्यंत त्याची विक्रीची उलाढाल [६][* * *] पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संबंधित मर्यादेपेक्षा पुन्हा प्रथम अधिक होत नाही तोपर्यंत, किंवा, यथास्थिती, [७][पोट-कलम] (८) किंवा (९) अन्वये तो कर भरण्यास पात्र होईपर्यंत बंद राहील.

(४) या कलमाच्या प्रयोजनाकरिता [८][ विक्रीच्या उलाढालीच्या] मर्यादा पुढीलप्रमाणे असतील :––

(क) **[८][विक्रीच्या उलाढालीची] मर्यादा १,००,००० रुपये.**––जो आयातकर्ता आहे आणि वर्षभरात त्याने विकलेल्या किंवा खरेदी केलेल्या करपात्र मालाचे मूल्य १०,००० रुपयांपेक्षा कमी नाही, अशा व्यापाऱ्याच्या बाबतीत.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४ (१) (एक) द्वारे '' १० लाख रुपयांहून '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४(१) (दोन) द्वारे '' उक्त वर्षातील त्याची विक्रीची उलाढाल '' या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४(२) (एक) द्वारे '' सर्व विक्रींची उलाढाल किंवा सर्व खरेदीची उलाढाल '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४(२) (दोन) (क) द्वारे '' किंवा खरेदीची उलाढाल '' हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ४(२) (दोन) (ख) द्वारे '' विक्रीच्या आणि खरेदीच्या '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४(३) द्वारे '' किंवा खरेदीची उलाढाल '' हा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन २००६ चा महा. अधि. क्र. ३२, कलम ३८(१) द्वारे '' पोट-कलम (७) '' ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ३८(२) द्वारे '' उलाढाल '' या शब्दाऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(ख) [१][**विक्रीच्या उलाढालीची मर्यादा ५,००,००० रुपये**].––अन्य कोणत्याही बाबतीत, त्या वर्षात विक्री केलेल्या किंवा खरेदी केलेल्या करपात्र मालाचे मूल्य रु. १०,००० हून कमी नसेल अशा व्यापाऱ्याच्या बाबतीत.

(५) कराच्या दायित्वासाठी [२][विक्रीच्या उलाढालीच्या] मर्यादेची परिगणना करण्याच्या प्रयोजनाकरिता––

[३][(क) अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, सर्व [२][ विक्रीची उलाढाल मोजण्यात येईल–– मग अशी विक्री करपात्र मालाची असो वा नसो.]

(ख) अशा [२][ विक्रीच्या उलाढालीत ] व्यापाऱ्याने स्वतःहून केलेल्या आणि तसेच, त्याच्या प्रकर्त्याच्या वतीने–मग तो प्रकर्ता उघड केलेला असो वा नसो–केलेल्या सर्व विक्रीचा [४][* * *] समावेश असेल.

(ग) लिलाव करणाऱ्याच्या बाबतीत, खंड (क) आणि (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या [२][विक्रीच्या उलाढालीशिवाय] असल्यास, आणखी त्या [२][विक्रीच्या उलाढालीमध्ये] त्याने त्याच्या प्रकर्त्यासाठी लिलाव केलेल्या मालाच्या किंमतीचा जर अशा मालाची किंमत त्या प्रकर्त्याच्या वतीने त्याला प्राप्त झाली असेल तर, देखील, समावेश असेल,–मग इच्छुक खरेदीदाराची बोली त्याने स्वीकारलेली असो किंवा प्रकर्त्याने अथवा प्रकर्त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने स्वीकारलेली असो ;

(घ) अनिवासी व्यापाऱ्याच्या अभिकर्त्याच्या बाबतीत, खंड (क), (ख) किंवा (ग) मध्ये निर्दिष्ट केलेल्या [२][विक्रीच्या उलाढालीशिवाय] काही असल्यास, आणखी, त्या [२][विक्रीच्या उलाढालीमध्ये] अनिवासी व्यापाऱ्याने राज्यात केलेल्या विक्रीचा [५][* * *] देखील समावेश असेल.

(६) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही करारात किंवा कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, कलम २ च्या खंड (८), [६][उपखंड (क), (ख) किंवा (ग)] यांच्या कक्षेत येत असलेली कोणतीही व्यक्ती–मग प्रकर्ता हा व्यापारी असो किंवा नसो–आणि असा प्रकर्ता या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असो वा नसो–आणि प्रकर्ते उघड करण्यात आलले असोत वा नसोत–या अधिनियमाखाली कर भरण्यास पात्र असेल.

[७][* * * * * * ]

(८) या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असलेला व्यापारी, कलम ४४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) मध्ये किंवा पोट-कलम (४) मध्ये वर्णन केलेल्या रीतीने, कोणत्याही व्यक्तीकडून व्यवसायामध्ये उत्तराधिकारी म्हणून आला असेल तर, अशी व्यक्ती, या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, असा उत्तराधिकारी होण्याच्या दिनांकाला किंवा त्यानंतर तिच्याकडून झालेली मालाची विक्री किंवा खरेदी यावरील कर भरण्यास ती पात्र असेल आणि त्यानुसार पोट-कलम (२) च्या परंतुकामधील कोणतीही गोष्ट तिला कोणत्याही वर्षात लागू होणार नाही.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४(४) द्वारे, " उलाढालीची मर्यादा १०,००,००० रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, याच्या कलम ३८(३) (ख) द्वारे " उलाढाल " हा शब्द जेथे जेथे आला असेल तेथे त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३८(३) (क) द्वारे , खंड (क) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[४] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४(५) (एक) द्वारे " व खरेदीचा " हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ४(५) (दोन) द्वारे " किंवा खरेदीचा " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४(६) द्वारे " उपखंड (क), (ख) आणि (ग) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३२, कलम ३८(४) द्वारे " पोट-कलम (७) " वगळण्यात आले.

(९) जी, या कलमाच्या पूर्वगामी तरतुदींन्वये कर भरण्यास पात्र नसेल, परंतु जिने या अधिनियमाच्या तरतुदींन्वये स्वेच्छेने नोंदणी केलेली असेल, अशी कोणतीही व्यक्ती, तिला रीतसर दिलेले नोंदणी प्रमाणपत्र अंमलात आल्याच्या दिनांकापासून कर भरण्यास पात्र असेल आणि त्यानुसार पोट-कलम (२) च्या परंतुकामधील कोणतीही गोष्ट तिला कोणत्याही वर्षात लागू होणार नाही.

असलेले कर.

४. या अधिनियमाच्या आणि नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, जो या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र आहे अशा प्रत्येक व्यापाऱ्यांकडून किंवा, यथास्थिती, प्रत्येक व्यक्तीकडून, या अधिनियमाच्या आणि नियमांच्या तरतुदींनुसार बसवण्यायोग्य असलेला कर किंवा असलेले कर भरण्यात येईल किंवा येतील.

[1][विवक्षित मालावर कर न बसवता येणे.]

[1][५. या अधिनियमाच्या इतर तरतुदींना, आणि अनुसूची क च्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक मालाच्या बाबतीत, कोणत्याही शर्ती अथवा अपवाद घालून दिले असल्यास त्यांना अधीन राहून, त्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही मालाच्या विक्रीवर कोणताही कर देय असणार नाही.]

[2][अनुसूच्यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालावर विक्रीकर बसवणे.]

[2][६. अनुसूची ख, ग, घ, किंवा, यथास्थिती, ङ यांच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालाच्या विक्रीच्या उलाढालीवर, त्या त्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये, त्या प्रत्येक मालाच्या समोर घालून दिलेल्या दरांनी, विक्रीकर बसविला जाईल.]

[3][आवेष्टनासाठी वापरण्यात येणाऱ्या सामग्रीवरील कराचा दर.]

[3][७. जेव्हा कोणत्याही मालाची विक्री करण्यात आली असेल आणि असा माल कोणत्याही सामग्रीत आवेष्टित केला असेल तेव्हा, अशाप्रकारे आवेष्टित केलेल्या मालाच्या विक्रीवर ज्या दराने कर देय आहे त्याच दराने, कोणताही असल्यास, अशा आवेष्टनासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीच्या विक्रीवर कलम ६ अन्वये कर वसुलीयोग्य असेल–मग अशा सामग्रीबद्दल निराळा आकार घेण्यात आलेला असो किंवा नसो.]

विवक्षित विक्री व खरेदी करासाठी पात्र नसणे.

८. (१) जेव्हा कोणत्याही मालाची विक्री किंवा खरेदी,––

(क) (एक) राज्याबाहेर ; किंवा

(दोन) भारताच्या राज्यक्षेत्रात माल आयात करण्याच्या ओघात, किंवा अशा राज्यक्षेत्राबाहेर माल निर्यात करण्याच्या ओघात ; किंवा

(ख) आंतरराज्य व्यापार अथवा वाणिज्य व्यवहार यांच्या ओघात, करण्यात आली असेल तेव्हा,

कोणत्याही मालाच्या अशा विक्रीवर किंवा खरेदीवर या अधिनियमातील किंवा त्या अन्वये केलेल्या नियमांतील किंवा अधिसूचनेतील कोणत्याही गोष्टीमुळे मुळातच कर लादण्यात येतो किंवा लादण्यास प्राधिकृत केले जाते, असे मानले जाणार नाही ;

आणि त्याप्रमाणे या अधिनियमाच्या व उक्त नियमांच्या व अधिसूचनांच्या तरतुदी वाचल्या जातील व त्यांचा अर्थ लावला जाईल.

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ५ द्वारे, मूळ कलम ५ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे, मूळ कलम ६ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे, मूळ कलम ७ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

**स्पष्टीकरण.**---या कलमाच्या प्रयोजनासाठी, एखादी विक्री किंवा खरेदी---

(एक) राज्याबाहेर ; किंवा

(दोन) भारताच्या राज्यक्षेत्रात माल आयात करण्याच्या ओघात, किंवा अशा राज्यक्षेत्राबाहेर माल निर्यात करण्याच्या ओघात ; किंवा

(तीन) आंतरराज्य व्यापार किंवा वाणिज्य व्यवहार करण्याच्या ओघात,

झाली आहे किंवा नाही हे, केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ याची कलमे ३, ४ आणि ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तत्त्वांनुसार ठरविण्यात येईल. १९५६ चा ७४.

(२) परदेशी विमान (इंधनावरील कर आणि शुल्क यामधून सवलत) अधिनियम, २००२ च्या कलम ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, केंद्र सरकारने काढलेल्या अधिसूचनेनुसार, भारताशिवाय अन्य देशात नोंदणी झालेल्या कोणत्याही विमानाचा भाग असणाऱ्या पात्रामध्ये भरल्या जाणाऱ्या इंधनाच्या किंवा वंगणाच्या विक्रीवर, जर--- २००२ चा ३६.

(क) उक्त देश हा, आंतरराष्ट्रीय आणि मुलकी विमान चालन अभिसंधी, १९४४ मधील पक्षकार असेल, आणि

(ख) उक्त देशाने भारताशी विमानसेवा करार केलेला असेल ; आणि

(ग) हे विमान भारताकडे आणि भारताकडून जाताना पूर्व नियोजित असलेल्या वा नसलेल्या सेवानुसार कार्यरत असेल,

तर, कोणताही कर बसविला जाणार नाही.

[१][ (३) राज्य शासनास, **राजपत्रात** सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून आणि त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्या असतील अशा शर्तींना आणि निर्बंधांना अधीन राहून, विशेष आर्थिक क्षेत्राच्या कोणत्याही युनिटने, विशेष आर्थिक क्षेत्राच्या विकासकाने, शंभर टक्के निर्यात अभिमुख असलेल्या कोणत्याही युनिटने, सॉफ्टवेअर तंत्रज्ञान केंद्राच्या कोणत्याही युनिटने किंवा इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर तंत्रज्ञान केंद्राने केलेल्या मालाच्या विक्रीच्या वर्गाला किंवा वर्गांना, कर भरण्यातून सूट देता येईल.

**स्पष्टीकरण.**---या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी,---

(क) '' विशेष आर्थिक क्षेत्रातील युनिट '' याचा अर्थ,---

(एक) केंद्र सरकारने किंवा, यथास्थिती, राज्य शासनाने, विशेष आर्थिक क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे, अशा क्षेत्रात असलेले युनिट, आणि

(दोन) आयुक्ताने प्रमाणित केलेले युनिट, असा आहे ;

(ख) '' सॉफ्टवेअर तंत्रज्ञान केंद्रातील युनिट '' याचा अर्थ,---

(एक) भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाद्वारे, अधिसूचित करण्यात आलेल्या सॉफ्टवेअर तंत्रज्ञान केंद्र योजनेनुसार उभारण्यात आलेले ; आणि

(दोन) आयुक्ताने प्रमाणित केलेले आहे, असे युनिट, असा आहे.

(ग) '' इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर तंत्रज्ञान केंद्रातील युनिट '' याचा अर्थ,---

(एक) भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या, इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर तंत्रज्ञान केंद्र योजनेनुसार स्थापन केलेले, आणि

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ८ (१) द्वारे, पोट-कलम (३) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(दोन) आयुक्ताने प्रमाणित केलेले युनिट, असा आहे.

(घ) " शंभर टक्के निर्यात अभिमुख युनिट " याचा अर्थ,—

(एक) उद्योग (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१, याच्या कलम १४, आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम, यांनी प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, केंद्र सरकारने, या संबंधात नियुक्त केलेल्या मंडळाने, शंभर टक्के निर्यात-अभिमुख युनिट म्हणून मान्यता दिलेले ; आणि १९५१ चा ६५.

(दोन) आयुक्ताने प्रमाणित केलेले युनिट, असा आहे.]

[1][ (ङ) विशेष आर्थिक क्षेत्राचा विकासक, याचा अर्थ,—

(एक) ज्याने विशेष आर्थिक क्षेत्राचा विकास, दुरुस्ती, देखभाल आणि सुधारणा ही कामे हाती घेतलेली आहेत, आणि

(दोन) ज्याला आयुक्ताने प्रमाणपत्र दिलेले आहे, असा विकासक, असा आहे ;

(च) युनिटमध्ये विशेष आर्थिक क्षेत्रात असलेल्या आस्थापनेचा समावेश होतो.

[2][ (३क) राज्य शासनास, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, आणि उक्त आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्ती, अपवाद व निर्बंध यांना अधीन राहून, केंद्र सरकारकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येणाऱ्या विदेश व्यापार धोरणामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, व्यापाऱ्यांच्या कोणत्याही वर्गाला कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्याने, केलेल्या मालाच्या विक्रीच्या कोणत्याही वर्गासंबंधात किंवा वर्गासंबंधात कर प्रदान करण्यातून सूट देता येईल.

(३ख) राज्य शासनास, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, आणि उक्त आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्ती, अपवाद व निर्बंध यांना अधीन राहून,—

(क) कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्याने, उपाहारगृह भांडार विभागाला अथवा भारतीय नौदल उपाहारगृह सेवांना केलेल्या ;

(ख) उपाहारगृह भांडार विभागाने अथवा भारतीय नौदल उपाहारगृह सेवांनी, सशस्त्र दलाच्या उपाहारगृह चालविणाऱ्या युनिटला किंवा सदस्यांना केलेल्या ;

(ग) उपाहारगृह चालविणाऱ्या युनिटने सशस्त्र दलाच्या सदस्यांना केलेल्या,—

मालाच्या विक्रीच्या कोणत्याही वर्गासंबंधात किंवा वर्गासंबंधात कर प्रदान करण्यातून पूर्णतः किंवा अंशतः सूट देता येईल.];

[3][(४) राज्य शासन, या संबंधात, **राजपत्रात** सर्वसाधारण किंवा विशेष आदेश प्रसिद्ध करुन आणि त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्या असतील अशा शर्तींना आणि निर्बंधांना अधीन राहून, कलम ८८ खाली व्याख्या केल्याप्रमाणे, हक्कदारी प्रमाणपत्र धारण करणाऱ्या आणि ज्यांना प्रोत्साहक योजनेअंतर्गत, कर भरण्यातून सूट देण्याच्या रुपात प्रोत्साहके देण्यात आली आहेत अशा युनिटाने केलेल्या कोणत्याही मालाच्या विक्रीच्या वर्गाच्या किंवा वर्गांच्या संबंधात, संपूर्ण कर प्रदान करण्यापासून सूट देता येईल.]

[4][(५) राज्य शासनास, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, आणि उक्त आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व निर्बंध, कोणतेही असल्यास, यांना अधीन राहून, कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्याने,—

(क) राज्य शासनाला,

(ख) केंद्र सरकारला,

---

[1] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३९ (क) द्वारे, पुढील खंड जादा दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३९ (ख) द्वारे, पोट-कलम (३) नंतर पोट-कलम (३क) दाखल करण्यात आले.

[3] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, याच्या कलम ८ (२) द्वारे, मूळ पोट-कलम (४) ऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३९ (ग) द्वारे, पोट-कलम (५) दाखल करण्यात आले.

(ग) वीज निर्मितीच्या वापराकरिता विद्युत अधिनियम, २००३ मध्ये व्याख्या केलेल्या वीज निर्मिती कंपनीला, २००३ चा ३६.

(घ) वीज पारेषणाच्या वापराकरिता विद्युत अधिनियम, २००३ अन्वये पारेषणासाठी असलेले लायसन धारण करणाऱ्या नोंदणीकृत व्यापाऱ्याला, २००३ चा ३६.

(ङ) वीज वितरणाच्या वापराकरिता विद्युत अधिनियम, २००३ अन्वये वीज वितरणाकरिता असलेले लायसन धारण करणाऱ्या नोंदणीकृत व्यापाऱ्याला, २००३ चा ३६.

(च) महानगर टेलिफोन निगम मर्यादित याला,

(छ) भारत संचार निगम मर्यादित याला,

(ज) दूरध्वनी ग्राहकांपर्यंत थेट दूरध्वनी सेवा पोहोचविण्याकरिता दूरध्वनी सेवा केंद्र स्थापन करणे, त्याचे परिरक्षण करणे आणि ते चालवणे यांसाठी भारतीय तार अधिनियम, १८८५ आणि भारतीय बिनतारी संदेश व्यवस्था अधिनियम, १९३३ अन्वये दिलेले लायसन धारण करणाऱ्या कोणत्याही दूरध्वनी सेवा पुरवठाकाराला, केलेल्या कोणत्याही विक्रीच्या संबंधात किंवा मालाच्या विक्रीच्या वर्गाच्या संबंधात कर प्रदान करण्यातून पूर्णतः किंवा अंशतः सूट देता येईल.]

१८८५ चा १३. १९३३ चा १७.

अनुसूचीमध्ये सुधारणा.

९. (१) राज्य शासनास, वेळोवेळी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,--

(क) अनुसूचीमध्ये कोणतीही नोंद जादा दाखल करुन, किंवा फेरबदल करुन किंवा वगळून अनुसूचीमध्ये सुधारणा करता येईल आणि त्यानंतर ती अनुसूची, कर बसविण्याच्या प्रयोजनासाठी त्यानुसार सुधारणा केल्याप्रमाणे लागू असेल,

(ख) कराचा दर कमी करण्याची किंवा वाढविण्याची अथवा जेथे कराचा दर विनिर्दिष्ट केलेला नाही तेथे दर विनिर्दिष्ट करण्याची तरतूद करता येईल आणि त्यानंतर ती अनुसूची, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, सुधारणा केल्याप्रमाणे लागू असेल :

[१][ * * * * * * ]

परंतु, [२][ * * * ] कराचा दर वाढवण्यासाठी तरतूद करणारी कोणतीही अधिसूचना नियत दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर काढण्यात येणार नाही आणि अशा कालावधीत अशा एकाहून अधिक अधिसूचना काढण्यात येणार नाहीत.

(२) कलम ८३ च्या [३][पोट-कलम (६) मधील] राज्य शासनाने केलेल्या नियमांसंबंधीच्या, तरतुदी, जशा त्या राज्य शासनाने केलेल्या नियमांना लागू होतात, त्याचप्रमाणे, पोट-कलम (१) खाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेला, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ९ (१) (अ) द्वारे, पहिले परंतुक वगळण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ९ (१) (ब) द्वारे, " आणखी असे की," हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९ (२) द्वारे, " पोट कलम (५) मधील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण तीन

## विक्रीकर प्राधिकारी व न्यायाधिकरण

विक्रीकर प्राधिकारी.

**१०.** (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राज्य शासन, विक्रीकर आयुक्त या नावाने संबोधावयाच्या एका अधिकाऱ्याची नियुक्ती करील.

(२) त्याचप्रमाणे, राज्य शासनाला त्यास आवश्यक वाटतील इतक्या संख्येत अपर विक्रीकर आयुक्त, आणि---

(क) सह आयुक्त,

(ख) वरिष्ठ उप आयुक्त,

(ग) उप आयुक्त,

(घ) सहायक आयुक्त,

(ङ) विक्रीकर अधिकारी, व

(च) इतर अधिकारी व व्यक्ती,

नियुक्त करता येतील व त्यांना, शासनास आवश्यक वाटतील अशी पदनामे देता येतील.

(३) आयुक्तास संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर अधिकारिता असेल ; [१][ * * * * ] इतर सर्व अधिकाऱ्यांना संपूर्ण राज्यभर किंवा आयुक्त, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा स्थानिक क्षेत्रात, अधिकारिता असेल.

(४) आयुक्ताला, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये त्याला प्रदान करण्यात आले असतील ते सर्व अधिकार असतील व तो अशा अधिकारांचा वापर करील व त्याच्यावर लादण्यात आली असतील ती सर्व कर्तव्ये पार पाडील आणि कोणत्याही अपर विक्रीकर आयुक्ताची किंवा अपर विक्रीकर आयुक्तांची नेमणूक करण्यात आली असेल तर, त्याला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे [२][आयुक्ताने अन्यथा निदेश दिला असेल] त्याच्याव्यतिरिक्त, त्याच्या किंवा त्यांच्या अधिकारितेत, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये आयुक्ताला प्रदान केलेले सर्व अधिकार असतील व तो किंवा ते अशा सर्व अधिकारांचा वापर करील किंवा करतील व लादलेली अशी सर्व कर्तव्ये पार पाडील किंवा पाडतील.

(५) सह आयुक्त, आपल्या अधिकारितेत, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, आयुक्ताने अन्यथा निदेश दिला असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये आयुक्तास जे अधिकार देण्यात आले असतील त्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि लादलेली सर्व कर्तव्ये पार पाडील.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १० (१) द्वारे, "आणि जर कोणत्याही " या मजकुराने सुरू होणारा आणि " अधिकारिता असेल " या मजकुराने संपणारा मजकूर वगळण्यात यावा.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १० (२) द्वारे, " राज्य शासनाने अन्यथा निदेश दिला असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(६) वरिष्ठ उप आयुक्त, उप आयुक्त, सहायक आयुक्त, विक्रीकर अधिकारी, इतर अधिकारी व व्यक्ती या आपल्या अधिकारितेत, आयुक्त, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे लादील अशा शर्तीना व निर्बंधांना अधीन राहून, आयुक्ताचे या अधिनियमाखालील जे अधिकार व जी कर्तव्ये, तो एकतर सर्वसाधारणपणे किंवा कोणत्याही विशिष्ट बाबीच्या किंवा बाबींच्या वर्गाच्या संबंधात **राजपत्रात** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे सोपवील, अशा अधिकारांचे पालन करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

(७) राज्य शासनाला, ते लादील अशा निर्बंधांना व शर्तीना, कोणत्याही असल्यास, अधीन राहून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, शासनाकडे पोट-कलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेले (अपर आयुक्त किंवा सह आयुक्त यांच्या नेमणुकीचे अधिकार नसतील असे) अधिकार आयुक्ताकडे प्रत्यायोजित करता येतील.

(८) कोणत्याही व्यक्तीला, पोट-कलम (२) अन्वये नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा व्यक्तीने या अधिनियमान्वये किंवा आधीच्या कोणत्याही कायद्यान्वये दिलेला कोणताही पत्रव्यवहार, सूचना, आदेश किंवा काढलेली कोणतीही नोटीस अशा व्यक्तीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, अशा अधिकाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या प्रादेशिक अधिकारितेसह, अधिकाराचा कोणताही वापर कोणत्याही कार्यवाहीमध्ये, प्रश्नास्पद करण्याचा हक्क असणार नाही. उपरोक्त कालावधीच्या आत अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा व्यक्तीकडे त्या अधिकाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या अधिकाराच्या वापरास आक्षेप घेणारा विहित नमुन्यातील लेखी अर्ज सादर करण्यात आला असेल तर, तो अधिकारी किंवा ती व्यक्ती, तो प्रश्न विचारार्थ आयुक्ताकडे पाठवील आणि आयुक्त, आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्या प्रश्नांचा निर्णय करणारा आदेश देईल. आयुक्ताने दिलेला आदेश अंतिम असेल.

(९) पोट-कलम (२) अन्वये नेमलेले सर्व अधिकारी व सर्व व्यक्ती, आयुक्ताला दुय्यम असतील ; आणि आयुक्ताव्यतिरिक्त इतर अधिकारी व व्यक्ती यांची आपापसातील दुय्यमता ही विहित करण्यात येईल अशी असेल.

(१०) आयुक्ताला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, त्याला दुय्यम असणाऱ्या प्राधिकाऱ्यांना, आणि अधिकाऱ्यांना, त्यास योग्य वाटतील अशा सूचना व निदेश, वेळोवेळी देता येतील, आणि असे प्राधिकारी आणि अधिकारी आयुक्ताच्या अशा सूचना व निदेश यांचे पालन आणि अनुसरण करतील :

परंतु,—

(एक) कोणत्याही प्राधिकाऱ्यास विशिष्ट आदेश काढण्यास किंवा विशिष्ट प्रकरणे विशिष्ट रीतीने निकालात काढण्यास भाग पाडण्यात येईल ; किंवा

(दोन) कोणत्याही विशिष्ट प्रकरणामध्ये, अपील प्राधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयात हस्तक्षेप करावा लागेल,

अशा कोणत्याही सूचना किंवा निदेश दिले जाणार नाहीत :

परंतु आणखी असे की, जनहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे, असे आयुक्ताचे मत असेल तर, त्यास अशा सूचना व निदेश सर्वसाधारण माहितीसाठी प्रसिद्ध करण्याची व वितरित करण्याची व्यवस्था करता येईल.

न्यायाधिकरण. **११.** (१) '' महाराष्ट्र विक्रीकरण न्यायाधिकरण '' या नावाचे एक न्यायाधिकरण असेल, हे न्यायाधिकरण, या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये न्यायाधिकरणास प्रदान करण्यात आलेली कामे योग्यरितीने पार पाडण्यासाठी राज्य शासनाला वेळोवेळी आवश्यक वाटेल अशा संख्येतील, राज्य शासनाने नेमलेल्या सदस्यांचे मिळून बनलेले असेल.

(२) राज्य शासन न्यायाधिकरणाच्या सदस्यांपैकी एका सदस्याची, न्यायिक सेवेतील त्याच्या सेवाज्येष्ठतेच्या आधारावर, त्या न्यायाधिकरणाचा अध्यक्ष म्हणून नेमणूक करील.

(३) न्यायाधिकरणाच्या सदस्यपदांची अर्हता आणि शर्ती विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील, आणि विहित करण्यात येईल अशा किंवा राज्य शासन, त्यांच्या बाबतीत, विशेष आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा कालावधीसाठी तो सदस्य पद धारण करील.

(४) न्यायाधिकरणाच्या सदस्यांपैकी कोणत्याही सदस्याची रिकामी झालेली जागा राज्य शासन, व्यवहार्य असेल तितक्या लवकर भरील.

(५) न्यायाधिकरणाची कामे, अध्यक्ष ठरवील त्याप्रमाणे, कोणत्याही सदस्याकडून, एकतर एकट्याने किंवा दोन वा अधिक सदस्यांच्या न्यायपीठामार्फत पार पाडता येतील.

(६) न्यायपीठाच्या सदस्यांमध्ये मतभिन्नता असेल त्याबाबतीत, बहुमत असल्यास, असा बहुमताने दिलेला निर्णय हा न्यायाधिकरणाचा किंवा न्यायमंडळाचा निर्णय असेल ; परंतु सदस्यांची समप्रमाणात विभागणी झाली असेल तर, ज्या मुद्यावर किंवा मुद्यांवर त्यांचे मतैक्य झाले नसेल तो मुद्दा किंवा ते मुद्दे, ते नमूद करतील आणि न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, ते प्रकरण अशा मुद्यावर किंवा मुद्यांवर सुनावणी करण्यासाठी त्याच्या स्वतःसह, न्यायाधिकरणाच्या अन्य एका किंवा अधिक सदस्यांकडे पाठवील ; आणि ज्यांनी त्या प्रकरणाची प्रथम सुनावणी केली असेल अशा सदस्यांसह, ज्यांनी त्याची सुनावणी केली असेल त्या न्यायाधिकरणाच्या सदस्यांच्या बहुमताप्रमाणे त्या मुद्यावर किंवा मुद्यांवर निर्णय करण्यात येईल.

(७) कोणत्याही न्यायपीठाने कोणत्याही मुद्यावर किंवा वादप्रश्नावर अगोदर घेतलेल्या कोणत्याही निर्णयाचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे, असे कोणत्याही कारवाईच्या ओघात न्यायपीठाचे मत असेल तर, किंवा न्यायाधिकरणाच्या कोणत्याही न्यायपीठाने कोणत्याही मुद्यावर किंवा वादप्रश्नावर घेतलेल्या अगोदरच्या निर्णयापेक्षा भिन्न निर्णय घेण्याचा अशा न्यायपीठाचा विचार असेल तर, ते न्यायपीठ मोठ्या न्यायपीठाची रचना करण्यासाठी अध्यक्षाकडे तो मुद्दा किंवा वादप्रश्न विचारार्थ पाठवील. त्यानंतर अध्यक्ष, तो ठरवील अशा न्यायाधिकरणाच्या सदस्यांचे एक मोठे न्यायपीठ बनवील. अशा मोठ्या न्यायपीठाचे अध्यक्षपद, जेथवर व्यवहार्य असेल तेथवर, अध्यक्ष स्वीकारील. अशा मोठ्या न्यायपीठाच्या सदस्यांनी बहुमताने घेतलेल्या निर्णयानुसार त्या मुद्याबाबत किंवा वादप्रश्नाबाबत निर्णय करण्यात येईल. जेव्हा कोणताही सदस्य, अध्यक्षसुद्धा, एकटा असेल त्यावेळी त्याला ; अशाच प्रकारच्या परिस्थितीमध्ये मोठे न्यायपीठ घटित करण्यासाठी अध्यक्षाकडे ते प्रकरण विचारार्थ पाठवता येईल.

(८) न्यायाधिकरणास, व्यापाऱ्याला किंवा, यथास्थिती, व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, खर्च (Costs) देण्यासंबंधी निवाडा देण्याचा अधिकार असेल, आणि अशा खर्चाची रक्कम, ती देण्याविषयी ज्यास आदेश देण्यात आला असेल अशा व्यापाऱ्याकडून किंवा व्यक्तीकडून कराच्या थकबाकीच्या वसुलीसाठी या अधिनियमात तरतूद केलेल्या रीतीने वसुलीयोग्य असेल.

(९) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने न्यायाधिकरण आपल्या कार्यपद्धतीचे तसेच ज्या ठिकाणी न्यायाधिकरणाची, त्याच्या न्यायपीठांची किंवा सदस्यांची बैठक घेण्यात येईल ते ठिकाण किंवा ती ठिकाणे आणि त्यांचे कामकाज याचे, नियमन करण्याच्या प्रयोजनासाठी या अधिनियमाच्या, नियमांच्या व अधिसूचनांच्या तरतुदींशी, सुसंगत असे विनियम करील.

(१०) पोट-कलम (९) अन्वये केलेले विनियम **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

तापदायक आदेश किंवा बुद्धिपुरस्सर न्यून निर्धारण, इत्यादी याबद्दल एखाद्या प्राधिकाऱ्याविरुद्ध कारवाई.

**१२.** (१) आयुक्तास,—

(एक) या अधिनियमानुसार कर देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यापाऱ्याकडून किंवा व्यक्तीकडून, किंवा कलम १० खाली नियुक्त केलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून कोणत्याही विशिष्ट प्राधिकाऱ्याने अशा व्यापाऱ्यांच्या किंवा व्यक्तीच्या संबंधातील कार्यवाहीत खोटा किंवा तापदायक आदेश काढलेला आहे किंवा या नियमान्वये सूडबुद्धीने कोणतीही कारवाई केलेली आहे अथवा या अधिनियमान्वये किंवा त्याद्वारे तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही अर्जावर वाजवी वेळात कार्यवाही करण्याचे सूडबुद्धीने टाळले आहे, अशा अर्थाची विहित नमुन्यामधील कोणतीही तक्रार आल्यावर, किंवा

(दोन) एखाद्या विशिष्ट प्राधिकाऱ्याने कोणत्याही व्यापाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या बाबतीत जाणूनबुजून किंवा बुद्धिपुरस्सर न्यून निर्धारण केले आहे किंवा खोटा अथवा तापदायक आदेश काढला आहे किंवा या अधिनियमान्वये सूडबुद्धीने कोणतीही कारवाई केलेली आहे, अथवा या अधिनियमान्वये किंवा त्याद्वारे तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही अर्जावर वाजवी वेळेत कारवाई करण्याचे सूडबुद्धीने टाळले आहे अशा अर्थाचा अहवाल न्यायाधिकरणाकडून मिळाल्यावर ; किंवा

(तीन) कोणत्याही प्राधिकाऱ्याने असा आदेश काढला आहे किंवा अशी कारवाई केली आहे, किंवा असे न्यून निर्धारण केले आहे किंवा कोणत्याही अर्जावर अशारितीने कार्यवाही केलेली नाही असे त्यास सकारण वाटेल, तर त्यास स्वतः होऊन,

[1][ * * * ] रीतसर चौकशी किंवा कारवाई सुरु करता येईल आणि त्याच्या मते अशा विशिष्ट प्राधिकाऱ्याविरुद्धच्या किंवा अधिकाऱ्याविरुद्धच्या प्रकरणात सकृतदर्शनी तथ्य दिसत असेल तर त्यास, अशा अधिकाऱ्याविरुद्ध, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ किंवा महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेले इतर संबद्ध नियम याअन्वये यथोचित कारवाई सुरु करता येईल. आयुक्त, खंड (एक) मध्ये नमूद केलेली तक्रार किंवा खंड (दोन) मध्ये तरतूद केलेला अहवाल प्राप्त झाल्यापासून एक वर्षाच्या आत, उक्त तक्रार करणाऱ्या व्यक्तीला किंवा व्यापाऱ्याला अथवा न्यायाधिकरणाला, संबंधित प्राधिकाऱ्याविरुद्ध किंवा अधिकाऱ्याविरुद्ध त्याने एखादी कारवाई सुरु करण्याचे ठरविले आहे किंवा नाही अथवा सुरु केली आहे किंवा नाही याविषयीची सूचना पाठवील.

(२) आयुक्ताला जर एखाद्या व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने केलेली तक्रार खोटी किंवा खोडसाळ असल्याचे आणि या अधिनियमाच्या प्रयुक्तीला किंवा प्रयोजनांना निष्फळ करण्याच्या दृष्टीने केलेली आहे, असे दिसून आले तर, ती तक्रार मिळाल्यापासून एक वर्षाच्या आत, त्या व्यक्तीला किंवा त्या व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, तो, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे, पाच हजारांहून अधिक नसेल इतका दंड त्याच्यावर बसवील आणि असा बसवलेला दंड, कराच्या थकबाकीच्या वसुलीसाठी या अधिनियमात तरतूद केलेल्या रीतीने वसूल करण्यात येईल.

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ११ द्वारे, " त्याबाबतीत अहवाल मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत " हा मजकूर वगळण्यात आला.

कलम १० अन्वये नेमलेल्या व्यक्ती व न्यायाधिकरणाचे सदस्य लोकसेवक असणे.

**१३.** कलम १० अन्वये नेमलेले आयुक्त आणि सर्व अधिकारी व व्यक्ती आणि न्यायाधिकरणाचे सर्व सदस्य हे, भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

न्यायाधिकरणाचे व आयुक्ताचे अधिकार.

**१४.** (१) या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये त्यांची कार्ये पार पाडताना न्यायाधिकरणास आणि आयुक्तास खालील प्रयोजनांसाठी, दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील :—

(क) शपथपत्रावर वस्तुस्थितीचे पुरावे घेणे ;

(ख) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलावणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर किंवा प्रतिज्ञेवर तिची तपासणी करणे ;

(ग) कागदपत्रे सादर करण्यास भाग पाडणे ; आणि

(घ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी करावयाच्या कोणत्याही शपथपत्राच्या बाबतीत, न्यायाधिकरणाने किंवा आयुक्ताने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास जबानीदाराला शपथ देता येईल.

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना बाध न येता, जेव्हा, विवक्षित ठिकाणी व वेळी एकतर साक्ष देण्यासाठी उपस्थित राहण्यासाठी किंवा लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा इतर कागदपत्रे सादर करण्यासाठी न्यायाधिकरणाने किंवा आयुक्ताने जिच्या नावे समन्स काढले असेल अशी व्यक्ती त्या ठिकाणी व त्या वेळी, उपस्थित राहण्याचे किंवा लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा कागदपत्रे सादर करण्याचे हेतुपूर्वक टाळील त्याबाबतीत न्यायाधिकरणाला, किंवा, यथास्थिति, आयुक्ताला, त्यास योग्य वाटेल असा पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतका दंड त्या व्यक्तीवर लादता येईल ; व अशा रितीने आकारण्यात आलेला दंड कराच्या थकबाकीच्या वसुलीसाठी या अधिनियमात तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल :

परंतु, असा कोणताही दंड लादण्यापूर्वी, संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(४) आयुक्ताने, जिच्या नावे समन्स काढले होते अशा व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने कोणतीही कागदपत्रे सादर केली असतील आणि अशा व्यापाऱ्याने अथवा अन्य कोणत्याही व्यापाऱ्याने, त्याच्याकडून येणे असलेला कोणताही कर देण्याची टाळाटाळ केली आहे किंवा तो असा कोणताही कर देण्यात टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करीत आहे व अशा व्यापाऱ्याकडून किंवा व्यक्तीकडून सादर करण्यात आलेली कागदपत्रे अशा व्यापाऱ्याविरुद्ध दावा दाखल करण्यासाठी आवश्यक आहेत, असे आयुक्ताचे मत असेल त्याबाबतीत, आयुक्तास त्याबद्दलची कारणे लेखी नमूद करुन, ती कागदपत्रे ताब्यात घेता येतील व तो त्याबाबतची पावती देईल आणि [१][या अधिनियमाखालील कामकाजाच्या संदर्भात किंवा खटला भरण्यासाठी] आवश्यक असतील तोपर्यंत तो ती ठेवून घेईल :

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १२ द्वारे, " या अधिनियमाखालील कामकाजाच्या संदर्भात किंवा कोणत्याही कायद्यान्वये खटला भरण्यासाठी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, कोणत्याही अधिकृत प्रयोजनार्थ, कोणत्याही सांविधिक प्राधिकाऱ्याने मूळ दस्तऐवज देण्याबाबत फर्मावल्यास उक्त दस्तऐवज आवश्यक असेल, अशा प्राधिकाऱ्याला अशा प्रयोजनांसाठी व अशा कालावधीसाठी उपलब्ध करून देण्यात येईल.

**१५.** या अधिनियमान्वये किंवा नियमांन्वये किंवा अधिसूचनांन्वये सद्भावनेने केलेल्या [1][किंवा करण्याचे योजिलेल्या] कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. क्षतिपूर्ती.

प्रकरण चार

## नोंदणी

**१६.** (१) कोणताही व्यापारी या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असताना, या अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे वैध नोंदणी प्रमाणपत्र बाळगत नसेल, तर तो व्यापारी म्हणून धंदा चालवणार नाही : नोंदणी.

परंतु, असा व्यापारी या कलमात तरतूद केल्याप्रमाणे विहित मुदतीत नोंदणीसाठी अर्ज करुन असा धंदा चालवत असेल तर, या पोट-कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन झालेले नाही, असे मानले जाईल :

१९५९ चा मुंबई ५१. परंतु, आणखी असे की, जर कोणताही व्यापारी, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ अन्वये दिलेले नियत दिनांकाच्या लगतपूर्वी परिणामक अथवा वैध असलेले नोंदणी प्रमाणपत्र धारण करीत असेल तर, त्याने, उक्त प्रमाणपत्र या अधिनियमान्वये यथोचितरित्या रद्द होत नाही तोपर्यंत, या कलमान्वये नवीन प्रमाणपत्रासाठी अर्ज करणे आवश्यक असणार नाही :

१९५९ चा मुंबई ५१. परंतु, तसेच मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ याव्यतिरिक्त इतर कोणत्याही कायद्यान्वये, नियत दिनांकापूर्वी दिलेले परिणामक असलेले नोंदणी प्रमाणपत्र किंवा, यथास्थिती, लायसन धारण करणाऱ्या व्यापाऱ्याने—तो असे परिणामक प्रमाणपत्र धारण करीत असला तरीही—या कलमान्वये नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी अर्ज करणे आवश्यक असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये ज्याने नोंदणी प्रमाणपत्र बाळगणे आवश्यक असेल असा किंवा नोंदणी करवून घेण्यास स्वेच्छेने इच्छुक असेल असा प्रत्येक व्यापारी विहित रीतीने प्राधिकाऱ्याकडे अर्ज करील.

(३) [2][विहित प्राधिकारी, अर्जाची छाननी केल्यानंतर आणि त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि नोंदणीसाठी केलेला अर्ज नियमानुसार आहे आणि विहित केलेल्या शर्ती पूर्ण केल्या आहेत, याबद्दल त्याची खात्री पटल्यावर, अर्जदाराची नोंद करील व त्याला विहित नमुन्यातील नोंदणी प्रमाणपत्र देईल]:

परंतु, अर्ज पूर्ण नाही अथवा अर्जदाराने, नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी विहित केलेली माहिती किंवा दस्तऐवज सादर केलेले नाहीत किंवा [3][ * * * * ] विहित शर्ती पूर्ण केलेल्या नाहीत असे विहित प्राधिकाऱ्यास आढळून आले तर, त्याला, अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अर्ज नाकारण्याची कारणे लेखी नमूद करून अर्ज फेटाळता येईल.

(४) या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीअन्वये पुरवण्यात आलेली किंवा अन्यथा मिळालेली कोणतीही माहिती विचारात घेतल्यानंतर, आयुक्तास कोणत्याही नोंदणी प्रमाणपत्रात वेळोवेळी सुधारणा करता येईल.

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १३ द्वारे, " किंवा करण्याचे प्रस्तावित केलेल्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १४ (१) द्वारे, " विहित प्राधिकारी " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " नोंदणी प्रमाणपत्र देईल " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १४ (२) द्वारे, " अर्ज स्वेच्छेने सादर करण्यात आला असेल अशा बाबतीत " हा मजकूर वगळण्यात आला.

(५) स्वतःची नोंदणी करवून घेतलेली कोणतीही व्यक्ती किंवा व्यापारी, त्याच्या प्रकरणामध्ये नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक नव्हते असे मागाहून आढळून आले असले तरी, त्याचे नोंदणी प्रमाणपत्र परिणामक असेपर्यंतच्या कालावधीत कर भरण्यास पात्र असेल.

(६) जेव्हा,—

(क) ज्याच्या बाबतीत या कलमान्वये नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले असेल असा कोणताही धंदा बंद करण्यात आला असेल किंवा अन्यथा तो निकालात काढण्यात आला असेल, किंवा हस्तांतरित करण्यात आला असेल, [१][ * * * * ] किंवा

(ख) कलम ३ अन्वये कर भरण्यास पात्र झाला आहे अशा एखाद्या नोंदणीकृत व्यापाऱ्याच्या विक्रीची उलाढाल किंवा खरेदीची उलाढाल कोणत्याही वर्षात कलम ३ च्या पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक झालेली नसेल.

तेव्हा खंड (क) खाली येणाऱ्या प्रकरणाच्या बाबतीत, तो व्यापारी त्याची नोंदणी रद्द करण्यासाठी विहित रीतीने आणि विहित मुदतीत आयुक्ताकडे अर्ज करील व खंड (ख) खाली येणाऱ्या प्रकरणाच्या बाबतीत, त्या व्यापाऱ्यास त्याची नोंदणी रद्द करण्यासाठी विहित रीतीने आयुक्ताकडे अर्ज करता येईल ; आणि त्यानंतर आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि नियमांस अधीन राहून, त्या प्रकरणाची परिस्थिती विचारात घेता, रद्द केल्याच्या आदेशाच्या दिनांकापूर्वीच्या कोणत्याही दिनांकासह त्यास योग्य वाटेल अशा दिनांकापासून नोंदणी रद्द करता येईल. या पोट-कलमान्वये रद्द केलेले नोंदणी प्रमाणपत्र विहित मुदतीत आयुक्ताकडे परत करण्यात येईल :

परंतु, या कलमान्वये ज्याच्याकरिता प्रमाणपत्र देण्यात आले असेल असा कोणताही धंदा बंद करण्यात आला आहे किंवा निकालात काढण्यात आला आहे [१][ * * * * ] आणि व्यापाऱ्याने नोंदणी रद्द करण्यासाठी पूर्वी सांगितल्याप्रमाणे खंड (क) अन्वये अर्ज करण्यात कसूर केली आहे, अशी आयुक्ताची खात्री झाली तर, त्या व्यापाऱ्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, ज्या दिनांकापासून धंदा बंद करण्यात आला आहे किंवा, तो निकालात काढला आहे किंवा वेगळ्या स्थानिक क्षेत्रात बदलला आहे असा दिनांक म्हणून आयुक्त, नियमांनुसार कोणतेही असल्यास, जो दिनांक ठरवील, त्या दिनांकापासून त्यास नोंदणी रद्द करता येईल:

परंतु आणखी असे की, अर्ज केल्यावरून किंवा अन्य प्रकारे नोंदणी प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे, अशा रीतीने नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याच्या दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी संपणाऱ्या कोणत्याही कालावधीसाठी येणे असलेला कोणताही कर, तसेच शास्ती, समपहृत रक्कम व व्याज देण्याबद्दलच्या व्यापाऱ्याच्या दायित्वास बाध येणार नाही. मग असा कर तसेच शास्ती, समपहृत रक्कम व व्याज यांसह नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याच्या दिनांकापूर्वी निर्धारित करण्यात आलेला परंतु न भरलेला असो, किंवा त्यानंतर निर्धारित करण्यात आलेला असो.

[२][ * * * * * * ]

(७) आयुक्त, राजपत्रामध्ये तो अधिसूचित करील अशा दिनांकापर्यंत सर्व नोंदणीकृत व्यापाऱ्यांची यादी तयार करील आणि त्याला वेळोवेळी त्या यादीमध्ये सुधारणा करता येतील. कोणत्याही व्यक्तीस यादीमधील कोणत्याही उताऱ्याच्या प्रमाणित प्रतीसाठी, आयुक्तांकडे विहित

१. सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४० (क) द्वारे, '' किंवा अशा धंद्याची जागा वेगळ्या स्थानिक क्षेत्रामध्ये बदलण्यात आली असेल '' हा मजकूर वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४० (ख) द्वारे हे स्पष्टीकरण वगळण्यात आले.

नमुन्यात आणि विहित फीसह, असल्यास, अर्ज करता येईल आणि त्यानंतर, आयुक्त, अर्जदाराला त्या उताऱ्याची प्रत देईल.

(८) पोट-कलम (९) मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, या कलमाखाली दिलेले नोंदणी प्रमाणपत्र आणि या अधिनियमाच्या इतर तरतुदींखाली देण्यात येईल असे कोणतेही प्रमाणपत्र, ज्या व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस देण्यात येईल तिचे ते व्यक्तिगत प्रमाणपत्र असेल आणि ते हस्तांतरणीय असणार नाही.

(९) जेव्हा एखादा नोंदणीकृत व्यापारी,--

(क) त्याच्या धंद्याच्या नावात बदल करील, किंवा

(ख) ही भागीदारी संस्था असेल आणि तिचे विसर्जन न करता त्या भागीदारी संस्थेच्या घडणीत बदल करण्यात आला असेल, किंवा

(ग) हा विश्वस्त मंडळाचा विश्वस्त असेल आणि त्याच्या विश्वस्तांमध्ये बदल करण्यात आला असेल, किंवा

(घ) हा पाल्याचा पालक असेल आणि पालकामध्ये बदल झाला असेल किंवा पालकत्व समाप्त झाले असेल, किंवा

(ङ) हा हिंदू अविभक्त कुटुंब असेल आणि त्याचा कर्ता बदलला असेल, किंवा

(च) हा खाजगी मर्यादित कंपनी असेल, आणि तिचे सार्वजनिक मर्यादित कंपनीमध्ये रूपांतर झाले असेल,

तेव्हा केवळ पूर्वोक्त कोणताही बदल घडून आल्याच्या कारणावरून त्या व्यापाऱ्यास किंवा घडणीत बदल झालेल्या भागीदारी संस्थेस, किंवा नवीन विश्वस्तांस किंवा नवीन पालकास किंवा पाल्यास किंवा नवीन कर्त्यास किंवा सार्वजनिक मर्यादित कंपनीस, नवीन नोंदणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही आणि कलम १८ अन्वये आवश्यक असलेल्या रीतीने माहिती पुरविल्यानंतर, नोंदणी प्रमाणपत्रात आवश्यक तेथे फेरबदल करण्यात येईल ; आणि हा अधिनियम, नियम किंवा अधिसूचना या अन्वये दिलेले इतर कोणतेही प्रमाणपत्र उचित दिनांकापासून विधिग्राह्य असण्याचे चालू राहील आणि त्यात आवश्यक तेथे सुधारणा करण्यात येईल.

**नवीन नोंदणी.**

**१७.** (१) आयुक्त, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दिनांकास, उक्त दिनांकास वैध असलेले नोंदणी प्रमाणपत्र (यात यानंतर या कलमामध्ये याचा निर्देश '' विद्यमान नोंदणी प्रमाणपत्र '' असा करण्यात आला आहे ) धारण करणारा प्रत्येक नोंदणीकृत व्यापारी, या कलमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे, विद्यमान नोंदणी प्रमाणपत्राऐवजी नवीन नोंदणी प्रमाणपत्र मिळवील.

(२) पोट-कलम (१) अन्वये नवीन प्रमाणपत्र मिळविणे आवश्यक आहे असा प्रत्येक व्यापारी, विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडे, अशा नमुन्यात, अशा रीतीने आणि वेळेत अर्ज करील; आणि अशा अर्जासोबत, त्याला दिलेले विद्यमान नोंदणी प्रमाणपत्र, त्याच्या सर्व अतिरिक्त प्रती असल्यास जोडण्यात येतील.

(३) असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, विहित प्राधिकरण, नियमांस अधीन राहून, अर्जादाराला विहित नमुन्यात नवीन नोंदणी प्रमाणपत्र देईल आणि त्यानंतर अशाप्रकारे दिलेले नवीन नोंदणी प्रमाणपत्र, या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनार्थ, कलम १६ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र असल्याचे मानले जाईल.

(४) या अधिनियमाच्या इतर तरतुदींना बाध न येता, आयुक्त, राजपत्रात अधिसूचित करील अशा दिनांकापासून सर्व विद्यमान नोंदणी प्रमाणपत्रे रद्द होतील.

(५) आयुक्तास, पोट-कलम (१) किंवा (४) अन्वये काढलेल्या अधिसूचनेद्वारे, अशी अधिसूचना उक्त अधिसूचनेत आणि त्याच्याकडून वेळोवेळी काढण्यात येणाऱ्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट, करण्यात आलेले असतील अशा नोंदणीकृत व्यापाराच्या वर्गालाच फक्त लागू होईल अशीही तरतूद करता येईल.

(६) या अधिनियमाच्या तरतुदी नोंदणी प्रमाणपत्राच्या संबंधात जशा लागू असतात तशाच त्या या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्या अन्वये देण्यात आलेल्या इतर प्रमाणपत्रांच्या संबंधातही, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

धंद्यामधील बदल, इत्यादीसंबंधी माहिती पुरविणे.

१८. (१) जो,—

(क) त्याचा धंदा किंवा त्यातील कोणताही भाग विक्रीच्या मार्गाने हस्तांतरित करील किंवा अन्यथा निकालात काढील. किंवा धंद्याच्या मालकीत इतर कोणताही बदल करील किंवा असा बदल झाल्याचे त्यास माहीत असेल, किंवा

(ख) त्याचा धंदा बंद करील किंवा धंद्याची जागा बदलील, किंवा धंदा नवीन जागी सुरू करील, किंवा

(ग) त्याच्या धंद्याचे नाव बदलील; किंवा

(घ) त्याच्या धंद्याच्या संबंधात भागीदारी करील, किंवा

(ङ) नादारीसाठी किंवा परिसमापनासाठी अर्ज करील किंवा त्याच्याविरुद्ध अर्ज केलेला असेल, किंवा

(च) एक कंपनी म्हणून, कंपन्यांच्या विलीनीकरणामध्ये, पुनर्विलीनीकरणामध्ये किंवा एकत्रीकरणामध्ये सहभागी असेल,

असा या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला व्यापारी, त्यानुसार विहित मुदतीत, विहित प्राधिकाऱ्याला त्याप्रमाणे कळवील.

(२) या अधिनियमान्वये, कर भरण्यास पात्र असलेला कोणताही व्यापारी,—

(क) मरण पावला तर, त्याचा मृत्युपत्र व्यवस्थापक, प्रबंधक किंवा अन्य कायदेशीर प्रतिनिधी, किंवा

(ख) हा भागीदारी संस्था, हिंदू अविभक्त कुटुंब किंवा व्यक्तींचा संघ असेल आणि अशा भागीदारी संस्थेच्या, हिंदू अविभक्त कुटुंबाच्या किंवा संघाच्या रचनेत विसर्जनामुळे, फाटाफुटीमुळे, आंशिक विभाजन किंवा विभाजन यामुळे किंवा अन्यथा बदल झाला असेल, तर अशा भागीदारी संस्थेचा, हिंदू अविभक्त कुटुंबाचा किंवा संघाचा अनुक्रमे भागीदार, कर्ता किंवा सदस्य होती अशी प्रत्येक व्यक्ती, किंवा

(ग) कलम ४४ च्या पोट-कलम (४) मध्ये नमूद केलेल्या परिस्थितीमध्ये, आपला धंदा हस्तांतरित करील किंवा अन्यथा निकालात काढील तर, तो धंदा ज्याच्याकडून हस्तांतरित झाला आहे आणि ज्याला हस्तांतरित केला आहे अशी प्रत्येक व्यक्ती,

असा मृत्यू, घटित करण्यातील बदल, विसर्जन, आंशिक विभाजन, विभाजन, फाटाफूट किंवा हस्तांतरण यासंबंधी विहित रीतीने उक्त विहित प्राधिकाऱ्याला कळवील.

व्यापाऱ्याने धंद्याच्या व्यवस्थापकाचे नाव आणि स्थायी खाते क्रमांक जाहीर करणे.

१९. (१) जो व्यापारी कर देण्यास पात्र असेल, आणि जो अविभक्त हिंदू कुटुंब किंवा व्यक्तींचा संघ, क्लब किंवा सोसायटी किंवा भागीदारी संस्था किंवा कंपनी असेल, किंवा जो पालक किंवा विश्वस्त किंवा अन्यथा, दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने धंदा चालवत असेल, असा प्रत्येक व्यापारी, ज्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना या अधिनियमांच्या प्रयोजनासाठी, अशा व्यापाऱ्याच्या धंद्याच्या किंवा धंद्याचे व्यवस्थापक म्हणून मानण्यात येईल अशा व्यक्तीचे नाव किंवा व्यक्तींची नावे नमूद करणारे प्रतिज्ञापन, विहित कालावधीच्या आत, विहित रीतीने, विहित प्राधिकाऱ्याकडे पाठवील. असे प्रतिज्ञापन लागू असेल तेव्हा नोंदणीच्या वेळी सादर करण्यात येईल व ते विहित रीतीने वेळोवेळी सुधारता येईल.

१९६१ चा. ४३. (२) या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असलेला आणि आयकर अधिनियम, १९६१ अन्वये स्थायी खाते क्रमांक (Permanent Account Number) प्राप्त करण्यास पात्र असलेला प्रत्येक व्यापारी, जर त्यास खाते क्रमांक मिळाला असेल तर तो क्रमांक आयुक्ताला विहित मुदतीत आणि विहित रीतीने कळवील आणि अन्य कोणत्याही प्रकरणी त्याने त्या क्रमांकासाठी अर्ज केलेले आहे किंवा कसे ते नमूद करील आणि अर्जाचा तपशील देईल.

## प्रकरण पाच

## विवरणे, निर्धारण इत्यादी

[1][**२०.** (१) (क) प्रत्येक नोंदणीकृत व्यापारी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा दिनांकापर्यंत, अशा कालावधीकरिता आणि अशा प्राधिकाऱ्याकडे बिनचूक, परिपूर्ण आणि स्वयं-सुसंगत विवरण दाखल करील. व्यापाऱ्यांच्या निरनिराळ्या वर्गासाठी विवरणांचे निरनिराळे नमुने विहित करता येतील. विवरणे व स्वयं-निर्धारण.

(ख) आयुक्ताला, विवरण परिपूर्ण व स्वयं-सुसंगत आहे किंवा कसे याची खात्री करण्यासाठी त्या विवरणाची तपासणी करता येईल. विवरण परिपूर्ण किंवा स्वयं-सुसंगत नसेल तर, आयुक्ताला, विवरण दाखल केल्याच्या दिनाकांपासून चार महिन्यांच्या आत, त्या व्यापाऱ्यावर, विहित नमुन्यात दोषासंबंधीची नोटीस बजावता येईल, उक्त नोंदणीकृत व्यापारी दोष दूर करील व दोषासंबंधीची नोटीस बजावल्यापासून एका महिन्याच्या आत, विहित प्राधिकाऱ्याकडे, नवीन, परिपूर्ण व स्वयं-सुसंगत असे विवरण सादर करील :

परंतु, नोंदणीकृत व्यापाऱ्याने, एक महिन्याच्या उक्त कालावधीत परिपूर्ण किंवा स्वयं-सुसंगत नवीन विवरण सादर करण्यास कसूर केली तर त्याने, खंड (क) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, विहित वेळेच्या आत विवरण सादर केलेले नव्हते असे मानण्यात येईल.

[2][ (२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्तास, विहित करण्यात येतील अशा अटींना व शर्तींना अधीन राहून, कोणत्याही व्यापारास,–

(क) व्यापाऱ्याच्या धंद्याच्या सर्व किंवा कोणत्याही ठिकाणांसाठी मग ती ठिकाणे एकाच नोंदणी प्राधिकाऱ्याच्या अधिकारितेत येत असोत किंवा नसोत, किंवा

(ख) त्याच्या धंद्याच्या वेगवेगळ्या घटकांकरिता तो निदेश देईल अशा प्राधिकाऱ्याकडे, स्वतंत्र विवरण सादर करण्याची परवानगी देता येईल.]

(३) या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदीन्वये जिने विवरण दाखल करणे आवश्यक असेल अशी प्रत्येक व्यक्ती किंवा नोंदणीकृत नसलेला व्यापारी, ते विवरण, विहित करण्यात येईल अशा कालावधीसंबंधात, अशा नमुन्यात, अशा दिनांकापर्यंत व अशा प्राधिकाऱ्याकडे सादर करील आणि अशा विवरणाला पोट-कलम (१) च्या परिच्छेद (ख) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी, ज्याप्रमाणे पोट-कलम (१) च्या परिच्छेद (क) अन्वये विहित केलेल्या विवरणाला लागू होतील त्याचप्रमाणे लागू होतील.

(४) कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने पोट-कलम (१), (२) किंवा (३) अन्वये विवरण सादर केल्यानंतर त्यात कोणताही मजकूर वगळला गेल्याचे किंवा चुकीचे विधान केले असल्याचे त्यास आढळून आले तर, उक्त विवरणात अंतर्भूत असलेल्या कालावधीच्या संबंधातील निर्धारणाची नोटीस त्याच्यावर बजावण्यापूर्वी किंवा विवरण कालावधीचा अंतर्भाव असलेल्या वर्षाच्या समाप्तीपासून [3][आठ महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी] यांपैकी जे अगोदर घडेल, त्या कोणत्याही वेळी विवरणात अंतर्भूत असलेल्या कालावधीच्या संबंधात सुधारित विवरण त्यास सादर करता येईल.]

---

१ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १५ द्वारे, कलम २० ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

२ सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४१ (क) द्वारे, पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

३ वरील अधिनियमाच्या कलम ४१ (ख) द्वारे, '' सहा महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ (५) एखाद्या व्यापाऱ्यास नवीन विवरण किंवा, यथास्थिती, सुधारित विवरण सादर करणे आवश्यक करण्यात आले तर, तो विहित प्राधिकाऱ्याकडे असे नवीन किंवा सुधारित विवरण सादर करील आणि अशा नवीन किंवा सुधारित विवरणानुसार, कोणतीही कराची रक्कम भरणे आवश्यक असल्यास, तो, अशी रक्कम, शासकीय कोषागारात भरील आणि प्राप्त पोच चलनाची स्वत: साक्षांकित केलेली सत्य प्रत नवीन किंवा सुधारित विवरणाबरोबर जोडील.]

विवक्षित प्रकरणांमध्ये निर्धारण करण्यासाठी नोटीस न पाठविणे.

[२][२१. (१) नोंदणीकृत व्यापाऱ्याने विहित दिनांकापर्यंत विवरण दाखल केलेले असेल अशा परिस्थितीत, विवरण कालावधीचा अंतर्भाव असलेल्या वर्षाच्या समाप्तीपासून दोन वर्ष झाल्यानंतर, विवरणात अंतर्भूत असलेल्या कालावधीच्या संबंधात व्यापाऱ्याचे निर्धारण करण्यासाठी व्यापाऱ्यावर कोणतीही नोटीस बजावली जाणार नाही.

(२) एखाद्या कालावधीच्या संबंधात नोंदणी केलेल्या विक्रेत्याने विहित दिनांकापर्यंत विवरण दाखल केले नसेल तर, उक्त कालावधीचा अंतर्भाव असलेले वर्ष समाप्त झाल्यापासून तीन वर्षांच्या कालावधीनंतर, उक्त कालावधीच्या संबंधात निर्धारण करण्यासाठी व्यापाऱ्याला बोलावणारी नोटीस त्याच्यावर बजावण्यात येणार नाही.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दिनांक ३१ मार्च, २००८ रोजी किंवा त्यापूर्वी संपणाऱ्या कोणत्याही कालावधीच्या संबंधात निर्धारण करण्यासाठीची नोटीस उक्त कालावधीचा अंतर्भूत असलेले वर्ष समाप्त झाल्यापासून [३][सहा वर्षांच्या कालावधीत व्यापाऱ्यावर बजावता येईल.]

लेखापरीक्षा.

२२. (१) आयुक्त, या अधिनियमांच्या तरतुदीचे पालन करणे सुकर होण्याच्या दृष्टीने, कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्याच्या व्यवसायाची लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करू शकेल. या कलमाच्या प्रयोजनासाठी व्यापाऱ्याची निवड ही,–

(क) ज्यानी विहित दिनांकापर्यंत विवरणे सादर केलेली नाहीत; किंवा

(ख) ज्यांनी कराच्या परताव्याची मागणी केलेली आहे; किंवा

(ग) जेथे व्यापाऱ्याने दाखल केलेल्या कोणत्याही विवरणाच्या बिनचूकपणाबद्दल आयुक्ताची सकृत दर्शनी खात्री पटली नसेल किंवा कोणत्याही व्यापाऱ्याने दाखल केलेल्या कोणत्याही विवरणामध्ये केलेली मागणी, मागितलेली वजात, किंवा दर्शविलेली उलाढाल याबाबत त्याची खात्री पटली नसेल; किंवा

(घ) ज्यांची कोणतेही निकष लागू करण्याच्या आधारावर किंवा या यादृच्छिक निवडीच्या आधारावर आयुक्ताने निवड केलेली आहे; किंवा

(ङ) जेथे आयुक्तास, प्रकरणाची तपशीलवार छाननी करणे आवश्यक आहे असे मानण्यास संयुक्तिक कारण आहे,

अशा व्यापाऱ्यामधून केली जाईल.

[४][ * * * * * * ]

(३) [५][नियत दिवशी किंवा त्यानंतर] या कलमान्वये ज्या कोणत्याही अधिकाऱ्यांकडे आयुक्ताने, अधिकार व कर्तव्ये लेखी सोपविले असतील. असा अधिकारी त्या व्यवसायाची लेखापरीक्षा करु शकेल.

[४][ * * * * * * ]

(५) (क) लेखापरीक्षेच्या दरम्यान, अधिकारी.–

(एक) त्याला आवश्यक वाटतील आणि अशा ठिकाणी उपलब्ध असतील, अशी लेखापुस्तके किंवा अन्य दस्तऐवज तपासण्यासाठी आवश्यक ती सुविधा देण्यास,

(दोन) तेथे आढळून येईल अशी रोकड किंवा साठा तपासण्यासाठी त्याला आवश्यक ती सुविधा देण्यास,

---

[१]सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४१ (१) द्वारे, हे पोट-कलम ज्यादा दाखल करण्यात आले.

[२]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १६ द्वारे, कलम २१ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[३]सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४२ द्वारे, " चार वर्षांच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १७ द्वारे, कलम २२ मधील पोट-कलम (२), (४), (६), (७), व (८) वगळले.

[५]सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४३ द्वारे " नियत दिवसाला किंवा, यथास्थिती, पूर्वोक्त कालावधीस कोणत्याही वेळी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(तीन) या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीसाठी उपयोगी पडेल किंवा तिच्याशी संबंधित असेल अशा कोणत्याही बाबींविषयी त्याला आवश्यक वाटेल अशी माहिती पुरविण्यास, व्यापाऱ्यास फर्मावील,

(ख) लेखापरीक्षा करणारा अधिकारी, कोणतीही लेखापुस्तके, अन्य दस्तऐवज किंवा कोणतीही रोकड किंवा साठा कोणत्याही कारणामुळे हलवणार नाही किंवा हलवण्याची व्यवस्था करणार नाही.

[1][ * * * * * * ]

निर्धारण. २३. [2][ (१) एखाद्या कालावधीच्या संबंधात नोदणीकृत व्यापारी विहित दिनांकापर्यत विवरण दाखल करण्यास कसूर करील अशा प्रकरणात, आयुक्तास, निर्धारणाची नोटीस न बजावता आणि व्यापाऱ्याला , त्याचे म्हणणे मांडण्याची संधी न देता, आपल्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार, उक्त कालावधीच्या संबंधात व्यापाऱ्याचे निर्धारण करता येईल :

परंतु, जर निर्धारण आदेश संमत झाल्यानंतर, व्यापारी, विवरणानुसार देय प्रदान केल्याच्या पुराव्यासह उक्त कालावधीसाठीचे विवरण सादर करील किंवा विवरणानुसार देय कर प्रदान केल्याच्या पुराव्यासह, निर्धारण आदेश संमत केला जाण्यांपूर्वी उक्त कालावधीसाठीचे विवरण दाखल करण्यात आले असल्याचा साक्षी पुरावा सादर करील अशा परिस्थितीत, आयुक्त, लेखी आदेशाद्वारे, उक्त निर्धारण आदेश रद्द करील आणि असा निर्धारण आदेश रद्द केल्यानंतर, या कलमाच्या इतर तरतुदी अन्वये उक्त कालावधीच्या संबंधात व्यापाऱ्याचे निर्धारण करण्यात येईल :

परंतु, आणखी असे की, असा निर्धारण आदेश रद्द केला गेल्यामुळे उक्त कालावधीच्या संबंधात बसवता येईल असे कोणतेही व्याज किंवा शास्ती यांना हानी पोहचणार नाही :

परंतु, तसेच, उक्त कालावधीचा अंतर्भाव असलेले वर्ष समाप्त झाल्यापासून तीन वर्षांनंतर, या पोट-कलमान्वये कोणताही आदेश संमत करण्यात येणार नाही.]

(२) [3][नोंदणीकृत व्यापाऱ्याने कोणत्याही कालावधीसंबंधात विवरण विहित दिनांकापर्यंत दाखल केलेले असेल त्याबाबतीत, [4][विवरण बिनचूक व परिपूर्ण आहे] याची खात्री करणे आयुक्तास आवश्यक किंवा इष्ट वाटले तर, आणि त्या व्यापाऱ्याला हजर राहण्यास फर्मावणे किंवा त्याने आणखी दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे. असे त्यास वाटले तर. तो अशा व्यापाऱ्याला नोटीस देऊन त्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास व त्या ठिकाणी हजर राहण्यास व असा [5][व्यापारी आपल्या वार्षिक विवरणाच्या पुष्ट्यर्थ] ज्या दस्तऐवजावर अवलंबून असेल ते सर्व दस्तऐवज सादर करण्यास किंवा करविण्यास किंवा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेले दस्तऐवज किंवा साक्षी पुरावा सादर करण्यास फर्माविल.

नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, आयुक्त, सादर करण्यात येतील असे सर्व दस्तऐवज किंवा पुरावा विचारात घेतल्यानंतर, त्या व्यापाऱ्याकडून येणे असलेल्या कराच्या रकमेचे निर्धारण करील :

परंतु, जर नोदणीकृत व्यापाऱ्याने, या पोट-कलमान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही नोटिशीच्या अटींचे अनुपालन करण्यात कसूर केली तर, आयुक्त, आपल्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार त्याच्याकडून येणे असलेल्या कराच्या रकमेचे निर्धारण करील :

---

[1]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, याच्या कलम १७ अन्वये कलमे(६), (७) व (८) वगळण्यात आली.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १८ (१) द्वारे, कलम २३ चे पोट-कलम (१) ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १८ (२) (क) (एक) द्वारे, '' एवाद्या वर्षासंबंधीचे वार्षिक विवरण, नोंदणीकृत व्यापाऱ्याने'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १८ (२) (क) (दोन) द्वारे '' विक्रीच्या आणि खरेदीच्या उलाढालीची '' या मजकुराने सुरु होणाऱ्या आणि '' तो भरण्यास येईल'' या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम १८ (२) (क) (तीन) द्वारे, '' आपल्या वार्षिक विवरणाच्या पुष्टयर्थ, या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु आणखी असे की, [१][ * * * * ] [२][ विवरणाशी संबंधित कालावधीचा अंतर्भाव असलेल्या वर्षाच्या] समाप्तीपासून तीन वर्षे संपल्यानंतर या पोट-कलमान्वये कोणताही निर्धारण आदेश देण्यात येणार नाही.

(३) नोंदणीकृत व्यापाऱ्याने, [३][कोणत्याही कालावधी संबंधीचे विवरण] विहित दिनांकापर्यंत दाखल केलेले नसेल अशाबाबतीत, आयुक्तास [४][उक्त कालावधीचा अंतर्भाव असलेले वर्ष संपल्यापासून तीन वर्षांच्या आत] कोणत्याही वेळी त्या व्यापाऱ्यावर नोटीस बजावता येईल व त्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास व जागी त्याला हजर राहण्यास फर्मावित येईल आणि त्या व्यापाऱ्याला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, उक्त व्यापाऱ्याकडून कराची येणे असलेली रक्कम आपल्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार निर्धारित करण्याची कार्यवाही करता येईल :

परंतु, [५][उक्त कालावधीचा अंतर्भाव असलेल्या वर्षाच्या] समाप्तीपासून चार वर्षे संपल्यानंतर, या पोटकलमान्वये कोणताही निर्धारण आदेश देण्यात येणार नाही.

(४) एखादा व्यापारी कोणत्याही कालावधीसंबंधी कर देण्यास पात्र आहे. परंतु त्याने नोंदणीसाठी अर्ज करण्यास किंवा या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार आवश्यक असलेल्या मुदतीच्या आत नोंदणीसाठी अर्ज करण्यात कसूर केली आहे. असे आयुक्तास सकारण वाटेल तर, आयुक्तांस त्या व्यापाऱ्याला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, ज्या वर्षामध्ये असा कालावधी येत असेल ते वर्ष संपल्यापासून पाच वर्षाच्या आत कोणत्याही वेळी, त्या कालावधीसंबंधी आणि त्यानंतरच्या कोणत्याही एका वा अनेक कालावधीसंबंधी उक्त व्यापाऱ्याकडून कराची कोणतीही रक्कम येणे असल्यास, आवश्यक असेल तेथे, आपल्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार ती निर्धारित करण्याची कार्यवाही करता येईल:

परंतु, उक्त कालावधीत समाविष्ट असलेल्या उक्त वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून आठ वर्षे संपल्यानंतर या पोटकलमान्वये कोणताही निर्धारण आदेश देण्यात येणार नाही.

[६][(५) (क) कोणत्याही व्यापाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या संबंधात कलम ६४ अन्वये कोणतीही कार्यवाही करीत असताना, विक्रीच्या किंवा खरेदीच्या कोणत्याही व्यवहारात नोंद न करता किंवा चुकीच्या पद्धतीने नोंद करून, कोणत्याही कालावधीच्या किंवा कालावधींच्या बाबतीत कर चुकविण्याचा प्रत्यन केलेला आहे, किंवा कोणताही दावा चुकीच्या पद्धतीने केलेला आहे अशी विहित प्राधिकाऱ्याची खात्री झाली असेल अशा प्रकरणात, या कलमाच्या इतर तरतुदीं अन्वये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही कलमांन्वये काढलेल्या निर्धारणाच्या कोणत्याही नोटिशीमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, अशा प्रकरणांमध्ये विहित प्राधिकरणास, अशा व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला विहित नमुन्यात नोटीस आणि आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर असा व्यापारी किंवा व्यक्ती यांचे, असा व्यवहार किंवा दावा यांच्याबाबतीत निर्धारण सुरु करता येईल.

---

[१]सन २००५ चा महाराष्ट्र अनिधियम क्र. १४ याच्या कलम १८ (२) (ख) (एक) द्वारे " उक्त व्यापाऱ्यावर " या मजकुराने सुरु होणाऱ्या आणि " कोणतीही नोटीस बजावण्यात येणार नाही " हा मजकूर वगळण्यात आला.

[२]वरील अधिनियमाच्या कलम १८ (२) (ख) (दोन) द्वारे " उक्त वित्तिय वर्षाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३]वरील अधिनियमाच्या कलम १८ (३) (क) (१) द्वारे, " कोणत्याही वर्षासंबंधीचे वार्षिक विवरण " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[४]वरील अधिनियमाच्या कलम १८ (३) (क) (२) द्वारे, " उक्त वर्ष संपल्यापासून तीन वर्षांच्या आत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[५]वरील अधिनियमाच्या कलम १८ (३) (ख) द्वारे, " उक्त वित्तीय वर्षाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]वरील अधिनियमाच्या कलम १८ (४) द्वारे, मूळ पोट-कलम (५) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) कलम ६४ अन्वये केलेल्या कोणत्याही कार्यवाही अनुषंगाने, कोणताही व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने, खंड (क) खाली तरतूद केल्यानुसार, कर चुकविण्याचा प्रयत्न केलेला आहे किंवा प्रयत्न करीत आहे अशी विहित प्राधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर, उक्त प्राधिकाऱ्यास, विहित नमुन्यात नोटीस देऊन आणि अशा व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, कोणत्याही कालावधीशी किंवा कालावधींशी संबंधित अशा प्रकारचा कोणताही व्यवहार किंवा दावा यांच्या बाबतीत, खंड (क) मध्ये तरतूद केल्यानुसार अशा व्यापाऱ्याचे किंवा व्यक्तीच्या निर्धारणास सुरुवात करता येईल आणि कलम ५९ मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, खंड (क) खाली येणारी विक्री किंवा खरेदी किंवा दावा यांच्या संबंधात करण्यात आलेल्या कोणत्याही उलाढालीच्या बाबतीत, अशा व्यापाऱ्याचे किंवा व्यक्तीचे निर्धारण करण्यासाठी अशा प्राधिकाऱ्याकडे आवश्यक ती अधिकारिता आहे असे मानण्यात येईल आणि अशा निर्धारणाची कार्यवाही या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांसाठी अशा प्राधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्यात आल्याचे मानले जाईल.

(ग) या पोट-कलमाखाली केलेल्या निर्धारणाच्या कोणत्याही कार्यवाहीमुळे, उक्त कालावधीच्या किंवा कालावधींच्या बाबतीत या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींन्वये विक्री, खरेदी किंवा खंड (क) आणि खंड (ख) मध्ये अंतर्भूत नसलेले अन्य कोणतेही दावे, यांच्या इतर कोणत्याही उलाढालीच्या संदर्भात, अशा व्यापाऱ्याचे किंवा व्यक्तीचे निर्धारण करण्याची ज्यांना अन्य प्रकारे अधिकारिता असेल, अशा कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून करण्यात आलेल्या निर्धारणाच्या कार्यवाहीला बाध येणार नाही.

(घ) या पोट-कलमान्वये करावयाचे निर्धारण हे, उक्त कालावधीच्या किंवा कालावधींच्या बाबतीत, आवश्यक असेल तेथे, विहित प्राधिकाऱ्याच्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार, स्वतंत्रपणे केले जाईल, आणि या पोट-कलमाखाली केलेले कोणतेही निर्धारण विचारात न घेता, त्या व्यापाऱ्याचे, या कलमाच्या इतर तरतुदींखाली, उक्त कालावधीच्या किंवा कालावधींच्या बाबतीत, स्वतंत्रपणे निर्धारण करता येईल :

परंतु, एखाद्या व्यापाऱ्याचे किंवा व्यक्तीचे या पोट-कलमाखाली एकदा निर्धारण केल्यावर, अशा व्यवहाराच्या किंवा दाव्याच्या संबंधात, उक्त कालावधीच्या किंवा कालावधींच्या बाबतीत, या कलमाच्या इतर तरतुदीअन्वये कराचे निर्धारण करतेवेळी अशा कराच्या परिणामी झालेली उलाढाल किंवा लावण्यात आलेला दावा, शास्ती आणि व्याज, कोणतीही असल्यास, त्यांच्यावर कोणताही कर, अशा व्यापाऱ्यावर किंवा व्यक्तीवर बसवण्यात येणार नाही किंवा त्यांच्याकडून मागण्यात येणार नाही.]

[१][(६) आयुक्ताच्या मते, विवरणात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही कालावधीच्या संदर्भात, विक्री किंवा खरेदीची कोणतीही उलाढाल उघड केलेली नसेल किंवा कर कमी दराने भरला असेल, चुकीच्या वजावटीची मागणी केलेली असेल किंवा चुकीच्या वजातीची मागणी केलेली असेल तर कलम २१ मध्ये किंवा या कलमाच्या इतर तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त कालावधीचा अंतर्भाव असलेल्या वर्षाचा समाप्तीपासून सुरू होणाऱ्या पाच वर्षांच्या कालावधीत कोणत्याही वेळी, आयुक्त, व्यापाऱ्यावर, विहित नमुन्यात नोटीस बजावील आणि त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, उक्त कालावधीच्या बाबतीत त्याचे निर्धारण करील :

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ याच्या कलम १८ (५) द्वारे पोट-कलम (६) ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

परंतु, उक्त कालावधीचा समावेश असलेल्या वर्षाच्या समाप्ती पासून सहा वर्षांच्या आत, आवश्यक असेल तेथे, आयुक्त आपल्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार, निर्धारण आदेश संमत करील.]

(७) न्यायाधिकरण किंवा उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशासह, या अधिनियमाखाली काढलेल्या कोणत्याही आदेशात समाविष्ट असलेला कोणताही निष्कर्ष किंवा निर्देश अंमलात आणण्यासाठी या कलमांखाली नव्याने निर्धारण करायचे असेल अशा बाबतीत, या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, असे निर्धारण हे, आदेशात समाविष्ट असलेल्या यथास्थिती, अशा निष्कर्षाची किंवा निर्देशाची सूचना दिल्याच्या दिनांकापासून छत्तीस महिन्यांच्या कालावधीत, [१][आयुक्ताकडे] पाठवले जाईल :

परंतु, अशा आदेशाची प्रमाणित प्रत, संबंधित व्यापाऱ्याने त्यास कळविण्यात आलेल्या उक्त दिनांकाच्या अगोदर [२][आयुक्ताला] दिली असेल तर,उक्त प्रत सादर केल्याच्या दिनांकापासून छत्तीस महिन्यांचा कालावधी मोजण्यात येईल.

(८) आयुक्तास, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने, कोणत्याही प्रकरणाचा, जरी तशाच प्रकारच्या प्रकरणांमध्ये न्यायाधिकरणाने राज्य शासनाच्या किंवा आयुक्ताच्या विरुद्ध निर्णय दिला असला तरी, जर अशा प्रकरणांमध्ये राज्य शासनाने किंवा आयुक्ताने समुचित न्यायसंस्थेपुढे न्यायाधिकरणाच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल केलेले असेल व ते अपील त्या समुचित न्यायसंस्थेपुढे प्रलंबित असेल तर, अभिलेख मागविता येईल आणि त्याची तपासणी करता येईल, त्या प्रकरणातील लेखापुस्तके व अन्य पुरावा मागविता येईल आणि संबंधित व्यापाऱ्याचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, त्या प्रकरणामध्ये कर निर्धारणाचा उचित आदेश संमत करता येईल :

परंतु, अशा प्रकरणात शास्ती किंवा व्याज किंवा समपहरण यांसह देय रकमांच्या वसुलीचा आदेश या प्रकरणात न्यायसंस्थेचा निर्णय होईपर्यंत, आयुक्ताकडून संमत करण्यात येणार नाही आणि समुचित न्यायसंस्थेने निर्णय दिल्यावर आयुक्त, संबंधित व्यापाऱ्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर अशा न्यायसंस्थेच्या आदेशाला अनुसरुन, त्या आदेशामध्ये फेरबदल करील.

(९) आयुक्तास, कोणत्याही व्यापाऱ्याने विहित नमुन्यात केलेला अर्ज आल्यावर, ज्यामध्ये निर्धारण प्रलंबित आहे, अशा कोणत्याही कार्यवाहीच्या अभिलेखाची मागणी करता येईल व त्याची तपासणी करता येईल, आणि प्रकरणाचे स्वरूप किंवा त्यात अंतर्भूत असलेली रक्कम लक्षात घेता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे त्यास वाटले तर, त्या प्रकरणाच्या प्रभारी असलेल्या निर्धारण प्राधिकाऱ्याला निर्धारण पूर्ण करणे शक्य व्हावे यासाठी त्याच्या मार्गदर्शनाकरिता आयुक्तास, योग्य वाटतील असे निदेश देता येतील आणि असे निर्देश, निर्धारण प्राधिकाऱ्यावर बंधनकारक असतील :

परंतु, व्यापाऱ्याला बाधक ठरतील असे कोणतेही निदेश, त्या व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, देण्यात येणार नाहीत. तथापि, निर्धारणाशी संबंधित तपासणी ज्या पद्धतीने करण्यात येईल त्याबाबतचा निदेश हा व्यापाऱ्याला बाधक निदेश असल्याचे समजले जाणार नाही.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १८ (६) (क) द्वारे, " त्या प्रकरणाच्या प्रभारी निर्धारण अधिकाऱ्याकडे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १८ (६) (ख) द्वारे, " उक्त निर्धारण अधिकाऱ्याला " या मजकुरऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

¹[(१०). एका विवरणात अंतर्भाव केलेल्या, एकापेक्षा अधिक कालावधीच्या संबंधात एखाद्या व्यापाऱ्याचे किंवा व्यक्तीचे निर्धारण करताना, असे सर्व कालावधी एकाच वर्षात येत असतील त्या बाबतीत, ते, निर्धारणाची एकच नोटीस आणि एकच आदेश काढून करता येईल.]

²[(११) जेव्हा पोट-कलम (२), (३) किंवा (४) अन्वये व्यापाऱ्याचे निर्धारण करण्यात आले असेल आणि, त्या व्यापाऱ्याने, निर्धारण आदेश काढण्यात आला तेव्हा सुनावणीच्या वेळी त्याला आयुक्तापुढे उपस्थित होणे किंवा हजर राहणे शक्य झाले नाही या कारणावरुन ते निर्धारण रद्द करण्याबाबत, निर्धारण आदेशाच्या बजावणीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत विहित नमुन्यात आयुक्ताकडे अर्ज केला असेल त्याबाबतीत, आयुक्त, अर्जदाराचे म्हणणे बरोबर आहे आणि विहित शर्ती पूर्ण करण्यात आल्या आहेत याबाबत पडताळणी केल्यानंतर, उक्त निर्धारण आणि त्या निर्धारणाच्या संबंधात वा त्याच्या परिणामी बसविण्यात आलेली कोणतीही शास्ती अथवा व्याज लेखी आदेशाद्वारे रद्द करील आणि पोट-कलमे (२), (३) किंवा (४) च्या तरतुदीनुसार नवीन निर्धारण करील, तसेच यथास्थिती, व्याज किंवा शास्ती बसवील :

परंतु, या पोट-कलमान्वये कोणत्याही निर्धारण कालावधीच्या संबंधात निर्धारण रद्द करण्याबाबतचा केवळ एकच अर्ज विचारार्थ स्वीकारण्यात येईल.

(१२) पोट-कलमे (२), (३) किंवा (४) मध्ये काहीही अंतर्भूत असला तरी, पोट-कलम (११) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, नवीन निर्धारण आदेश, निर्धारण रद्द करण्याबाबतचा आदेश बजावल्याच्या दिनांकापासून अठरा महिन्यांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी काढता येईल.]

**२४.** (१) आयुक्तास त्याने दिलेला कोणताही आदेश बजावण्यात आल्याचे वित्तीय वर्ष संपल्यापासून दोन वर्षांच्या आत केव्हाही, अभिलेखावरून उघड दिसून येणारी कोणतीही चूक स्वतः होऊन दुरुस्त करता येईल आणि अशा आदेशामुळे बाधा पोचलेल्या कोणत्याही व्यक्तीने उक्त कालावधीत त्याच्या निदर्शनास आणलेली अशी कोणतीही चूक, उक्त कालावधीत किंवा त्यानंतर दुरुस्त करता येईल : चुकांची दुरुस्ती.

परंतु, अशा दुरुस्तीमुळे कर वाढत असेल, किंवा परताव्याची रक्कम किंवा परताव्याच्या रकमेवरील देय असलेले व्याज कमी होत असेल तर, आयुक्ताने अशा व्यक्तीस आपण दुरुस्ती करणार असल्याची विहित नमुन्यात लेखी नोटीस दिलेली असल्याखेरीज आणि अशा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिलेली असल्याखेरीज अशी कोणतीही दुरूस्ती करण्यात येणारी नाही. संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज दुरुस्तीसाठीचा अर्ज, अभिलेखावरून चूक दिसून येत नाही या कारणास्तव फेटाळण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, उक्त आदेशातील चूक दुरुस्त करण्यासाठी, व्यापाऱ्याने विहित नमुन्यात उक्त दोन वर्षांच्या कालावधीत अर्ज केला असेल आणि त्या अर्जात उक्त आदेशानुसार देय असलेल्या रकमेमधून कमी करावयाच्या रकमेचे ठरीव प्रमाण विनिर्दिष्ट केले असेल तर, आयुक्त, या अधिनियमाच्या इतर तरतुदींना बाध न येता, व्याज बसविण्यासह दुरुस्तीसाठीचा अर्ज निकालात काढेपर्यंत अशा ठरीव रकमेच्या वसुलीस स्थगिती देईल.

(२) जेव्हा कोणत्याही व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने आपल्या लेखापुस्तकांमध्ये असे नमूद केले असेल किंवा यथास्थिती, विवरणांमध्ये असा दावा केलेला असेल की, खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याकडून किंवा व्यक्तींकडून प्राप्त करावयाच्या प्रतिज्ञापनामुळे किंवा प्रमाणपत्रामुळे, कोणत्याही विक्री व्यवहारावर कोणताही कर देय नाही किंवा कमी केलेल्या दराने देय आहे आणि ज्या निर्धारण आदेशामध्ये दावा नामंजूर करण्यात आला असेल, असा कोणताही निर्धारणाचा आदेश कलम २३ अन्वये देण्यापूर्वी त्याने असे प्रमाणपत्र किंवा प्रतिज्ञापन कोणत्याही कारणास्तव का

---

¹सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १८ (७) द्वारे, हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

²सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४४ द्वारे, पोट-कलम (१०) नंतर ही पोट-कलमे जादा दाखल करण्यात आली.

होईना, सादर केलेले नसेल तेव्हा उक्त आदेश बजावल्याचे वित्तीय वर्ष संपल्यापासून दोन वर्षांच्या आत केव्हाही त्या व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला उक्त आदेशाविरुद्ध अपील दाखल केले नसेल तर, असे प्रतिज्ञापन किंवा प्रमाणपत्र प्राप्त केले आहे आणि ती ते सादर करण्याच्या स्थितीत आहे, या कारणावरून आदेशात दुरुस्ती करण्यासाठी आयुक्ताकडे अर्ज करता येईल आणि त्यानंतर आयुक्त त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करील आणि अर्जदाराचे म्हणणे ऐकल्यानंतर, अर्ज नियमानुसार असल्यास, आदेशात दुरुस्ती करील :

परंतु, दुरुस्ती करावयाच्या कोणत्याही निर्धारण आदेशाच्या बाबतीत या पोट-कलमान्वये दुरुस्तीसाठी केवळ एकच अर्ज विचारार्थ स्वीकारण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) च्या तरतुदी, आयुक्ताने चुकीची दुरूस्ती करण्याच्या बाबतीत ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे त्या योग्य त्या फेरफारांसह न्यायाधिकरणाने किंवा अपील प्राधिकाऱ्याने चुकीची दुरुस्ती करण्याच्या बाबतीत लागू होतील :

परंतु, जेथे कोणतीही बाब, कोणत्याही आदेशाच्या संबंधातील किंवा आदेशाच्या भागासंबंधातील अपिलाच्या किंवा पुनर्विलोकनाच्या स्वरुपातील कोणत्याही कार्यवाहीत विचारात घेण्यात आली असेल आणि तिचा निर्णय करण्यात आला असेल तेथे, अपिलावर किंवा पुनर्विलोकनावर आदेश देण्याऱ्या प्राधिकाऱ्यास, या अधिनियमात कांहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अशा रीतीने जी बाब विचारात घेण्यात आली असेल आणि जिचा निर्णय करण्यात आला असेल अशी बाब खेरीज करुन इतर कोणत्याही बाबीसंबंधातील आदेश किंवा आदेशाचा भाग दुरुस्त करता येईल.

(४) जेव्हा अशा कोणत्याही दुरुस्तीमुळे कराची किंवा शास्तीची किंवा व्याजाची रक्कम किंवा समपह्रत रक्कम कमी होत असेल तेव्हा, आयुक्त, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अशा व्यक्तीस देय असलेली कोणतीही रक्कम परत करील.

(५) जेव्हा अशा कोणत्याही दुरुस्तीमुळे कराची किंवा शास्तीची किंवा व्याजाची रक्कम किंवा समपह्रत रक्कम वाढत असेल किंवा परताव्याची रक्कम कमी होत असेल तेव्हा, आयुक्त, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अशा व्यक्तीकडून येणे असलेली रक्कम वसूल करील.

पुनर्विलोकन

२५. [१][(१) " आयुक्ताला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा व्यक्तीने, हा अधिनियम, नियम किंवा अधिसूचना यांअन्वये या कलमाखाली काढलेला किंवा अपिलावर दिलेला आदेश यांसह कोणताही आदेश संमत केल्यानंतर, आयुक्तास, स्वतः होऊन किंवा त्याला मिळालेल्या माहितीवरुन, अशा आदेशासंबंधीचा अभिलेख मागविता येईल, आणि,—

(क) विक्रीच्या किंवा खरेदीच्या कोणत्याही उलाढालीवर कर आकारावयाचा राहिला आहे काय किंवा कमी दराने आकारण्यात आला आहे काय किंवा चुकीच्या पद्धतीने वर्गीकरण केले आहे काय किंवा कोणतीही चुकीची मागणी मान्य करण्यात आली आहे काय किंवा करदायित्व कमी दाखविले आहे काय, किंवा

(ख) कोणत्याही प्रकरणात महसुलाच्या दृष्टीने बाधक ठरेल असा चुकीचा आदेश काढण्यात आला आहे काय, याची तपासणी करता येईल,

आणि तपासणीनंतर, व्यापाऱ्यावर, विहित नमुन्यातील नोटीस बजावून, आवश्यक तेव्हा आपल्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार आदेश देता येईल.

---

[१]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १९ द्वारे, कलम २५ मधील पोट-कलम (१) व (२) यांऐवजी ही पोट-कलम दाखल करण्यात आली.

(२) (क) तपासणीच्या आणि आदेश देण्याच्या प्रयोजनार्थ, आयुक्तास, व्यापाऱ्यावर विहित नमुन्यातील नोटीस बजावून उपरोक्त प्रयोजनासाठी त्यास आवश्यक वाटतील अशी लेखापुस्तके व इतर दस्तऐवज किंवा साक्षी पुरावा त्याच्यासमोर सादर करण्यास किंवा सादर करविण्यास फर्मावता येईल.

(ख) दुय्यम अधिकाऱ्याने दिलेला आदेश व्यापाऱ्यावर बजावण्यात आला असेल त्या वर्षाच्या समाप्तीपासून पाच वर्षे संपल्यानंतर, या कलमान्वये कोणताही आदेश संमत करण्यात येणार नाही.

(ग) दुय्यम अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या किंवा उक्त आदेशाच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत न्यायधिकरणासह कोणत्याही अपील प्राधिकरणाकडून कोणताही आदेश संमत करण्यात आला असेल किंवा अपिलावरील निर्णयासाठी असा आदेश प्रलंबित असेल किंवा अपील दाखल करण्यात आले असेल तेव्हा, तपासणीमध्ये अंतर्भूत असलेले मुद्दे अपिलामध्ये उपस्थित करण्यात आले असले किंवा नसले, किंवा त्यावर निर्णय झालेला असला किंवा नसला तरी, आयुक्तास, त्याच्या तपासणीचा किंवा त्याला मिळालेला वृत्तांत किंवा माहिती यांबाबतचा अहवाल, दुय्यम अधिकाऱ्याने दिलेला उक्त आदेश व्यापाऱ्याला बजावण्यात आल्याच्या वर्षाच्या समाप्तीपासून पाच वर्षांच्या आत, उक्त अपील न्यायाधिकरणासह अपील प्राधिकाऱ्याला सादर करता येईल आणि त्यानंतर न्यायाधिकरणासह उक्त अपील प्राधिकारी, त्या व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आवश्यक त्या बाबतीत, आपल्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार, आदेश संमत करील. कलम २६ च्या प्रयोजनार्थ असा आदेश हा अपिलामध्ये संमत केलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.]

(३) न्यायाधिकरणाच्या न्यायानिर्णयानुसार राज्याविरुद्ध निर्णय दिलेल्या मुद्याविरुद्ध राज्य शासनाने किंवा आयुक्ताने समुचित न्यायसंस्थेसमोर कोणतेही प्रकरण सुरु केले असेल तर, आयुक्तास, न्यायनिर्णयाचा विषय असेल अशा आदेशाव्यतिरिक्त इतर कोणत्याही आदेशाच्या संबंधात अशा प्रकरणाचा अभिलेख मागविता येईल, पूर्वोक्तप्रमाणे त्याची तपासणी करता येईल. आपले निष्कर्ष नोंदविता येतील, उक्त लेखापुस्तके आणि इतर पुरावा मागविता येईल, व्यापाऱ्याचे म्हणणे ऐकून घेता येईल आणि जणू काही त्या मुद्यासंबंधात राज्या विरुद्ध असा निर्णय देण्यात आला नव्हता असे समजून, या कलमात तरतूद केल्यानुसार आदेश देता येईल. परंतु, समुचित न्यायसंस्थेकडून निर्णय देण्यात येईपर्यंत ते व्याज, शास्ती किंवा समपहृत रक्कम यांसह येणे रकमांची जेथवर त्या अशा मुद्यांशी संबधित असतील तेथवर वसुली करण्यास स्थगिती देईल आणि त्याला अशा निर्णयानंतर, व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यावर आवश्यकता भासल्यास, पुनर्विलोकन आदेशात फेरबदल करता येईल.

(४) या कलमाखालील कोणतीही कार्यवाही व्यापाऱ्याने वा व्यक्तीने केलेल्या कोणत्याही अर्जावरुन हाती घेतली जाणार नाही.

२६. (१) कलम ८५ च्या पोट-कलम (२) मध्ये उल्लेखलेला आदेश नसेल अशा या अधिनियमान्वये किंवा नियमान्वये किंवा अधिसूचनेअन्वये दिलेल्या प्रत्येक मूळ आदेशाविरुद्धचे अपील,-- अपिले.

(क) विक्रीकर अधिकाऱ्याने किंवा सहायक आयुक्ताने किंवा त्याच्या हाताखालील अन्य कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याने, आदेश दिला असेल तर उप आयुक्ताकडे ;

(ख) उप आयुक्ताने किंवा वरिष्ठ उप आयुक्ताने आदेश दिला असेल तर सह आयुक्ताकडे ;

(ग) सह आयुक्ताने, अपर आयुक्ताने किंवा आयुक्ताने आदेश दिला असेल तर न्यायाधिकरणाकडे ; करण्यात येईल.

(२) अपिलावर उप आयुक्ताने किंवा सह आयुक्ताने आदेश दिला असेल अशा बाबतीत, दुसरे अपील न्यायाधिकरणाकडे करता येईल.

(३) न्यायाधिकरणाने अपिलावर या कलमान्वये दिलेला प्रत्येक आदेश कलम २४ आणि २७ (क) च्या तरतुदींना अधीन राहून, अंतिम असेल आणि इतर कोणत्याही न्यायाधिकरणाने अपिलावर दिलेला प्रत्येक आदेश कलमे [1][२४, २५ आणि २७] च्या तरतुदींना अधीन राहून, अंतिम असेल.

(४) कलम ८० आणि ८१ यांच्या तरतुदींच्या अधीन राहून, ज्या आदेशाविरुद्ध अपील करावयाचे असेल तो आदेश कळवल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत अपील दाखल करण्यात आले नसेल तर, असे कोणतेही अपील व दुसरे अपील विचारात घेण्यात येणार नाही.

(५) विहित करण्यात येतील अशा कार्यपद्धतीविषयक नियमांना अधीन राहून, प्रत्येक अपील प्राधिकरणास (पहिले व दुसरे या दोन्ही अपिलांच्या बाबतीत) पुढील अधिकार असतील ते असे :–

(क) निर्धारण आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलाच्या बाबतीत त्यास, निर्धारण कायम करता येईल, कमी करता येईल, वाढविता येईल किंवा विलोपित करता येईल :

परंतु, न्यायाधिकरणाकडे अपील केले असल्यास, न्यायाधिकरणास निर्धारण रद्द करता येईल व त्याने दिलेल्या निदेशानुसार आणि आवश्यक असेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, नव्याने निर्धारण करण्यासाठी ते प्रकरण निर्धारण प्राधिकाऱ्याकडे परत पाठविता येईल ; त्यानंतर निर्धारण प्राधिकारी, असे नवीन निर्धारण करण्याच्या कामास प्रारंभ करील व आवश्यक असेल त्याबाबतीत अशा नवीन निर्धारणाच्या आधारे देय असलेल्या कराची रक्कम निश्चित करील ;

(ख) शास्ती लादण्याच्या आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलामध्ये, अपील प्राधिकरणास या अधिनियमाच्या तरतुदींनुसार असा आदेश कायम करता येईल किंवा तो रद्द करता येईल किंवा त्यात बदल करता येईल ;

(ग) व्याज आकारण्याच्या आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलामध्ये अपील प्राधिकरणास, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार, असा आदेश कायम करता येईल किंवा तो रद्द करता येईल किंवा त्यात बदल करता येईल [2][ * * * * * ]

(घ) अन्य कोणत्याही प्रकरणात अपील प्राधिकाऱ्यास, त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश अपिलामध्ये देता येईल :

परंतु, अपीलकारास अशी वाढ किंवा घट याविरुद्ध कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिलेली असल्याखेरीज अपील प्राधिकरण निर्धारणात किंवा शास्तीत किंवा व्याजात किंवा समपहृत रकमेत वाढ करणार नाही किंवा वजावटीची किंवा कर परताव्याची रक्कम कमी करणार नाही.

**स्पष्टीकरण.**–अपील निकालात काढताना, अपील प्राधिकरणाला ज्याच्याविरुद्ध अपील करण्यात आले तो आदेश ज्या कार्यवाहीत देण्यात आला होता, अशा कार्यवाहीतून उद्‌भवणारे कोणतेही प्रकरण असे प्रकरण अपीलकाराने त्याच्या समोर उपस्थित केलेले नसले तरीही किंवा अशा प्रकरणासंबंधीच्या उक्त कार्यवाहीमध्ये तो आदेश दिलेला नसला तरीही विचारात घेता येईल व त्यावर निर्णय देता येईल.

(६) अपील प्राधिकरण किंवा, यथास्थिती, न्यायाधिकरण अपील दाखल करुन घेताना, अपिलाचा निकाल होईपर्यंत, ज्याविरुद्ध अपील करण्यात आले त्या आदेशाला, अपीलकर्त्याने विवादग्रस्त रकमेचा काही भाग किंवा संपूर्ण रक्कम जमा करावी अशा निदेशासह त्यास आवश्यक वाटतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, पूर्णतः किंवा अंशतः स्थगिती देईल.

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २० (१) द्वारे, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २० (२) द्वारे, " किंवा नियमांना, कोणतेही असल्यास, अधीन राहून, व्याजात पूर्णपणे किंवा अंशतः सूट देता येईल : " हा मजकूर वगळण्यात आला.

(७) न्यायाधिकरणासह प्रत्येक अपील प्राधिकरण, त्यास शक्य असेल तेथवर, त्याच्यासमोर प्रलंबित असलेल्या अपिलांवर [1][विहित करण्यात येईल अशा प्राथम्यक्रमाने] निर्णय देईल :

परंतु, एखाद्या व्यक्तीचे वय पंच्याहत्तर वर्षे किंवा त्याहून अधिक असेल आणि ती धंद्याची मालक, सहकारी संस्थेची भागीदार किंवा निगम निकाय असलेल्या कंपनीत महत्त्वाचे हितसंबंध असलेली संचालक असेल तर तिने यासंदर्भात विहित नमुन्यात अर्ज केला असल्यास संबंधित मालकीच्या संस्थेने, भागीदाराने किंवा कंपनीने केलेल्या कोणत्याही अपिलावर इतर सर्व अपिलांना बाजूला सारुन अग्रक्रमाने निर्णय देण्यात येईल.

२७. (१) आगाऊ दिलेल्या अधिनिर्णयाद्वारे न्यायाधिकरणाने न्यायनिर्णयासह संमत केलेल्या प्रत्येक आदेशाविरुद्ध उच्च न्यायालयाकडे, त्या प्रकरणामध्ये विधिविषयक महत्त्वाचा प्रश्न अंतर्भूत आहे, अशी उच्च न्यायालयाची खात्री पटल्यास, अपील करता येईल. उच्च न्यायालयाकडे अपील करणे.

(२) आयुक्ताने किंवा न्यायाधिकरणाने संमत केलेल्या कोणत्याही आदेशामुळे, बाधा पोहोचलेल्या, न्यायाधिकरणासमोरील अर्जदारास उच्च न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल आणि या पोट-कलमान्वये केलेले असे अपील,——

(क) ज्यांच्याविरुद्ध अपील करण्यात आलेले आहे असा आदेश, अशा करपात्र व्यक्तीस किंवा आयुक्तास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एकशेवीस दिवसांच्या आत दाखल करण्यात येईल ;

(ख) अपील अर्जाच्या नमुन्यात असेल व त्यात अंतर्भूत असलेला विधिविषयक महत्त्वाचा प्रश्न नेमका नमूद केलेला असेल.

(३) जेथे उच्च न्यायालयाची अशी खात्री पटलेली असेल की, कोणत्याही प्रकरणामध्ये विधिविषयक महत्त्वाचे प्रश्न अंतर्भूत आहे तेथे तो प्रश्न मांडण्यात येईल.

(४) अशा तऱ्हेने मांडण्यात आलेल्या प्रश्नावरच केवळ अपिलाची सुनावणी होईल, आणि अपिलाच्या सुनावणीच्या वेळी उत्तरवादीस, या प्रकरणात असा प्रश्न अंतर्भूत नाही असा युक्तिवाद करण्याची मुभा असेल :

परंतु, न्यायालयाने न मांडलेला अन्य एखादा विधिविषयक महत्त्वाचा प्रश्न त्या प्रकरणात अंतर्भूत आहे याविषयी न्यायालयाची जर खात्री पटली असेल तर, अशा प्रश्नावर अपिलाची सुनावणी, त्याची कारणे नोंदवून, करण्याचा न्यायालयाचा अधिकार, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे काढून घेतला जात आहे किंवा त्याचा संक्षेप होत आहे असे मानण्यात येणार नाही.

(५) उच्च न्यायालय, अशा रीतीने मांडण्यात आलेल्या विधिविषयक प्रश्नावर निर्णय देईल आणि असा निर्णय ज्यावर आधारित आहे अशी कारणे अंतर्भूत करुन त्यावर न्यायनिर्णय देईल आणि त्यास योग्य वाटेल असा खर्च देण्याचा निवाडा त्यास देता येईल.

(६) उच्च न्यायालयास,——

(क) ज्याबाबत न्यायाधिकरणाकडून निर्णय देण्यात आलेला नसेल; किंवा

(ख) ज्याबाबत पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा विधिविषयक प्रश्नावरील एखाद्या निर्णयामुळे न्यायाधिकरणाकडून चुकीचा निर्णय देण्यात आलेला असेल;

अशा कोणत्याही वादप्रश्नावर निर्णय देता येईल.

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २० (३) द्वारे, "ती दाखल करण्यात आल्याच्या" या मजकुराने सुरु होणाऱ्या आणि "सारखेच महत्व देऊन" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(७) या कलमान्वये ज्याबाबत अपील करण्यात आलेले असेल त्या न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार न्यायाधिकरणापुढील अर्जदाराने किंवा, यथास्थिती, आयुक्ताने देय असलेल्या कोणत्याही रकमेच्या प्रदानास अशा अपिलावर अंतिम निकाल होईपर्यंत उच्च न्यायालय स्थगिती देणार नाही, परंतु अपिलाच्या अंतिम निकालाच्या परिणामी अशी रक्कम बदलण्यात आली असेल तर करातील फरकाची रक्कम, या अधिनियमाच्या तरतुदीनुसार वसूल करण्यात येईल किंवा, यथास्थिती, परत करण्यात येईल.

(८) उच्च न्यायालय, त्याच्यासमोर दाखल केलेल्या अपिलाच्या बाबतीत निर्णय देईल तेव्हा, अपिलावर देण्यात आलेला आदेश न्यायाधिकरणाकडून न्यायनिर्णयाच्या प्रमाणित प्रतीच्या आधारे अंमलात आणला जाईल :

परंतु, या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी न्यायाधिकरणास आयुक्ताने किंवा, यथास्थिती, व्यापाऱ्याने सादर केलेली न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत स्वीकारता येईल.

(९) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या उच्च न्यायालयाच्या अपिलाच्या संबंधातील तरतुदी, शक्य असेल तेथवर, या कलमाखालील अपिलाच्या बाबतीत लागू असतील. १९०८ चा ५.

उलाढालीचे वर्गीकरण.

२८. कोणतेही न्यायालय किंवा न्यायाधिकरण किंवा दुसरे कोणतेही न्यायाधिकरण, या अधिनियमाखाली किंवा इतर कोणत्याही अधिनियमाखाली निर्धारित करण्यात आलेला कोणताही कर हा, तो ज्या कायद्याखाली निर्धारित करण्यात आला त्याहून अन्य कायद्याच्या तरतुदीखाली निर्धारित करावयास हवा होता अशा आशयाचे अपील किंवा पुनर्विलोकन आदेश संमत करील अशा बाबतीत, अशा निर्धारणाच्या कालावधीला मुदतमर्यादेची कोणतीही तरतूद लागू होत असली तरी, अशा आदेशाच्या परिणामी, अशा उलाढालीचे किंवा तिच्या भागाचे, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या आत कोणत्याही वेळी, कर निर्धारण करता येईल आणि कोणतेही निर्धारण हे अगोदरच केलेले असेल अशा बाबतीत, त्या व्यापाऱ्याला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर त्या निर्धारणात फेरबदल करण्यात येतील.

## प्रकरण सहा

## शास्ती व व्याज

विवक्षित प्रसंगी शास्ती लादणे.

२९. [१][*     *     *     *]

(३) कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यापाऱ्याच्या संबंधात, या अधिनियमान्वये [२][कोणताही आदेश संमत करताना किंवा केल्यानंतर] अशा व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने करपात्र असलेल्या कोणत्याही व्यवहाराचा तपशील लपवून ठेवला आहे किंवा जाणूनबुजून चुकीचा तपशील पुरविला आहे किंवा करपात्र असलेला कोणताही व्यवहार लपवून ठेवला आहे किंवा जाणूनबुजून त्याचे चुकीचे वर्गीकरण केले आहे किंवा त्याला देय असलेल्या वजावटीपेक्षा त्याने जाणूनबुजून अधिक वजावटीचा दावा केला आहे, असे आयुक्ताच्या निदर्शनास आले किंवा त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले तर, आयुक्त, अशा व्यक्तीला किंवा व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, त्याच्यावर, त्याच्याकडून देय असलेल्या कोणत्याही कराबरोबरच, उपरोक्त कोणत्याही कृतीच्या किंवा अकृतीच्या परिणामी देय असल्याचे आढळून आलेल्या कराच्या रकमेइतकी रक्कम शास्तीच्या रुपाने लादील.

---

[१]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २१ (१) द्वारे, कलम २९ ची पोट-कलमे (१) व (२) वगळण्यात आली.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २१ (२) द्वारे, " कोणताही आदेश संमत केल्यानंतर " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(४) जेव्हा, कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने, त्याने स्वतः किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने केलेल्या विक्रीचा किंवा खरेदीचा कोणताही व्यवहार, ज्यामुळे कर आकारणी करण्यास पात्र होत नसेल, किंवा कमी दराने कर आकारणी करण्यास पात्र होत असेल किंवा अशा व्यवहारावर चुकीची वजावट करण्याचा दावा करण्यास पात्र असेल असे खोटे देयक, रोख ज्ञापन, प्रमाणक, प्रतिज्ञापन, किंवा प्रमाणपत्र यांसह कोणताही दस्तऐवज जाणूनबुजून दिला असेल किंवा सादर केला असेल तेव्हा आयुक्तास, अशा व्यक्तीस किंवा व्यापाऱ्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, त्याच्यावर, त्याच्याकडून देय असलेल्या कोणत्याही कराबरोबरच, उपरोक्त कोणत्याही कृतीच्या किंवा अकृतीच्या परिणामी देय असल्याचे आढळून आलेल्या कराच्या रकमेइतकी शास्ती लादता येईल.

[१][ (५) जेव्हा एखाद्या व्यापाऱ्याने कोणत्याही मालाची विक्री केली असेल आणि त्या विक्रीस, कलम ८ च्या पोट-कलम (३), (३क), (३ख), किंवा (५) मधील कोणत्याही तरतुदींच्या आधारे, कर प्रदान करण्यातून पूर्णतः वा अंशतः सूट देण्यात आली असेल, आणि ज्या शर्तींना अथवा निर्बंधांना अधीन राहून, अशी सूट देण्यात आली असेल त्या शर्तींचे अथवा निर्बंधाचे पालन करण्यात खरेदीदाराने कसूर केली असेल त्याबाबतीत, आयुक्तास, उक्त खरेदीदारास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर अशा विक्रीवर उक्त सूट देण्यात आली नसली तर त्या विक्रीवर जो कर देय झाला असता त्या कराच्या दीडपट एवढी रक्कम भरण्याची शास्ती त्याच्यावर लादता येईल. ]

(६) जेथे कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने कलम ८६ च्या तरतुदींचे उल्लंघन केले असेल त्याच्याकडून देय असलेल्या कराच्या ठरीव रकमेचे न्यूननिर्धारण व्हावे म्हणून, तेथे आयुक्तास, अशा व्यक्तीस किंवा व्यापाऱ्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, त्यांच्याकडून देय असलेल्या कोणत्याही कराबरोबरच, कराच्या जेवढ्या रकमेचे न्यूननिर्धारण झाले असते त्या रकमेच्या निम्मी रक्कम किंवा शंभर रुपये, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतकी शास्ती त्याच्यावर लादता येईल.

(७) जेथे कोणतीही व्यक्ती किंवा व्यापारी कोणत्याही कार्यवाहीच्या बाबतीतील, कोणत्याही नोटिशीचे अनुपालन करण्यात वाजवी कारणाविना कसूर करील तेथे, आयुक्ताला, त्या व्यक्तीस किंवा व्यापाऱ्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, त्याच्याकडून देय असलेल्या कोणत्याही कराबरोबरच, एक हजार रुपये इतक्या रकमेची शास्ती त्याच्यावर लादता येईल.

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४५ द्वारे, हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

(८) जेथे कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने, विहित कालावधीत, कलम २० अन्वये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे, कोणत्याही कालावधीचे विवरण [१][ * * * * ] दाखल करण्यात वाजवी कारणाविना कसूर केली असेल तेथे, आयुक्ताला, त्या व्यक्तीस किंवा व्यापाऱ्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, त्याच्याकडून देय असलेल्या २,००० रुपये इतक्या रकमेच्या कराबरोबर शास्ती लादता येईल. अशा शास्तीमुळे, या अधिनियमान्वये त्याच्यावर लादण्यात येणाऱ्या इतर कोणत्याही शास्तीस बाध येणार नाही :

परंतु, जर शास्ती लादण्याची कार्यवाही सुरु करण्यापूर्वी विवरण दाखल करण्यात आले तर एक हजार रुपये इतकी शास्ती बसवण्यात येईल आणि उक्त शास्ती बसवण्यापूर्वी विवरण दाखल करण्यात आले नाही तर, इतर कोणत्याही प्रकरणांत, रुपये दोन हजार इतकी शास्ती बसवण्यात येईल.

(९) [२][ * * * * ]

(ग) जेव्हा एखाद्या व्यापाऱ्याने [३][ * * * * ] विवरण दाखल केले असेल आणि ते विवरण [४][ पूर्ण आणि सुसंगत ] नसल्याचे आढळून आले असेल तेव्हा आयुक्तास, त्या व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, त्याच्यावर रुपये एक हजार इतकी शास्ती लादता येईल. शास्तीच्या अशा आकारणीमुळे, या अधिनियमान्वये लादता येणाऱ्या इतर कोणत्याही शास्तीस बाध येणार नाही.

[५][ (१०) एखाद्या व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने, कलम ६० च्या तरतुदींचे उल्लंघन करुन कराच्या स्वरूपात कोणतीही रक्कम वसूल केली असेल अशा प्रकरणात,—

(क) तो, दोन हजार रुपयांहून अधिक नसेल इतकी शास्ती देण्यास पात्र असेल, आणि

(ख) याशिवाय, कलम ६० चे उल्लंघन करून त्या व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने वसूल केलेली कोणतीही रक्कम राज्य शासनाकडे समपहृत करण्यात येईल.

या अधिनियमान्वये किंवा अन्य प्रकारे कोणतीही कार्यवाही करीत असताना आयुक्ताला जर कोणतीही व्यक्ती, या पोट-कलमान्वये कोणत्याही रकमेच्या शास्तीस किंवा समपहरणास किंवा शास्ती व समपहरण या दोहोंस पात्र ठरली आहे असे समजण्यास कारण असले तर, अशा व्यक्तीवर विहित नमुन्यात नोटीस बजावून, त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास व अशा ठिकाणी त्या व्यक्तीला हजर राहण्यास आणि या पोट-कलमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे तिच्यावर कोणत्याही रकमेची शास्ती किंवा समपहरण किंवा शास्ती व समपहरण दोन्ही का लादण्यात येऊ नये, याबाबत कारणे दाखविण्यास फर्मावील. आयुक्त, त्यानंतर चौकशी करुन त्यास योग्य

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, याच्या कलम २१ (४) द्वारे, '' वार्षिक विवरण खेरीज करुन '' हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २१ (५) (क) द्वारे, पोट-कलम (९) मधील परिच्छेद (क) आणि (ख) वगळण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २१ (५) (ख) (एक) द्वारे, '' वार्षिक विवरणाखेरीज इतर '' हा मजकूर वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २१ (५) (ख) (दोन) द्वारे, '' अचूक किंवा पूर्ण '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २१ (६) द्वारे, पोट-कलम (१०) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

वाटेल असा आदेश देईल. समपहरणाचा कोणताही आदेश दिल्यावर आयुक्त, विहित करण्यात येईल असा तपशील देणारी नोटीस, विहित करण्यात येईल अशा रीतीने, संबंधित व्यक्तींच्या माहितीसाठी प्रसिद्ध करील किंवा प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील].

[१][(११) उक्त कालावधीचा अंतर्भाव असलेले वर्ष समाप्त झाल्यापासून पाच वर्षांनंतर, कोणत्याही कालवधीच्या संबंधात, या कलमाच्या पूर्वगामी तरतुदींन्वये, शास्ती लादणारा कोणताही आदेश संमत करण्यात येणार नाही].

(१२) कोणत्याही पूर्वगामी पोट-कलमांन्वये शास्ती लादणारा कोणताही आदेश,—

(क) जेव्हा शास्तीची रक्कम [२][पाच लाख] रुपयांपेक्षा अधिक असेल तेव्हा विक्रीकर अधिकाऱ्याकडून किंवा सहायक आयुक्ताकडून, उप आयुक्ताच्या पूर्वमंजुरीखेरीज काढण्यात येणार नाही ;

(ख) जेव्हा शास्तीची रक्कम [३][दहा लाख] रुपयांपेक्षा अधिक असेल तेव्हा सहायक आयुक्ताकडून, [४][किंवा वरिष्ठ सहायक आयुक्ताकडून] सह आयुक्तांच्या पूर्वमंजुरीखेरीज काढण्यात येणार नाही :

परंतु, या पोट-कलमातील कोणतीही तरतूद ही, अपील प्राधिकरणाद्वारे लादण्यात येणाऱ्या शास्तीच्या बाबतीत लागू होणार नाही.

(१३) या कलमाच्या प्रयोजनार्थ, आयुक्त, यामध्ये या अधिनियमान्वये नियुक्त केलेले किंवा घटित केलेले कोणतेही अपील प्राधिकरण, याचा समावेश आहे.

व्यापारी किंवा व्यक्तीकडून देय असलेले व्याज.

३०. (१) कोणत्याही वर्षाच्या संबंधात कर भरण्यास पात्र असलेल्या व्यापाऱ्याने या अधिनियमाखाली किंवा या अधिनियमानुसार आवश्यक असल्यानुसार त्या वेळेत नोंदणीसाठी अर्ज करण्यात कसूर केली असेल तर, तो, अशा प्रत्येक वर्षाच्या बाबतीत, अशा वर्षासाठी देय असलेल्या कराच्या रकमेबरोबरच, संबंधित वर्षाच्या, १ एप्रिल रोजी प्रारंभ होणाऱ्या व कर भरण्याच्या दिनांकाला संपणाऱ्या कालावधीसाठी प्रत्येक महिन्याकरिता किंवा त्याच्या भागाकरिता, अशा कराच्या रकमेवरील, विहित दराने परिगणित केलेली रक्कम सरळ व्याजाच्या रूपाने, भरण्यास पात्र असेल अशा, व्याजाच्या रकमेची परिगणना, अशी भरणा केलेली रक्कम व भरणा केल्याचा दिनांक वेगवेगळ्या दिनांकांना भरणा केला असल्यास किंवा अंशतः भरणा केला असल्यास किंवा भरणा केला नसल्यास या सर्व बाबी विचारात घेऊन करण्यात येईल. या अधिनियमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या परिणामी, अशा कराची उक्त रक्कम जेव्हा कमी झाली असेल तेव्हा, तद्नुसार व्याज कमी होईल आणि [५][अशी रक्कम वाढली असेल तेथे वाढलेल्या रकमेवरील व्याजाची परिगणना योग्य त्या फेरफारांसह अशा आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी करण्यात येईल] :

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २१ (७) द्वारे, पोट-कलम (११) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २१ (८) (क) द्वारे, " पन्नास हजार " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २१ (८) (ख) द्वारे, " एक लाख " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २१ (८) (ख) (एक) द्वारे, " सहायक आयुक्ताकडून " या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २२ (१) (क) द्वारे, " अशी रक्कम वाढली असती तेथे वाढलेल्या रकमेवरील व्याजाची परिगणना योग्य त्या फेरफारांसह, करण्यात येईल ; " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, यापैकी कोणत्याही वर्षाच्या बाबतीत, या पोट-कलमाखाली [१][देय व्याजाची रक्कम] ही, त्या वर्षासाठी देय असलेल्या कराच्या रकमेतून अधिक असणार नाही.

(२) या अधिनियमान्वये किंवा अधिनियमाद्वारे विनिर्दिष्ट मुदतीत एखाद्या नोंदणीकृत व्यापाऱ्याने कर भरण्यास कसूर केली असल्यास त्याला कराच्या रकमेबरोबरच ज्या शेवटच्या दिनांकापर्यंत त्याने कर भरणे आवश्यक असेल त्या दिनांकानंतरच्या प्रत्येक महिन्याकरिता, किंवा त्याच्या भागाकरिता या कराच्या रकमेवरील विहित दराने परिगणित केलेली रक्कम सरळ व्याजाने भरावी लागेल :

परंतु, [२][विवरणानुसार, नवीन विवरणानुसार, किंवा, यथास्थिती] नवीन विवरणानुसार किंवा [३][सुधारित विवरणानुसार] देय असलेल्या कराच्या संबंधात या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त व्यापाऱ्याने, असे विवरण सादर करण्यासाठी विहित केलेल्या शेवटच्या दिनांकास त्यापूर्वी अशा कराची संपूर्ण रक्कम भरली नसेल तर, या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये आवश्यकता असल्याप्रमाणे त्याने ज्या कालावधीत अशी कराची रक्कम भरणे, आवश्यक असेल, तेवढ्या कालावधीत ती भरलेली नाही, असे मानण्यात येईल. आणि तद्नुसार, त्याने जर अशा दिनांकापर्यंत त्या कराची संपूर्ण रक्कम भरलेली नसेल किंवा फक्त तिचा काही भागच भरलेला असेल तर, अशा दिनांकापर्यंत भरण्यात न आलेल्या अशा कराच्या संपूर्ण रकमेवर किंवा तिच्या भागावर अशा दिनांकानंतर, व्याज भरण्यास तो या खंडान्वये पात्र ठरेल आणि जेथे व्यापाऱ्याने [३][ नवीन विवरण किंवा सुधारित विवरण] दिले असेल आणि [३][नवीन विवरणानुसार किंवा सुधारित विवरणानुसार]देय असलेल्या कराची रक्कम ही, मूळ विवरणानुसार देय असलेल्या कराच्या रकमेहून अधिक असेल तेथे, या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी व्यापाऱ्याने, त्याला मूळ विवरणपत्रानुसार ज्यावेळी कर भरणे आवश्यक असेल त्यावेळी कराची जादा रक्कम भरण्याचे आवश्यक असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार तो, या पोट-कलमान्वये कराच्या उक्त जादा रकमेवर व्याज देण्यास पात्र असेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये ज्यावर व्याज आकारणी योग्य असेल अशा कराव्यतिरिक्त इतर कोणताही कर, कर निर्धारणाच्या कालावधीच्या अखेरीनंतर एका महिन्यापर्यंत, ज्याच्याकडून भरावयाचा राहिला असेल, अशा नोंदणीकृत व्यापाऱ्याच्या बाबतीत असा व्यापारी, निर्धारण आदेशामध्ये अंतर्भूत असलेल्या कालावधीच्या अखेरच्या दिनांकाच्या लगतनंतरच्या दिनांकापासून ते निर्धारणाच्या आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीकरिता प्रत्येक महिन्याकरिता किंवा त्याच्या भागाकरिता [४][अशा कराच्या रकमेवर विहित दराने परिगणित करण्यात आलेली रक्कम] सरळ व्याज्याच्या रुपाने भरण्यास पात्र असेल आणि ज्याबाबतीत कर निर्धारणाच्या आदेशाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी कोणत्याही दिवशी असा न भरलेला संपूर्ण कर किंवा त्याचा काही भाग भरण्यात आला असेल त्याबाबतीत, अशा व्याजाची परिगणना, अशी भरणा केलेली रक्कम आणि असा भरणा केल्याचा दिनांक विचारात घेऊन करण्यात येईल. या अधिनियमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या परिणामी, जर, उक्त कराची रक्कम कमी झाली असेल तर, व्याजही त्यानुसार कमी केले जाईल आणि तेथे रक्कम वाढविण्यात आली असेल तेथे, अशा वाढीव रकमेवरील व्याज हे अशा नंतरच्या दिनांकापासून अशा आदेशाच्या दिनांकापर्यंत योग्य त्या फेरफारांसह परिगणित केले जाईल.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या २२ (१) (ख) द्वारे, " बसवलेल्या व्याजाची रक्कम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २२ (२) (क) द्वारे, " विवरणानुसार किंवा यथास्थिती " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २२ (२) (ख) द्वारे, " सुधारित विवरण " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २२ (३) द्वारे, " अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

१[*   *   *   *]

## प्रकरण सात

## कराचे प्रदान आणि वसुली

३१. (१)(क) खंड (ख) मधील तरतुदींना अधीन राहून, आयुक्तास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना आणि निर्बंधांना अधीन राहून, कोणत्याही व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस किंवा व्यापाऱ्यांच्या वा व्यक्तींच्या वर्गास, (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश " नियोक्ता " असा करण्यात आला आहे) उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये किंवा कालावधींमध्ये त्याच्याकडून करण्यात आलेल्या कलम ८ लागू होते अशा खरेदी व्यतिरिक्त अन्य खरेदीवर देय असलेला, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल असा कर किंवा अशी कराची रक्कम वजा करण्यास फर्मावता येईल. मूळ स्त्रोतातून कराची वजात.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी, खरेदीवर देय असलेला कर याचा अर्थ, उक्त कालावधींमध्ये किंवा कालावधींमध्ये पुरवठाकाराने केलेल्या संबंधित मालाच्या पुरवठ्यावर त्याने विक्रीकराच्या स्वरुपात, उक्त नियोक्त्याकडून स्वतंत्रपणे गोळा केलेली रक्कम, असा आहे आणि ही वजात उक्त पुरवठ्यासाठी पुरवठाकाराला देय असलेल्या रकमांमधून करावयाची आहे.

(ख)(एक) आयुक्तास, तशा अधिसूचनेद्वारे नियोक्त्याच्या, कोणत्याही वर्गाला, अशा नियोक्त्याने कार्य कंत्राट दिले आहे अशा व्यापाऱ्याला, उक्त कार्य कंत्राट पूर्ण करण्यासाठी देय असलेल्या रकमेमधून विनिर्दिष्ट केली असेल अशी कोणत्याही कराची २[भारत सरकारकडून बसविण्यात आलेला कर किंवा सेवा कर म्हणून कंत्राटदाराने स्वतंत्रपणे आकारलेली रक्कम कोणतीही असल्यास, ती वगळून] वजाती करण्यास फर्माविता येईल :

परंतु, अशा वजातीची ठरीव रक्कम ही, त्या कार्य कंत्राटासाठी देय असलेल्या कराच्या ठरीव रकमेहून अधिक असणार नाही :

परंतु आणखी असे की, जेव्हा मुख्य कंत्राटदाराने त्याचे कार्य कंत्राट पूर्णतः किंवा अंशतः पार पाडण्यासाठी उप-कंत्राटदाराकडे सोपवले असेल तेव्हा कंत्राटदाराने कोणत्याही उप कंत्राटदारास केलेल्या प्रदानामधून कोणतीही वजात केली जाणार नाही :

परंतु, तसेच कलम ८ ज्याला लागू होते अशा कोणत्याही विक्रीच्या किंवा खरेदीच्याबाबतीत, या खंडाखाली केलेल्या तरतुदीनुसार कोणतीही वजात केली जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—कार्य कंत्राट पूर्ण करण्यासंबंधीच्या अग्रिम प्रदानाच्या स्वरुपात जेव्हा नियोक्त्याकडून व्यापाऱ्याला कोणतेही प्रदान करण्यात येते आणि अशी रक्कम, उक्त व्यापाऱ्याला देय असलेल्या एकूण कंत्राट मूल्यामध्ये समायोजित करण्यासारखी असेल तर, या खंडाच्या प्रयोजनांसाठीचे अग्रिम प्रदान हे, जेव्हा कार्य कंत्राटामध्ये देय असलेल्या एकूण रकमेमध्ये अंशतः किंवा अन्य प्रकारे समायोजित केले जाईल तेव्हाच, ती कार्य कंत्राटाची अंमलबजावणी करण्यासाठी दिलेली रक्कम असल्याचे मानण्यात येईल.

३[(दोन) कोणत्याही कंत्राटदाराने याबाबतीत अर्ज केल्यावर जर संदर्भित कंत्राट हे कार्य-कंत्राट नाही अशी आयुक्ताची खात्री पटली असेल आणि म्हणून कोणतीच वजात करु नये असे त्याचे मत झाले असेल तर त्याबाबतीत, आयुक्त त्या कंत्राटदाराला तसे प्रमाणपत्र देईल :

---

१ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २२ (४) द्वारे, पोट-कलम (४) वगळण्यात आले.

२ सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४६ (क)(एक) द्वारे, " (कंत्राटदाराने स्वतंत्रपणे आकारला असल्यास अशा कराची रक्कम वगळून) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ४६ (क)(दोन) द्वारे, पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

परंतु, आयुक्तास, त्या कंत्राटदाराला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, असा अर्ज फेटाळता येईल किंवा असे प्रमाणपत्र रद्द करता येईल वा त्यात फेरबदल करता येईल :

परंतु, आणखी असे की, उक्त प्रमाणपत्रातील कोणत्याही गोष्टीमुळे कंत्राटदाराच्या कर दायित्वावर परिणाम होणार नाही.]

[1][* * * *]

(२) या कलमाच्या प्रयोजनासाठी, जेथे पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेली कोणतीही कराची रक्कम नियोक्त्याच्या लेखापुस्तकात कोणत्याही लेख्यामध्ये मग तो '' निलंबन लेखा '' म्हणून ओळखला जाणारा असो किंवा इतर कोणत्याही नावाने ओळखला जाणारा असो.---जमा केली जाईल तेथे, अशी जमा रक्कम, नियोक्त्याच्या लेख्यामध्ये असा कर म्हणून जमा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमाच्या तरतुदी तद्नुसार लागू होतील.

(३) उक्त अधिसूचनेखाली नियोक्ता म्हणून ज्याचा समावेश होत नाही अशा कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्यास त्यास लागू होतील अशा नियोक्त्यांच्या संबंधातील तरतुदी करण्यासाठी, आयुक्ताकडे अर्ज करता येईल आणि विहित करण्यात येतील अशा शर्तींना आणि निर्बंधाना अधीन राहून, आयुक्तास लेखी आदेशाद्वारे, ती विनंती मान्य करता येईल.

[2][ (४) उक्त पुरवठा करणाऱ्या व्यक्तीला, या कलमाच्या तरतुदींनुसार वजा केलेली आणि राज्य शासनाला प्रदान केलेली कोणतीही रक्कम किंवा कोणतीही एकूण रक्कम ही, कराचे प्रदान असल्याचा दावा करता येईल आणि उक्त व्यक्तीला, या कलमाच्या तरतुदींनुसार कर वजा करणाऱ्या व्यक्तीने तिला ज्या कालावधीमध्ये कर प्रदानाबाबतचे प्रमाणपत्र दिले असेल त्या कालावधीमध्ये अशा कर प्रदानाची जमा खाती नोंद करण्यात यावी अशी मागणी करता येईल.]

(५) या कलमानुसार कोणतीही एकूण रक्कम वजा करणारा कोणताही नियोक्ता विहित वेळेमध्ये, अशा प्रकारे वजा केलेली रक्कम राज्य शासनाकडे जमा करील. नियोक्त्याने जर अशी रक्कम वजा केली नाही किंवा ती वजा केल्यानंतर या कलमानुसार आवश्यक असलेला कर भरण्यात कसूर केली तर, या अधिनियमाच्या तो भरण्याबाबतच्या तरतुदीद्वारे किंवा तदन्वये त्याने देय असलेला कर आवश्यक असलेल्या वेळेमध्ये भरला नाही असे मानण्यात येईल आणि व्याजाच्या संबंधातील तरतुदींसह या अधिनियमातील सर्व तरतुदी अशा न भरलेल्या करास योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

(६) मूळ स्रोतातून वजातीद्वारे कर वसुली करण्याचा अधिकार, वसुलीच्या इतर कोणत्याही मार्गास बाध आणणारा असणार नाही.

(७) या कलमाच्या तरतुदींनुसार कर वजा करणारी प्रत्येक व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा कालावधींमध्ये, या कलमाखाली ज्या व्यक्तींच्या लेख्यामध्ये कराची रक्कम जमा झाल्याचे दाखवायचे आहे, अशा व्यक्तींना विहित नमुन्यामधील प्रमाणपत्र देईल.

[3][* * * *]

---

[1] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४६(ख) द्वारे खंड (तीन) वगळण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४६ (ग) द्वारे, पोट-कलम (४) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४६ (घ) द्वारे, पोट-कलमे (८) आणि (१०) वगळण्यात आली.

(९) कोणत्याही नियोक्त्याकडून मूळ स्त्रोतातून जेव्हा कराची वजात केली जाते तेव्हा उक्त पुरवठा करणाऱ्या व्यक्तीस, उक्त पुरवठ्याच्या बाबतीत ज्या मर्यादेपर्यंत कर वजा करण्यात आला असेल त्या मर्यादेपर्यंत, तिला स्वतःला कर भरण्यास सांगण्यात येणार नाही.

[१][* * * *]

**३२.** (१) यात तरतूद केलेल्या रीतीने आणि विहित करण्यात येईल अशा कालांतराने कर भरण्यात येईल. कराचे प्रदान, इत्यादी.

(२) [२][कलम २० अनुसार] आवश्यक असलेली विवरणे सादर करणारा नोंदणीकृत व्यापारी, त्याने दाखल करणे आवश्यक असलेल्या विवरणात अंतर्भूत असलेल्या कालावधीसाठी त्याच्याकडून येणे असलेली कराची रक्कम व्याजाच्या रकमेसह आणि त्याच्याकडून देय असलेल्या इतर कोणत्याही रकमेसह, विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कालांतराने शासकीय कोषागारात भरील.

(३) कलम २० च्या [३][पोट-कलम (४)]अनुसार, आधी भरलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम देय असल्याचे दर्शविणारे सुधारित विवरण सादर करणारा नोंदणीकृत व्यापारी, प्रथम कराची जादा रक्कम शासकीय कोषागारात भरील.

(४) (क) (एक) देय असलेल्या कराची पूर्ण रक्कम न भरता विवरण किंवा सुधारित विवरण सादर केले असेल तर ती कराची देय रक्कम ताबडतोब भरण्यात येईल.

(दोन) नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही आकस्मिकतेमुळे कराव्या लागलेल्या, वजावटीतील कपातीमुळे प्रदान करणे आवश्यक असलेली कराची रक्कम, अशी आकस्मिकता उद्‌भवली त्या कालावधीसाठीचा कर भरण्यासाठी विहित केलेल्या कालावधीत भरली जाईल.

(ख) (एक) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशानुसार कोणत्याही कालावधीकरिता, देय असलेल्या कराच्या रकमेतून उक्त कालावधीसंबंधात आधीच भरलेली कोणतीही रक्कम वजा करुन येणारी रक्कम; आणि

(दोन) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये बसवण्यात आलेली व्याजाची किंवा शास्तीची किंवा दोन्हीची रक्कम कोणतीही असल्यास ती ; आणि

(तीन) अधिनियमान्वये किंवा नियमांन्वये बसवण्यात आलेली समपद्धत रक्कम, कोणतीही असल्यास, आणि दंडाची रक्कम, कोणतीही असल्यास, ती ; आणि

(चार) जादा प्रोत्साहनांचा फायदा घेण्याचा किंवा अनुज्ञेय नसलेली प्रोत्साहने घेण्याचा संदर्भात मागितलेल्या कराची, शास्तीची आणि व्याजाची रक्कम ; आणि

(पाच) या अधिनियमाखालील देय असलेली इतर कोणतीही रक्कम,

त्या व्यक्तीकडून किंवा व्यापाऱ्याकडून किंवा त्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीकडून, त्या बाबतीत आयुक्ताने नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत शासकीय कोषागारामध्ये भरण्यात येईल :

परंतु, आयुक्तास, कोणत्याही विशिष्ट व्यापाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या बाबतीत कारणे लेखी नमूद करुन, कर, शास्ती, व्याज किंवा समपहृत केलेली रक्कम हप्त्याहप्त्याने भरण्याची परवानगी देता

---

[१] सन २००६ चा महा. अधि. क्र. ३२, कलम ४६ (घ) द्वारे, पोट-कलमे (८) आणि (१०) वगळण्यात आली.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २३ (१) द्वारे, " कलम २० च्या पोट-कलम (२) अनुसार " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २३ (२) द्वारे, " पोट-कलम (५) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

येईल, परंतु, हप्त्याहप्त्याने कर भरण्यास परवानगी दिल्यामुळे शास्ती, व्याज, किंवा दोन्हीही आकारण्याच्या तरतुदींसह या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींना बाध येणार नाही.

(५) पोट-कलम (४) अन्वये नोटीस बजावण्यात आल्यानंतर भरावयाचा राहिलेला कोणताही कर, शास्ती, व्याज, दंड किंवा समपहृत रक्कम, किंवा रीतसर न भरलेला कोणताही हप्ता, किंवा या अधिनियमान्वये देय किंवा देण्यायोग्य असलेली कोणतीही रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असेल.

(६) या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही संविदेत काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या व्यक्तीने कलम ६० चे उल्लंघन करुन कर म्हणून वसूल केलेली कोणतीही रक्कम, कलम २९ अन्वये समपहृत करण्यात आली असेल व त्याच्याकडून वसूल करण्यात आली असेल त्या बाबतीत, असे प्रदान किंवा वसुली यामुळे, ज्या व्यक्तीकडून ती अशा रीतीने वसूल करण्यात आली असेल त्या व्यक्तीस ती परत करण्याच्या दायित्वातून उक्त व्यक्तीची मुक्तता होईल. ज्या व्यक्तीकडून कर म्हणून अशी रक्कम वसूल करण्यात आली असेल त्या व्यक्तीला, आयुक्ताकडे त्या रकमेच्या किंवा तिच्या काही भागाच्या परताव्याची मागणी करता येईल ; मात्र त्या व्यक्तीने, खरेदीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीमध्ये त्या मालाची फेरविक्री केलेली नसावी; आणि समपहरण आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत आयुक्ताकडे विहित नमुन्यातील लेखी अर्ज केलेला असावा. या प्रयोजनासाठी, ज्यांनी कलम ६० चे उल्लंघन करुन कोणतीही रक्कम गोळा केली असेल अशा व्यक्तीच्या अभिलेखामध्ये ज्यांची नावे व पत्ते उपलब्ध आहेत अशा उक्त खरेदीदारांना आयुक्त, विहित नमुन्यात सूचना पाठवू शकेल असा अर्ज मिळाल्यानंतर, आयुक्त, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करील आणि पूर्वोक्तप्रमाणे आपण मालाची फेरविक्री केलेली नाही अशी अर्जदाराने आयुक्तांची खात्री पटविली तर आणि ती मागणी विधिग्राह्य व स्वीकार्य आहे आणि परतावा म्हणून अशा रीतीने मागणी करण्यात आलेली रक्कम शासकीय कोषागारात प्रत्यक्ष भरण्यात आली असून किंवा वसूल करण्यात आली असून त्या रकमेच्या बाबतीत कोणतीही वजावट किंवा परतावा देण्यात आलेला नाही, अशी आयुक्ताची खात्री झाली असेल तर, तो, संबंधित व्यक्तीस जी देय असल्याचे आढळून आले असेल अशी रक्कम किंवा तिचा कोणताही भाग परत करील.

(७) (एक) " महाराष्ट्र ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन निधी " (यात यापुढे या कलमामध्ये ज्याचा निर्देश " निधी " असा करण्यात आलेला आहे) या नावाचा एक निधी स्थापन करण्यात येईल. समपहृत करण्यात आलेल्या व वसूल करण्यात आलेल्या रकमांमधून पूर्वोक्तप्रमाणे खरेदीदारांना परत करण्यात आलेल्या रकमा, तसेच, ज्या रकमांच्या बाबतीत वजावट किंवा परतावा दिलेली असेल त्या रकमा वगळता, आणि राज्य शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे उगरानी व वसुलीचा खर्च वजा जाता राहिलेली रक्कम याबाबत कायद्याने यथोचितरीत्या केलेल्या विनियोजनाद्वारे निधीमध्ये समाविष्ट व हस्तांतरित करण्यात येईल.

(दोन) या निधीमधील कोणतीही रक्कम, खंड (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी देण्यात येणार नाही किंवा वापरण्यात येणार नाही.

(तीन) निधीचा कारभार विहित रीतीने करण्यात येईल आणि या निधीमधील रक्कम, ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन यांच्याशी संबंधित अशा कोणत्याही कामांसाठी येणारा खर्च भागविण्यासाठी राज्य शासनाकडून निदेश देण्यात येईल त्याप्रमाणे आणि ग्राहकांच्या हिताचे अधिक चांगल्या प्रकारे संरक्षण करणाऱ्या व विहित करण्यात येईल अशी पात्रता असणाऱ्या कोणत्याही सेवाभावी

ग्राहक संघटना, संस्था, संघ, मंडळ किंवा परिसंस्था यांना विहित रीतीने अनुदान देण्यासाठी वापरण्यात येईल.

(८) (क) कोणत्याही व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस, निपटारा प्रमाणपत्रसाठी विहित नमुन्यामध्ये आयुक्ताकडे अर्ज करता येईल आणि त्यानंतर, आयुक्त, शक्यतो अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत, ज्या कालावधीकरिता विवरणे दाखल केली आहेत किंवा, यथास्थिती, दाखल केली नाहीत, मूल्यनिर्धारण केले आहे, असा कालावधी, प्रलंबित कार्यवाहीची स्थिती, कोणत्याही असल्यास आणि अर्जदारांकडून देय असलेल्या रकमा, कोणत्याही असल्यास, प्रमाणपत्रमध्ये नमूद करुन विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अभिलेखाच्या आधारे देईल.

(ख) आयुक्त, दरवर्षी प्रत्येक नोंदणीकृत व्यापाऱ्याला, त्या वर्षीच्या १ एप्रिल रोजी त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा, ज्या कालावधीची विवरणे सादर करण्यात आलेली नाहीत, तो कालावधी, त्या कालावधीनिहाय व्यापाऱ्याकडून देय असलेल्या कर, शास्ती, व्याज व समपहृत रकमां यांच्या अदत्त रकमा, ज्यांच्या प्रदानाची तारीख अद्याप उलटलेली नाही अशा, ज्यांची वसुली स्थगित करण्यात आली आहे, अशा आणि ज्यांचे हप्ते दिले जात आहेत, अशा, रकमा यांच्या बाबतीतले प्रमाणपत्र देईल. असे प्रमाणपत्र शक्य होईल तेथवर दरवर्षी १ एप्रिलनंतर ताबडतोब दिले जाईल.

(ग) या पोट-कलमाखाली काढलेले प्रमाणपत्र हे अपूर्ण किंवा चुकीच्या माहितीवर आधारलेले होते असे नंतर आढळून आले तर, आयुक्तास, वसुलीच्या कार्यवाहीसह कोणतीही कार्यवाही चालू करण्यास किंवा चालू ठेवण्यास प्रमाणपत्रातील कोणत्याही गोष्टीमुळे बाध येणार नाही.

**३३.** (१) कोणत्याही कायद्यात किंवा संविदेत त्याविरुद्ध काहीही समाविष्ट असले तरी, आयुक्ताला, एखाद्या व्यापाऱ्याविरुद्ध किंवा व्यक्तीविरुद्ध किंवा कलम ३२ च्या पोट-कलम (४) अन्वये ज्याच्यावर आधीच नोटीस बजावली आहे त्याच्याविरुद्ध कर, व्याज किंवा शास्ती यांचे दायित्व शिल्लक असल्याचे निदर्शनास आले तर, कोणत्याही वेळी, लेखी नोटिशीद्वारे,— वसुलीची विशेष पद्धत.

(क) उक्त व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस, ज्या कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही रक्कम येणे असेल, किंवा येणे होईल, त्या व्यक्तीस, किंवा

(ख) जी कोणतीही व्यक्ती अशा व्यापाऱ्यासाठी किंवा व्यक्तीसाठी किंवा अशा व्यापाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या वतीने पैसा धारण करीत असेल किंवा नंतर धारण करील त्या व्यक्तीस ;

पैसा येणे झाल्यावर किंवा धारण केल्यावर ताबडतोब किंवा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या (परंतु वर सांगितल्याप्रमाणे पैसा येणे होण्यापूर्वीच्या किंवा धारण करण्यापूर्वीच्या नसलेल्या) वेळेच्या आत, उपरोक्तप्रमाणे अशा व्यापाऱ्याकडून देय असलेल्या आणि अदत्त असलेल्या रकमेइतकी रक्कम आयुक्ताकडे भरण्यास फर्माविता येईल :

परंतु, कलम ३२ च्या पोट-कलम (४), अन्वये ज्या आदेशानुसार व्यापाऱ्यावर नोटीस बजावण्यात आली असेल त्या आदेशाविरुद्ध, अपील दाखल करण्याचे प्रस्तावित करीत असल्याचे नमूद केलेला अर्ज व्यापारी जर आयुक्ताकडे उक्त दिनांकापूर्वी विहित नमुन्यात, दाखल करील तर, अपील दाखल करण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापर्यंत या पोट-कलमान्वये कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनासाठी, कोणत्याही व्यक्तीकडून व्यापाऱ्यास येणे असलेल्या किंवा कोणत्याही व्यक्तीने व्यापाऱ्यासाठी किंवा व्यापाऱ्याच्या वतीने धारण केलेल्या रकमेची परिगणना, अशा व्यापाऱ्याकडून अशा व्यक्तीस देणे झाल्या असतील अशा कायदेशीर असलेल्या मागण्यांची, (कोणत्याही असल्यास) रक्कम त्यामधून वजा करुन करण्यात येईल.

(२) आयुक्तास, कोणत्याही वेळी, अशा कोणत्याही नोटिशीत सुधारणा करता येईल किंवा ती रद्द करता येईल किंवा अशा नोटिशीत अनुसरुन कोणतीही रक्कम भरण्याची मुदत वाढविता येईल.

(३) या कलमाखालील नोटिशीचे अनुपालन करुन कोणतीही रक्कम भरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, व्यापाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या प्राधिकाराखाली अशी रक्कम भरली आहे असे मानले जाईल. आणि आयुक्ताच्या पावतीवरुन, तीत उल्लेखलेल्या रकमेच्या मर्यादेपर्यंत अशा व्यक्तीने आपले दायित्व योग्य आणि पुरेशा रीतीने पार पाडल्याचे प्रस्थापित होईल.

(४) या कलमात उल्लेखलेली नोटीस मिळाल्यानंतर व्यापाऱ्याचे किंवा व्यक्तीचे कोणतेही दायित्व पार पाडणारी कोणतीही व्यक्ती, तिने पार पाडलेल्या दायित्वाच्या मर्यादेपर्यंत किंवा व्यापाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या कर, शास्ती, व्याज आणि समपहृत रक्कम यासंबंधीच्या दायित्वाच्या मर्यादेपर्यंत, यापैकी जे कमी असेल त्यापुरती आयुक्तास व्यक्तिशः पात्र असेल.

(५) ज्या व्यक्तीस, या कलमान्वये नोटीस पाठविण्यात आली असेल त्या व्यक्तीने, मागणी केलेली रक्कम किंवा तिचा कोणताही भाग तिच्याकडून व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस देय नाही किंवा ती व्यक्ती त्या व्यापाऱ्यासाठी किंवा व्यक्तीसाठी किंवा व्यापाऱ्याच्या वतीने किंवा व्यक्तीच्या वतीने कोणताही पैसा धारण करत नाही अशी, आयुक्ताची खात्री होईल अशा रितीने सिद्ध केले तर, या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे त्या व्यक्तीस, यथास्थिती, अशी कोणतीही रक्कम किंवा तिचा भाग आयुक्ताकडे भरणे आवश्यक आहे, असे मानले जाणार नाही.

(६) पोट-कलम (५) च्या तरतुदींना अधीन राहून, एखाद्या व्यक्तीकडून आयुक्ताला देय असलेली कोणतीही रक्कम भरावयाची राहिल्यास, ती रक्कम पोट-कलम (१) आणि पोट-कलम (४) अन्वये, कलम ३२ अन्वये मागणी केलेली रक्कम असल्याप्रमाणे वसुलीयोग्य असेल, आणि त्यानुसार, या कलमान्वये बजावलेली कोणतीही नोटीस ही, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, कलम ३२ अन्वये बजावलेली नोटीस असल्याचे मानण्यात येईल आणि न भरलेल्या रकमा जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यायोग्य असतील.

कराची वसुली जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे करण्यासंबंधीचे विक्रीकर प्राधिकाऱ्याचे विशेष अधिकार.

**३४.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये कोणत्याही व्यापाऱ्याकडून किंवा अन्य व्यक्तीकडून देय आणि वसुलीयोग्य असलेली कराची, शास्तीची, व्याजाची रक्कम, समपहृत रक्कम किंवा अन्य कोणतीही रक्कम, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्याच्या प्रयोजनासाठी,---

(एक) विक्रीकर आयुक्तास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये आयुक्तास असलेले सर्व अधिकार असतील व तो त्यांचा वापर करील आणि आयुक्ताची सर्व कर्तव्ये पार पाडील ; १९६६ चा महा. ४१.

(दोन) अपर विक्रीकर आयुक्तास, उक्त संहितेअन्वये अपर आयुक्तास असलेले सर्व अधिकार असतील व तो त्यांचा वापर करील आणि अपर आयुक्ताची सर्व कर्तव्ये तो पार पाडील ;

(तीन) विक्रीकर सह आयुक्तास, उक्त संहितेअन्वये जिल्हाधिकाऱ्याला असलेले सर्व अधिकार असतील व तो त्यांचा वापर करील आणि जिल्हाधिकाऱ्याची सर्व कर्तव्ये पार पाडील ;

(चार) वरिष्ठ उप आयुक्त आणि विक्रीकर उप आयुक्त यांना, उक्त संहितेअन्वये सहायक जिल्हाधिकाऱ्यास किंवा उप जिल्हाधिकाऱ्यास असलेले सर्व अधिकार (विक्री कायम करणे आणि कसूरदारास अटक करणे व दिवाणी तुरुंगामध्ये बंदिवासात ठेवणे हे अधिकार वगळून) असतील व तो त्यांचा वापर करील आणि सहायक जिल्हाधिकाऱ्याची किंवा उप जिल्हाधिकाऱ्यांची सर्व कर्तव्ये पार पाडील ;

(पाच) सहायक आयुक्तास, आणि विक्रीकर अधिकाऱ्यास उक्त संहिते अन्वये तहसिलदारास असलेले सर्व अधिकार (विक्री कायम करणे आणि कसूरदारास अटक करणे व दिवाणी तुरुंगामध्ये बंदिवासात ठेवण्याचे हे अधिकार वगळून) असतील व तो त्यांचा वापर करील आणि उक्त संहितेखालील तहसिलदाराची सर्व कर्तव्ये पार पाडील.

(२) पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन दिलेली प्रत्येक नोटीस किंवा काढलेला प्रत्येक आदेश, कलमे २४, २५, २६, २७ व ८५ च्या प्रयोजनार्थ, या अधिनियमान्वये दिलेली नोटीस किंवा काढलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

विवक्षित प्रकरणी महसुलाचे संरक्षण करण्यासाठी तात्पुरती जप्ती.

**३५.** (१) कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यापाऱ्याच्या बाबतीत, कोणत्याही येणे रकमेच्या वसुलीसंबंधातील कार्यवाहीसह कोणत्याही कार्यवाहीमधील चौकशी चालू असताना, अथवा या अधिनियमाखाली कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यापाऱ्याच्या धंद्यासंबंधात कोणतीही तपासणी किंवा झडती चालू असताना, महसुलासंबंधीच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याच्या प्रयोजनासाठी, अशा व्यक्तीला किंवा व्यापाऱ्याला अन्य कोणत्याही व्यक्तीकडून देय असलेली कोणतीही रक्कम किंवा देय होणारी कोणतीही रक्कम अथवा अशा व्यक्तीच्या किंवा व्यापाऱ्याच्या वतीने अन्य कोणतीही व्यक्ती धारण करीत असलेली किंवा नंतर धारण करील अशी कोणतीही रक्कम, तात्पुरती जप्त करणे आवश्यक आहे, असे आयुक्ताचे मत असल्यास त्याला, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये किंवा कोणत्याही संविदेत तद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी लेखी नोटिशीद्वारे तसे करता येईल :

परंतु, आदेश ज्यासाठी काढण्यात आला आहे ती रक्कम, आयुक्त, आपल्या आदेशात नमूद करील :

परंतु, आणखी असे की, जर व्यापाऱ्याने, त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा वेळेमध्ये, अशा कालावधीकरिता बँकेची हमी आयुक्ताकडे सादर केली तर, आयुक्ताला आदेशाद्वारे अशी नोटीस रद्द करता येईल.

(२) अशी प्रत्येक तात्पुरती जप्ती ही, पोट-कलम (१) अन्वये आदेश बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर अंमलात असण्याचे बंद होईल :

परंतु, आयुक्तास, कारणे लेखी नमूद करुन त्यासाठी, उपरोक्त कालावधी त्याला योग्य वाटेल इतक्या कालावधीएवढा किंवा कालावधींएवढा येईल ; तथापि, हा एकूण वाढीव कालावधी कोणत्याही बाबतीत दोन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

(३) या कलमाखालील अधिकारांचा स्वतः आयुक्ताकडून किंवा संपूर्ण राज्यावर अधिकारिता असलेल्या उप आयुक्ताकडून किंवा, यथास्थिती, आयुक्ताने **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे ज्याच्याकडे असे अधिकार सोपविले असतील अशा कोणत्याही सह आयुक्ताकडून वापर करण्यात येईल.

(४) कोणत्याही व्यक्तीवर, पोट-कलम (१) अन्वये कोणतीही रक्कम जप्त करण्यासाठी तात्पुरता आदेश जारी करण्यात येईल त्याबाबतीत अशी व्यक्ती, जोपर्यंत जप्तीचा आदेश रद्द होत नाही किंवा अंमलात असण्याचे बंद होत नाही, तोपर्यंत आयुक्ताला अशी जप्त केलेली रक्कम देण्यास व्यक्तीशः जबाबदार राहील.

(५) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला आदेश बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत किंवा, यथास्थिती, पोट-कलम (२) अन्वये कालावधी वाढवून देणारा आदेश बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत उक्त व्यक्तीने, किंवा व्यापाऱ्याने

आयुक्ताकडे विहित नमुन्यात अर्ज केला तर, आयुक्तास, अशा व्यक्तीला किंवा व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्या प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेतल्यानंतर, तो आदेश कायम करता येईल, त्यात फेरबदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल.

(६) पोट-कलम (५) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाविरुद्ध करावयाचे अपील, न्यायाधिकरणाकडे करता येईल आणि कलम २६ च्या सर्व इतर तरतुदी तद्नुसार लागू होतील.

वसुलीची विवक्षित कार्यवाही चालू ठेवणे व विधिग्राह्य असणे.

**३६.** (१) कोणत्याही कराच्या, शास्तीच्या, समपहृत रकमेच्या किंवा व्याजाच्या बाबतीत (ज्याचा या कलमात यापुढे " शासनाची येणे रक्कम " असा उल्लेख केला आहे), मागणीची कोणतीही नोटीस, व्यापाऱ्यावर किंवा त्याकरिता पात्र असणाऱ्या व्यक्तीवर बजावण्यात आली असेल आणि अशा शासनाच्या येणे रकमांच्या, बाबतीत कोणतेही अपील, किंवा अन्य कार्यवाही दाखल करण्यात आली असेल किंवा हाती घेण्यात आली असेल, त्या बाबतीत,—

(क) अशा अपिलात, किंवा कार्यवाहीत अशी शासनाची येणे रक्कम वाढविण्यात आली असेल तर, आयुक्त, त्या व्यापाऱ्यावर किंवा यथास्थिति, व्यक्तीवर, शासनाची येणे रक्कम जेवढ्या रकमेने वाढवण्यात आली असेल तेवढ्याच रकमेच्या बाबतीत दुसरी नोटीस बजावील आणि असे अपील किंवा कार्यवाही निकालात काढण्यापूर्वी, त्याच्यावर बजावलेल्या मागणीच्या नोटिशीमध्ये किंवा नोटिशींमध्ये समाविष्ट असलेल्या शासनाच्या येणे रकमेच्या वसुलीची कोणतीही कार्यवाही ही कोणतीही नवीन नोटीस न बजावता असे अपील किंवा कार्यवाही निकालात काढण्याच्या लगतपूर्वी ज्या अवस्थेत होती त्या अवस्थेपासून पुढे चालू ठेवता येईल ;

(ख) अशा अपिलात किंवा कार्यवाहीत अशी शासनाची येणे रक्कम कमी करण्यात आली असेल तर,—

(एक) आयुक्ताने त्या व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीवर नवीन नोटीस बजावणे आवश्यक असणार नाही ;

(दोन) आयुक्त, त्या व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस अशी सरकारी देय रक्कम कमी केल्याची सूचना देईल ;

(तीन) असे अपील किंवा कार्यवाही निकालात काढण्यापूर्वी त्याच्यावर बजावलेल्या मागणीच्या नोटिशीच्या किंवा नोटिशींच्या आधारे सुरु करण्यात आलेली वसुलीची कोणतीही कार्यवाही ही, अशा रीतीने कमी केलेल्या रकमेच्या बाबतीत, असे अपील, किंवा कार्यवाही निकालात काढण्याच्या लगतपूर्वी ज्या अवस्थेत होती त्या अवस्थेपासून पुढे चालू ठेवता येईल ;

(ग) असे अपील किंवा कार्यवाही निकालात काढल्यानंतर त्या व्यापाऱ्यावर किंवा व्यक्तीवर मागणीची नवीन नोटीस बजावली नाही. किंवा अशा अपिलात, किंवा कार्यवाहीत अशी शासनाची येणे रक्कम वाढविण्यात आली किंवा कमी करण्यात आली, याच केवळ कारणामुळे, अशा शासनाच्या येणे रकमेच्या बाबतीतील वसुलीची कोणतीही कार्यवाही विधि अग्राह्य ठरणार नाही :

परंतु, अशा अपिलात किंवा कार्यवाहीत कोणतीही शासनाची येणे रक्कम कमी करण्यात आली असेल आणि त्या व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस त्याबाबत कोणताही परतावा मिळण्याचा हक्क असेल तर, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार त्यास असा परतावा देण्यात येईल.

(२) शंका निरसनासाठी याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, या अधिनियमाखालील अपिलात किंवा कार्यवाहीत दिलेल्या कोणत्याही आदेशाचा परिणाम म्हणून, शासनाच्या येणे रकमेत

बदल झाला नसेल तर, अशा कोणत्याही बाबतीत मागणीची कोणतीही नवीन नोटीस आवश्यक असणार नाही.

(३) शासनाची कोणतीही येणे रक्कम देण्यास पात्र असलेल्या व्यापाऱ्यावर किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीवर आयुक्ताने बजावलेल्या मागणीच्या प्रत्येक नोटिशीच्या बाबतीत, या कलमातील तरतुदी लागू होतील.

या अधिनियमाखालील दायित्व हा प्रथम भार असणे.

**३७.** कोणत्याही संविदेत त्याविरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही केंद्रीय अधिनियमातील प्रथम भार निर्माण करण्यासंबंधीच्या कोणत्याही तरतुदीस अधीन राहून, या अधिनियमान्वये एखाद्या व्यापाऱ्याकडून किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून देय असलेली कोणतीही कराची, शास्तीची, व्याजाची रक्कम, समपहृत रक्कम, दंडाची किंवा अन्य कोणतीही रक्कम ही, त्या व्यापाऱ्याच्या, किंवा, यथास्थिती, व्यक्तीच्या मालमत्तेवरील प्रथम भार असेल

महसूल चुकविण्यासाठी केलेले हस्तांतरण निरर्थक असणे.

**३८.** (१) या अधिनियमान्वये कोणतीही कार्यवाही प्रलंबित असताना किंवा ती पूर्ण झाल्यानंतर, [1][व्यापाऱ्याकडून या अधिनियमाखाली देय असलेल्या कराची किंवा इतर कोणतीही रक्कम रुपये पंचवीस हजार रुपयांपेक्षा अधिक असण्याची शक्यता आहे असे समजण्यास आयुक्ताला कारण असेल तर, आणि त्या व्यापाऱ्याने,] महसूल चुकविण्याच्या हेतुने कोणत्याही व्यक्तीच्या नावाने आपल्या धंद्याच्या दहा हजार रुपयांइतक्या किंवा त्यापेक्षा अधिक किंमतीच्या कोणत्याही मत्तेवर भार निर्माण केला असेल किंवा अशा मत्तेची विक्री करुन, ती गहाण ठेवून, तिची देणगी देऊन, तिची अदलाबदल करून किंवा अन्य कोणत्याही हस्तांतरण पद्धतीने तिचा कब्जा अन्य कोणत्याही व्यक्तीकडे दिला असेल अशा बाबतीत, कोणत्याही अधिनियमात किंवा संविदेत त्याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, अशी कार्यवाही पूर्ण झाल्याचा परिणाम म्हणून किंवा अन्यथा, अशा व्यापाऱ्याकडून देय असलेल्या कोणत्याही कराच्या किंवा अन्य कोणत्याही रकमेसंबंधातील कोणत्याही मागणीच्या संबंधात असा भार किंवा असे हस्तांतरण निरर्थक ठरेल :

परंतु, असा भार किंवा असे हस्तांतरण, पुरेशा मोबदल्यासाठी आणि कार्यवाही प्रलंबित असल्याचे किंवा कोणतीही कार्यवाही पूर्ण झाल्यावर कोणत्याही रकमेची देयता प्रलंबित असल्याचे माहीत नसताना करण्यात आले असेल तर, ते निरर्थक ठरणार नाही.

(२) या अधिनियमान्वये कोणतीही कार्यवाही प्रलंबित असताना किंवा ती पूर्ण झाल्यानंतर या अधिनियमान्वये देय असलेला कर किंवा अन्य रक्कम देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही अन्य व्यक्तीच्या नावाने आपल्या कोणत्याही मत्तेवर भार निर्माण केला असेल किंवा अशा मत्तेची विक्री करुन, ती गहाण ठेवून, देणगी देऊन, अदलाबदल करुन, किंवा अन्य कोणत्याही हस्तांतरण पद्धतीने तिचा कब्जा अन्य कोणत्याही व्यक्तीकडे दिला असेल आणि असा भार किंवा हस्तांतरण पोट-कलम (१) अन्वये निरर्थक ठरते असे आयुक्ताचे मत असेल तर, आयुक्त, नोटीस देऊन चौकशी करील आणि तो भार किंवा हस्तांतरण पोट-कलम (१) अन्वये निरर्थक ठरले आहे किंवा नाही, हे ठरवील.

(३) अशी चौकशी करण्यात आल्यानंतर, असा भार किंवा हस्तांतरण हे निरर्थक असल्याबद्दल आयुक्ताची खात्री झाली तर तो या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी असा भार किंवा हस्तांतरण निरर्थक असल्याचे जाहीर करणारा आदेश काढील.

**स्पष्टीकरण.**——या कलमातील " मत्ता " यामध्ये जमीन, इमारत, यंत्रसामग्री, संयंत्र, शेअर, कर्जरोखे व बँकेतील नियत, ठेवी, यापैकी कोणतीही गोष्ट जेथवर ती करपात्र व्यक्तीच्या व्यवसायाच्या धंदेमालाचा भाग होत नसेल तेथवर, त्यांचा समावेश होतो.

---

१ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २४ द्वारे, " एकूण पंचवीस हजार रुपयांपेक्षा अधिक होईल अशी, या अधिनियमाखालील कराची किंवा इतर कोणतीही रक्कम देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यापाऱ्याने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कर इत्यादींची रक्कम पूर्णांकात भरणे.

**३९.** या अधिनियमाच्या तरतुदीन्वये देय असलेली कराची, शास्तीची, व्याजाची रक्कम, आपसमेळाची रक्कम, दंडाची किंवा इतर कोणतीही रक्कम, आणि येणे असलेली वजावटीची किंवा परताव्याची रक्कम ही, लगतच्या पूर्ण रुपयांत धरण्यात येईल, आणि या प्रयोजनासाठी, अशा रकमेत रुपयातील पैशाचा भाग अंतर्भूत असेल तेव्हा असा भाग पन्नास पैसे किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर, तो एक रुपयापर्यंत वाढविण्यात येईल, आणि असा भाग पन्नास पैशाहून कमी असेल तेव्हा तो विचारात घेतला जाणार नाही ;

परंतु, या अधिनियमान्वये व्यापाऱ्याकडून कराच्या रुपात येणे असलेली कोणतीही रक्कम वसूल करण्याच्या प्रयोजनासाठी या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

कोणत्याही प्रदानाचे समायोजन करणे.

**४०.** एखाद्या व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने कोणत्याही कालावधीच्या बाबतीत [१][या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशानुसार देय असलेल्या कोणत्याही रकमेचे केलेले प्रदान,] उक्त रकमेची किंवा उक्त रकमेच्या भागाची वसुली कलम २६ च्या पोट-कलम (६) अन्वये स्थगित करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, उक्त कालावधीच्या बाबतीत त्याच्याकडून अशा प्रदानाच्या दिनांकास देय असलेल्या व्याजाच्या पोटी प्रथम समायोजित करण्यात येईल आणि त्यानंतर शास्ती, समपहृत रक्कम आणि दंड म्हणून येणे असलेल्या रकमांसाठी तिचे समायोजन करण्यात येईल. समायोजित न केलेल्या कोणत्याही उर्वरित रकमेचे नंतर, त्या कालावधीच्या बाबतीत देय असलेल्या कराच्या रकमेसाठी समायोजन करण्यात येईल.

सूट व परतावा.

**४१.** (१) व्यापाऱ्यांच्या किंवा व्यक्तींच्या कोणत्याही वर्गाकडून किंवा वर्गाकडून आकारण्यात व वसूल करण्यात आलेल्या किंवा, यथास्थिती, व्यापाऱ्यांच्या किंवा व्यक्तींच्या कोणत्याही खरेदी व किंवा विक्रीकर आकारलेल्या कोणत्याही कराचा परतावा देणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक असल्याची राज्य शासनाची खात्री पटली तर, राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आल्या असतील अशा अटींना आणि शर्तींना अधीन राहून, अशा कालावधीकरिता आणि अशा व्यापाऱ्यांच्या किंवा व्यक्तींच्या वर्गाला, अशा परताव्याकरिता त्यांनी विहित नमुन्यात आयुक्ताकडे अर्ज केल्यावर, अशा कराचा परतावा देण्याकरिता तरतूद करता येईल :

परंतु, अशी अधिसूचना, भूतलक्षी प्रभावाने काढता येईल. मात्र तिचा प्रभावी दर हा, नियत दिनांकाच्या पूर्वीचा असणार नाही.

[२][*    *    *    *]

[३][(४) राज्य शासनास, त्यास लादता येतील अशा शर्तींना अधीन राहून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढील बाबतीत देय असलेल्या कराच्या प्रदानातून पूर्णतः किंवा अशतः सूट देण्याकरिता तरतूद करता येईल :—

(क) एका तेल कंपनीने दुसऱ्या तेल कंपनीला केलेली, मोटार स्पिरिट आणि पेट्रोलियम पदार्थ यांची विक्री ;

(ख) विमानचालन चक्की इंधन आणि विमानचालन गॅसोलीन यांव्यतिरिक्त, मोटार स्पिरिटच्या किरकोळ विक्रेत्यांनी केलेली विक्री.

**स्पष्टीकरण.**— या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, मोटार स्पिरिट आणि पेट्रोलियम पदार्थ यांचा अर्थ, राज्य शासन **राजपत्रात** वेळोवेळी अधिसूचित करील असे पदार्थ, असा असेल].

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २५ द्वारे " देय असलेल्या कोणत्याही रकमेचे केलेले प्रदान " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २६ द्वारे, पोट-कलमे (२) आणि (३) वगळण्यात आली.

[३] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४७ द्वारे, पोट-कलम (४) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

४२. (१) (क) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, जे व्यापारी कोणत्याही मालाच्या किंवा व्यापारी मालाच्या किरकोळ फेरविक्रीचा धंदा करतात अशा व्यापाऱ्याकडून देय असलेल्या कराबाबत, विहित केल्यानुसार आपसमेळाच्या योजनेची, त्या अधिसूचनेत तरतूद करण्यात आलेल्या अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, तरतूद करता येईल आणि किरकोळ विक्रीचा धंदा करणाऱ्याच्या वेगवेगळया वर्गाकरिता वेगवेगळया प्रकारच्या योजना अधिसूचित करता येतील. कराचा आपसमेळ.

(ख) [1][या पोट-कलमाच्या] प्रयोजनासाठी, एखाद्या व्यापाऱ्याने, जर आपल्या विक्रीच्या उलाढालीच्या ९/१० इतकी विक्री, व्यापारी नसलेल्या व्यक्तींना केली असेल तर, त्यास किरकोळ विक्रीचा धंदा करणारा आहे, असे समजण्यात येईल आणि एखादा विशिष्ट व्यापारी हा किरकोळ व्यापारी आहे किंवा कसे, याबाबत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, [2][असा प्रश्न सहआयुक्तांकडे निर्देशित करण्यात येईल.] आणि तो सह आयुक्त, आवश्यकता भासल्यास, त्या व्यापाऱ्याचे म्हणणे ऐकून घेतल्यावर, त्या प्रश्नावर निर्णय करील. सह आयुक्ताने काढलेला आदेश अंतिम असेल.

(ग) [3][पोट-कलम (२) मध्ये तरतूद केले असेल ते खेरीजकरून, या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट] जो निर्माता असेल किंवा जो आयातकर्ता असेल किंवा [4][कलम ८ च्या पोट-कलम (१) मध्ये] अंतर्भूत केलेल्या तरतुदींनुसार ज्यांची, उक्त मालाची विक्री करास पात्र नाही अशा नोंदणीकृत व्यापाऱ्याकडून ज्याने तो माल खरेदी केला असेल, अशा व्यापाऱ्यास किंवा जे भारताबाहेरून आयात केलेले मद्य, भारतात तयार केलेले विदेशी किंवा देशी मद्य यांसह मद्याच्या किरकोळ विक्रीकरता अशा व्यापाऱ्यास लागू होणार नाही.

(२) राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, [5][* * *] कोणतेही खाद्यगृह, उपाहारगृह, हॉटेल, अल्पोपाहार कक्ष किंवा भोजन आस्थापना चालवणाऱ्या व्यापाऱ्यांकडून आणि जे खाद्यपेय प्रबंधक आहेत व ज्यांच्याकडून अन्न व मद्यार्क नसलेली पेये दिली जातात अशा व्यापाऱ्यांकडून देय असलेल्या [6][किंवा बेकरी चालवणाऱ्या व्यापाऱ्यांकडून किंवा ज्यांचा मुख्य व्यवसाय मोटार वाहनांची खरेदी वा विक्री करण्याचा आहे अशा वापरलेल्या मोटार वाहनांची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून [7][किंवा भारतात तयार केलेले विदेशी मद्य नियम, १९५३ याला जोडलेल्या नमुना
१९४९ चा मुंबई २५. एफ एल दोन मधील लायसन अथवा मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ अन्वये केलेले, महाराष्ट्र देशी दारू नियम, १९७३ यांना जोडलेल्या नमुना सीएल तीन किंवा नमुना सी.एल/एफ.एल/टी.ओ.डी/तीन मधील लायसन धारण करणाऱ्या विक्रेत्यांकडून] देय असलेल्या] कराबाबत आपसमेळ योजनेची त्या अधिसूचनेत तरतूद करण्यात आलेल्या अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, तरतूद करता येईल.

---

[1] सन २००६ चा महा. अधिनियम क्रमांक ३२, कलम ४८ (क) (एक) द्वारे, " या कलमाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २७ (१) (क) द्वारे, " त्या प्रकरणाचा प्रभारी अधिकारी असा प्रश्न सह आयुक्ताकडे निर्देशित करील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४८ (क) (दोन) द्वारे, " या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २७ (१) (ख) द्वारे, " कलम ८ मध्ये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम २७ (२) (एक) द्वारे, " सर्वसाधारण जनतेचा खुला प्रवेश असतो असे " हा मजकूर वगळण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम २७ (२) (दोन) द्वारे, " मद्यार्क नसलेली पेये दिली जातात अशा व्यापाऱ्याकडून देय असलेल्या " या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४८ (ख) द्वारे, " वापरलेल्या मोटारवाहनांची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून " या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[1][(३) एखादा व्यापारी, कार्यकंत्राटाच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील (मालाच्या स्वरूपातील असो किंवा अन्य कोणत्याही स्वरूपातील असो) मालमत्तेचे हस्तांतरण करून केलेल्या विक्रीवर कर देण्यास पात्र असेल तर, त्याला, या अधिनियमान्वये त्याच्याकडून देय असलेल्या कराच्या रकमेऐवजी— मग तो कर कार्यकंत्राटाच्या मार्गाने केलेल्या विक्रीच्या संपूर्ण उलाढालीच्या संबंधात असो किंवा व्यक्तिगत कार्यकंत्राटाने केलेल्या उलाढालीच्या कोणत्याही भागाच्या संबंधात असो– विहित करण्यात येतील अशा निर्बंधांना व शर्तींना अधीन राहून, मालाचा अंतर्भाव असलेल्या उप-कंत्राटासाठी नोंदणीकृत उप-कंत्राटदाराला देय असलेली रक्कम कार्यकंत्राटाच्या एकूण कंत्राट मूल्यातून वजा करून नंतर,—

(क) बांधकाम कंत्राटाच्या बाबतीत कार्यकंत्राटाच्या एकूण कंत्राट मूल्याच्या पाच टक्क्यांएवढी रक्कम ; आणि

(ख) इतर कोणत्याही बाबतीत कार्यकंत्राटाच्या एकूण कंत्राट मूल्याच्या आठ टक्के रक्कम,—

आपसमेळ करून ठोक स्वरूपात भरता येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(एक) " बांधकाम कंत्राट " याचा अर्थ, राज्य शासन, वेळोवेळी, राजपत्रात अधिसूचित करील असे बांधकाम कंत्राट, असा आहे ; आणि

(दोन) " मालाचा अंतर्भाव असलेल्या उप-कंत्राटासाठी देय असलेली रक्कम " याचा अर्थ, ज्या मालावर कर भरण्यात आला असेल त्या मालाचे एकूण मूल्य आणि उप-कंत्राटदाराने भरलेली उक्त कराची रक्कम किंवा, यथास्थिती, उप-कंत्राटदाराने ज्या उप-कंत्राट मूल्यावर आपसमेळ करुन कर भरला असेल ते उप-कंत्राट मूल्य, असा आहे.

(४) एखादा व्यापारी मंडप किंवा ताडपत्री वापरण्याच्या हक्काचे हस्तांतरण (–मग ते विनिर्दिष्ट कालावधीसाठी असो अथवा नसो–) करून करण्यात आलेल्या विक्रीवर कर भरण्यास पात्र असेल त्याबाबतीत, त्याला विहित करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, त्याच्याकडून देय असलेल्या कराच्या रकमेऐवजी, त्याने केलेल्या विक्रीच्या उलाढालीच्या दीड टक्क्यांएवढी रक्कम भरता येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी, मंडप वापरण्याच्या हक्काचे हस्तांतरण यामध्ये मंडप, पँडॉल, शामियाना यांच्या वापराच्या किंवा असा मंडप, पँडॉल वा शामियाना यांच्या सजावटीच्या वापराच्या हक्कांच्या हस्तांतरणाचा किंवा सर्वसाधारणपणे मंडप, पँडॉल वा शामियान्याबरोबर वापरले जाणारे फर्निचर, जोडण्या, दिवे व विजेच्या जोडण्या, जमिनीवरील आच्छादने, भांडी आणि इतर वस्तू यांच्या वापराच्या हक्काच्या हस्तांतरणाचा समावेश होतो.]

या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीस या अधिनियमाच्या या किंवा पूर्वीच्या कोणत्याही कायद्याच्या सर्व तरतुदी लागू असणे.

**४३.** या अधिनियमान्वये किंवा पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये एखाद्या व्यापाऱ्याकडून किंवा व्यक्तीकडून येणे असलेल्या (कोणतीही शास्ती, व्याज आणि समपहृत रक्कम यांसह) कोणत्याही कराच्या बाबतीत, कलम ४४ अन्वये तो कर भरण्यास अन्य कोणतीही व्यक्ती पात्र असेल तर, जणू ती व्यक्ती स्वतः व्यापारी आहे असे समजून या अधिनियमाच्या, किंवा यथास्थिति, पूर्वीच्या कायद्याच्या सर्व संबंधित तरतुदी अशा दायित्वाच्या बाबतीत अशा व्यक्तीलासुद्धा लागू असतील.

[1] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४८ (ग) द्वारे, पोट-कलम (३) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४४. (१) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला एखादा व्यापारी मरण पावला तर,— विवक्षित प्रकरणी कर देण्याच्या दायित्वांसंबंधी विशेष तरतूद.

(क) तो व्यापारी जो धंदा चालवत होता तो धंदा त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत चालू ठेवण्यात आला असल्यास, असा कायदेशीर प्रतिनिधी किंवा अन्य व्यक्ती ही, या अधिनियमान्वये किंवा पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये अशा व्यापाऱ्याकडून कोणतीही शास्ती, समपहृत रक्कम व व्याज यांसह येणे असलेला कोणताही कर मृत व्यापारी ज्या रीतीने आणि ज्या मर्यादेपर्यंत तो कर देण्यास पात्र होता त्याच रीताने आणि त्याच मर्यादेपर्यंत देण्यास पात्र असेल, आणि

(ख) तो व्यापारी चालवत असलेला धंदा, त्याच्या मृत्युपूर्वी किंवा त्यानंतर बंद झाला असल्यास, अशा व्यापाऱ्याकडून या अधिनियमाअन्वये किंवा त्यापूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये देय असलेला कर तसेच, कोणतीही शास्ती, समपहृत रक्कम व व्याज–मग असा कर, कोणतीही शास्ती, समपहृत रक्कम व व्याज त्याच्या मृत्युपूर्वी निर्धारित करण्यात आलेले, परंतु अदत्त राहिलेले असो किंवा त्याच्या मृत्यूनंतर निर्धारित करण्यात आलेले असो–जर तो व्यापारी मृत्यू पावला नसता तर, ज्या रीतीने व ज्या मर्यादेपर्यंत देण्यास पात्र असता, त्याच रीतीने व त्याच मर्यादेपर्यंत त्याचा कायदेशीर वारस, मृत व्यापाऱ्याच्या संपत्तीमधून असा कर, शास्ती, समपहृत रक्कम व देय व्याज देण्यास पात्र असेल.

(२) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला व्यापारी म्हणजे एक हिंदू अविभक्त कुटुंब असेल आणि संयुक्त कुटुंबाच्या मालमत्तेचे निरनिराळ्या कुटुंबियांमध्ये किंवा व्यक्तींच्या गटामध्ये अंशतः विभाजन किंवा विभाजन करण्यात आले असेल तेव्हा, प्रत्येक व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट, अंशतः विभाजनाच्या किंवा विभाजनाच्या वेळेपर्यंत या अधिनियमान्वये किंवा पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये व्यापाऱ्यांकडून येणे असलेला कर व कोणतीही शास्ती, समपहृत रक्कम आणि व्याज देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे पात्र असेल—–मग असा कर व कोणतीही शास्ती, समपहृत केलेली आणि व्याज अंशतः विभाजनापूर्वी किंवा विभाजनापूर्वी निर्धारित करण्यात आलेले परंतु न भरलेले असो, किंवा अशा घटनेनंतर निर्धारित करण्यात आलेले असो.

(३) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला व्यापारी एखादी भागीदारी संस्था असेल आणि ती विसर्जित करण्यात आली असेल तर, अशा बाबतीत, भागीदार असलेली प्रत्येक व्यक्ती, विसर्जनाच्या वेळेपर्यंत या अधिनियमान्वये किंवा पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये भागीदारी संस्थेकडून देय असलेला कर व कोणतीही शास्ती, समपहृत रक्कम आणि व्याज, कलम ४६ अन्वये ज्या मर्यादेपर्यंत असा कर, शास्ती, समपहृत रक्कम व व्याज देण्यास ती पात्र असेल त्या मर्यादेपर्यंत असा कर, शास्ती, समपहृत रक्कम व व्याज देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे पात्र असेल; मग असा कर, कोणतीही शास्ती, समपहृत केलेली रक्कम आणि व्याज अशा विसर्जनापूर्वी निर्धारित करण्यात आलेले परंतु देण्यात न आलेले असो किंवा अशा विसर्जनानंतर निर्धारित करण्यात आलेले असो.

(४) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला व्यापारी त्याच्या धंद्याचे संपूर्णतः किंवा अंशतः हस्तांतरण करील किंवा अन्यथा त्याची विल्हेवाट लावील किंवा त्याच्या मालकीमध्ये कोणताही बदल करील व त्याच्या परिणामी त्या धंद्यात किंवा त्याच्या भागात इतर कोणतीही व्यक्ती त्याच्या जागी येईल अशा बाबतीत, तो व्यापारी व त्याच्या जागी येणारी व्यक्ती अशा हस्तांतरणाच्या, विल्हेवाट लावण्याच्या किंवा मालकीत बदल घडवून आणण्याच्या वेळेपर्यंत, या अधिनियमान्वये, किंवा पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये त्या व्यापाऱ्याकडून येणे असलेला कर व कोणतीही शास्ती, समपहृत रक्कम आणि व्याज देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे पात्र असेल–मग असा कर, कोणतीही शास्ती, समपहृत रक्कम आणि व्याज अशा हस्तांतरणाच्या, विल्हेवाट लावण्याच्या किंवा बदलाच्या पूर्वी निर्धारित करण्यात आलेले परंतु न भरलेले असो, किंवा त्यानंतर निर्धारित करण्यात आलेले असो.

(५) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला व्यापारी,–

(क) एखाद्या पाल्याचा पालक असेल, व त्या पाल्याच्या वतीने धंदा चालवीत असेल, किंवा

(ख) विश्वस्तव्यवस्थेद्वारे लाभाधिकाऱ्यांसाठी तो धंदा चालविणारा विश्वस्त असेल ,

अशा बाबतीत, जर पालकत्व किंवा विश्वस्तव्यवस्था समाप्त करण्यात आली तर, असा पाल्य किंवा, यथास्थिती, लाभाधिकारी, असे पालकत्व किंवा विश्वस्तव्यवस्था समाप्त होण्याच्या वेळेपर्यंत अशा व्यापाऱ्याकडून येणे असलेला कर व कोणतीही शास्ती, समपहृत रक्कम आणि व्याज देण्यास पात्र असेल--मग असा कर, कोणतीही शास्ती, समपहृत रक्कम आणि व्याज असे पालकत्व किंवा विश्वस्तव्यवस्था समाप्त होण्यापूर्वी निर्धारित करण्यात आलेले, परंतु न भरलेले असो किंवा त्यानंतर निर्धारित करण्यात आलेले असो.

प्रकर्त्याच्या वतीने केलेल्या विक्रीवर कर देण्यास विवक्षित अभिकर्ते पात्र असणे.

**४५.** (१) कलम २ च्या खंड (८) चे उपखंड (क), (ख) किंवा (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही व्यक्ती, तिच्या प्रकर्त्याच्या वतीने कोणत्याही करपात्र मालाची विक्री [१][ * * ] करील तेव्हा, ती व्यक्ती आणि तिचा प्रकर्ता हे दोघेही, अशा विक्रीच्या [१][ * * ] उलाढालीवर कर देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे पात्र असतील.

(२) ज्या प्रकर्त्याच्या वतीने उक्त व्यक्तीने कोणताही माल विकला असेल, [२][ * * * ] त्या प्रकर्त्याने अशा मालावर पोट-कलम (१) अन्वये उक्त व्यक्तीमार्फत कर भरण्यात आला आहे, असे आयुक्ताचे समाधान होईल, अशा रीतीने दाखवून दिल्यास, तो प्रकर्ता पुन्हा त्याच व्यवहाराच्या बाबतीत, कर देण्यास पात्र असणार नाही आणि प्रकर्त्याने असा कर भरला आहे असे त्या व्यक्तीने, आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने दाखवून दिल्यास ती व्यक्ती, पुन्हा त्याच व्यवहाराच्या बाबतीत, कर देण्यास पात्र असणार नाही.

(३) अनिवासी व्यापाऱ्याचा अभिकर्ता, अनिवासी व्यापाऱ्याच्या वतीने राज्यात कोणत्याही मालाची विक्री [३][ * * ] करील, तेव्हा अनिवासी व्यापारी आणि राज्यात राहणारा तो अभिकर्ता हे, अशा विक्रीच्या [३][ * * ] उलाढालीवर कर देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे पात्र असतील :

परंतु, अनिवासी व्यापाऱ्याने, अशा विक्रीच्या [४][ * * ] बाबतीत देय असलेला कर राज्यात राहणाऱ्या अभिकर्त्याने भरला आहे, असे आयुक्तांचे समाधान होईल अशा रीतीने दाखवून दिल्यास, तो अनिवासी व्यापारी पुन्हा त्याच व्यवहाराच्या बाबतीत कर देण्यास पात्र असणार नाही आणि अनिवासी व्यापाऱ्याने असा कर भरला आहे असे त्या अभिकर्त्याने, आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने दाखवून दिल्यास तो अभिकर्ता पुन्हा त्याच व्यवहाराच्या बाबतीत कर देण्यास पात्र असणार नाही.

(४) कार्य-कंत्राटाच्या अंमलबाजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील (मालाच्या किंवा अन्य कोणत्याही स्वरुपातील) मालमत्तेच्या हस्तांतरणाच्या मार्गाने कोणतीही विक्री झाली असेल आणि कंत्राटदाराने, त्याला देण्यात आलेल्या कार्य-कंत्राटाची अंमलबाजावणी उप-कंत्राटदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अन्यप्रकारे केली असेल त्याबाबतीत, कोणत्याही कायद्यामध्ये किंवा करारामध्ये त्याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, कंत्राटदार व उप-कंत्राटदार म्हणून ज्या व्यक्तीने

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २८ (१) द्वारे, " किंवा खरेदी " हा मजकूर दोन्ही ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २८ (२) द्वारे, " किंवा खरेदी केली असेल " हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २८ (३) (एक) द्वारे, " किंवा खरेदी " हा मजकूर दोन्ही ठिकाणी व्याकरणिक फेरफारांसह वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २८ (३) (दोन) द्वारे, " किंवा खरेदीच्या " हा मजकूर वगळण्यात आला.

प्रत्यक्षात कार्यकंत्राटाची किंवा त्याच्या भागाची अंमलबजावणी केली असेल ती व्यक्ती, त्यांच्यामधील संबंध प्रकर्ता व अभिकर्ता यांच्यामधील संबंधाप्रमाणे असल्याचे मानण्यात येईल आणि त्याप्रमाणे---

(क) अशा प्रकर्त्याने कार्यकंत्राटाची संपूर्ण किंवा अंशतः अंमलबजावणी अशा वेगवेगळ्या अभिकर्त्यांवर सोपवली असेल व परिणामी, उक्त विक्रीच्या उलाढालीची वाटणी प्रकर्ता आणि अभिकर्ते यांच्यामध्ये किंवा पूर्णतः अभिकर्त्यामध्ये होईल तर, व ज्यामुळे प्रकर्ता विक्रीच्या उलाढालीवरील संपूर्ण किंवा अंशतः कर देणाच्या दायित्वातून मुक्त होत असेल तर, निर्धारण वर्षामधील त्या प्रकर्त्याच्या अशा कंत्राटाच्या अंमलबजावणीच्या संबंधातील विक्रीच्या एकूण उलाढालीसह, विक्रीची एकूण उलाढाल विचारात घेता, अशा कार्यकंत्राटाची अंमलबजावणी त्याने एकट्याने केली असली तर, तो प्रकर्ता या अधियिमान्वये कर भरण्यास पात्र ठरला असता, म्हणून अशा विक्रीच्या एकूण उलाढालीवर कर भरण्याचे दायिव त्व प्रकर्त्याचे असेल ;

(ख) अशा अभिकर्त्याने प्रकर्त्याच्या वतीने अशा कार्यकंत्राटांची अंमलबजावणी केली असेल व त्यांच्यापैकी प्रत्येकजण किंवा दोघांपैकी एक या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असतील अशा बाबतीत, इतर कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही संविदेत त्याविरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, प्रकर्ता व अभिकर्ता हे, अशा कार्यकंत्राटाच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधातील कर संयुक्तपणे व पृथकपणे भरण्यास पात्र असतील ;

(ग) अभिकर्त्याने विक्रीच्या उलाढालीवर प्रत्यक्षात कर भरला आहे असे प्रकर्त्याने जर आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने दाखवून दिले तर, अभिकर्त्याने ज्या विक्रीच्या उलाढालीवर कर भरला आहे त्याच विक्रीच्या उलाढालीच्या बाबतीत पुन्हा कर भरण्यास प्रकर्ता पात्र ठरणार नाही ;

(घ) अभिकर्त्याने, या अधिनियमान्वये ज्या विक्रीच्या उलाढालीवर कर भरण्यास तो पात्र असेल त्या उलाढालीवर त्याच्या प्रकर्त्याने प्रत्यक्षात कर भरला आहे, असे आयुक्तांचे समाधान होईल अशारीतीने दाखवून दिल्यास, प्रकर्त्याने ज्या विक्रीच्या उलाढालीवर कर भरला असेल त्याच विक्रीच्या उलाढालीवर पुन्हा कर भरण्यास तो अभिकर्ता पात्र ठरणार नाही ;

(ङ) विहित नमुन्यात यथोचित रीतीने स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र सादर केल्याखेरीज, प्रकर्ता किंवा अभिकर्ता यांना, पूर्ववर्ती खंडान्वये कर भरण्यातून कोणतीही वजात देण्यात येणार नाही ;

(च) या अधिनियमाखाली नोंदलेल्या उप-कंत्राटदाराकडे कार्यकंत्राटाची (पूर्णतः किंवा अंशतः) अंमलबजावणी सोपवणारा कंत्राटदार हा, त्याच्या एकूण कंत्राटमूल्यामधून किंवा यथास्थिति, विक्रीच्या उलाढालीमधून, अशा उप-कंत्राटदाराने विहित नमुन्यात स्वाक्षरी केलेले प्रतिज्ञापत्र सादर केल्यानंतर, उक्त उप-कंत्राटदारामार्फत अंमलबजावणी केलेल्या कार्यकंत्राटदारांच्या संबंधातील मूल्य किंवा विक्रीची उलाढाल वजा करील ;

(छ) कंत्राटदाराने ज्या उप-कंत्राटदारांकडे कार्यकंत्राटाची (एकतर संपूर्ण किंवा अंशतः) अंमलबजावणी सोपवलेली असेल तर तो उप-कंत्राटदार हा, त्याच्या एकूण कंत्राटमूल्यामधून किंवा यथास्थिति, विक्रीच्या उलाढालीमधून अशा कंत्राटदाराने विहित नमुंन्यात स्वाक्षरी केलेले प्रतिज्ञापत्र सादर केल्यानंतर, त्याने अंमलबजावणी केलेल्या अशा कार्यकंत्राटाच्या संबंधातील मूल्य किंवा विक्रीची उलाढाल वजा करील.

भागीदारी संस्थांचे व भागीदारांचे दायित्व.

४६. (१) कोणत्याही संविदेत एतद्‌विरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये कर देण्यास कोणतीही भागीदारी संस्था जबाबदार असेल त्याबाबतीत, ती भागीदारी संस्था व तिचा प्रत्येक भागीदार असा कर देण्यास संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असेल.

(२) प्रस्तुत कालावधीत जी व्यक्ती भागीदार होती अशा कोणत्याही व्यक्तीवर या अधिनियमान्वये कोणतीही नोटीस किंवा आदेश बजावण्यात येईल-मग त्या भागीदारी संस्थेचे विसर्जन झालेले असो किंवा नसो-आणि या अधिनियमाच्या सर्व तरतुदी त्यानुसार लागू होतील.

(३) कोणताही भागीदार, भागीदारी संस्थेतून निवृत्त झाल्यास, त्याच्या निवृत्तीच्या वेळी द्यावयाचा राहिलेला कर, शास्ती, समपहृत रक्कम व व्याज (कोणतेही असल्यास) आणि निवृत्त होण्याच्या दिनांकापर्यंत निर्धारित करण्यात आलेली नसली तरीही, त्या दिनांकापर्यंत देय असेल अशी कोणतीही रक्कम देण्यास, तो जबाबदार असेल आणि उक्त भागीदाराच्या मृत्यूच्या वेळी, कायदेशीर प्रतिनिधी हा, उक्त भागीदारी संस्थेतील भागीदार नसेल तर, तो, मृत भागीदाराच्या संपत्तीमधून, असा मृत भागीदार जर मरण पावला नसता तर, ज्या रीतीने व ज्या मर्यादेपर्यंत रक्कम भरण्यास पात्र झाला असता त्याच रीतीने आणि तेवढ्या मर्यादेपर्यंतच केवळ रक्कम भरण्यास पात्र असेल.

[1][नियत दिनांकाच्या नंतर संमत केलेल्या] कंपन्यांचे एकत्रीकरण [2][किंवा विलगीकरण.]

४७. (१) दोन किंवा त्याहून अधिक कंपन्यांचे न्यायालयाच्या किंवा केंद्र सरकारच्या आदेशानुसार एकत्रीकरण करावयाचे असेल आणि आदेशाच्या दिनांकाच्या अगोदरच्या दिनांकास तो आदेश अंमलात यावयाचा असेल आणि अशा कोणत्याही दोन किंवा अधिक कंपन्यांनी आदेश अंमलात येण्याच्या दिनांकापासून सुरु होणाऱ्या आणि आदेशाच्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीत, एकमेकांना कोणताही माल विकला असेल किंवा एकमेकांकडून तो खरेदी केला असेल तर, अशा विक्रीचे आणि खरेदीचे व्यवहार, संबंधित कंपन्यांच्या विक्री किंवा खरेदीच्या उलाढाली-मध्ये समाविष्ट केले जातील आणि त्यानुसार त्यांच्यावरील कराचे निर्धारण करण्यात येईल.

(२) उक्त आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांसाठी उक्त दोन किंवा अधिक कंपन्या, [उक्त आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या] सर्व कालावधींसाठी, वेगवेगळ्या कंपन्या असल्याचे समजण्यात येईल आणि उक्त आदेश आणि उक्त कंपन्यांची नोंदणी प्रमाणपत्रे, आवश्यक तेथे, [उक्त आदेशाच्या दिनांकापासून] रद्द केली जातील.

[3][(२क) (क) न्यायालयाच्या किंवा केंद्र सरकारच्या नियत दिनांकाच्या नंतर संमत केलेल्या आदेशानुसार जेव्हा एखाद्या कंपनीचे विलगीकरण करण्यात यावयाचे असेल आणि ज्या दिनांकाला तो आदेश काढण्यात आला असेल त्या दिनांकाच्या अगोदरच्या दिनांकास तो अंमलात यावयाचा असेल तर, उक्त आदेशामुळे ज्या दोन किंवा अधिक कंपन्या अस्तित्वात आल्या, त्यांनी तो आदेश अंमलात येण्याच्या दिनांकापासून ते त्या आदेशाच्या दिनांकापर्यंत, या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांसाठी परस्परांना कोणत्याही मालाची विक्री केलेली नाही, किंवा परस्परांकडून कोणत्याही मालाची खरेदी केलेली नाही असे गृहीत धरण्यात येईल.

(ख) उक्त आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी उक्त दोन किंवा अधिक कंपन्या या उक्त आदेशाच्या दिनांकापर्यंत सर्व कालावधीसाठी एकच कंपनी असल्याचे समजण्यात येईल आणि विलगीकरण करण्यात यावयाच्या कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र उक्त आदेशाच्या दिनांकापासून रद्द करण्यात येईल आणि उक्त दोन किंवा अधिक कंपन्यांना नियमांच्या अधीन राहून, उक्त आदेशाच्या दिनांकापासून नोंदणी प्रमाणपत्रे देण्यात येतील].

(३) या कलमामध्ये वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना, कंपनी अधिनियम, १९५६ मध्ये त्यांना नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील. १९५६ चा १.

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २९ (एक) द्वारे, " न्यायालयाच्या किंवा केंद्र सरकारच्या " या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २९ (३) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २९ (२) द्वारे, पोट-कलम (२क) समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण आठ
## वजावट, परतावा इत्यादी

४८. (१) राज्य शासनाला नियमांद्वारे— वजावट, परतावा इत्यादी.

(क) नियमात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीत व अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून,—

(एक) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेल्या व्यापारी व्यक्तीने, नेमून दिलेल्या दिवसाच्या लगत पूर्वीच्या दिवशी, जो माल भांडवली मत्ता म्हणून समजण्यास येत होता अशा मालाच्या किंवा नेमून दिलेल्या दिनांकास धारण केलेल्या साठ्यातील मालाच्या पूर्वीच्या कोणत्याही विक्रीच्या किंवा खरेदीच्या बाबतीत पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये दिलेल्या सर्व कराची किंवा कराच्या कोणत्याही भागाची वजावट किंवा परतावा अशा व्यापाऱ्यास देण्यात यावा ; किंवा

(दोन) या अधिनियमान्वये मालाच्या पूर्वीच्या कोणत्याही विक्रीच्या किंवा खरेदीच्या बाबतीत दिलेल्या सर्व कराची किंवा करांच्या कोणत्याही भागाची वजावट किंवा परतावा खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यास देण्यात यावा ; किंवा

१९८७ चा महा. ४२. २००३ चा महा. ४. (तीन) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रामध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७ अन्वये दिलेल्या, सर्व करांची किंवा कराच्या कोणत्याही भागाची वजावट किंवा परतावा मोटार वाहने खरेदी करणाऱ्या किंवा आयात करणाऱ्या व्यापाऱ्याला देण्यात यावा ; किंवा

(चार) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांत मालाच्या प्रवेशावर कर बसविणे अधिनियम, २००२ अन्वये दिलेल्या सर्व कराची किंवा करांच्या कोणत्याही भागाची वजावट किंवा परतावा, व्यापाऱ्याला देण्यात यावा ;

(ख) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अन्वये कर बसवण्याच्या प्रयोजनासाठी, विक्रीच्या [१][ * * ] कोणत्याही वर्गाच्या बाबतीत विक्रीची किंमत [१][ * * ] किंमत ही, नियमांत विनिर्दिष्ट करण्यात आली असेल अशा मर्यादेपर्यंत आणि अशा रीतीने कमी करता येईल ;

अशी तरतूद करता येईल.

(२) कोणत्याही व्यापाऱ्याला, नोंदणीकृत व्यापाऱ्याकडून त्याने नियत दिनांकानंतर केलेल्या खरेदीच्या बाबतीत, परताव्याची मागणी करणाऱ्या व्यापाऱ्याने, विक्रीच्या दिनांकास, विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याचे नोंदणी प्रमाणपत्र अंमलात होते आणि त्या विक्रीवरील देय कर, कोणताही असल्यास, भरण्यात आला आहे किंवा भरण्यात येईल, अशा प्रमाणपत्राचा अंतर्भाव असलेले कराचे बीजक, सादर केल्याखेरीज, आणि अशा प्रमाणपत्रावर, विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याने किंवा त्याने यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने स्वाक्षरी केली असल्याखेरीज, या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही नियमांद्वारे तरतूद केल्याप्रमाणे, कोणतीही वजावट किंवा परतावा देण्यात येणार नाही.

(३) पोट-कलम (४) मध्ये अंतर्भूत केलेल्या तरतुदींना अधीन राहून, पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये स्वतंत्रपणे कोणत्याही कराची आकारणी करण्यात आली नसेल त्या बाबतीत, मालाच्या पूर्वीच्या कोणत्याही विक्रीच्या किंवा खरेदीच्या बाबतीतील वजावट किंवा परताव्याच्या रकमांची गणना करण्याच्या प्रयोजनांसाठी, किंवा कर बसविण्याकरिता विक्रीच्या किंवा खरेदीच्या किंमतीत घट करण्याच्या प्रयोजनांसाठी लागू असलेला कराचा दर हा, [२][कोणत्याही पूर्वीच्या कायद्यान्वये] संबंधित अनुसूचीमध्ये त्या मालासमोर दर्शविण्यात आलेला दर असेल.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ३०(१) द्वारे, " किंवा खरेदीच्या " व " किंवा खरेदीची किंमत " हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३० (२) द्वारे, हा मजकूर दाखल करण्यात आला.

(४) या अधिनियमान्वये किंवा, यथास्थिती, पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही अधिसूचनेअन्वये मालाच्या कोणत्याही विक्रीस किंवा खरेदीस, संपूर्ण विक्री करातून किंवा खरेदी करांतून सूट देण्यात आली असेल अशा बाबतीत, पोट-कलम (३) च्या प्रयोजनासाठी, कराचा दर शून्य असेल; आणि जेथे अशा खरेदीस किंवा विक्रीस विक्रीकराचा (किंवा खरेदीकराचा) कोणताही भाग देण्यातून सूट देण्यात आली असेल तेथे लागू होणारा कराचा दर हा अशी सूट देण्यात आल्यामुळे ज्या दराने कर देण्यात यावयाचा असेल तो दर असेल.

(५) शंका निरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, मालाच्या कोणत्याही खरेदीवरील वजावटीची किंवा परताव्याची रक्कम ही, मागणीदार व्यापाऱ्याने उक्त मालाची खरेदी केलेली असता जो खरेदीकर त्याच्याकडून देय असेल त्या मर्यादेव्यतिरिक्त, कोणत्याही बाबतीत, त्याच मालाच्या संबंधात , या अधिनियमान्वये किंवा, यापूर्वीच्या कोणत्याही कायद्ययान्वये प्रत्यक्षात शासकीय कोषागारात भरलेली कोणतीही असल्यास, कराच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, या अधिनियमान्वये किंवा यापूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये लादलेल्या किंवा लादावयाच्या कराचे प्रदान राज्य शासनाने अंमलात आणलेल्या सामूहिक प्रोत्साहन योजनेखाली (पॅकेज स्कीम) लांबणीवर टाकलेले असेल किंवा लांबणीवर टाकण्याजोगे असेल त्याबाबतीत असा कर, या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी शासकीय कोषागारात प्राप्त झाला आहे, असे मानण्यात येईल.

(६) व्यापारी, नियत दिवसांनंतर कोणत्याही वेळी, यापूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा या अधिनियमान्वये, परताव्यासाठी हक्कदार होईल अशाबाबतीत, असा परतावा [१][* *] यापूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा या अधिनियमान्वये, काही रक्कम देय असल्यास अशा रकमेच्या संबंधात प्रथम उपयोगात आणण्यात येईल आणि त्यानंतर शिल्लक रक्कम, कोणतीही असल्यास, ती व्यापाऱ्याला परत करण्यात येईल.

आंतरराज्य व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात, विकलेल्या घोषित मालावरील कराचा परतावा.

**४९.** कोणताही घोषित केलेला माल एखाद्या व्यापाऱ्याने आंतरराज्य व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात विकला असेल आणि आंतरराज्य व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात केलेल्या अशा मालाच्या विक्रीच्या संबंधात, केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ अन्वये त्याने कर भरला असेल १९५६ चा ७४. आणि १ ऑक्टोबर, १९५८ नंतर, राज्यात अशा मालाच्या केलेल्या कोणत्याही पूर्वीच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या बाबतीत, या अधिनियमान्वये किंवा कोणत्याही पूर्वीच्या कायद्यान्वये कर भरण्यात आला आहे. अशी, आयुक्ताची खात्री होईल अशा रीतीने असा व्यापारी दाखवून देईल तर त्या बाबतीत, आंतरराज्य व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात, अशी विक्री करणाऱ्या अशा व्यापाऱ्यास, अशा रीतीने भरण्यात आलेल्या कराच्या रकमेइतक्या रकमेची, विहित करण्यात येईल अशा रीतीने, अशा शर्तींना अधीन राहून, प्रतिपूर्ती करण्यात येईल.

जादा प्रदानाचा परतावा.

**५०.** (१) एखाद्या व्यक्तीने, तिच्याकडून देणे असलेल्या कराच्या, शास्तीच्या व व्याजाच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम, कोणतीही असल्यास, भरलेली असल्यास, या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या इतर तरतुदींना अधीन राहून, [२][आयुक्त आदेशाद्वारे]अशा व्यक्तीस त्या रकमेचा परतावा देईल. असा परतावा, अन्य कोणत्याही कालावधीच्या बाबतीत देय असलेल्या कराच्या, शास्तीच्या, समपहृत रकमेच्या व व्याजाच्या रकमेतून, कोणतीही असल्यास, अशी जादा रक्कम वजा करून किंवा अन्य कोणत्याही प्रकरणामध्ये, रोख रक्कम देऊन देता येईल :

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३० (३) द्वारे, " मूळ मजकूर वगळण्यात आला.

[२] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४९ (क) द्वारे, " आयुक्त " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, आयुक्त, अशा जादा रकमेचा विनियोग, प्रथम, ज्या कोणत्याही रकमेच्या संबंधात कलम-३२ च्या पोट-कलम (४) अन्वये नोटीस देण्यात आलेली असेल ती रककम, किंवा, यथास्थिती, कोणत्याही विवरणानुसार किंवा सुधारित विवरणानुसार देय असलेली परंतु, भरणा न केलेली कोणतीही रक्कम वसूल करण्यासाठी करील आणि त्यानंतर, कोणतीही असल्यास, शिल्लक रक्कम परत करील.

[1][(२) एखाद्या नोंदणीकृत व्यापाऱ्याने कोणत्याही वर्षातील कोणत्याही कालावधीबाबत कोणतेही विवरण, नवीन विवरण अथवा सुधारित विवरण सादर केले असेल आणि त्या विवरणानुसार, नवीन विवरणानुसार अथवा सुधारित विवरणानुसार उक्त व्यापाऱ्याला कोणतीही रक्कम परतावायोग्य असेल तर, त्या व्यापाऱ्यास, नियमांना अधीन राहून, उक्त वर्षातील कोणत्याही लगतनंतरच्या कालावधीसाठी या अधिनियमान्वये, किंवा केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ अन्वये, किंवा महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२ अन्वये सादर केलेल्या कोणत्याही विवरणानुसार, नवीन विवरणानुसार अथवा सुधारित विवरणानुसार देय असलेल्या कोणत्याही रकमेतून ही परताव्याची रक्कम समायोजित करता येईल] :

१९५६ चा ७४. २००३ चा महा. ४.

परंतु, अशा समायोजनाच्या दिनांकाला व्यापाऱ्याकडून देय असलेली कराची किंवा शास्तीची किंवा व्याजाची किंवा समपहृत रक्कम किंवा या सर्व रकमा, समायोजन करण्यापूर्वी प्रथम अशा परताव्यामधून वजा करण्यात येतील.

तात्पुरता परतावा.

[2][**५१.** (१) जेव्हा नोंदणीकृत व्यापाऱ्याने, कोणत्याही विवरणामध्ये, नवीन विवरणामध्ये किंवा सुधारित विवरणामध्ये परतावायोग्य म्हणून कोणतीही रक्कम दर्शविलेली असेल आणि कलम ५० अनुसार नंतरच्या कोणत्याही विवरणानुसार देय असलेल्या रकमेमधून अशी रक्कम समायोजित केलेली नसेल तेव्हा, आयुक्त, व्यापाऱ्याने केलेल्या अर्जावर आणि नियम व या अधिनियमाच्या इतर तरतुदी यांना अधीन राहून, उक्त व्यापाऱ्याला अशा रकमेचा परतावा देईल.

(२) (क) आयुक्त, व्यापाऱ्याने परतावायोग्य म्हणून दावा केलेल्या रकमेचा परतावा, त्या व्यापाऱ्याला उक्त विवरण, नवीन विवरण किंवा सुधारित विवरण ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या अखेरीच्या सहा महिन्यांमध्ये देईल आणि एका वर्षातील सर्व कालावधीशी संबंधित परतावा एकाच आदेशाने देण्यात येईल :

परंतु, जेव्हा असे विवरण, नवीन विवरण किंवा, यथास्थिती, सुधारित विवरण, उक्त वर्षाचे शेवटचे विवरण सादर करण्यासाठी विहित केलेल्या दिनांकानंतर सादर केले असेल तेव्हा, हा सहा महिन्यांचा कालावधी, उक्त विवरण, नवीन विवरण किंवा सुधारित विवरण सादर केल्याच्या दिनांकापासून मोजण्यात येईल.

(ख) खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा व्यापाऱ्याने, या अधिनियमान्वये तरतूद केल्याप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र मिळविलेले असेल तेव्हा, नोंदणी अंमलात आल्याचा दिनांक अंतर्भूत असणाऱ्या वर्षाच्या संबंधातील विवरणे, नवीन विवरणे किंवा सुधारित विवरणे यांच्याबाबतीतील परतावा, उक्त वर्षानंतरच्या वर्षाच्या अखेरच्या सहा महिन्यांत देण्यात येईल :

परंतु, उक्त व्यापाऱ्यास, परतावा ज्या वर्षाशी संबंधित असले ते वर्ष संपल्यानंतर केव्हाही उक्त परतावा देण्यासाठी, आयुक्ताकडे विहित नमुन्यात अर्ज करता येईल आणि आयुक्तास, बँक हमीशी संबंधित नियमांसह नियमांना अधीन राहून, असा परतावा देता येईल :

---

[1] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ४९ (ख) द्वारे, पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५० द्वारे, मूळ कलमाऐवजी कलम ५१ दाखल करण्यात आले.

परंतु आणखी असे की, जेव्हा उक्त वर्षाचे शेवटचे विवरण सादर करण्यासाठी विहित केल्याच्या दिनांकानंतर केव्हाही विवरण, नवीन विवरण किंवा, यथास्थिती, सुधारित विवरण सादर केले असेल तेव्हा, हा परतावा उक्त विवरण, नवीन विवरण किंवा सुधारित विवरण सादर केल्याच्या दिनांकापासून अठरा महिन्यांच्या आत दिला जाईल.

(३) (क) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर व्यापारी हा,—

(एक) केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ च्या कलम ५ च्या पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) च्या अर्थानुसार निर्यातक असेल ; किंवा १९५६ चा ७४.

(दोन) कलम ८ च्या, पोट-कलम (३) च्या स्पष्टीकरणामध्ये विनिर्दिष्ट केलेले युनिट असेल; किंवा

(तीन) पर्यटन प्रकल्पांकरिता नवीन एकत्रित प्रोत्साहन योजना, १९९९ अन्वये असेल तेवढे खेरीज करून अन्य, कोणत्याही एकत्रित प्रोत्साहन योजनेअन्वये हक्कविषयक प्रमाणपत्र धारण करणारा असेल—

तर त्याला, विवरण, नवीन विवरण किंवा सुधारित विवरण यामध्ये समाविष्ट असलेल्या कालावधीशी संबंधित परतावा देण्यासाठी विवरण सादर केल्यानंतर, आयुक्ताकडे विहित नमुन्यात अर्ज करता येईल.

(ख) आयुक्तास, उक्त अर्ज प्राप्त झाल्यानंतर एका महिन्याच्या आत,—

(एक) अशा कालावधीसाठी आणि विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्यांना अशा बँकांकडून अशा रकमांसाठी अशी बँक हमी देण्यासाठी व्यापाऱ्याला आवश्यक करता येईल ; आणि

(दोन) त्यास आवश्यक वाटेल अशी जादा माहिती मागवता येईल.

(४) विवरणामध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही कालावधीमध्ये व्यापाऱ्याने आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्य याच्या ओघात विक्री केलेली आहे आणि उक्त कालावधीच्या संबंधात सादर केलेले विवरण, नवीन विवरण किंवा सुधारित विवरण यामध्ये त्याने परतावायोग्य म्हणून कोणतीही रक्कम दर्शविली असेल त्याबाबतीत त्याला, नियत विवरण सादर केल्यानंतर, विवरण, नवीन विवरण किंवा सुधारित विवरण यामध्ये समाविष्ट असलेल्या कालावधीशी संबंधित परतावा देण्यासाठी, आयुक्ताकडे विहित नमुन्यात अर्ज करता येईल. अशा अर्जाबरोबर किंवा त्यानंतर तो, विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी आणि विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्यांना, अशा बँकांकडून, अशा रकमेसाठी बँक हमी देईल.

(५) आयुक्त, पोट-कलमे (२), (३) किंवा (४) अन्वये ज्याबाबतीत बँक हमी देणे आवश्यक आहे त्याबाबतीत, बँक हमी मिळाल्यापासून एका महिन्याच्या आत, विवरणात परतावायोग्य म्हणून मागणी केलेल्या रकमेचा परतावा त्या व्यापाऱ्यास देईल.

ज्याबाबतीत आयुक्ताने, व्यापाऱ्याला बँक हमी देणे आवश्यक केले नसेल किंवा ज्या कोणत्याही प्रकरणात, आयुक्ताने व्यापाऱ्याकडून जादा माहिती मागवली असेल त्याबाबतीत, आयुक्त, देय म्हणून आढळून आलेल्या रकमेचा परतावा त्या व्यापाऱ्याला देईल. अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक किंवा, यथास्थिति, जादा माहिती प्राप्त झाल्याचा दिनांक, यांपैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत असा परतावा देण्यात येईल.

(६) (क) जर या, कलमान्वये परतावा देण्यापूर्वी, ज्या कालावधीशी विवरण संबंधित आहे अशा कालावधीचे निर्धारण करण्याबाबत नोटीस पाठवण्यात आली असेल किंवा ज्या कालावधीशी विवरण संबंधित आहे अशा कालावधीच्या बाबतीत कलम ६४ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये कोणतीही कार्यवाही सुरु करण्यात आली असेल,—

(एक) जर व्यापाऱ्याने बँक हमी सादर केलेली नसेल तर, या कलमान्वये कोणताही परतावा दिला जाणार नाही ; आणि

(दोन) जर व्यापाऱ्याने बँक हमी दिलेली असेल तर, हमी दिलेल्या रकमेइतक्या रकमेचा परतावा देण्यात येईल.

(ख) या अधिनियमान्वये मंजूर केलेल्या कोणत्याही आदेशाच्या परिणामी, या कलमान्वये दिलेला परतावा हा, कोणताही असल्यास, उक्त आदेशानुसार निर्धारण केलेल्या परताव्याहून, अधिक आहे असे आढळून आले तर, ही अधिकची रक्कम, व्यापाऱ्याकडून येणे असलेल्या कराच्या रकमेप्रमाणे वसूल करण्यात येईल आणि तो व्यापारी, परतावा दिल्याच्या दिनांकापासून दर महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी विहित दराने सरळ व्याज देण्यास पात्र असेल.

(७) तरतूद केल्याप्रमाणे अर्ज केलेला नसेल तर, या कलमान्वये कोणताही परतावा दिला जाणार नाही आणि विवरण ज्या कालावधीशी संबंधित असेल त्या कालावधीचा समावेश असणाऱ्या वर्षाच्या अखेरीपासून तीन वर्षांच्या कालावधीच्या आत असा अर्ज केलेला नसेल तर या कलमान्वये कोणताही अर्ज विचारात घेतला जाणार नाही.]

**५२.** (१) [1][* * *] एखाद्या नोंदणीकृत व्यापाऱ्याला कोणत्याही कराचा परतावा देय होईल त्याबाबतीत, त्याला, नियमांना अधीन राहून, परताव्याबरोबरच [2][ज्या कालावधीशी परतावा संबंधित असेल अशा कालावधीच्या अंतिम दिनांकाच्या लगतनंतरच्या दिनांकास सुरु होणारा आणि परतावा मंजूर करणाऱ्या आदेशाच्या दिनांकास समाप्त होणारा] कालावधी किंवा चोवीस महिन्यांचा कालावधी यांपैकी जो कमी असेल त्या कालावधीकरिता परताव्याच्या रकमेवरील विहित दराने सरळ व्याज मिळण्याचा हक्क असेल. उक्त कालावधीच्या संबंधात त्या नोंदणीकृत व्यापाऱ्यांस देय असलेल्या परताव्याच्या रकमेवरील व्याजाची परिगणना, उक्त कालावधीसंबंधात कोणतीही शास्ती, समपहृत रक्कम व व्याज आकारलेले असल्यास, त्या शास्तीची, समपहृत व व्याजाची रक्कम त्यातून वजा करून [3][या अधिनियमांन्वये आधीच्या कोणत्याही कायद्यान्वये] किंवा, यथास्थिति, केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ यान्वये वसुलीदाखल परताव्याची कोणतीही रक्कम समायोजित केलेली असल्यास, ती परताव्याची रक्कम, वजा करुन करण्यात येईल. या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशामुळे अशा परताव्याच्या रकमेमध्ये, यथास्थिती, वाढ किंवा घट झाली तर त्यानुसार, अशा व्याजामध्ये वाढ किंवा घट करण्यात येईल. व्याजामध्ये घट झाली तर, अधिक दिलेली रक्कम ही, जणू काही ती या अधिनियमान्वये देय असलेली रक्कम आहे, असे समजून वसूल करण्यात येईल :

परताव्याच्या रकमेवरील व्याज.

१९५६ चा ७४.

[4][परंतु, कलम ५१ अन्वये दिलेल्या कोणत्याही [5][ * * ] परताव्या संबंधात या कलमान्वये व्याज दिले जाणार नाही.]

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, जेव्हा कराच्या परताव्यामध्ये,—मग तो संपूर्ण असो किंवा अंशतः असो-उक्त कालावधीच्या संबंधात अंतिम प्रदान करण्यासाठी विहित केलेल्या दिनांकानंतर केलेल्या कराच्या कोणत्याही प्रदानावरील परताव्याची कोणतीही रक्कम समाविष्ट असेल तेव्हा, अशा कराच्या प्रदानामुळे उद्‌भवलेल्या परताव्याशी जे व्याज संबंधित असेल त्याची परिगणना असे प्रदान केल्याच्या दिनांकपासून अशा आदेशाच्या दिनांकापर्यंत करण्यात येईल.

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३२ (१) द्वारे " या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशास अनुसरुन " हा मजकूर वगळण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३२ (२) द्वारे, " अशा आदेशात " या मजकुराने सुरु होणाऱ्या आणि " अशा आदेशाच्या दिनांकास समाप्त होणारा " या मजकुराने समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३२ (३) द्वारे, " आणि तसेच या अधिनियमान्वये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३२ (४) द्वारे, हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[5] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ५१ द्वारे, " तात्पुरत्या " हा शब्द वगळण्यात आला.

उशिरा दिलेल्या परताव्यावरील व्याज.

**५३.** (१) [1][कलम ५१ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या आधारे किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींन्वये काढलेल्या आदेशाच्या आधारे, आयुक्ताने कोणत्याही व्यक्तीला जी रक्कम परत करणे आवश्यक असेल ती रक्कम, त्याने, कलम ५१ मध्ये तरतूद केलेला संबंधित कालावधी संपल्यापासून किंवा, यथास्थिती, उक्त आदेशाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत परत केली नाही तर, तो आयुक्त, असा नव्वद दिवसांचा कालावधी संपल्याच्या लगतनंतरच्या दिनांकापासून ती रक्कम परत करण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी उक्त रकमेवर, अशा व्यक्तीस, विहित दराने सरळ व्याज देईल :]

परंतु , न्यायाधिकरणाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या आधारे जेव्हा रक्कम परतावायोग्य होईल त्याबाबतीत, या कलमाच्या तरतुदींन्वये देय असलेले व्याज ज्या अधिकाऱ्याचा आदेश न्यायाधिकरणापुढील, उच्च न्यायालयापुढील किंवा सर्वोच्च न्यायालयापुढील कार्यपद्धतीचा विषय झालेला असेल त्या अधिकाऱ्याला न्यायाधिकरणाचा, उच्च न्यायालयाचा किंवा सर्वोच न्यायालयाचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांचा कालावधी संपल्याच्या लगतनंतरच्या दिनांकापासून परताव्याच्या दिनांकापर्यंत देय असेल. अर्जदार व्यापारी किंवा व्यक्ती उक्त अधिकाऱ्यास अशा आदेशाची प्रमाणित प्रत पुरवू शकेल आणि जर प्रत अशा प्रकारे देण्यात आली तर, अशी प्रत दिल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर व्याज देय होईल.

**स्पष्टीकरण.**–पूर्वोक्त नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत रक्कम परत करण्यात उक्त व्यक्तीमुळे उशीर झाला असेल,–मग तो पूर्णतः झालेला असो किंवा अंशतः झालेला असो–तर त्याच्यामुळे उशीर झालेला कालावधी हा, ज्या कालावधीकरिता व्याज देय असेल त्या कालावधीतून वगळण्यात येईल.

(२) या कलमातील तरतुदीन्वये व्याजाची परिगणना करण्याच्या प्रयोजनासाठी वगळावयाच्या कालावधीसंबंधी कोणताही प्रश्न उद्भवल्यास, अशा प्रश्नावर आयुक्त निर्णय देईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

विवक्षित प्रकरणात परतावा रोखून ठेवण्याचा अधिकार.

**५४.** (१) ज्या आदेशामुळे परताव्याचा प्रश्न उद्भवेल असा आदेश एखाद्या अपिलाचा किंवा पुढील कार्यवाहीचा विषय असेल किंवा त्या विषयी या अधिनियमाखालील इतर कोणतीही कार्यवाही प्रलंबित असेल आणि असा परतावा दिल्यास महसुलावर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव आहे, असे अशा परताव्यास मंजुरी देण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याचे मत असेल तर, अशा प्राधिकाऱ्यास, आयुक्ताच्या पूर्वमान्यतेने, आयुक्त, निश्चित करील अशा वेळेपर्यंत परताव्याची रक्कम रोखून ठेवता येईल :

परंतु , अशा अपिलाचा, पुढील कार्यवाहीचा किंवा इतर कार्यवाहीचा निष्कर्ष काढल्यानंतर परताव्याची रक्कम, पूर्णतः किंवा अंशतः वसूल करणे आवश्यक झाले तर, कोणत्याही वाजवी कालावधीमध्ये ती वसूल करणे अन्यथा व्यवहार्य होणार नाही किंवा तसे करणे शक्य होणार नाही, असे आयुक्ताचे मत झाले तरच, आयुक्त परतावा रोखून ठेवण्यासाठी आपली मान्यता देईल :

परंतु आणखी असे की, उक्त परतावा देण्याचा प्रश्न ज्यामुळे उद्भवला तो आदेश बजावल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांचा कालावधी संपल्यानंतर, परतावा रोखून ठेवण्याचा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

---

[1] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५२ द्वारे, " या अधिनियमान्वये काढलेल्या आदेशाच्या आधारे " या मजकुराने सुरु होणाऱ्या व " सरळ व्याज देईल " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) अन्वये परतावा रोखून ठेवण्यात आला असेल त्याबाबतीत, राज्य शासन, अपील किंवा पुढील कार्यवाहीचा किंवा इतर कोणत्याही कार्यवाहीचा परिणाम म्हणून त्या व्यक्तीस देय होणाऱ्या, अंतिमरित्या निश्चित करण्यात येईल अशा परताव्याच्या रकमेवर, कलम ५३ च्या तरतुदींनुसार, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला आदेश बजावल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांचा कालावधी संपल्यानंतर लगेच येणाऱ्या दिनांकापासून परताव्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीकरिता व्याज देईल.

## प्रकरण नऊ

## कार्यवाही

**५५.** (१) [१][राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा दिनांकास आणि अशा दिनांकापासून, कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्यास] [२][तो करणार असलेल्या प्रस्तावित व्यवहाराच्या संबंधात] या अधिनियमाच्या, नियमांच्या किंवा अधिसूचनांच्या कोणत्याही तरतुदीची अर्थउकल करण्याबाबत आगाऊ अधिनिर्णय मिळण्यासाठी उक्त तरतुदीशी संबंधित कोणताही प्रश्न कोणत्याही कार्यवाहीत उद्‌भवला नसला तरीही, न्यायाधिकरणाकडे विहित नमुन्यात व विहित रीतीने अर्ज करता येईल. आगाऊ अधिनिर्णय देणे.

(२) न्यायाधिकरणाला, अर्जामध्ये कोणत्याही महत्वपूर्ण व सारभूत प्रश्नाचा अंतर्भाव नाही, असे आढळून आले तर, न्यायाधिकरण, अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर अर्ज फेटाळू शकेल.

(३) अर्ज दाखल करुन घेण्यात आला असेल तर, त्या प्रश्नावर निर्णय देण्यासाठी अध्यक्ष, न्यायाधिकरणाचे तीन [३][ * * ] सदस्य, [४][अध्यक्षाने नामनिर्देशित करावयाचा] न्यायाधिकरणासमोर हजर राहण्यास हक्कदार असलेले वरिष्ठ व्यवसायी आणि आयुक्ताने नामनिर्देशित करावयाचा सह-आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला विक्रीकर विभागाचा अधिकारी यांचे मिळून बनणारे एक न्यायपीठ घटित करण्याची व्यवस्था करील. अर्जदाराचे म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर, न्यायपीठ, अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रश्नावर आपला आगाऊ अधिनिर्णय घोषित करील. न्यायपीठाच्या सदस्यांमध्ये मतभिन्नता असेल तर, त्यानंतर घेतलेला निर्णय हा, बहुमताचा निर्णय असेल. न्यायाधिकरणाद्वारे अर्ज स्वीकारल्यापासून चार महिन्यांच्या आत उक्त खंडपीठाकडून शक्य तेथवर आगाऊ अधिनिर्णयाची अधिघोषणा करण्यात येईल.

(४) ज्या कायद्याच्या आधारे आगाऊ अधिनिर्णय घोषित केलेला असेल त्या कायद्यात बदल झाला नसल्यास, घोषित केलेला आगाऊ अधिनिर्णय बंधनकारक असेल आणि त्यानुसार, कलम २७ मध्ये तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमान्वये नियुक्त किंवा घटित केलेल्या कोणत्याही प्राधिकरणाकडून असा कोणताही प्रश्न कोणत्याही कार्यवाहीमध्ये विचारात घेतला जाणार नाही. [५][ * * * * ]

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३३ (१) (क) द्वारे," कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्यास किंवा व्यापार, वाणिज्य, उद्योग किंवा सेवा क्षेत्र यांच्या कोणत्याही संघास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३३ (१) (ख) द्वारे, " या अधिनियमाच्या, नियमांच्या किंवा अधिसूचनांच्या " या मजकुरापूर्वी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३३ (२) (क) द्वारे, " किंवा पाच " हा मजकूर वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३३ (२) (ख) द्वारे, " न्यायाधिकरणासमोर हजर राहण्यास हक्कदार असलेले " या मजकुरापूर्वी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३३ (३) द्वारे, " या कलमान्वये नंतरच्या कोणत्याही कार्यवाहीत न्यायाधिकरणाला " या मजकुराने सुरु होणारा आणि " असा आदेश देता येईल " या मजकुराने संपणारा मजकूर वगळण्यात आला.

विवादग्रस्त प्रश्नांचा निर्णय करणे.

५६. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) कोणतीही व्यक्ती, सोसायटी, क्लब किंवा संघ, किंवा कोणतीही भागीदारी संस्था किंवा कोणत्याही भागीदारी संस्थेची कोणतीही शाखा किंवा विभाग हा, व्यापारी आहे किंवा नाही, किंवा

(ख) कोणत्याही विशिष्ट व्यक्तीची किंवा व्यापाऱ्याची नोंदणी करणे आवश्यक आहे किंवा नाही, किंवा

(ग) कोणत्याही मालास, केलेली कोणतीही विशिष्ट गोष्ट ही मालाची निर्मिती या संज्ञेच्या अर्थानुसार, त्या मालाची निर्मिती ठरते किंवा कसे अथवा त्याचे पर्यावसान निर्मितीत होते किंवा कसे, किंवा

(घ) कोणताही व्यवहार हा विक्री आहे, किंवा खरेदी आहे, किंवा तो व्यवहार विक्री किंवा खरेदी असल्यास, त्याची यथास्थिती, विक्री किंमत किंवा खरेदी किंमत काय आहे, किंवा

(ङ) कर भरण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यापाऱ्याच्या बाबतीत, अशा व्यक्तीकडून किंवा व्यापाऱ्याकडून कोणत्याही विशिष्ट विक्रीच्या किंवा खरेदीच्या बाबतीत कोणताही कर देय आहे किंवा नाही अथवा देय असल्यास त्याचा दर काय आहे, किंवा

(च) खरेदीच्या कोणत्याही विशिष्ट व्यवहारात वजावटीची मागणी करता येऊ शकेल काय आणि मागणी करता येणे शक्य असेल तर अशी वजावट कोणत्या शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून करता येईल,

यासंबंधी कलम ५५ अन्वये न्यायालय किंवा न्यायाधिकरण यांच्यापुढे चालू असलेल्या कार्यवाहीत उपस्थित झालेल्या प्रश्नाव्यतिरिक्त कोणताही प्रश्न उद्भवल्यास, किंवा आयुक्ताने कलम २३ अन्वये व्यापाऱ्यावर आकारणी करण्यास सुरुवात करण्यापूर्वी कोणताही प्रश्न उद्भवल्यास, आयुक्त, नियमांना अधीन राहून, अशा प्रश्नांचा निर्णय करण्याचा आदेश देईल.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी, आयुक्ताने, कलम २३ अन्वये व्यापाऱ्यावर कोणतीही नोटीस बजावली असेल तर, आयुक्ताने, त्या कलमान्वये त्या व्यापाऱ्यावरील आकारणीस सुरुवात केली आहे असे मानले जाईल.

(२) आयुक्तास, निर्धारणापूर्वी केलेल्या कोणत्याही विक्रीच्या किंवा खरेदीच्या बाबतीत या अधिनियमाखालील अर्जदाराच्या दायित्वास किंवा परिस्थितीनुसार तसे करणे समर्थनीय असेल तर, तशाच परिस्थितीत असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या दायित्वात बाधा येणार नाही असा निर्देश देता येईल.

(३) आयुक्त, कारणे लेखी नमूद करून पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये, त्याच्याकडून देण्यात आलेल्या आदेशाचे स्वतःहून पुनर्विलोकन करील आणि त्यास रास्त व योग्य वाटेल असा आदेश त्यावर देईल. आयुक्तास, पुनर्विलोकनाच्या आदेशामुळे, पुनर्विलोकनापूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही विक्रीच्या किंवा खरेदीच्या संबंधात ज्या व्यक्तीच्या बाबतीत पुनर्विलोकन करण्यात आले त्या व्यक्तीच्या दायित्वास बाधा येणार नाही, असा निदेश देता येईल आणि त्यानुसार त्याप्रमाणे जर परिस्थितीनुसार तसे करणे समर्थनीय असेल तर, तशाच परिस्थितीत असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या दायित्वास बाधा येणार नाही, असा निदेश देता येईल :

परंतु, ज्याबाबतीत आदेशाचे पुनर्विलोकन करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे, अशा व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, या पोट-कलमान्वये, कोणताही आदेश दिला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, या पोट-कलमान्वये कोणतीही कार्यवाही सुरु करण्यापूर्वी, आयुक्त राज्य शासनाची पूर्वपरवानगी मिळवील.

(४) या अधिनियमान्वये किंवा पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये आधीच दिलेल्या कोणत्याही आदेशातून असा कोणताही प्रश्न उपस्थित होत असेल तर, या कलमान्वये निर्धारण करण्यासाठी असा कोणताही प्रश्न दाखल करुन घेतला जाणार नाही. मात्र अशा आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलात असा प्रश्न उपस्थित करता येईल.

(५) आयुक्त, शक्य होईल तेथवर, निर्धारणासाठी अर्ज ज्या कालक्रमानुसार दाखल करण्यात आले असतील, त्या कालक्रमानुसार त्या अर्जावर निर्णय देईल.

अधिनियमाचा उद्देश व प्रयुक्ती विफल करण्यासाठीचा करार शून्यवत असणे.

५७. (१) या अधिनियमाची किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीची प्रयुक्ती किंवा प्रयोजने विफल ठरविणारी कोणतीही संव्यवस्था दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये किंवा व्यापाऱ्यांमध्ये करण्यात आली असल्याबद्दल आयुक्ताची खात्री झाली तर, आयुक्त अशी संव्यवस्था या अधिनियमाची प्रयुक्ती व प्रयोजने या संबंधात शून्यवत असल्याचे, आदेशाद्वारे जाहीर करु शकेल, आयुक्तास, उक्त आदेशाद्वारे, अशा संव्यवस्थेमुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा व्यापाऱ्याकडून–मग असा व्यापारी किंवा व्यक्ती संव्यवस्थेतील पक्षकार असो वा नसो–देय असलेल्या कराच्या रकमेमध्ये, त्या व्यापाऱ्याला त्या संव्यवस्थेतून अथवा संव्यवस्थेअन्वये मिळालेला कराचा कोणताही फायदा विफल करण्याच्या दृष्टीने त्याला योग्य वाटेल अशी वाढ किंवा घट करण्याची तरतूद करता येईल.

(२) या कलमाच्या प्रयोजनासाठी,––

(एक) '' संव्यवस्था '' यामध्ये, कोणतीही संविदा, करार, योजना किंवा समझोता–मग तो कायद्यान्वये अंमलात आणण्याजोगा असो वा नसो–आणि ज्याद्वारे ती व्यवस्था अंमलात आणावयाची आहे असे सर्व उपाय व व्यवहार यांचा समावेश होतो ;

(दोन) '' कराचा फायदा '' यामध्ये,––

(क) कोणत्याही व्यापाऱ्याच्या कर भरण्याच्या दायित्वात केलेली कोणतीही कपात,

(ख) कोणत्याही व्यापाऱ्याच्या, वजावटीची किंवा परताव्याची मागणी करण्याच्या हक्कामध्ये केलेली कोणतीही वाढ,

(ग) कोणत्याही व्यापाऱ्याला मिळणाऱ्या किंवा त्याने द्यावयाच्या विक्री किंमतीत अथवा खरेदी किंमतीत केलेली कोणतीही कपात,

यांचा समावेश होतो.

(३) या कलमाखाली कोणताही आदेश काढण्यापूर्वी, आयुक्त, ज्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यापाऱ्याला मिळालेला कराचा फायदा विफल करावयाचा आहे, त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

एका वर्षापेक्षा कमी किंवा अधिक कालावधी संबंधातील सांविधिक आदेशाबाबत विशेष तरतुदी.

५८. जेव्हा एखाद्या व्यापाऱ्याच्या बाबतीत, कोणत्याही कारणासाठी वर्षाच्या एखाद्या भागाकरिता या अधिनियमाखाली कोणताही आदेश देण्यात येत असेल तेव्हा, कर आकारण्याच्या किंवा कर भरण्यापासून संपूर्ण किंवा अंशतः सूट देण्याच्या प्रयोजनासाठी आणि त्याच्याशी आनुषंगिक किंवा त्याला साह्यभूत असणाऱ्या कोणत्याही प्रयोजनासाठी, या अधिनियमाखालील कलम ३ व्यतिरिक्त इतर कोणत्याही कलमामध्ये किंवा कोणत्याही नियमामध्ये किंवा त्या वर्षाच्या बाबतीत काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही रकमेच्या किंवा रकमांच्या कोणत्याही निर्देशाचा अशा आदेशाच्या प्रयोजनासाठी, अशा प्रत्येक रकमेला किंवा

रकमांना, संख्येच्या अंशाच्या जागी, ज्या कालावधीसाठी आदेश दिला असेल त्या कालावधीतील महिन्यांची संख्या असेल व छेदाच्या जागी बारा ही संख्या असेल अशा संख्येने गुणून, सुधारणा केल्याप्रमाणे उक्त रकमेचा किंवा रकमांचा निर्देश आहे, असा लावण्यात येईल :

परंतु, अशा कालावधीमध्ये एखाद्या महिन्याच्या भागाचा समावेश असेल त्यावेळी, असा भाग पंधरा किंवा त्याहून अधिक दिवसांचा असेल, तर तो एक पूर्ण महिना समजण्यात येईल आणि असा भाग पंधरा दिवसांपेक्षा कमी असेल तर तो हिशेबात धरला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, असा संपूर्ण कालावधी जेव्हा पंधरा दिवसांपेक्षा कमी असेल तेव्हा, तो एक पूर्ण महिना समजण्यात येईल.

कार्यवाही हस्तांतरित करण्याचा अधिकार.

**५९.** (१) आयुक्तास, संबंधित पक्षकारांना त्या प्रकरणी आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, तसे करण्याबद्दलची आपली कारणे त्या आदेशात नमूद करुन, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीखालील कोणतीही कार्यवाही किंवा कार्यवाहीचा वर्ग, स्वत:कडून इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करता येईल आणि त्याचप्रमाणे त्यास, कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रलंबित कार्यवाही किंवा या कलमाखाली आधीच हस्तांतरित केलेली कार्यवाही यासह, अशी कोणतीही कार्यवाही, कोणत्याही अधिकाऱ्याकडून, समवर्ती अधिकारिता असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा स्वत:कडे हस्तांतरित करुन घेता येईल :

परंतु, असे हस्तांतरण एका अधिकाऱ्याकडून इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे करावयाचे असेल आणि दोन्ही अधिकाऱ्यांची कार्यालये ठाणे जिल्हा यासह बृहन्मुंबईमध्ये किंवा, यथास्थिती, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४ अन्वये घटित करण्यात आलेल्या एकाच जिल्ह्यात असतील तेव्हा, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, अशी कोणतीही संधी देणे आवश्यक ठरते, असे मानले जाणार नाही. १९६६ चा महा. ४१.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, कोणतीही कार्यवाही ही, योग्य अधिकारिता असलेला कोणताही प्राधिकारी, या अधिनियमाच्या, नियमांच्या किंवा अधिसूचनेच्या तरतुदींअन्वये नोटीस देईल तेव्हाच प्रलंबित असल्याचे मानण्यात येईल आणि अशी नोटीस दिल्यानंतरच ती कार्यवाही प्रलंबित असल्याचे मानण्यात येईल.

(३) जेव्हा कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे कार्यवाही प्रलंबित नसेल तेव्हा, एखाद्या व्यक्तीवर किंवा व्यापाऱ्यावर, योग्य अधिकारिता असलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास अशा वेळी जी कोणतीही कार्यवाही असेल ती सुरु करता आणि ती पूर्ण करता येईल.

**स्पष्टीकरण एक.**––या कलमात, कोणत्याही व्यापाऱ्याच्या संबंधात, " कार्यवाही " या शब्दाचा अर्थ, अशा आदेशाच्या दिनांकास जी प्रलंबित असेल किंवा अशा दिनांकास किंवा दिनांकापूर्वी जी, पूर्ण झाली असती अशा कोणत्याही कालावधीच्या बाबतीतील या अधिनियमाखालील सर्व कार्यवाही, असा आहे आणि त्यात, अशा व्यापाऱ्याच्या बाबतीत, उक्त कालावधीच्या वर्षाच्या संबंधात, अशा आदेशाच्या दिनांकानंतर जी सुरु केली जाईल अशा या अधिनियमाखालील सर्व कार्यवाहींचा देखील समावेश होतो.

[१][* * * *]

विवक्षित प्रकरणांमध्ये कराच्या रुपाने किंवा कराच्या ऐवजी रकमा वसूल करण्यास मनाई.

**६०.** (१) करपात्र नसलेल्या कोणत्याही मालाच्या विक्रीच्या बाबतीत, कोणतीही व्यक्ती, कराच्या रुपाने कोणतीही रक्कम वसूल करणार नाही.

(२) जी नोंदणीकृत व्यापारी नाही अशी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही मालाच्या विक्रीबाबत अन्य कोणत्याही व्यक्तीकडून कराच्या रुपाने कोणतीही रक्कम वसूल करणार नाही आणि कोणताही नोंदणीकृत व्यापारी, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये कोणत्याही मालाच्या विक्रीवर त्याच्याकडून देय असलेल्या कराच्या रकमेपेक्षा कोणतीही अधिक रक्कम कराच्या रुपाने किंवा कराच्या ऐवजी वसूल करणार नाही.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३४ द्वारे,स्पष्टीकरण दोन वगळण्यात आले.

**स्पष्टीकरण.**—— या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी, जेथे नोंदणीकृत व्यापाऱ्याकडून विक्रीच्या उलाढालीवर वसूल केलेल्या कराची एकूण रक्कम ही, अशा उलाढालीवर त्या व्यापाऱ्याकडून देय असलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक होत असेल आणि उक्त व्यापारी किंवा आयुक्त, अशी अधिक वसुली नेमक्या कोणत्या व्यवहारावर करण्यात आली आहे. हे ओळखू शकत नसतील तेथे, या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी, ती अधिक वसुली, उलाढाली अंतर्भूत असलेल्या सर्व व्यवहारामुळे त्या त्या प्रमाणात करण्यात आली आहे, असे मानण्यात येईल आणि त्यानुसार या कलमाच्या प्रयोजनांसाठी उपरोक्त अधिक रक्कम ही, अशा प्रत्येक व्यवहारावर वसूल करण्यात आली आहे, असे मानण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) मधील कोणतीही गोष्ट त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींअन्वये एखाद्या व्यक्तीवर लादण्यात आलेल्या शर्तीचे आणि निर्बंधाचे अनुपालन करण्याकरिता त्या व्यक्तीने अशी कराची रक्कम स्वतंत्रपणे वसूल करणे आवश्यक असेल त्याबाबतीत, लागू असणार नाही.

(४) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जो कार्यकंत्राटदार नाही अशा ज्या व्यापाऱ्यास आयुक्ताने या अधिनियमाच्या, नियमांच्या किंवा अधिसूचनेच्या कोणत्याही तरतुदीअन्वये कराच्या ऐवजी ठोक रक्कम भरण्याची परवानगी दिली असेल तो व्यापारी, ज्या कालावधीकरिता अशी ठोक रक्कम देणे लागू असेल, त्या कालावधीत मालाची विक्री केलेली असल्यास, त्या विक्रीवर कराच्या रुपाने किंवा कराच्या ऐवजी कोणतीही रक्कम वसूल करणार नाही.

विवक्षित प्रकरणी लेख्यांची लेखापरीक्षा करणे.

**६१.** (१) कर देण्यास पात्र असलेला प्रत्येक व्यापारी,——

(क) जर त्याच्या विक्रीची, किंवा, यथास्थिति, खरेदीची उलाढाल कोणत्याही वर्षात चाळीस लाख रुपायांहून अधिक असेल तर,

[१][(ख) (एक) महाराष्ट्र स्पिरीट गाळणे व पेय मद्याच्या निर्मितीबाबतचे नियम, १९६६ खालील नमुना पी. एल. एल.; किंवा

(दोन) महाराष्ट्र बियर व वाईन निर्मितीबाबतचे नियम, १९६६, खालील नमुना बी-आरएल, किंवा

(तीन) विशेष परवाना व अनुज्ञप्ती नियम, १९५२ खालील नमुना इ. किंवा

(चार) मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ खालील नमुने एफएल-एक, एफएल-दोन, एफएल-तीन, एफएल-चार; किंवा

(पाच) महाराष्ट्र देशी दारू नियम, १९७३ खालील नमुने सीएल-एक, सीएल-दोन, सीएल-तीन, सीएल/एफएल/टीओडी तीन,

या नमुन्यांमधील लायसन धारण करणारा व्यापारी किंवा व्यक्ती असेल तर ;]

तो, अशा वर्षाच्या बाबतीतील त्याच्या लेख्यांची, त्या वर्षाच्या समाप्तीपासून विहित कालावधीच्या आत लेखापालाकडून लेखापरीक्षा करुन घेईल आणि अशा लेखापालाने यथोचित स्वाक्षरी व सत्यापित केलेला व विहित करण्यात येईल असा तपशील व प्रमाणपत्रे नमूद करणारा, अशा लेखापरीक्षेचा अहवाल विहित नमुन्यात त्या कालावधीत सादर करील.

**स्पष्टीकरण.**——या कलमाच्या प्रयोजनार्थ, '' लेखापाल '' याचा अर्थ, सनदी लेखापाल अधिनियम, १९४९ याच्या अर्थानुसार सनदी लेखापाल, असा आहे. १९४९ चा ३८.

(२) पोट-कलम (१) अन्वये लेख्यांची लेखापरीक्षा करण्यास जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यापाऱ्याने, उपरोक्त मुदतीत अशा अहवालाची एक प्रत सादर करण्यात कसूर केली तर, आयुक्त, व्यापाऱ्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर ; त्याच्यावर, देय असलेल्या कोणत्याही कराबरोबरच एकूण विक्रीच्या किंवा, यथास्थिति, खरेदीच्या, एक

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३५ (१) द्वारे, खंड (ख) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

दशांश टक्के इतकी रक्कम किंवा एक लाख रुपये यांपैकी जी कमी असेल ती रक्कम शास्तीच्या स्वरुपात लादील :

[१][परंतु, व्यापाऱ्याने पोट-कलम १ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत अशा अहवालाची एक प्रत सादर करण्यात कसूर केली परंतु, उक्त कालावधी संपल्याच्या एक महिन्याच्या आत ती सादर केली आणि त्याने त्याच्या नियंत्रणापलिकडील कारणांमुळे विलंब झाला होता हे आयुक्ताची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध केले तर, या पोट-कलमान्वये त्याच्यावर कोणतीही शास्ती लादण्यात येणार नाही.]

निर्धारणाची कार्यवाही, इत्यादी विवक्षित कारणांमुळे विधिअग्राह्य न ठरणे.

६२. (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीला अनुलक्षून सादर करण्यात आलेले, केलेले किंवा दिलेले किंवा करण्यात आल्याचे, केल्याचे किंवा दिल्याचे किंवा करण्यात आल्याचे अभिप्रेत असलेले कोणतेही [२][* *] निर्धारण, (पुनर्विलोकन, अपील सुधारणा [३][शास्ती आणि समपहरण]) नोटीस, समन्स किंवा इतर कार्यवाही ही, जर असे [२][* *] निर्धारण, नोटीस, समन्स किंवा इतर कार्यवाही यांचा आशय आणि प्रभाव हा, या अधिनियमाच्या उद्देशाशी, प्रयोजनाशी आणि आवश्यकताशी सुसंगत किंवा त्यानुसार असेल तर, केवळ असे निर्धारण, नोटीस, समन्स किंवा इतर कार्यवाही यातील कोणतीही चूक, दोष किंवा कसूर याच कारणामुळे विधिअग्राह्य ठरणार नाही किंवा विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही.

(२) कोणतीही नोटीस, आदेश किंवा, यथास्थिती, पत्र ज्याला पाठविण्यात आले असेल त्या व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने आधीच त्यावर कारवाई केली असेल तर, किंवा ज्याच्या बजावणीस अशी नोटीस, आदेश किंवा पत्र यांनुसार अगोदर सुरु झालेल्या, चालू असलेल्या किंवा पूर्ण झालेल्या कार्यवाहीमध्ये अथवा कार्यवाहीच्या बाबतीत आक्षेप घेण्यात आला नसेल तर, उक्त नोटिशीच्या, आदेशाच्या किंवा पत्राच्या बजावणीस आक्षेप घेण्यात येणार नाही.

(३) या अधिनियमाच्या तरतुदीन्वये दिलेला निर्धारण, पुनर्विलोकन, अपील, सुधारणा, किंवा सूचना यांच्या आदेशासह कोणताही आदेश, या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीन्वये इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून देखील ती कार्यवाही करता आली असती, केवळ एवढ्याच कारणावरुन विधिअग्राह्य ठरणार नाही.

## प्रकरण दहा

## हिशेब, इत्यादी सादर करण्याचे दायित्व

हिशेब.

६३. (१) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला प्रत्येक व्यापारी, आणि विहित नमुन्यातील नोटीस बजावून आयुक्ताने ज्यास तसे करण्यास फर्मावले असेल असा अन्य कोणताही व्यापारी, त्याने खरेदी केलेल्या किंवा विकलेल्या मालाच्या मूल्याचा खरा हिशेब ठेवील.

(२) असे ठेवलेले हिशेब, एखादा व्यापारी कोणत्याही कालावधीत कर देण्यास पात्र आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी पुरेसे स्पष्ट किंवा समजण्यासारखे नाहीत किंवा सादर केलेल्या विवरणाची किंवा विवरणपत्राची योग्य चाचणी करता येणार नाही अशा रीतीने ते ठेवण्यात आले आहेत, असे आयुक्तास वाटले तर, त्यास अशा व्यापाऱ्यास, विक्रीच्या किंवा खरेदीच्या अभिलेखासह असे हिशेब, कराचे निर्धारण योग्य प्रमाणात होण्याच्या प्रयोजनासाठी त्याच्या मते आवश्यक असेल, अशा नमुन्यात किंवा अशा रीतीने आणि त्याबाबत विहित करण्यात येईल अशा कोणत्याही गोष्टींना अधीन राहून, तो लेखी निवेदन देईल त्याप्रमाणे ठेवण्यास लेखी नोटिशीद्वारे फर्माविता येईल.

(३) आयुक्तास, याबाबतीत विहित करण्यात येतील अशा शर्तींना किंवा निर्बंधाना अधीन राहून, लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही व्यापाऱ्यास किंवा राजपत्रातील अधिसूचनेद्वारे व्यापाऱ्यांच्या

---

[१]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३५ (२) द्वारे, हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[२]वरील अधिनियमाच्या कलम ३६ (१) (क) द्वारे, " विवरण " हा शब्द जेथे जेथे आला असेल तो वगळण्यात आला.

[३]वरील अधिनियमाच्या कलम ३६ (१) (ख) द्वारे, " अधिसूचना " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कोणत्याही वर्गास, त्याच्या मालाची खरेदी, विक्री किंवा पोचवणी यासंबंधी आणि मालाच्या विक्री किंवा खरेदीबाबत दिलेल्या किंवा स्वीकारलेल्या रकमेसंबंधी तो विनिर्दिष्ट करील असे तपशील दर्शविणारे हिशेब आणि अभिलेख, अशा नमुन्यात आणि अशा रीतीने ठेवण्याबद्दल निदेश देता येईल.

(४) प्रत्येक नोंदणीकृत व्यापारी, सर्वसाधारणपणे त्याच्या मालाचा साठा, किंवा त्याने केलेली मालाची खरेदी, विक्री आणि मालाची पोचवणी, किंवा त्याने दिलेली किंवा मालाच्या विक्री किंवा खरेदीबाबत स्वीकारलेली रक्कम यासंबंधातील त्याचे हिशेब, नोंदवह्या आणि कागदपत्रे, त्याच्या नोंदणी प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या धंद्याच्या एका किंवा अनेक ठिकाणी किंवा, आयुक्ताच्या पूर्वमान्यतेने, आयुक्ताने संमती दिली असेल अशा अन्य ठिकाणी ठेवील.

[1][(५) ज्या ज्या वेळी,–

(क) मालाची कोणतीही विक्री करण्यात आली असेल आणि त्यानंतर, माल विहित मुदतीत परत करण्यात आला असेल तेव्हा, अशा परत करण्यात आलेल्या मालाचा हिशेब, ज्या कालावधीत लेखा पुस्तकांमध्ये समुचित नोंदी घेण्यात आल्या असतील त्या कालावधीच्या विवरणात देण्यात येईल; आणि

(ख) मालाची कोणतीही खरेदी करण्यात आली असेल आणि त्यानंतर, माल विहित मुदतीत परत करण्यात आला असेल तेव्हा, परत करण्यात आलेल्या मालाचा हिशेब, ज्या कालावधीत लेखा पुस्तकांमध्ये समुचित नोंदी घेण्यात आल्या असतील त्या कालावधीच्या विवरणात देण्यात येईल.

(६) कोणत्याही मालाच्या विक्री किंमतीत किंवा, यथास्थिती, खरेदी किंमतीत बदल झाला असेल आणि अशा फरकाबद्दलचे जमापत्र किंवा, यथास्थिती नावेपत्र देण्याची विनंती करण्यात आली असेल तेव्हा,–

(क) त्या जमापत्रात किंवा, यथास्थिती, नावेपत्रात, कराचा हिस्सा, कोणताही असल्यास, आणि किंमतीचा हिस्सा, स्वतंत्ररीत्या विनिर्दिष्ट करण्यात येईल, आणि

(ख) अशा जमापत्रांचा किंवा, यथास्थिति, नावेपत्रांचा हिशेब, ज्या कालावधीत लेखा पुस्तकांमध्ये जमापत्रांच्या व नावेपत्रांच्या समुचित नोंदी घेण्यात आल्या असतील, त्या कालावधीच्या विवरणात देण्यात येईल.]

**६४.** (१) आयुक्तास विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, कोणत्याही व्यापाऱ्यास कोणतेही हिशेब किंवा कागदपत्रे त्याच्यापुढे सादर करण्यास, किंवा त्या व्यापाऱ्याच्या मालाच्या साठ्यासंबंधी किंवा त्याने विकलेल्या, खरेदी केलेल्या, आणि पोचवणी केलेल्या मालासंबंधी किंवा मालाच्या विक्री किंवा खरेदीबाबत त्याने दिलेल्या किंवा स्वीकारलेल्या रकमेसंबंधी कोणतीही माहिती पुरविण्यास, किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असेल अशी त्याच्या धंद्यासंबंधीची अन्य कोणतीही माहिती पुरविण्यास फर्माविता येईल.

हिशेब व कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी आणि जागेची झडती.

(२) कोणत्याही व्यापारी मालाच्या साठ्याशी संबंधित असलेले किंवा कोणत्याही व्यापाऱ्याने खरेदी केलेल्या, विकलेल्या आणि पोचवणी केलेल्या मालाशी, किंवा मालाच्या विक्री किंवा खरेदीबाबत दिलेल्या किंवा स्वीकारलेल्या रकमेशी संबंधित असलेले सर्व हिशेब, नोंदवह्या व कागदपत्रे आणि कोणत्याही व्यापाऱ्याच्या धंद्याच्या कोणत्याही ठिकाणी ठेवलेला सर्व माल व रोकड ही, आयुक्तास सर्व वाजवी वेळी पाहण्यासाठी खुली असेल आणि आयुक्तास, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्यास आवश्यक वाटतील अशा उक्त हिशेबाच्या, नोंदवह्यांच्या किंवा कागदपत्राच्या प्रती किंवा उतारे आणि आढळलेल्या मालाची आणि रोख रकमेची यादी करून घेता येईल किंवा घेण्याची व्यवस्था करता येईल.

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३७ द्वारे, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात आले

(३) जर कोणत्याही व्यापाऱ्याने त्याच्याकडून येणे असलेल्या कोणत्याही कराची रक्कम भरण्याचे टाळले आहे किंवा तो टाळण्याचा प्रयत्न करत आहे असे आयुक्तास सकारण वाटत असेल तर, त्यास, कारणे लेखी नमूद करुन, त्यास आवश्यक वाटतील असे त्या व्यापाऱ्याचे हिशेब, नोंदवह्या किंवा कागदपत्रे जप्त करता येतील, आणि त्याबद्दल तो पावती देईल, आणि या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या [१][किंवा कोणत्याही खटल्याच्या] संबंधात आवश्यक असेल तोपर्यंत ते ठेवून घेईल :

परंतु, व्यापाऱ्याने अर्ज केल्यावर, आयुक्त, उक्त हिशेब, नोंदवह्या किंवा कागदपत्रे याच्या सत्य प्रती पुरवील.

(४) पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) च्या प्रयोजनांसाठी आयुक्तास, कोणत्याही व्यापाऱ्याच्या धंद्याच्या कोणत्याही ठिकाणी व्यापारी त्याच्या धंद्याचे हिशेब, नोंदवह्या किंवा कागदपत्रे किंवा त्याच्या धंद्याशी संबंधित मालाचा साठा ठेवत आहे किंवा त्यावेळी त्याने ठेवला आहे, असे आयुक्तास सकारण वाटत असेल, तर त्या ठिकाणी प्रवेश करता येईल आणि त्या जागेची झडती घेता येईल.

(५) झडती घेत असताना कोणतीही हिशेबाची पुस्तके, इतर दस्तऐवज, पैसे किंवा माल कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात किंवा नियंत्रणात असल्याचे आढळून आल्यास, एतद्‌विरूद्ध सिद्ध करण्यात आले नाही तर, अशी हिशेबाची पुस्तके, इतर दस्तऐवज, पैसे किंवा माल अशा व्यक्तीच्या मालकीची आहे, असे गृहीत धरण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी, धंद्याचे ठिकाण, यामध्ये व्यापारी, कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या अभिकर्त्यामार्फत किंवा अन्यथा, ज्या ठिकाणी कामधंदा करीत असेल अशी जागा, अभिकर्त्याच्या कामधंद्याची जागा, व्यापारी किंवा अभिकर्ता त्याचा माल साठवत असेल अशी वखार, गोदाम किंवा इतर जागा, आणि व्यापारी किंवा अभिकर्ता त्याची खातेपुस्तके ठेवत असेल अशी कोणतीही जागा यांचा समावेश होतो.

व्यवहारांची उलटतपासणी करणे.

**६५.** (१) कर चुकवेगिरीस प्रतिबंध घालण्याच्या आणि या अधिनियमाच्या तरतुदींच्या योग्य अनुपालनाची खात्री करण्याच्या दृष्टीने, आयुक्तास, व्यापाऱ्यांच्या कोणत्याही वर्गाने केलेल्या विक्री आणि खरेदीसंबंधीची माहिती वेळोवेळी गोळा करता येईल आणि त्यास, विक्रीच्या आणि खरेदीच्या अशा कोणत्याही व्यवहारांची उलटतपासणी करविता येईल.

(२) या प्रयोजनासाठी, आयुक्तास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी, व्यापाऱ्याच्या कोणत्याही वर्गास, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा प्राधिकाऱ्याकडे आणि अशा दिनांकापर्यंत, उक्त अधिसूचनेत नमूद केलेल्या कालावधीत त्यांनी केलेल्या विक्री किंवा खरेदीसंबंधीची, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी माहिती सविस्तर व तपशीलवार सादर करण्यास फर्मावता येईल.

[२][* * * *].

सर्वेक्षण.

**६६.** (१) या अधिनियमान्वये कर देण्यास जबाबदार असलेले, परंतु, नोंदणी न झालेले व्यापारी शोधून काढण्याच्या दृष्टीने, आयुक्त वेळोवेळी नोंदणी न झालेल्या व्यापाऱ्यांचे सर्वेक्षण करवील.

(२) सर्वेक्षण करण्याच्या प्रयोजनासाठी, आयुक्तास, सर्वसाधारण किंवा विशेष नोटिशीद्वारे कोणत्याही व्यापाऱ्यास किंवा व्यापाऱ्यांच्या वर्गास, ज्यांनी अशा व्यापाऱ्याकडून किंवा व्यापाऱ्यांच्या वर्गाकडून कोणत्याही नियत कालावधीमध्ये कोणताही माल खरेदी केला आहे किंवा त्यांना कोणताही माल विकला आहे अशा व्यक्तींची आणि व्यापाऱ्यांची नावे, पत्ते आणि त्यास आवश्यक वाटेल असा त्यांच्या संबंधातील इतर तपशील सादर करण्यास फर्मावता येईल.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३ द्वारे, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३९ द्वारे, पोट-कलम (३) वगळण्यात आले.

(३) सर्वेक्षण करण्याच्या प्रयोजनासाठी, आयुक्तास, त्याच्या मते सर्वेक्षणाच्या प्रयोजनार्थ, ज्या प्रस्तुत व उपयुक्त वाटतील अशा बँक व्यवसायी कंपन्यांसह लोकसेवाभावी व वित्तीय संस्थांमार्फत पुरविण्यात आलेल्या सेवासंबंधीची सविस्तर व तपशीलवार माहिती मागविता येईल. त्यास, वेळोवेळी अशा सर्वेक्षणामध्ये आढळून आलेल्या कोणत्याही विशिष्ट नोंदणी न झालेल्या व्यापाऱ्याचे नाव उघड होणार नाही किंवा सूचित होणार नाही अशाप्रकारे, त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही रीतीने त्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष प्रसिद्ध करविता येतील.

[1][* * * *]

**तपासणी चौक्यांची व नाक्यांची स्थापना करणे.**

६७. (१) जर शासनास या अधिनियमाखालील कराच्या चुकवेगिरीला आळा घालण्याच्या किंवा तपासणी करण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटत असल्यास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा राज्यातील किंवा राज्याच्या सीमेवरील ठिकाणी, तपासणी चौक्यांची स्थापना किंवा नाक्यांची उभारणी किंवा दोन्हींचीही स्थापना करण्याचा निदेश देता येईल.

(२) वाहनाचा मालक किंवा ते ताब्यात असलेली व्यक्ती किंवा चालक,–

(क) वाहनातून वाहून नेत असलेल्या मालाच्या संबंधातील कर बीजक (टॅक्स इनव्हाईस) किंवा विक्रीचे देयक किंवा पोचवणी पावती किंवा विहित करण्यात येईल असा अन्य दस्तऐवज आपल्यासोबत बाळगील ;

(ख) तपासणी चौकीच्या किंवा नाक्याच्या कोणत्याही प्रभारी अधिकाऱ्यासमोर, किंवा कलम ७७ च्या पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अन्य अधिकाऱ्यासमोर, पोट-कलम (क) मध्ये उल्लेख केलेले दस्तऐवज किंवा कागदपत्रे सादर करील आणि त्यावर अशा अधिकाऱ्याचा शिक्का उमटवून घेईल आणि विक्रीच्या बिलाची व पोचवणी पावतीची एक प्रत उक्त अधिकाऱ्याला देईल आणि दुसरी प्रत मालाची वाहतूक पूर्ण होईपर्यंत आपल्याजवळ बाळगील :

(ग) राज्यात प्रवेश करताना, प्रथम लागणाऱ्या तपासणी चौकीला किंवा नाक्याला आणि राज्यातून बाहेर पडताना शेवटी लागणाऱ्या तपासणी चौकीला किंवा नाक्याला कळवील आणि वाहनात भरलेल्या मालाच्या संबंधात विहित करण्यात येईल असा तपशील असलेले प्रतिज्ञापत्र उक्त अधिकाऱ्याला देईल;

(घ) मालाच्या तपासणीकरिता आणि वाहनात भरलेल्या मालाच्या संबंधातील अशा चालकाच्या किंवा वाहन ताब्यात असलेल्या अन्य व्यक्तीच्या ताब्यात असलेल्या अभिलेखाचे निरीक्षण करण्यासाठी वाहन थांबवील आणि उक्त अधिकाऱ्याला आवश्यक वाटेल तितका वेळ ते थांबवून ठेवील आणि तशी आवश्यकता असल्यास तो त्याचे नाव व पत्ता आणि वाहनाच्या मालकाचे नाव व पत्ता देईल;

(ङ) कलम ७७ च्या पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत केलेला एखादा अधिकारी कोणतेही वाहन मध्येच अडवील तेव्हा असा अधिकारी त्याला आवश्यक वाटल्यास, मालकाला किंवा चालकाला किंवा वाहन ताब्यात असलेल्या व्यक्तीला, ते वाहन तपासणी चौकीवर किंवा नाक्यावर किंवा पोलीस ठाण्यावर नेण्याचा निदेश देईल आणि मालक, चालक किंवा वाहन ताब्यात असलेली व्यक्ती, त्याच्या अशा निदेशांचे पालन करील;

**राज्यातून रस्त्याने मालाची ने-आण करणे आणि ने-आण पास देणे**

६८. (१) एखादे वाहन, करपात्र मालाची वाहतूक करताना,—

(क) राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून, राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणी वाहतूक करीत असेल आणि राज्यातून जात असेल; किंवा

(ख) देशाबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून राज्यात आयात केली असेल आणि असा माल राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणी नेत असेल;

अशा बाबतीत, वाहनाचा मालक किंवा वाहन ताब्यात असलेली कोणतीही अन्य व्यक्ती विहित

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ४० द्वारे पोट-कलमे (४), (५), (६) आणि (७) वगळण्यात आली.

माहिती भरुन देईल आणि राज्यातील त्याच्या प्रवेशानंतर किंवा, यथास्थिती, असा माल राज्यातून हलवण्यास प्रारंभ केल्यानंतर लागणाऱ्या पहिल्या तपासणी चौकीच्या किंवा नाक्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडून, किंवा, यथास्थिती, राज्यात प्रवेश केल्यावर किंवा असा माल हलविण्यास सुरूवात केल्यावर मालवाहन मध्येच अडवण्याबाबत कलम ७७ चे पोट-कलम (१) अन्वये ज्याला अधिकार प्रदान करण्यात आले आहेत अशा अधिकाऱ्याकडून, विहित नमुन्यातील ने-आण पास दोन प्रतीत मिळवील.

(२) वाहनाचा चालक किंवा वाहन ताब्यात असलेली व्यक्ती, पोट-कलम (१) अन्वये मिळवलेल्या ने-आण पासाची प्रत, करारनिविष्ट वेळेत, राज्यातून बाहेर पडण्याआधी शेवटच्या तपासणी-चौकीच्या किंवा नाक्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला देईल.

(३) (क) मालाने भरलेले वाहन, जर कोणत्याही कारणाने ने-आण पासातील करारनिविष्ट वेळेत राज्याबाहेर हलवण्यात आले नसेल तर, माल वाहनाचा मालक, चालक, किंवा ते ताब्यात असलेली कोणतीही व्यक्ती, अशा विलंबाची कारणे व इतर तपशील कोणताही असल्यास, याबाबतीत अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याला देईल आणि असा, अधिकारी, जेथे आवश्यक असेल तेथे योग्य ती चौकशी केल्यानंतर, ने-आण पासामध्ये उचित सुधारणा करुन बाहेर जाण्याची वेळ वाढवून देईल.

(ख) एखाद्या वाहनाने वाहून आणलेल्या मालाचा राज्यात प्रवेश झाल्यानंतर किंवा, यथास्थिती, माल हलवायला सुरूवात केल्यानंतर, असा माल कोणत्याही अन्य वाहनाने किंवा कोणत्याही अन्य मार्गाने राज्याबाहेर वाहून नेल्याचा दावा केला असल्यास, तो माल राज्याबाहेर प्रत्यक्ष वाहून नेला हे सिद्ध करण्याची जबाबदारी राज्यात प्रथम माल आणणारा वाहन चालक, वाहन ताब्यात असलेली व्यक्ती किंवा मालक यांच्यावर असेल.

(४) वाहनाचा चालक किंवा ते ताब्यात असलेली कोणतीही अन्य व्यक्ती, पोट-कलम (२) च्या आवश्यकतांची पूर्तता करीत नसेल तर, त्याने अन्यथा सिद्ध करेपर्यंत वाहनाच्या मालकाने उक्त मालाची राज्यामध्ये विक्री केलेली आहे असे गृहीत धरण्यात येईल आणि तो कर भरण्यास पात्र असलेला व्यापारी आहे असे समजून, आयुक्ताने याबाबतीत अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याकडून त्याच्यावरील कर निर्धारित केला जाईल आणि या अधिनियमांच्या सर्व तरतुदी तदनुसार त्याला लागू होतील.

(५) पोट-कलम (१) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे ने-आण पास मिळवलेल्या वाहनाच्या मालकाने, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्यानुसार पास परत करण्यात कसूर केल्यास, तो वाहतूक केलेल्या मालावर बसवण्यायोग्य कराच्या रकमेच्या दुप्पट होईल एवढी रक्कम शास्ती म्हणून भरण्यास पात्र असेल.

(६) मालक असलेल्या व्यक्तीने वाहन अन्य व्यक्तीला मालाच्या वाहतुकीसाठी भाड्याने दिलेले असेल अशा प्रकरणात, वाहन भाड्याने घेणारा देखील, या कलमाच्या प्रयोजनाकरिता, वाहनाचा मालक आहे, असे मानण्यात येईल.

स्वयंचलन. ६९. (१) माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील तरतुदी आणि या अधिनियमाखाली केलेले नियम आणि दिलेले निदेश, डिजिटल सह्या, इलेक्ट्रॉनिक नियंत्रण, निर्देश, पोच आणि इलेक्ट्रॉनिक अभिलेख पाठवणे, इलेक्ट्रॉनिक अभिलेख मिळविणे आणि डिजिटल सह्या व डिजिटल सहीचे प्रमाणपत्र मिळविणे यांबाबतच्या तरतुदींसह, या अधिनियमाखाली केलेल्या कार्यपद्धतीला, शक्य होईल तेथवर, लागू होतील. २००० चा २१.

(२) जेव्हा कोणतीही नोटीस, [१][किंवा पत्र] स्वयंचलित माहिती संस्करण यंत्रणेवर तयार केली असेल आणि ती कोणत्याही व्यापाऱ्यावर किंवा व्यक्तीवर रीतसर बजावण्यातआली असेल तेव्हा,

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४१ द्वारे, " पत्र किंवा सूचना " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी आला असेल तेथे हा मजकूर दाखल करण्यात आला.

उक्त नोटीस, [1][किंवा पत्र] यावर कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा व्यक्तीने व्यक्तिशः सही करणे आवश्यक नसेल आणि नोटीस, [1][किंवा पत्र] यावर अशा अधिकाऱ्याने व्यक्तिशः सही केलेली नाही याच केवळ कारणासाठी ते विधिग्राह्य नसल्याचे मानण्यात येणार नाही.

## प्रकरण अकरा

## आकडेवारी

आकडेवारी गोळा करण्याचा अधिकार.

७०. (१) या अधिनियमाची अधिक चांगल्या रीतीने अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी, तसे करणे आवश्यक आहे असे आयुक्ताला वाटले तर, त्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाद्वारे किंवा त्या संबंधात हाताळण्यात येईल अशा कोणत्याही बाबीसंबंधी आकडेवारी गोळा करण्यात यावी, असा निदेश देता येईल.

(२) असा निदेश देण्यात आल्यानंतर, आयुक्ताला किंवा याबाबत आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि आवश्यक वाटल्यास कोणत्याही वृत्तपत्रामध्ये नोटीस प्रसिद्ध करून, किंवा व्यापाऱ्यांचे व इतर व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे लक्ष नोटिशीकडे वेधण्यास आयुक्ताच्या व उक्त व्यक्तीच्या मते जी रीत अधिक सोयीस्कर असेल अशा अन्य रीतीने, ज्यासंबंधी आकडेवारी गोळा करावयाची असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी अशा नोटिशीत नमूद करण्यात येईल अशी माहिती किंवा विवरणे सादर करण्यास सर्व व्यापाऱ्यांना किंवा व्यापाऱ्यांच्या कोणत्याही वर्गाला किंवा व्यक्तींना सांगता येईल. ज्या नमुन्यात व ज्या व्यक्तीकडे किंवा प्राधिकरणांकडे अशी माहिती किंवा विवरणे पाठवावयाची असतील तो नमुना व त्या व्यक्ती किंवा ती प्राधिकरणे, त्यामध्ये जो तपशील अंतर्भूत असावयास पाहिजे तो तपशील, आणि ज्या कालांतराने अशी माहिती किंवा विवरणे पुरवावयाची असतील ते कालांतर, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

लोकसेवकाने माहिती उघड करणे.

७१. (१) या अधिनियमानुसार दिलेल्या कोणत्याही विवरणपत्रातील, पुरवलेल्या कोणत्याही विवरणातील किंवा सादर केलेल्या कोणत्याही हिशेबातील किंवा दस्तऐवजातील सर्व तपशील, किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी दिलेल्या पुरावावयाच्या कोणत्याही अभिलेखातील सर्व तपशील (फौजदारी न्यायालयापुढील कार्यवाही व्यतिरिक्त), किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी तयार करण्यात आलेल्या कोणत्याही आकारणीच्या कार्यवाहीच्या किंवा मागणीच्या वसुलीसंबंधीच्या कोणत्याही कार्यवाहीच्या कोणत्याही अभिलेखातील सर्व तपशील, पोट-कलम (३) मध्ये तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, गोपनीय समजण्यात, येईल; आणि
१८७२ चा १. भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही न्यायालयास, वर सांगितले असेल त्या व्यतिरिक्त, कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्यास आपल्यासमोर असे कोणतेही विवरणपत्र, विवरण, हिशेब, दस्तऐवज किंवा अभिलेख किंवा त्यातील कोणताही भाग सादर करण्यास किंवा त्या बाबतीत आपल्यासमोर साक्षी पुरावा देण्यास भाग पाडण्याचा हक्क असणार नाही.

(२) पोट-कलम (३) मध्ये तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, जर कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याने, पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या तपशिलापैकी कोणताही तपशील उघड केला तर, त्यास दोष सिद्ध झाल्यानंतर ६ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा द्रव्य-दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील :

परंतु, राज्य शासनाची पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज, या कलमान्वये कोणताही खटला दाखल करण्यात येणार नाही.

---

[1]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४१ द्वारे, '' पत्र किंवा सूचना '' हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी आला असेल तेथे हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) या कलमातील कोणतीही गोष्ट,--

(क) भारतीय दंड संहिता किंवा भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये, किंवा या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये कोणताही खटला भरण्याच्या प्रयोजनांसाठी असे कोणतेही विवरणपत्र, विवरण, हिशेब, दस्तऐवज, साक्षी पुरावा, प्रतिज्ञापत्र किंवा जबानी यांच्याबाबतचा असा कोणताही तपशील उघड करणे; किंवा १८६० चा ४५. १९८८ चा ४९.

(ख) राज्य शासनाकडे किंवा या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडे असा कोणताही तपशील उघड करणे किंवा

(ग) एखादी नोटीस बजावणीसाठी किंवा कोणतीही मागणी वसूल करण्यासाठी या अधिनियमान्वये कोणतीही आदेशिका कायदेशीर रीतीने बजावताना असा तपशील उघड करावा लागत असेल तर, असा तपशील उघड करणे; किंवा

(घ) या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीतून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही गोष्टीशी संबंधित असणाऱ्या ज्या कोणत्याही दाव्यात शासन पक्षकार असेल, त्या कोणत्याही दाव्यात [1][दिवाणी न्यायालयास किंवा कोणत्याही केंद्रीय कायद्याखाली घटित करण्यात आलेल्या न्यायाधिकरणास] असा कोणताही तपशील उघड करणे; किंवा

(ङ) या अधिनियमान्वये लादण्यात आलेल्या कराच्या जमा रकमांची किंवा परताव्याच्या रकमांची लेखापरीक्षा करण्याकरिता नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास असा कोणताही तपशील उघड करणे; किंवा

(च) कोणत्याही संबंधित कायद्यान्वये चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती किंवा कोणत्याही व्यक्ती यांस, विक्रीकर विभागाच्या अधिकाऱ्याच्या वर्तणुकीसंबंधी करावयाच्या कोणत्याही चौकशीच्या प्रयोजनार्थ संबंधित असलेला असा कोणताही तपशील उघड करणे; किंवा

(छ) केंद्र सरकारला किंवा कोणत्याही राज्य शासनाला त्याने लादलेला कोणताही कर किंवा शुल्क बसवणे किंवा वसूल करणे शक्य होण्यासाठी केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याला आवश्यक असेल अशी वस्तुस्थिती उघड करणे; किंवा

(ज) मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ किंवा भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ अन्वये एखादा लोकसेवक अपुरा मुद्रांक लावलेला दस्तऐवज अवरुद्ध करण्यासाठी कायदेशीररीत्या आपल्या अधिकारांचा वापर करीत असताना त्याच्याकडून जो तपशील उघड होईल असा कोणताही तपशील उघड करणे; किंवा १९५८ चा मुंबई ६०. १८९९ चा २.

(झ) विधि व्यवसायी, विक्रीकर व्यवसायी, परिव्यय लेखापाल किंवा सनदी लेखापाल यांच्याविरूद्ध विक्रीकर कार्यवाहीच्या संबंधातील गैरवर्तणुकीच्या आरोपाच्या कोणत्याही चौकशीच्या संबंधित असलेला जो तपशील, यथास्थिती, विधि व्यवसायी, विक्रीकर व्यवसायी, परिव्यय लेखापाल किंवा सनदी लेखापाल म्हणून व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास उघड करण्यात येईल, असा कोणताही तपशील उघड करणे; किंवा

---

[1]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४२ द्वारे, '' दिवाणी न्यायालय '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ञ) संचालक, अर्थ व सांख्यिकी केंद्र, यास किंवा त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कलम ७०, पोट-कलम (२) अन्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना आपली शासकीय कर्तव्ये पार पाडणे शक्य व्हावे म्हणून त्या संचालकास किंवा अशा व्यक्तीस, किंवा व्यक्तींना आवश्यक असेल असा कोणताही तपशील उघड करणे; किंवा

(ट) कोणत्याही स्वयंचलित पद्धतीने आकडेवारीची नोंद करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा कोणतेही स्वयंचलित यंत्र चालविण्याच्या किंवा त्याची क्षमता वाढविण्याच्या किंवा त्याचे परिरक्षण करण्याच्या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या कोणत्याही अभिकरणास, असे अभिकरण, उपरोक्त प्रयोजनाव्यतिरिक्त, ज्या तपशिलाचा वापर न करण्यास किंवा जे उघड न करण्यास कराराने बांधील असेल असा कोणताही तपशील उघड करणे; किंवा

(ठ) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्यास, भारताच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा अशा कायद्याखालील चौकशीच्या किंवा खटल्याच्या प्रयोजनासाठी चौकशीच्या किंवा खटल्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल असा कोणताही तपशील उघड करणे, यास लागू होणार नाही.

कलम ७२ अन्वये आवश्यक असलेली माहिती उघड करणे व त्या कलमान्वये माहिती किंवा विवरण पुरविण्यात कसूर करणे.

**७२.** (१) कलम ७० च्या प्रयोजनांसाठी कोणत्याही गोष्टीसंबंधी कोणत्याही व्यक्तिगत विवरणात किंवा त्याच्या भागात दिलेली कोणतीही माहिती, त्या व्यापाऱ्याच्या वा व्यक्तीच्या किंवा, त्याचा जो कोणी प्राधिकृत अभिकर्ता असेल त्याच्या लेखी पूर्वसंमतीशिवाय, त्यातील कोणताही तपशील एखाद्या विशिष्ट व्यापाऱ्याच्या संदर्भातील आहे, असे ओळखणे शक्य होईल अशा रीतीने प्रसिद्ध करण्यात येणार नाही आणि अशी कोणतीही माहिती या अधिनियमाच्या तरतुदींखालील कोणत्याही कार्यवाहींच्या प्रयोजनासाठी वापरता येणार नाही.

(२) या अधिनियमाखालील खटल्याच्या प्रयोजनासाठी असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमान्वये आकडेवारी गोळा करण्याचे किंवा '' या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी तिचे संकलन करण्याचे किंवा तिचे संगणीकरण करण्याचे काम जी व्यक्ती करीत नसेल, अशा कोणत्याही व्यक्तीस, त्या कलमात उल्लेखिलेली कोणतीही माहिती किंवा कोणतेही विवरण पाहण्यास किंवा उपलब्ध होण्यास परवानगी देता येणार नाही.

(३) जर कलम ७० अन्वये आकडेवारी गोळा करण्याचे किंवा तिचे संकलन करण्याचे किंवा संगणकीकरण करण्याचे काम करणारी कोणतीही व्यक्ती, त्या कलमान्वये दिलेली कोणतीही माहिती किंवा दिलेल्या कोणत्याही विवरणातील आशय, त्या कलमान्वये तिचे कर्तव्य बजावताना असेल त्याव्यतिरिक्त किंवा या अधिनियमाखालील अपराधाबद्दल खटला भरण्याच्या प्रयोजनासाठी असेल त्याव्यतिरिक्त, हेतुपुरस्सर उघड करील तर, तिला दोष सिद्ध झाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील :

[1][परंतु, राज्य शासनाची पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज या पोट-कलमान्वये कोणताही खटला दाखल करण्यात येणार नाही.]

(४) अशी माहिती प्रसिद्ध करणे लोकहितार्थ इष्ट आहे, असे आयुक्ताचे मत असेल तर, एखाद्या व्यापाऱ्याच्या वर्गासंबंधीची किंवा व्यवहाराच्या वर्गासंबंधीची कोणतीही माहिती प्रसिद्ध करण्याबाबत या कलमातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

---

[1]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४३ द्वारे, हे परंतुक दाखल करण्यात आले.

व्यापारी व इतर व्यक्ती यांच्या संबंधीचा तपशील लोकहितार्थ प्रसिद्ध करणे व उघड करणे.

७३. (१) कलमे ७१ आणि ७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही व्यापारी किंवा इतर व्यक्ती यांची नावे आणि असे व्यापारी व व्यक्ती यांच्या बाबतीतील या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीशी संबंधित इतर कोणताही तपशील लोकहितार्थ प्रसिद्ध करणे किंवा उघड करणे आवश्यक किंवा इष्ट आहे, असे राज्य शासनाचे मत असेल तर, त्यास, अशी नावे आणि तपशील, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने प्रसिद्ध किंवा उघड करता येईल किंवा प्रसिद्ध अथवा उघड करण्याची व्यवस्था करता येईल.

(२) या अधिनियमान्वये बसवलेला कोणताही कर किंवा लादलेली शास्ती किंवा आकारलेले व्याज किंवा कोणत्याही कार्यवाहीशी संबंधित कोणत्याही अपराधाबद्दलची दोषसिद्धी याबद्दलची या कलमाखालील कोणतीही प्रसिद्धी किंवा प्रकटन समुचित अपील प्राधिकरणाकडे अपील सादर करण्याचा काळ, अपील सादर न होता संपल्याशिवाय किंवा अपील सादर केले असल्यास ते निकालात निघाल्याशिवाय, केले जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—भागीदारी संस्था, कंपनी किंवा व्यक्तींचा इतर संघ यांच्याबाबतीत, भागीदारी संस्थेचे भागीदार, कंपनीचे संचालक, व्यवस्थापन अभिकर्ते, सचिव, कोषपाल किंवा व्यवस्थापक किंवा, यथास्थिति, संघाचे सदस्य यांची नावेदेखील, राज्य शासनाच्या मते, प्रत्येक बाबतीतील परिस्थितीनुसार तसे समर्थनीय असेल तर, प्रसिद्ध किंवा उघड करता येतील.

## प्रकरण बारा

## **अपराध व शास्ती**

अपराध व शास्ती.

[१][७४. (१) जी कोणतीही व्यक्ती, बुद्धिपुरस्सर,—

(क) या अधिनियमाखालील नोंदणीकृत व्यापारी नसताना, माल विकण्याच्या किंवा विकत घेण्याच्या वेळी आपण नोंदणीकृत व्यापारी आहोत किंवा होतो, असे दर्शवील, किंवा

(ख) खोटे विवरण देईल; किंवा,

(ग) कलम २९, पोट-कलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेले खोटे देयक, रोखीचे टिपण, प्रमाणक, प्रतिज्ञापत्र, प्रमाणपत्र किंवा अन्य कागदपत्रे आयुक्तापुढे किंवा न्यायाधिकरणापुढे जाणूनबुजून सादर करील; किंवा

(घ) कलम ६३, पोट-कलम (१) चे उल्लंघन करून, तिने विकत घेतलेल्या किंवा विकलेल्या मालाच्या किंमतीचा जाणूनबुजून खोटा हिशेब ठेवील; किंवा

(ङ) खोटे हिशेब, खोट्या नोंदवह्या किंवा खोटी कागदपत्रे जाणूनबुजून सादर करील किंवा जाणूनबुजून चुकीची माहिती पुरवील; किंवा

(च) या अधिनियमाखालील,नियमांखालील किंवा अधिसूचनांखालील कोणतेही प्रमाणपत्र किंवा प्रतिज्ञापत्र कोणत्याही व्यक्तीस देईल किंवा जी खोटी असल्याचे तिला माहित आहे किंवा जी खोटी असल्याचे तिला सकारण वाटत असेल अशी देयके, रोखीचे ज्ञापन, प्रमाणक, बटवडा चलान (delivery challan), मालमोटारीची पावती किंवा इतर कागदपत्रे, कोणत्याही व्यक्तीस देईल ; किंवा

(छ) कोणत्याही कार्यवाहीमध्ये कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे उपस्थित राहण्यासाठी तिला कलम ८२ अन्वये प्राधिकृत केले आहे असे खोटेच दर्शवील,

तिला, दोष सिद्ध झाल्यानंतर एक महिन्याहून कमी नसेल परंतु, एका वर्षाची असू शकेल एवढ्या मुदतीच्या सश्रम कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४४ द्वारे, कलम ७४ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(२) जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेला कोणताही कर चुकविण्याचा किंवा या अधिनियमाखालील कोणताही कर, शास्ती किंवा व्याज यांचे प्रदान चुकविण्याचा कोणत्याही रीतीने बुद्धिपुरस्सर प्रयत्न करील, तिला दोष सिद्ध झाल्यानंतर, तीन महिन्यांहून कमी नसेल परंतु, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) जी कोणतीही व्यक्ती,—

(क) कलम १४ च्या पोट-कलम (३) अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(ख) कलम १६ अन्वये नोंदणी न करता व्यापारी म्हणून धंदा करील ; किंवा

(ग) कलम १७ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे विद्यमान नोंदणी प्रमाणपत्राऐवजी नवीन नोंदणी प्रमाणपत्र मिळवणे आवश्यक असेल तेव्हा, तसे करण्यास पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(घ) कलम १८ अन्वये आवश्यक असलेली कोणतीही माहिती देण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(ङ) कलम १९ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रतिज्ञापत्र किंवा, यथास्थिती, सुधारित प्रतिज्ञापत्र देण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील किंवा आयकर अधिनियम, १९६१ अन्वये मिळविलेला स्थायी खाते क्रमांक कळविण्यात किंवा, यथास्थिती, त्यासाठी त्याने अर्ज केला आहे किंवा कसे हे नमूद करण्यात, पुरेशा कारणाशिवाय कसूर करील आणि कलम १९ च्या पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अर्जाचा तपशील देण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

१९६१ चा ४३.

(च) विहित केलेल्या दिनांकास आणि विहित केलेल्या रीतीने कलम २० अन्वये आवश्यक असलेले कोणतेही विवरण किंवा, यथास्थिति, परिपूर्ण व स्वयंसुसंगत विवरण देण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(छ) मुळातूनच कपातयोग्य असलेला कर देण्यात किंवा असा कर मुळातूनच कापून देण्यास पुरेशा कारणाशिवाय कसूर करील किंवा, विक्रीकर वजात खाते क्रमांक मिळविण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील किंवा कलम ३१ च्या तरतुदींनुसार आवश्यक असलेले विवरण दाखल करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(ज) कलम ३३ च्या पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या नोटिशीतील आवश्यक गोष्टींचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(झ) कलम ३५ च्या पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या आवश्यक गोष्टींचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(ञ) कलम ३८ च्या पोट-कलम (३) अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या आवश्यक बाबींचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(ट) कलम ४२ च्या आवश्यक बाबींचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(ठ) वाजवी कारणाशिवाय कलम ६० च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील ; किंवा

(ड) कलम ६१ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्याच्या लेख्यांची लेखापरीक्षा करुन घेण्यात किंवा लेखापरीक्षा अहवाल देण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(ढ) कलम ६३ अन्वये, आवश्यक असलेल्या गोष्टींचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(ण) कलम ६४ अन्वये, आवश्यक असलेल्या गोष्टींचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(त) कलम ६५ अन्वये, आवश्यक असलेल्या गोष्टींचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(थ) विहित केलेल्या दिनांकास आणि विहित केलेल्या रीतीने, कलम ७० अन्वये आवश्यक केलेली कोणतीही माहिती किंवा विवरणे देण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा चुकीची किंवा खोटी असल्याचे तिला माहित आहे, अशी कोणतीही माहिती किंवा विवरण बुद्धिपुरस्सर देईल ; किंवा

(द) कलम ८६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, कर बीजक, देयक किंवा रोखीचे ज्ञापन देण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील ; किंवा

(ध) ज्या शर्तींना अधीन राहून, हक्कविषयक प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्या शर्तींचे पुरेशा कारणाशिवाय उल्लंघन करील ; किंवा

(न) कोणत्याही कार्यवाहीसंबंधातील कोणत्याही नोटिशीचे अनुपालन करण्यास पुरेशा कारणाशिवाय कसूर करील,

तिला दोष सिद्ध झाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या साध्या कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(४) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलमे (१) किंवा (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही कृत्य करण्यास कोणत्याही व्यक्तीस मदत करील किंवा अपप्रेरणा देईल किंवा प्रवृत्त करील, तिला दोष सिद्ध झाल्यानंतर, एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या साध्या कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा होईल, आणि जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही कृत्य करण्यास कोणत्याही व्यक्तीस मदत करील किंवा अपप्रेरणा देईल किंवा प्रवृत्त करील, तिला दोष सिद्ध झाल्यानंतर, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या साध्या कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(५) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलमे (१) ते (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही कृत्ये करील आणि या पोट-कलमांच्या कोणत्याही तरतुदींखालील अपराध करण्याचे तिने चालू ठेवले असेल त्याबाबतीत, तिला, दोष सिद्ध झाल्यानंतर, या कलमान्वये तरतूद केलेल्या शिक्षांबरोबरच आणखी, अपराध करण्याचे चालू राहील त्या कालावधीत, दर दिवसाला शंभर रुपयांहून कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(६) पोट-कलम (१), (२) किंवा (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाचा आरोप एखाद्या व्यापाऱ्यावर ठेवण्यात आला असेल त्याबाबतीत, कलम १९ अन्वये अशा व्यापाऱ्याच्या धंद्याचा व्यवस्थापक म्हणून मानण्यात येणारी व्यक्ती देखील, जर तिने असा अपराध आपल्या नकळत घडला आहे किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती, असे सिद्ध केले नसेल तर, अशा अपराधाबद्दल दोषी आहे, असे मानले जाईल.

(७) ज्या कलमा अन्वये, आरोपीची मानसिक स्थिती सदोष असणे आवश्यक असेल अशा या कलमाखालील अपराधासंबंधातील कोणत्याही कार्यवाहीत, न्यायालय, अशी सदोष मानसिक स्थिती असल्याचे गृहित धरेल, परंतु त्या कार्यवाहीमध्ये अपराधाचा आरोप केलेल्या कृतीच्या बाबतीत, आपली अशी मानसिक स्थिती नव्हती, ही वस्तुस्थिती सिद्ध करणे, हा आरोपीसाठी बचाव असू शकेल.

**स्पष्टीकरण.**——सदोष मानसिक स्थिती यात, उद्देश, हेतू किंवा वस्तुस्थितीचे ज्ञान किंवा त्या बाबतीतील विश्वास किंवा वस्तुस्थिती मानण्यास कारण, यांचा अंतर्भाव आहे आणि एखादी वस्तुस्थिती अस्तित्वात आहे याबाबत जेव्हा न्यायालयाची निःसंशय खात्री पटेल तेव्हाच फक्त ती वस्तुस्थिती सिद्ध झाल्याचे म्हटले जाते ; केवळ संभवनीयतेच्या प्राबल्याने तिचे अस्तित्व प्रस्थापित केल्याने ते अस्तित्व सिद्ध होत नाही].

७५. (१) या अधिनियमाखाली किंवा नियमांखालील अपराध व्यवसाय युनिटने (Business Entity) केला असेल तर, असा अपराध घडण्याच्या वेळी व्यवसाय युनिटचा धंदा-चालवण्यासाठी व्यवसाय युनिटचा (Business Entity) ताबा ज्या व्यक्तीकडे होता आणि व्यवसाय युनिटचा (Business Entity) धंदा चालवण्यास जी व्यक्ती जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे व्यवसाय युनिट, त्या अपराधाबद्दल दोषी आहे, असे मानले जाईल आणि अशी व्यक्ती व व्यवसाय युनिट, त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास पात्र असतील : व्यवसाय युनिटानी केलेले अपराध.

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने असा अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती, या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांखालील अपराध एखाद्या व्यवसाय युनिटाने केला असेल आणि त्या व्यवसाय युनिटच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिकाऱ्याच्या संमतीने, किंवा मूकसंमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे असा अपराध घडल्याचे सिद्ध करण्यात आले असेल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी देखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**---या कलमाच्या प्रयोजनासाठी,---

(क) '' व्यवसाय युनिट '' याचा अर्थ, निगम निकाय असा आहे आणि त्यात भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या अन्य संघाचा समावेश होतो ; आणि

(ख) भागीदारी संस्थेच्या संबंधात '' संचालक '' याचा अर्थ, भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे.

(३) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या अविभक्त हिंदू कुटुंबाने केला असेल तर, अशा कुटुंबाचा कर्ता, त्या अपराधाब्रद्दल दोषी आहे असे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व दोष सिद्ध झाल्यानंतर त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र असेल :

परंतु, अशा कर्त्याने असा अपराध आपल्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे तो कर्ता कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही :

परंतु आणखी असे की, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या अविभक्त हिंदू कुटुंबाने केला असेल आणि अशा अविभक्त हिंदू कुटुंबाच्या कोणत्याही प्रौढ सदस्यांच्या संमतीने किंवा मूकसंमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे असा अपराध घडल्याचे सिद्ध करण्यात आले असेल तर, असा सदस्य देखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास तो सदस्य पात्र असेल.

१९७४ चा २. ७६. (१) फौज़दारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार केलेल्या नियमांन्वये शिक्षापात्र असलेले सर्व अपराध दखलपात्र व जमानत योग्य असतील. अपराधांची दखल.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगर दंडाधिकाऱ्याला किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याला कलम ७१, ७२ किंवा ७४ अन्वये दोषी असल्याचे आढळून आलेल्या कोणत्याही व्यक्तीवर संबंधित कलमांमध्ये तरतूद केल्यानुसार शास्ती लादता येईल. १९७४ चा २.

(३) जर कलम २९ किंवा ६१ अन्वये आयुक्ताकडून ज्या वस्तुस्थितीबाबत शास्ती लादण्यात आली आहे त्याच वस्तुस्थिती संबंधात या अधिनियमाखालील अपराधाकरिता कोणताही खटला सुरु करण्यात आला असल्यास, जर कलम ७८ खाली किंवा इतर कोणत्याही बाबतीत अंतिम कार्यवाहीचा परिणाम म्हणून दोष सिद्ध झाल्यानंतर अपराध आपसात मिटवण्यात आला असेल तर, आयुक्त व्यापाऱ्यास त्याने भरलेल्या शास्तीची रक्कम परत करील.

अपराधांचे अन्वेषण.

७७. (१) विहित करण्यात येतील अशा शर्तीस कोणत्याही असल्यास, अधीन राहून, आयुक्ताला, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या सर्व किंवा कोणत्याही अपराधांचे अन्वेषण करण्यासाठी, एकतर सर्वसाधारणपणे किंवा कोणत्याही विशिष्ट प्रकरणाच्या संबंधात किंवा प्रकरणांच्या वर्गाच्या संबंधात त्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस प्राधिकृत करता येईल.

(२) अशा रीतीने प्राधिकृत केलेला प्रत्येक अधिकारी, अशा अन्वेषणाचे काम चालवताना, पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला दखलपात्र अपराधांचे अन्वेषण करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करील. १९७४ चा २.

अपराध आपसात मिटविणे.

७८. (१) आयुक्ताला, कलम ७४ अन्वये किंवा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर, संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, [१][पोट-कलम (४)] खाली किंवा कोणत्याही नियमाखाली असा आरोप ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अपराधाच्या आपसमेळापोटी दोन हजार रुपयांहून अधिक नसेल इतकी रक्कम किंवा इतर कोणत्याही बाबतीत त्या विक्रीवर, खरेदीवर किंवा उलाढालीवर कराची जितकी रक्कम द्यावी लागली असती त्या रकमेच्या दुप्पट रकमेहून अधिक नसेल इतकी रक्कम स्वीकारता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये आयुक्ताकडून ठरवण्यात येईल अशी रक्कम प्रदान केल्यानंतर, त्याच अपराधाच्या संबंधात त्या, आरोपी व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही आणि त्यापूर्वी कोणतीही कार्यवाही केलेली असेल तर, ती समाप्त होईल.

## प्रकरण तेरा

### संकीर्ण

अपील आणि अन्य विवक्षित अर्ज यांवरील फी.

७९. मुंबई न्यायालय फी अधिनियम, १९५९ यात काहीही अंतर्भूत असले तरी,— १९५९ चा मुंबई ३५.

(क) खंड (ख) च्या तरतुदींना अधीन राहून, ज्यासंबंधी अन्यथा तरतूद करण्यात आलेली नसेल असा कोणताही अर्ज, विहित प्रयोजनांसाठी विहित प्रधिकरणाकडे सादर करण्यास येईल तेव्हा किंवा न्यायाधिकरणाकडे सादर करण्यात येईल तेव्हा, त्यावर विहित करण्यात येईल त्याप्रमाणे शंभर रुपयांपेक्षा अधिक मूल्य नसेल इतकी मूल्य फी आकारण्यात येईल ; आणि

(ख) कलम २६ अन्वये केलेल्या अपिलावर, जर विवादाची रक्कम एक लाखरुपयांपेक्षा अधिक असेल तर, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, एक हजार रुपयांपेक्षा अधिक मूल्याची नसेल इतकी फी आकारण्यात येईल आणि अन्य कोणत्याही अपिलावर विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या मूल्याचा न्यायालय फी मुद्रांक असेल.

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४५ द्वारे, " पोट-कलम (८), (१०) व (११) " ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१९६३ चा ३६. **८०.** कलमे ५, ६ व ७ अन्वये ठरवून दिलेल्या मुदतीची गणना करताना, मुदत अधिनियम, १९६३ याची कलमे ४ व १२ यांच्या तरतुदी शक्य असतील तितपत लागू होतील. मुदत अधिनियमाची कलमे ४ व १२ लागू असणे.

**८१.** (१) अपील प्रधिकाऱ्यास, कलम २६ खालील कोणतेही अपील, उक्त कलमात नमूद केलेल्या मुदतीनंतर, जर अपीलकर्त्याने अशा मुदतीच्या आत अपील दाखल न करण्यास त्यास पुरेसे कारण होते अशी अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटवून दिली तर, दाखल करुन घेता येईल. विवक्षित बाबतीत मुदत वाढविणे.

**स्पष्टीकरण.**––या कलमाच्या प्रयोजनांसाठी जेव्हा कलम २६ अन्वये दाखल करण्यात आलेले अपील, त्या कलमात नमूद केलेल्या मुदतीनंतर दाखल करण्यात आलेले असेल तेव्हा, उपरोक्त मुदत संपल्यानंतर अपीलकर्त्याला एखाद्या न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा किंवा अन्य प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, निर्णय किंवा आदेश कळला होता (मग असा न्यायनिर्णय, निर्णय किंवा आदेश हा त्या मुदतीच्या समाप्तीपूर्वी किंवा नंतर दिलेला किंवा केलेला असो) हे कारण, या कलमाच्या प्रयोजनासाठी पुरेसे कारण ठरत असल्याचे मानण्यात येणार नाही.

(२) मुदतीची संगणना करतेवेळी, या अधिनियमाखाली कोणत्याही कार्यवाहीच्या बाबतीत, एखाद्या [१][सक्षम न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या] आदेशानुसार ती कार्यवाही ज्या काळात तहकूब झाली असेल तो काळ वगळण्यात येईल.

**८२.** (१) शपथेवर तपासणी घेण्यासाठी किंवा दृढकथन करण्यासाठी व्यक्तिशः हजर राहणे आवश्यक असेल ते खेरीज करून, या अधिनियमान्वये कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात न्यायाधिकरणासह कोणत्याही प्राधिकरणापुढे हजर राहण्याचा हक्क असलेल्या किंवा हजर राहणे आवश्यक आहे अशा कोणत्याही व्यक्तीला,–– कार्यवाहीमध्ये कोणत्याही प्राधिकरणापुढे हजर राहणे.

(क) तिचा नातेवाईक असलेल्या किंवा तिने नियमितपणे नोकरीस ठेवलेल्या व्यक्तीमार्फत, किंवा

(ख) पोट-कलम (२) द्वारे किंवा त्यानुसार ज्याला अपात्र ठरवले नाही अशा विधि, व्यवसायीमार्फत, सनदी लेखापालामार्फत, किंवा परिव्यय लेखापालामार्फत, किंवा

(ग) विहित केलेली पात्रता धारण करणाऱ्या व त्याबाबतीत आयुक्त ठेवील त्या यादीत नोंद केलेल्या आणि पोट-कलम (२) अन्वये किंवा त्यानुसार अपात्र ठरवण्यात न आलेल्या विक्रीकर व्ययसायीमार्फत, किंवा

(घ) जी व्यक्ती, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अगोदरच्या कोणत्याही कायद्यान्वये विक्रीकर व्यवसायी म्हणून हजर राहण्यास पात्र होती व जी, पोट-कलम (२) अन्वये किंवा त्यानुसार अपात्र नाही अशा कोणत्याही व्यक्तीमार्फत.

असा नातेवाईक, नोकरीत ठेवलेली व्यक्ती, विधि व्यवसायी, सनदी लेखापाल, परिव्यय लेखापाल किंवा विक्रीकर व्यवसायी याला अशा व्यक्तीने, विहित केलेल्या नमुन्यामध्ये प्राधिकृत केलेले असेल तरच आणि अशा प्राधिकारपत्रात अशा कार्यवाहीमध्ये अशा व्यक्तीच्या वतीने काम करण्याच्या प्राधिकाराचा समावेश असू शकेल तरच, हजर राहता येईल.

**स्पष्टीकरण.**––'' नियमितपणे नोकरीत ठेवलेली व्यक्ती '' याचा अर्थ, जिचे वेतन व्यापाऱ्याच्या लेखा पुस्तकामध्ये नियमितपणे व नियतकालाने खर्चखाती घालण्यात येते व नोंदविण्यात येते अशी व्यक्ती, असा आहे.

---

१ सन २००५ सा महा. अधिनियम क्रमांक १४, कलम ४६ द्वारे, '' सक्षम न्यायालयाच्या '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) आयुक्ताला, लेखी आदेशाद्वारे व त्यात कारणे नमूद करुन, त्या आदेशात नमूद केलेल्या कालावधीसाठी,——

(एक) ज्याला शासकीय सेवेतून काढून टाकण्यात किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा

(दोन) जो विधि व्यवसायी, सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल असून, तो जो व्यवसाय करीत असेल त्या व्यवसायातील व्यक्तीविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकाऱ्यास, या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात गैरवर्तणुकीबद्दल दोषी असल्याचे आढळून आले असेल, किंवा

(तीन) जो विक्रीकर व्यवसायी असून अशा गैरवर्तणुकीबद्दल दोषी असल्याचे आयुक्तास आढळून आले असेल,

अशा कोणत्याही विधि व्यवसायीस, सनदी लेखापालास, परिव्यय लेखापालास किंवा विक्रीकर व्यवसायीस अशा कोणत्याही प्राधिकाऱ्यासमोर हजर राहण्यास अपात्र ठरवता येईल.

(३) कोणत्याही विशिष्ट व्यक्तीबाबत, त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, अपात्रतेचा कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

(४) या कलमान्वये ज्या व्यक्तीविरूद्ध अपात्रतेचा कोणताही आदेश देण्यात आला असेल अशा कोणत्याशी व्यक्तीला, असा आदेश कळविल्याच्या दिनांकापासून एक महिन्यांच्या आत, असा आदेश रद्द करण्यासाठी किंवा त्यात फेरबदल करण्यासाठी न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल.

(५) आयुक्ताचा आदेश, तो बजावल्यापासून एक महिन्यापर्यंत किंवा अपील दाखल केले असेल तेव्हा अपिलाचा निर्णय होईपर्यंत, अंमलात येणार नाही.

(६) आयुक्ताला, कोणत्याही वेळी स्वाधिकारे किंवा याबाबतीत त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यावर, पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही व्यक्तीविरूद्ध देण्यात आलेला कोणताही आदेश रद्द करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल व त्यानंतर अशा आदेशामध्ये अंतर्भूत करण्यात येतील अशा शर्तींना किंवा निर्बंधाना अधीन राहून, अशी व्यक्ती अपात्र असण्याचे बंद होईल.

नियम करण्याचा अधिकार.

८३. (१) या अधिनियमाखाली नियम करण्याचा अधिकार राज्य शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वापरता येईल.

(२) या अधिनियमात अन्यत्र अंतर्भूत असलेल्या, नियम करण्याच्या कोणत्याही अधिकाराला बाध न आणता राज्य शासनाला सर्वसाधारणतः या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करता येतील ; आणि अशा नियमांमध्ये, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी फी आकारण्याच्या नियमांचाही अंतर्भाव असू शकेल.

(३) याबाबत करण्यात आलेल्या कोणत्याही तरतुदीला बाध न आणता या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणताही नियम, नियत दिनांकाच्या आधीचा नसेल अशा कोणत्याही दिनांकास तो भूतलक्षी ठरेल अशा प्रकारे करता येईल.

(४) या कलमान्वये करण्यात आलेले नियम, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन असतील :

परंतु, राज्य शासनास तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटली असेल तर, या कलमान्वये करावयाच्या कोणत्याही नियमाच्या अथवा नियमांच्या पूर्वप्रसिद्धीची आवश्यकता काढून टाकता येईल.

(५) नियमांचा भंग केल्यास दोन हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या रकमेच्या द्रव्यदंडाची आणि जेव्हा अपराध चालू राहिल तेव्हा अपराध चालू राहिल्याच्या मुदतीत प्रत्येक दिवसास शंभर रुपयांहून अधिक नसेल इतक्या रकमेच्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, अशी तरतूद त्या नियमांमध्ये करता येईल.

(६) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, या नियमात कोणताही फेरफार करण्याविषयी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा नियम करण्यात येऊ नये याविषयी दोन्ही सभागृहाचे एकमत होईल व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर तो नियम, अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरुपात अंमलात येईल किंवा, यथास्थिति, तो नियम अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

नियत दिवशी ताब्यात असलेला मालाचा साठा घोषित करणे.

**८४.** आयुक्तास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नोंदणीकृत व्यापाऱ्यांच्या कोणत्याही वर्गास, नियत दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवशी त्यांनी धारण केलेल्या भांडवली मत्तांचे आणि नियत दिवसांच्या लगतपूर्वीच्या दिवशी, त्यांच्या ताब्यात असलेल्या मालाच्या साठ्याबद्दल आयुक्त याबाबतीत, अधिसूचित करील अशा रीतीने, अशा तपशिलासह आणि अशा प्राधिकाऱ्याकडे असे विशिष्ट तपशील घोषित करण्यास फर्माविता येईल.

विवक्षित कार्यवाहीस रोध.

**८५.** (१) कलम २७ मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमाखाली नियुक्त किंवा घटित केलेल्या कोणत्याही प्राधिकरणाने, या अधिनियमान्वये, नियमांन्वये किंवा अधिसूचनेअन्वये दिलेला कोणताही आदेश किंवा केलेली कोणतीही कार्यवाही, कोणत्याही न्यायालयामध्ये प्रश्नास्पद केली जाणार नाही, आणि कलम २६ मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, [१][* * * *] अशा कोणत्याही आदेशाच्या विरुद्ध कोणतेही अपील दाखल केले जाणार नाही.

(२) (क) हा अधिनियम, नियम किंवा अधिसूचना यांअन्वये दिलेली कोणतीही नोटीस, किंवा

(ख) [२][कलम २० अन्वये देण्यात आलेले दोष ज्ञापन] किंवा कलम १४ च्या पोट-कलम (१) अन्वये काढलेले कोणतेही समन्स, किंवा

(३) [३][(ख-१) कलम २३ च्या पोट-कलम (१) अन्वये, संमत केलेला निर्धारण आदेश, किंवा]

(ग) हप्त्यासाठीच्या अर्जावरुन दिलेला कोणताही आदेश, किंवा

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४७ (१) द्वारे," परंतु पोट-कलम (२) ला अधीन राहून " हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४७ (२) (क) द्वारे, " कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या सूचना " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४७ (२) (ख) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[1][(घ) कलम ३४ चे पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये दिलेला कोणताही आदेश, किंवा कोणतीही नोटीस, किंवा]

(ङ) लेखा पुस्तके, नोंदवह्या आणि इतर दस्तऐवज जप्त करण्याच्या किंवा ठेवून घेण्याच्या संबंधातील आदेश, किंवा

[2][* * * *]

(छ) कलम ५९ खालील कोणताही आदेश किंवा अभिहस्तांकन, किंवा

[3][* * * *]

(झ) कोणत्याही कार्यवाहीच्या ओघात दिलेला अंतरिम आदेश परंतु कलम २६ च्या पोट-कलम (६) अन्वये काढण्यात आलेला आदेश वगळून,

याविरुद्ध कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही.

कराचे बीजक आणि विक्रीचे किंवा खरेदीचे ज्ञापन.

८६. (१) जर एखादा नोंदणीकृत व्यापारी [4][कोणताही माल विकील, तर त्यास पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तपशिलाचा समावेश असलेले कराचे बीजक खरेदीदाराला देता येईल.] आणि त्याची एक प्रत, ज्या वर्षात विक्री करण्यात आली असेल त्या वर्षाच्या समाप्तीपासून तीन वर्षासाठी स्वतःजवळ ठेवून घेईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या कराच्या मूळ बीजकामध्ये, तसेच सर्व प्रतींवर पुढील तपशील समाविष्ट असेल,—

(क) प्रतीच्या वरच्या भागात किंवा कोणत्याही ठळक ठिकाणी " **कराचे बीजक** " हे जाड ठशातील शब्द,

(ख) [5][विक्री करणाऱ्या व्यापाराचे नाव, पत्ता व नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक तसेच खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याचे नाव आणि पत्ता]

(ग) कराच्या बीजकाचा व्यक्तीगत अनुक्रमांक आणि ते काढल्याचा दिनांक,

(घ) मालाचे वर्णन, प्रमाण किंवा, यथास्थिती, नग आणि विकलेल्या मालाची किंमत आणि त्यावर आकारलेल्या कराची रक्कम, स्वतंत्रपणे दर्शवलेली आणि

(ङ) विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याची किंवा त्याने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या कर्मचाऱ्याची, व्यवस्थापकाची किंवा अभिकर्त्याची स्वाक्षरी,

[6][(३) एखादा नोंदणीकृत व्यापारी कोणत्याही मालाची विक्री करील त्याबाबतीत, त्याला, त्याच्या मर्जीने, खरेदीदाराला अनुक्रमांक घातलेले, त्याने अथवा त्याच्या कर्मचाऱ्याने, अभिकर्त्याने किंवा व्यवस्थापकाने दिनांकासह स्वाक्षरी केलेले आणि विहित करण्यात येतील असे अन्य तपशील दर्शविलेले देयक वा रोखीचे ज्ञापन देता येईल. तो अशा देयकाची वा रोखीच्या ज्ञापनाची यथोचितरीत्या स्वाक्षरित व दिनांकित स्थळप्रत किंवा दुसरी प्रत स्वतःजवळ ठेवील आणि ज्या वर्षात विक्री करण्यात आली त्या वर्षाच्या समाप्तीपासून तीन वर्षाच्या कालावधीसाठी तिचे जतन करील, जेथे उक्त नोंदणीकृत व्यापारी देयक वा रोखीचे ज्ञापन देत असेल तेथे, तो, अशा विक्रीवर वेगळा कर वसूल करणार नाही.]

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४७ (२) (ग) द्वारे, खंड (घ) ऐवजी हा खंड दाखल केला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४७ (२) (घ) द्वारे, खंड (च) वगळण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४७ (२) (ङ) द्वारे खंड (ज) वगळण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ४८ (१) द्वारे, "दुसऱ्या नोंदणीकृत व्यापाऱ्याला कोणताही करपात्र माल विकील, तर, तो पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तपशिलाचा समावेश असलेले कराचे बीजक खरेदीदाराला देईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ४८ (२) द्वारे, " विक्री करणाऱ्या " या शब्दांनी सुरु होणाऱ्या व " नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ४८ (३) द्वारे पोट-कलम (३) ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[१][(४) कलम ४२ च्या पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये आपसमेळाच्या स्वरुपात कर भरणाऱ्या व्यापाऱ्यास पोट-कलम (१) किंवा (२) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.]

[२][(५) कोणत्याही व्यापाऱ्यास, आयुक्ताकडून मान्यता देण्यात येईल अशा इलेक्ट्रॉनिक यंत्रणेवर देयकांचा किंवा रोखीच्या ज्ञापनांचा अभिलेख ठेवण्यासाठी, परवानगी मिळविण्यासाठी आयुक्ताकडे अर्ज करता येईल. अशी परवानगी देण्यात आल्यावर, अशा व्यापाऱ्यास, पोट-कलम (३) च्या प्रयोजनांसाठी उक्त देयकांच्या किंवा रोखीच्या ज्ञापनाच्या स्थळप्रती किंवा दुसऱ्या प्रती ठेवण्याच्या आणि देयकावर किंवा रोखीच्या ज्ञापनावर स्वाक्षरी करणाच्या बाबतीत सूट मिळेल.]

[३][(६) नोंदणीकृत व्यापारी, त्याने केलेल्या प्रत्येक विक्रीच्या संबंधात, पोट-कलम (१) किंवा (३) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, एकतर कराचे बीजक किंवा देयक किंवा रोखीचे ज्ञापन देईल.]

विनिर्दिष्ट दिनांकास आणि त्या दिनांकानंतर विवक्षित विहित नमुने विहित प्राधिकाऱ्याकडून मिळविणे.

**८७.** आयुक्तास, वेळोवेळी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेमध्ये, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास व त्या दिनांकानंतर, या अधिनियमाखालील किंवा कोणताही नियम किंवा कोणतीही अधिसूचना याखालील कोणत्याही प्रमाणपत्रांचा किंवा प्रतिज्ञापनांचा नमुना, विहित प्राधिकाऱ्याकडून, तो त्याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, विहित रीतीने मिळविण्यात यावा, असा निदेश देता येईल.

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४८ (४) द्वारे, पोट-कलम (४) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

२. सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ५३ द्वारे, पोट-कलम (५) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

३. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४८ (५) द्वारे, पोट-कलम (६) जादा दाखल करण्यात आले.

## प्रकरण चौदा

## सामूहिक प्रोत्साहन योजना

प्रकरण चौदा खालील व्याख्या.

८८. या प्रकरणात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) '' हक्कविषयक प्रमाणपत्र '' याचा अर्थ, संबंधित सामूहिक प्रोत्साहन योजनेखाली, विक्रीकरविषयक प्रोत्साहन मिळण्याबाबत आयुक्ताने दिलेले प्रमाणपत्र, असा आहे ;

(ख) कोणत्याही पात्र युनिटाच्या बाबतीत '' जिल्हा औद्योगिक केंद्र '' याचा अर्थ, ज्या जिल्ह्यात संबंधित पात्र युनिट आहे, त्या जिल्ह्यात राज्य शासनाने स्थापन केलेले जिल्हा औद्योगिक केंद्र, असा आहे ;

(ग) '' पात्रता प्रमाणपत्र '' याचा अर्थ, राज्य शासनाने बनविलेल्या संबंधित सामूहिक प्रोत्साहन योजनेखाली, विक्रीकरविषयक प्रोत्साहन मिळण्यासंबंधांत [1][महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (सिकॉम) किंवा उद्योग संचालनालय] किंवा संबंधित प्रादेशिक विकास महामंडळ किंवा संबंधित जिल्हा औद्योगिक केंद्र किंवा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ किंवा महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण यांनी दिलेले प्रमाणपत्र, असा आहे ;

(घ) '' पात्र युनिट '' याचा अर्थ, ज्याच्याबाबतीत पात्रता प्रमाणपत्र दिले जाते असे औद्योगिक युनिट, असा आहे ;

(ङ) '' सामूहिक प्रोत्साहन योजना '' याचा अर्थ, वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे, असलेल्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून १९७९, १९८३, १९८८ किंवा १९९३ मध्ये सुरु केलेल्या सामूहिक प्रोत्साहन योजना, गृह व पर्यटन विभागाने सुरु केलेली पर्यटनासाठीची सामूहिक प्रोत्साहन योजना, १९९३, [2][ इलेक्ट्रॉनिक योजना, १९८५] आणि [3][ प्रकल्पांसाठीची नवीन सामूहिक प्रोत्साहन योजना, १९९९] तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने सुरु केलेले वीजनिर्मिती प्रचालन धोरण, १९९८, असा आहे ;

(च) '' संबंधित प्रादेशिक विकास महामंडळ '' याचा अर्थ,—

(एक) राज्याच्या विदर्भ क्षेत्राच्या बाबतीत, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणीकृत असलेली विदर्भ विकास महामंडळ मर्यादित ही शासकीय कंपनी ; १९५६ चा १.

(दोन) मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून कोकण महसूल विभागाच्या बाबतीत, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणीकृत असलेली कोकण विकास महामंडळ मर्यादित, ही शासकीय कंपनी ; १९५६ चा १.

(तीन) राज्याच्या मराठवाडा क्षेत्राच्या बाबतीत, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणीकृत असलेली मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, ही शासकीय कंपनी ; १९५६ चा १.

(चार) उर्वरित महाराष्ट्राच्या बाबतीत, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणीकृत असलेली पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित ही शासकीय कंपनी, असा आहे ; १९५६ चा १.

(छ) '' सिकॉम '' याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणीकृत असलेली महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ मर्यादित, ही शासकीय कंपनी, असा आहे. १९५६ चा १.

(ज) '' महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ '' याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणीकृत असलेली शासकीय कंपनी, असा आहे ;

(झ) '' महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण '' याचा अर्थ '' महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण या नावाने सोसायटी नोंदणी अधिनियम,१८६० अन्वये नोंदणीकृत असलेली संस्था, असा आहे. १८६० चा २१.

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४९ (१) द्वारे, '' महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (सिकॉम) '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४९ (२) (एक) द्वारे, '' पर्यटनासाठीची सामूहिक प्रोत्साहन योजना, १९९३ '' या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४९ (२) (दोन) द्वारे, '' प्रकल्पासाठीची नवीन सामूहिक प्रोत्साहन योजना, १९९८ '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८९. (१) राज्य शासनाने जाहीर केलेल्या कोणत्याही सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत पात्र युनिटाला अंमलबजावणी अभिकरणाकडून पात्रता प्रमाणपत्राची शिफारस करण्यात आली असेल त्याबाबतीत, अशा पात्र युनिटास, हक्कविषयक प्रमाणपत्र देण्यासाठी आयुक्तांकडे अर्ज करता येईल. हक्कविषयक प्रमाणपत्र देणे.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींना, आणि या संदर्भात करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांना अधीन राहून, आयुक्त, जर पात्र युनिट विहित करण्यात येतील अशा अतिरिक्त आवश्यकतांची पूर्तता करीत असेल तर [१][विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, युनिटाला हक्कविषयक प्रमाणपत्र देईल.]

९०. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही सामूहिक प्रोत्साहन योजनेबाबत, आयुक्ताने पात्र युनिटाच्या नावे काढलेले हक्कविषयक प्रमाणपत्र— मग ते नियत दिनांकापूर्वीचे असो किंवा नंतरचे असो,— हक्कविषयक प्रमाणपत्र रद्द करणे.

(क) (एक) पात्र युनिटासाठी नियत केलेल्या द्रव्यविषयक कमाल मर्यादेपेक्षा, लाभांच्या एकत्रित ठरीव प्रमाणासह, उपयोगात आणलेली प्रोत्साहने अधिक असतील तर ती—मग ती नियत दिनांकापूर्वीची असोत किंवा नंतरची असोत ; किंवा

(दोन) पात्र युनिटाला हक्कविषयक प्रमाणपत्र ज्या कालावधीसाठी देण्यात आले होते, तो कालावधी जेव्हा समाप्त होईल ; किंवा

(तीन) पात्र युनिटाला देण्यात आलेले [२][नोंदणी प्रमाणपत्र] जेव्हा रद्द करण्यात आलेले असेल,

त्या दिनांकास, आपोआप रद्द झाले असल्याचे मानण्यात येईल, किंवा

१९५९ चा मुंबई ५१. (ख) देण्यात आलेले हक्कविषयक प्रमाणपत्र, या अधिनियमाच्या, किंवा, यथास्थिती, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ याच्या, किंवा नियमांच्या किंवा अधिसूचनांच्या कोणत्याही तरतुदीशी किंवा प्रस्तुत सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या कोणत्याही तरतुदीशी विसंगत असल्याचे निदर्शनास आले असल्यास, [३][किंवा, युनिटाने प्रस्तुत योजनेच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले असल्यास,] पात्र युनिटाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यानंतर, आयुक्ताकडून ते रद्द करण्यात येईल.

९१. (१) सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या कोणत्याही युनिटाला जेव्हा हक्कविषयक प्रमाणपत्र दिले असेल आणि असे युनिट हे, नियत दिनांकानंतर समाप्त होणाऱ्या कोणत्याही कालावधीसाठी लाभ मिळविण्यास हक्कदार असेल तेव्हा अशा युनिटास, उक्त योजनेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीहि, फक्त हा अधिनियम आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम आणि काढलेल्या अधिसूचना यांच्या अनुसार लाभ घेता येतील. प्रोत्साहनांच्या स्वरुपात बदल.

(२) कलम ३२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्तास, शासनाची देणी लांबणीवर टाकून लाभ प्राप्त करण्यासाठी हक्कविषयक प्रमाणपत्र दिलेल्या व्यापाऱ्याच्या बाबतीत, देय रकमांच्या प्रदानाचा दिनांक वाढवून देता येईल किंवा देय रकमांच्या प्रदानासाठी विलंबावधी मंजूर करता येईल किंवा विहित केल्या असतील अशा शर्तींना अधीन राहून, देय रकमांचे प्रदान, त्यानंतर हप्त्यांमध्ये करता येण्याची तरतूद करता येईल;

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ५० द्वारे, " त्या युनिटाला विहित करण्यात येईल अशा नमुन्यात अशा शर्तींना अधीन राहून हक्कविषयक प्रमाणपत्र देईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५१ (१) द्वारे, " हक्कविषयक प्रमाणपत्र " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५१ (२) द्वारे, " प्रस्तुत सामुहिक प्रोत्साहन योजनेच्या कोणत्याही तरतुदीशी विसंगत असल्याचे निदर्शनास आले असल्यास, या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][परंतु आणखी असे की, ज्याला हक्कविषयक प्रमाणपत्र देण्यात आले आहे आणि ज्यास प्रदानाचा नियत दिनांक वाढवून देण्यात आला आहे, विलंबावधी मंजूर करण्यात आला आहे किंवा हप्ते मंजूर करण्यात आले आहेत आणि त्यानुसार रकमा प्रदान केलेल्या आहेत, अशा व्यापाऱ्याकडून, कलम ३० अन्वये, कोणतेही व्याज देय असणार नाही.]

(३) शासनाच्या देय रकमांच्या प्रदानातून सूट देऊन त्याद्वारे लाभ प्राप्त करण्यासाठी हक्कविषयक प्रमाणपत्र देण्यात आलेल्या कोणत्याही व्यापाऱ्याने प्राप्त केलेले, लाभांचे एकत्रित ठरीव प्रमाण, कोणत्याही सामूहिक प्रोत्साहन योजनेखालील संबद्ध द्रव्यविषयक कमाल मर्यादेहून अधिक आहे किंवा कसे, हे निश्चित करण्यासाठी, आयुक्त, विहित केलेल्या रीतीने, लाभांचे एकत्रित ठरीव प्रमाण प्रगणित करील आणि या प्रयोजनांसाठी तो, उक्त व्यापाऱ्याला, नियत दिवसापूर्वी मिळालेले लाभ, कोणतेही असल्यास, विचारात घेईल.

(४) कोणत्याही व्यापाऱ्याच्या बाबतीत प्रगणित करण्यात आलेले लाभांचे एकत्रित ठरीव प्रमाण जर संबद्ध द्रव्यविषयक कमालमर्यादेपेक्षा, अशी कमालमर्यादा, संबद्ध सामूहिक प्रोत्साहन योजनेत घालून दिली असेल त्यापेक्षा अधिक असेल तर, आयुक्त अशा व्यापाऱ्यास, लेखी, आदेशाद्वारे, प्रत्येक संबद्ध कालावधीसाठी कर, व्याज किंवा शास्ती भरण्यास फर्मावील आणि शासनाच्या अशा देय रकमांच्या वसुलीच्या प्रयोजनासाठी, व्यापाऱ्यावर कलम ३२ खाली तरतूद केल्याप्रमाणे नोटीस बजावील:

परंतु, व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, या कलमान्वये कोणताही आदेश संमत करण्यात येणार नाही.

(५) हा अधिनियम, त्याखाली तयार करण्यात आलेले नियम किंवा कोणतीही सामूहिक प्रोत्साहन योजना यांत काहीही अंतर्भूत असले तरी,—

(एक) शासनाच्या देय रकमांच्या, प्रदानाचा दिनांक लांबणीवर टाकून किंवा प्रदानांमधून सूट मिळवून लाभ प्राप्त करण्यासाठी हक्कविषयक प्रमाणपत्र देण्यात आलेला कोणताही व्यापारी, त्याने केलेल्या कच्च्या मालांच्या खरेदीच्या संबंधात विक्री कराच्या वजावटीचा दावा करण्यास हक्कदार असणार नाही आणि या कलमाच्या प्रयोजनासाठी, " कच्चा माल "या शब्दप्रयोगाचा अर्थ, नियमांमध्ये त्याला नेमून दिलेल्या अर्थाप्रमाणे असेल ;

(दोन) शासनाच्या देय रकमांच्या प्रदानाचा दिनांक लांबणीवर टाकून, किंवा त्या प्रदानामधून सूट मिळवून लाभ प्राप्त करण्यासाठी हक्कविषयक प्रमाणपत्र देण्यात आलेला कोणताही व्यापारी, कच्च्या मालाच्या खरेदीच्या संदर्भात नियमांना अनुसरून, विक्रीकराच्या परताव्याची मागणी करण्यात हक्कदार असेल ;

[2] * * * *

सामूहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत उपलब्ध रून द्यावयाच्या लाभावरील वार्षिक कमाल मर्यादा.

९२. (१) कोणत्याही सामूहिक प्रोत्साहन योजनेमध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, ज्याला पात्रता प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे असे कोणतेही पात्र युनिट, संबंधित कालावधीत लागू असलेल्या उद्योग (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१ याखालील अनुज्ञापक तरतुदी विचारात घेऊन, राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे, असलेल्या त्या युनिटाच्या वार्षिक उत्पादन क्षमतेहून अधिक झालेल्या उत्पादनाच्या संबंधात, नियत दिनांकानंतर कोणत्याही वर्षामध्ये लाभ घेण्यास पात्र असणार नाही. १९५१ चा ६५.

(२) कोणत्याही पात्र युनिटाने पोट-कलम (१) चे उल्लंघन करुन मिळवलेला लाभ काढून घेण्यात येईल आणि तो काढून घेतला असल्याचे मानण्यात येईल आणि असे युनिट, विक्रीच्या किंवा खरेदीच्या संबंधात, जेथवर ती विक्री किंवा खरेदी पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशी अधिक उत्पादनांशी संबंधित असेल तेथवर, शास्ती आणि व्याजासह कर भरण्यास पात्र असेल.

---

[1]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ५२(१) द्वारे, पोट-कलम (२) मध्ये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[2]वरील अधिनियमाच्या कलम ५२ (२) द्वारे, खंड (तीन) वगळण्यात आला.

[1][(३) हक्कविषयक प्रमाणपत्र धारण करणारे युनिट, पुढील गोष्टींच्या बाबतीत, कोणतेही प्रोत्साहन मिळण्यासाठी दावा करण्यास किंवा प्रोत्साहन मिळण्यास हक्कदार असणार नाही,---

(एक) कार्यकंत्राटाच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेचे हस्तांतरण करून (मग ती मालाच्या स्वरूपात असो किंवा अन्य कोणत्याही स्वरूपात असो) केलेली विक्री,

(दोन) रोख रक्कम, विलंबित प्रदान किंवा मौल्यवान मोबदल्याखातर कोणत्याही मालाचा कोणत्याही प्रयोजनासाठी वापर करण्याच्या हक्काचे (मग तो विनिर्दिष्ट कालावधीकरिता असो किंवा नसो) हस्तांतरण करून केलेली विक्री.]

विवक्षित आकस्मिक खर्चामध्ये पात्र युनिटाला प्रमाणानुसारी लाभ.

**९३.** (१) प्रोत्साहनाच्या कोणत्याही सामूहिक योजनेमध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, ज्याला पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले आहे असे कोणतेही पात्र युनिट, नियत दिनांकानंतर कोणत्याही वर्षी, त्या वर्षातील उक्त युनिटच्या विक्रीच्या व खरेदीच्या एकूण उलाढालीला, राज्य शासनाने विहित केले असेल असे गुणोत्तर लागू करून येणाऱ्या विक्रीच्या किंवा खरेदीच्या उलाढालीच्या फक्त तेवढ्याच भागावर लाभ मिळण्यास पात्र असेल आणि युनिटांच्या विविध वर्गांकरिता आणि विविध योजनांकरिता वेगवेगळी गुणोत्तरे विहित करता येतील.

(२) पोट-कलम (१) चे उल्लंघन करून पात्र युनिटाने मिळविलेले लाभ, असल्यास ते काढून घेण्यात येतील आणि काढून घेतले असल्याचे मानण्यात येईल आणि असे युनिट पोट-कलम (१) अन्वये करण्यात येणाऱ्या उलाढालीपेक्षा जास्त असलेल्या विक्री व खरेदीच्या उलाढालीच्या संबंधात, कोणत्याही असल्यास, शास्ती आणि व्याजासह, कर भरण्यास पात्र असेल आणि त्यानुसार अशाप्रकारे मिळवलेला कोणताही लाभ हा कराची थकबाकी असल्याप्रमाणे पोट-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(३) कराच्या थकबाकीच्या वसुलीसाठी, ज्या उलाढालीच्या बाबतीत लाभ उपलब्ध नसतील अशा उलाढालीच्या बाबतीत कर, व्याज आणि शास्ती भरण्याबाबत आयुक्त, त्या पात्र युनिटाला लेखी आदेशाद्वारे [illegible]र्वील आणि त्या व्यापाऱ्यावर, कलम ३२ च्या पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मागणीची नोटीस बजावील :

परंतु, त्या पात्र युनिटाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय या कलमाखाली कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

मानीव प्रदान.

**९४.** (१) या अधिनियमात, नियमांत किंवा अधिसूचनांत काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, आयुक्त, **राजपत्रातील** सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शर्तीस अधीन राहून, ज्या व्यापाऱ्यास पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे,[2][राज्य शासनाने तयार केलेल्या कोणत्याही सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत विक्रीकर दायित्वाच्या] स्थगित प्रदानाच्या स्वरूपात प्रोत्साहन देण्यात आले असेल, आणि अशा व्यापाऱ्याकडून देय असलेल्या अशा कोणत्याही कराच्या रकमेइतकेच कर्जाचे दायित्व [3][सिकॉम [किंवा उद्योग संचालनालय] किंवा संबंधित प्रादेशिक विकास महामंडळ किंवा संबंधित जिल्हा उद्योग केंद्र [4][* * *] ] यांच्याकडून उभारण्यात आलेले असेल, तेव्हा लोकहिताच्या दृष्टीने, असा कर भरण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(२) या अधिनियमात किंवा नियमांत किंवा सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या कोणत्याही भागात एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याला यथास्थिती, विक्रीकराच्या किंवा खरेदीकराच्या स्थगित प्रदानाच्या स्वरूपात प्रोत्साहन मिळविण्यासाठी पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले आहे, अशा पात्र युनिटास, ज्या कालावधीत उक्त प्रमाणपत्र वैध असेल अशा कोणत्याही कालावधीच्या संबंधात, स्वतःच्या विकल्पानुसार, त्यास स्थगिती देण्यात आलेल्या कराच्या रकमेच्या ऐवजी, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, स्थगित कराच्या निव्वळ वर्तमान मूल्याएवढी रक्कम मुदतपूर्व देता येईल व अशी रक्कम देण्यात आल्यावर, अशा स्थगित कराचे प्रदान झाले असल्याचे लोकहितार्थ मानण्यात येईल.

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ५३ द्वारे, पोट--कलम (२) नंतर हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५४ (१) द्वारे, '' विक्रीकराच्या किंवा खरेदीकराच्या किंवा अतिरिक्त कराच्या किंवा अधिभाराच्या किंवा उलाढाल कराच्या '' या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि '' सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत कराच्या '' या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५४ (२) द्वारे, ''सिकॉम'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ५४ (३) द्वारे, '' किंवा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ किंवा महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण '' हा मजकूर वगळण्यात आला.

## प्रकरण पंधरा

## निरसन व व्यावृत्ती

निरसन. **९५.** (१) पुढील कायदे, याद्वारे, निरसित करण्यात येत आहेत:---

(क) मुंबई मोटार स्पिरिट विक्री कराधान अधिनियम, १९५८. १९५८ चा मुंबई ६६.

(ख) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९. १९५९ चा मुंबई ५१.

[1][ * * * * ]

(घ) महाराष्ट्र विक्रीकर अधिनियम, १९७९. १९७९ चा महा. १७.

(ङ) महाराष्ट्र कोणताही माल कोणत्याही प्रयोजनार्थ वापरण्याच्या हक्काच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५. आणि १९८५ चा महा. १८.

(च) महाराष्ट्र कार्यकंत्राटाच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित) अधिनियम, १९८९. १९८९ चा महा. ३६.

(२) कलम ३ चे पोट–कलम (१) आणि कलम ९६ चे पोट–कलम (१) यामधील तरतुदींच्या अधीनतेने, पूर्वीच्या कोणत्याही कायद्यान्वये दिलेले प्रत्येक नोंदणी प्रमाणपत्र आणि लायसन हे, नियत दिवसापासून रद्द होईल व नियत दिवसापासून तीन महिन्यांच्या कालावधीत ते विरुपित करण्यासाठी निर्धारण प्राधिकरणाकडे परत पाठविण्यात येईल. निर्धारण प्राधिकरण, उक्त प्रमाणपत्राची किंवा लायसनची आपली स्वतःची प्रत आणि त्यांच्याकडे परत पाठविलेली प्रतही विरुपित करील आणि विरुपणान्तर, ती विरुपित प्रत, प्रमाणपत्राच्या किंवा लायसनच्या पूर्वीच्या धारकाला परत पाठविण्यात येईल.

व्यावृत्ती. **९६.** (१) कलम ९५ अन्वये त्यात उल्लेखिलेल्या कायद्यांपैकी कोणत्याही कायद्याचे निरसन केले असले तरीही,---

(क) कोणताही कर बसविण्याच्या, त्याच्या विवरणाच्या, आकारणीच्या, फेरआकारणीच्या, अपिलाच्या, निर्धारणाच्या, पुनरीक्षणाच्या, दुरुस्तीच्या, निर्देशाच्या, मुदत, हिशेब व कागदपत्रे प्रस्तुत करण्याच्या, जागेची झडती घेण्याच्या, कार्यवाही हस्तांतरण करण्याच्या, आणि त्याच्या प्रदानाच्या आणि वसुलीच्या, लाभांच्या एकत्रित ठरीव प्रमाणाच्या परिगणनेच्या, कर प्रदानातून सूट देण्याच्या व कर प्रदानांचा देय दिनांक लांबणीवर टाकण्याच्या हक्कविषयक प्रमाणपत्र रद्द करण्याच्या, मूळ स्रोतातून कर वसुलीच्या, किंवा वजातीच्या, कोणत्याही कर परताव्याच्या किंवा वजावटीच्या, कोणताही परतावा रोखून ठेवण्याच्या, कर प्रदानातून सूट देण्याच्या, आकडेवारी गोळा करण्याच्या, नियम करण्याच्या अधिकाराच्या, कोणतीही शास्ती लादण्याच्या किंवा व्याज आकारण्याच्या किंवा कोणत्याही रकमेचे समपहरण करण्याच्या प्रयोजनासाठी, जेथे असा कर बसवण्याचा, विवरणाचा, आकारणी करण्याचा, फेरआकारणी करण्याचा, अपिलांचा, निर्धारणाचा, पुनरीक्षणाचा, दुरुस्तीचा, निर्देशाचा, मुदतमर्यादेचा, प्रदानाचा व वसुलीचा, लाभांच्या एकत्रित ठरीव प्रमाणाच्या परिगणनेचा, कर प्रदानातून सूट देण्याच्या व कर प्रदानांचा देय दिनांक लांबणीवर टाकण्याच्या, हक्कविषयक प्रमाणपत्र रद्द करण्याच्या, वसुली करण्याच्या, मूळ स्रोतातून कर वजातीच्या, परताव्याच्या किंवा वजावटीच्या, कोणताही परतावा रोखून ठेवण्याच्या, कर भरण्यापासून सूट देण्याच्या, आकडेवारी गोळा करण्याच्या, नियम करण्याच्या अधिकाराचा, मुदतमर्यादेचा, हिशेब आणि दस्तऐवज प्रस्तुत करण्याचा आणि

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ५५ द्वारे, पोट–कलम (१) मधील, खंड (ग) वगळण्यात आला.

तपासणीचा आणि जागेची झडती घेण्याच्या, कार्यवाही हस्तांतरणाचा, कोणतीही शास्ती लादण्याचा किंवा व्याज आकारण्याचा किंवा कोणत्या रकमेचे समपहरण करण्याचा संबंध नियत दिनांकापूर्वीच संपलेल्या कोणत्याही कालावधीशी असेल, तेथे त्या प्रयोजनासाठी किंवा उपरोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाशी संबंध असलेल्या किंवा त्यास आनुषंगिक असलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी ते कायदे (त्यांच्या कोणत्याही तरतुदींन्वये अंमलात असलेल्या कोणत्याही पूर्वीच्या कायद्यासह) आणि त्या कायद्यान्वये केलेले व नियत दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले सर्व नियम, विनियम, आदेश, अधिसूचना, नमुने, प्रमाणपत्रे आणि नोटिसा, नेमणुका आणि अधिकार सोपवणे ह्या बाबीकरिता या अधिनियमाच्या इतर तरतुदी लागू होतील तितपत त्यांना अधीन राहून, अंमलात असण्याचे चालू राहतील–मग अशा कार्यवाहीच्या संबंधातील कर, शास्ती, व्याज समपहृत रक्कम, किंवा मूळ स्रोतातून केलेली कर वजावट कोणतीही असल्यास, नियत दिनांकास किंवा त्यापूर्वी भरण्यात आली असो वा नसो;

१९५९ चा मुंबई ५१.

(ख) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ अन्वये दिलेले कोणतेही नोंदणी प्रमाणपत्र हे, या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये कर भरण्याचे दायित्व अस्तित्वात असेल तेथवर, नियत दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले नोंदणी प्रमाणपत्र असल्यामुळे या अधिनियमान्वये नियत दिवशी दिलेले नोंदणी प्रमाणपत्र आहे, असे नियत दिवशी मानण्यात येईल आणि, तद्नुसार, नियत दिवसाच्या लगतपूर्वी असे नोंदणी प्रमाणपत्र धारण करणारा व्यापारी, या अधिनियमान्वये ते प्रमाणपत्र यथोचितरित्या रद्द होईपर्यंत, या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असलेला नोंदणीकृत व्यापारी असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमाच्या सर्व तरतुदी, या अधिनियमाखाली कर भरण्यास पात्र असलेल्या व्यापाऱ्याला जशा लागू होतात तशाच त्या त्याला लागू होतील ;

१९५९ चा मुंबई ५१.

(ग) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ या व्यतिरिक्त कोणत्याही अगोदरच्या कायद्याखाली, जी नियत दिवसाच्या लगतपूर्वी, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ अन्वये नोंदणीचे प्रमाणपत्र धारण करत नाही अशा कोणत्याही व्यक्तीला दिलेले, नियत दिवसाच्या लगतपूर्वी अंमलात आलेले कोणतेही नोंदणी प्रमाणपत्र किंवा लायसन, विद्यमान कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये कर भरण्याचे दायित्व असेल तेथवर, कलम १६ च्या पोट-कलम (१) मधील तिसऱ्या परंतुकाअन्वये तरतूद केलेल्या विहित कालावधीच्या समाप्तीपर्यंत, या अधिनियमाखाली नियत दिवसाला देण्यात आलेले नोंदणीचे प्रमाणपत्र आहे, असे मानण्यात येईल आणि त्यानुसार असे नोंदणी प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीला असा कालावधी संपेपर्यंत या अधिनियमान्वये नोंदणीकृत व्यापारी मानण्यात येईल आणि त्यानुसार, या अधिनियमाच्या सर्व तरतुदी या अधिनियमाखाली कर भरण्यास पात्र असलेल्या एखाद्या व्यापाऱ्याला जशा लागू होतात तशाच त्या त्याला लागू होतील [१][आणि या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, कोणत्याही पूर्वीच्या कायद्यान्वये मंजूर केलेली सर्व नोंदणी आणि लायसने नियत दिवशी रद्द होतील ;]

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ५६ (१) द्वारे, हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(घ) कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने, नियत दिवसापूर्वी, यापूर्वीच्या कायद्यान्वये नोंदणीसाठी अर्ज केलेला असेल, परंतु नियत दिवसापूर्वी, नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आलेले नसेल किंवा नियत दिवसापूर्वी, पूर्वीच्या कायद्यान्वये कर भरण्यास पात्र झालेला आहे, अशा कोणत्याही व्यापाऱ्याने, त्या पूर्वीच्या कायद्यान्वये, अशा अर्जासाठी तरतूद करण्यात आलेल्या वेळेत, अर्ज केला असेल, परंतु तो अर्ज नियत दिवसानंतर केला गेला असेल त्याबाबतीत, अशा व्यक्तीला किंवा व्यापाऱ्याला पूर्वीच्या कायद्यान्वये तरतूद केल्याप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र यथोचितरीत्या देण्यात येईल आणि कलम ३ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींसह या अधिनियमाच्या सर्व तरतुदींच्या प्रयोजनार्थ, अशी व्यक्ती किंवा व्यापारी नियत दिवसाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले वैध नोंदणी प्रमाणपत्र धारण करीत असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार या अधिनियमाच्या सर्व तरतुदी लागू होतील ;]

[२][(एक) मुंबई विक्रीकर अधिनियम १९५९ अन्वये कर भरण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा कोणत्याही व्यापाऱ्याने, त्या अधिनियमाअन्वये जी व्यापारी नव्हती अशा व्यक्तीकडून अथवा त्या अधिनियमाअन्वये नोंदणीकृत व्यापारी नव्हता अशा व्यापाऱ्याकडून खरेदी केलेला कोणताही माल नियत दिवशी साठ्यात ठेवला असेल त्याबाबतीत ती व्यक्ती किंवा तो व्यापारी, जणू काही ती किंवा तो, त्या अधिनियमाच्या कलम १३ अन्वये खरेदी कराच्या संबद्ध दराने खरेदी कर भरण्यास पात्र झाला असल्याप्रमाणे, त्या अधिनियमान्वये, अशा मालाच्या खरेदीमूल्यावर खरेदी कर भरण्यास पात्र असेल आणि त्यानुसार उक्त व्यापारी किंवा व्यक्ती, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ अन्वये तिने दाखल करणे आवश्यक असेल अशी उलाढाल उघड करील व त्याप्रमाणे असा कर भरील.] १९५९ चा मुंबई ५१.

[१][(दोन) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ अन्वये कर भरण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने, उक्त अधिनियमाच्या कलम ८क, ११, १२ किंवा ४१ अन्वये, त्याने दिलेल्या प्रमाणपत्रान्वये किंवा घोषणापत्रान्वये नियत दिवसाअगोदर कोणत्याही वेळी, कोणताही माल खरेदी केला असेल आणि नियत दिवसानंतर कोणत्याही वेळी, अशा प्रमाणपत्रातील किंवा घोषणापत्रातील शर्तींचे, कथनांचे किंवा वचनांचे पालन करण्यात आले नसेल, त्या बाबतीत असा व्यापारी, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ अन्वये, अशा मालाच्या खरेदी किंमतीवर खरेदी कर भरण्यास पात्र असेल आणि खरेदी कर, उक्त अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ख आणि ग च्या स्तंभ (४) मध्ये अशा प्रत्येक मालासमोर मांडलेल्या दराने आकारण्यात येईल आणि तदनुसार, तो, ज्या कालावधीत मालाची खरेदी करण्यात आली त्या कालावधीच्या संबंधात, विहित नमुन्यात, विहित प्राधिकाऱ्याकडे विवरण सादर करील आणि उक्त विवरणामध्ये त्या मालाच्या खरेदी किंमतीचा समावेश असेल आणि ज्या महिन्यात असे दायित्व निर्माण झाले असेल त्या महिन्याच्या समाप्तीपासून एका महिन्याच्या आत असे विवरण सादर करील आणि असे विवरण सादर करण्यापूर्वी त्या विवरणाप्रमाणे देय असलेला कर भरील : १९५९ चा मुंबई ५१.

परंतु, नियत दिनांकापासून नऊ महिन्यांच्या आत, उक्त अधिनियमाच्या कलम ८क, ११, १२ किंवा ४१ खाली दिलेल्या ज्ञापनाच्या किंवा प्रमाणपत्राच्या शर्तींचे, कथनांचे किंवा वचनांचे अनुपालन करण्यास एखाद्या व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने कसूर केली असेल, या वस्तुस्थितीमुळे या खंडान्वये त्या व्यापाऱ्याकडून किंवा व्यक्तीकडून खरेदी कर देय असेल तेव्हा, कलम ११, १२, १३क किंवा, यथास्थिती कलम ४१ अन्वये भरलेल्या किंवा देय असलेल्या कराएवढी रक्कम, अशा देय असलेल्या खरेदी करामधून वजा करण्यात येईल.]

(च) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ किंवा, यथास्थिती, महाराष्ट्र कोणताही माल कोणत्याही प्रयोजनार्थ वापरण्याच्या हक्काच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५ याअन्वये कर भरण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यापाऱ्याने, भाडे खरेदीवर वा हप्त्याने प्रदान करावयाच्या कोणत्याही पद्धतीने मालाची पोचवणी करुन किंवा, यथास्थिती, कोणत्याही प्रयोजनासाठी कोणत्याही मालाच्या वापराच्या अधिकाराचे हस्तांतरण करून (विनिर्दिष्ट कालावधीसाठी असो किंवा नसो) नियत दिवसापूर्वी कोणत्याही वेळी विक्री केली असेल आणि नियत दिवसानंतर अशा पोचवणी वा हस्तांतरणाबाबत विक्री मूल्याची कोणतीही रक्कम आदेय व देय असेल त्याबाबतीत, त्या पोचवणीशी वा हस्तांतरणाशी संबंधित पूर्ण कर, नियत दिवसापूर्वी १९५९ चा मुंबई ५१. १९८५ चा महा. १८.

[१]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ५६ (२) द्वारे, खंड (घ) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

[२]वरील अधिनियमाच्या कलम ५६ (३) द्वारे, खंड (ङ) ला हा नवीन क्रमांक देण्यात आला. आणि पोट–कलम (दोन) जादा दाखल करण्यात आले.

भरला किंवा प्रदान केला नसेल तर, उक्त रकमा, या अधिनियमान्वये दाखल करावयाच्या समुचित विवरणांमध्ये उक्त व्यापाऱ्याकडून दर्शविण्यात येतील आणि त्यानुसार [1][या अधिनियमाअन्वये लागू असलेल्या दराने त्या रकमावर देय असलेला कर] भरण्यात येईल आणि त्यानुसार पोचवणी वा हस्तांतरण हे नियत दिवसापूर्वी करण्यात आले असले तरीही, उक्त व्यापारी, पोचवणी वा हस्तांतरण आणि उक्त रकमा यांना या अधिनियमाच्या सर्व तरतुदी लागू होतील :

परंतु, नियत दिवसानंतर आदेय व देय असेल अशा विक्री मूल्याच्या बाबतीत, या अधिनियमान्वये कर भरण्याचे उक्त व्यापाऱ्याचे दायित्व हे, जर निरसित अधिनियम अंमलात असणे चालू राहिले असते तर त्या अधिनियमान्वये उपर्जित झाले असते, अशा दायित्वापेक्षा अधिक असणार नाही.

१९८९ चा महा. ३६. [2][(छ) महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनर्रधिनियमित) अधिनियम, १९८९ अन्वये नोंदणी केलेला व्यापारी जेव्हा या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असेल आणि त्याने नियत दिवसापूर्वी केव्हाही कोणताही कार्य-कंत्राटाचा करार केलेला असेल आणि उक्त कार्य-कंत्राटाची अंमलबजावणी नियत दिवसापूर्वी सरू केलेली असेल आणि त्यानंतरही ती चालू असेल त्याबाबतीत, व्यापारी उक्त कंत्राटाच्या संबंधात, महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनर्रधिनियमित) अधिनियम, १९८९ याच्या तरतुदींनुसार, कर देईल ; तथापि, नियत दिवशी किंवा त्यानंतर केलेल्या कंत्राटाला अनुरूप अशा खरेदीवर, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये जी वजावट मिळण्यास तो हक्कदार झाला असता ती वजावट तो याबाबतीत मागणार नाही.]

१९०४ चा मुंबई १. (२) पूर्ववर्ती पोट-कलमांतील तरतुदींना बाध न येता आणि त्यांना अधीन राहून, मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ चे कलम ७ हे, कलम ९५ मध्ये उल्लेखिलेल्या कायद्यांपैकी कोणत्याही कायद्याचे निरसन करण्याच्या संबंधात, जणू काही अशा रीतीने निरसन केलेला कायदा हा त्या अधिनियमाच्या कलम ७ च्या अर्थानुसार अधिनियमित करण्यात आला होता, असे समजून लागू होईल.

**निरसन केलेल्या कोणत्याही कायद्यातील अधिकारी, प्राधिकारी इत्यादींच्या निर्देशांचा अर्थ लावणे.**

**९७.** या अधिनियमान्वये आता निरसन केलेल्या कोणत्याही कायद्याच्या कोणत्याही तरतुदीतील कोणत्याही अधिकाऱ्याच्या, प्राधिकाऱ्याच्या किंवा न्यायाधिकरणाच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, कलम ९६ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार नेमलेल्या किंवा घटित केलेल्या तत्सम अधिकाऱ्याचा, प्राधिकाऱ्याचा किंवा स्थापन केलेल्या तत्सम न्यायाधिकरणाचा निदेश आहे असा लावला जाईल ; आणि जर असा अधिकारी, प्राधिकारी किंवा न्यायाधिकरण कोण आहे, असा प्रश्न उपस्थित झाला तर, ते प्रकरण राज्य शासनाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल आणि राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

**अडचणी दूर करणे.**

**९८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची, कलम ९६ मध्ये अंतर्भूत असणाऱ्या तरतुदींसह, अंमलबजावणी करण्यात अडचण निर्माण झाली तर, राज्य शासनाला, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट राजपत्रात सर्वसाधारण किंवा विशेष आदेश प्रसिद्ध करून त्याद्वारे, करता येईल. विशेषत : किंवा पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाधा न येता, अशा कोणत्याही आदेशात नियत दिवसाच्या लगतपूर्वी संपणाऱ्या वर्षाच्या किंवा पूर्वीच्या कोणत्याही वर्षाच्या बाबतीतील कार्यवाहीच्या संबंधात पूर्वीचा कायदा ज्या अनुकूलनांना किंवा फेरबदलांना अधीन राहून, लागू होईल त्या अनुकूलनाची किंवा फेरबदलाची तरतूद करता येईल :

परंतु, नेमलेल्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर. शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

---

[1]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ५६ (४) द्वारे, " त्या रकमांवर देय असलेला कर " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2]सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ५४ द्वारे, पोट-कलम (१) मधील खंड (छ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

## १[अनुसूची क

[ कलमे २ (२६), ५ आणि ६ पहा ]

### ज्या मालावर शून्य टक्के कर आहे असा माल

टीप.— '' टक्के '' या शब्दाचा किंवा % याचा कराच्या दरासंदर्भातील अर्थ असा की, ती कर ज्या मालासंबंधातील असेल त्या मालावरील कर, विक्री किंमतीच्या आधारे लावला जाईल आणि तो, कर संबंधित मालासमोर दर्शवण्यात आलेल्या विक्री किमतीच्या टक्केवारी इतका असेल :—

### अनुसूची क

| अनुक्रमांक (१) | वस्तुचे नाव (२) | शर्ती व अपवाद (३) | कराचा दर (४) |
|---|---|---|---|
| १ | राज्य शासनाकडून, वेळोवेळी, **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येतील अशी हाताने चालवावयाची किंवा पशुंकडून ओढली जाणारी शेतीची अवजारे. | . . . | शून्य टक्के |
| २ | राज्य शासनाकडून, वेळोवेळी, **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येतील अशा अपंग व्यक्तीकडून वापरली जाणारी साधने व उपकरणे. | . . . | शून्य टक्के |
| ३ | पशुंकडून ओढल्या जाणाऱ्या गाड्या, बैलगाड्यांसह. | . . . | शून्य टक्के |
| २[४ | (क) माशांचे खाद्य, पशुखाद्य, कोंबड्यांचे खाद्य त्यांची सत्त्वे, पूरक पशुखाद्य, अधिक पोषक पशुखाद्य, | . . . | शून्य टक्के |
| | (ख) गवत, वाळलेले गवत, चारा. | . . . | शून्य टक्के |
| | (ग) पुढील गोष्टी वगळता धान्य व डाळीचा कोंडा आणि तेल काढलेल्या पेंडी.<br>(क) इतर तेलाची पेंडी,<br>(ख) भाताचा कोंडा]. | . . . | शून्य टक्के |
| ५ | विड्याची पाने | . . . | शून्य टक्के |
| ६ | ज्योतिषपत्रिका, पंचांग, प्रवासी वाहतूक सेवांची वेळापत्रके आणि नियतकालिके ३[नकाशे, तक्ते, ओरिअर्स, गोल (पृथ्वीचा) आणि त्यांचे भाग]यांच्यासह परंतु— वार्षिक अहवाल, अर्जाचे नमुने, लेखापुस्तके, दिनदर्शिका डायऱ्या, सूच्या, रेसकार्डस् आणि मुख्यतः व्यावसायिक प्रयोजनासाठी माल, सेवा आणि वस्तू यांची प्रसिद्धी करणारी आणि त्यावरील लेख प्रसिद्ध करणारी प्रकाशने यांना वगळून—पुस्तके. | . . . | शून्य टक्के |
| ७ | (पिझ्झा ब्रेड वगळून) लोफ, रोल किंवा स्लाईस अशा स्वरूपातील ब्रेड, भाजलेला किंवा न भाजलेला, परंतु खाण्यासाठी देण्यात आला असेल तो वगळून. | . . . | शून्य टक्के |
| ८ | प्रसाधनगृहातील फरशीसह फरशी स्वच्छ करण्यासाठी वापरले जाणारे झाडू आणि ब्रश. | . . . | शून्य टक्के |

१ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ५७ द्वारे, मूळ अनुसूचीऐवजी अनुसूच्या क ते ड दाखल केल्या.

२ शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र.क्र.१३७/कराधान-१, दिनांक १ मे, २००५ याच्या कलम एक खंड (१) द्वारे, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ वरील अधिसूचनेच्या कलम एक खंड (२) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## अनुसूची क—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| [1][९ | धान्ये [भात (साळी), तांदूळ व गव्हाव्यतिरिक्त] अखंड, फोडलेल्या किंवा भरडलेल्या स्वरूपातील आणि त्यांची पिठे- मग ते एकाच धान्याचे असो की मिश्रित स्वरुपात असो. . . . | शून्य टक्के |
| | (क) भात (साळी), तांदूळ आणि गहू अखंड, फोडलेल्या किंवा भरडलेल्या स्वरुपातील . . . | शून्य टक्के |
| | (ख) गहू व तांदळाचे पीठ, आटा, मैदा, रवा, सुजी यासह . . . | शून्य टक्के |
| | (ग) डाळींची पीठे व बेसन भाग, मात्र बेसन इतर डाळींच्या किंवा धान्य पीठात मिसळलेले नसेल. . . . | शून्य टक्के |
| | १ मे, २००५ ते ३१ मार्च, २००६ या कालावधीसाठी केलेले विक्री.] | |
| १० | खडू . . . | शून्य टक्के |
| ११ | कोळसा आणि बदामी कोळसा . . . | शून्य टक्के |
| १२ | चरखा, अंबर चरखा आणि हातानी कातलेल्या सुताच्या [2][खादी पासून तयार केलेली वस्त्रे व इतर वस्तुंच्या] उत्पादनासाठी वापरण्यात येणारी इतर अवजारे. . . . | शून्य टक्के |
| १३ | हातमाग, त्याचे सुटे भाग, उपसाधने, त्याला जोडावयाचे भाग आणि राज्य शासन, वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचित करील अशी त्याची यंत्रे. . . . | शून्य टक्के |
| १४ | गांधी टोपी . . . | शून्य टक्के |
| १५ | मातीचे दिवे (पणत्या) . . . | शून्य टक्के |
| १६ | सर्व प्रकारची संतति प्रतिबंधक साधने . . . | शून्य टक्के |
| १७ | सुती व रेशमी धाग्याची लड . . . | शून्य टक्के |
| १८ | दही, लस्सी, ताक आणि मलईरहित दूध, सेवन करण्यास दिले असेल त्याव्यतिरिक्त. . . . | शून्य टक्के |
| १९ | मातीची भांडी . . . | शून्य टक्के |
| २० | वीज . . . | शून्य टक्के |
| २१ | [3][कॅसुरिना व निलगिरी लाकड्याचे ओंडके व कापलेल्या तुकड्याव्यतिरिक्त जळाऊ लाकूड] . . . | शून्य टक्के |
| २२ | मासे पकडण्याचे जाळे [4][मासे पकडण्याचे जाळे, मत्स्य बीज, कोलंबी बीज आणि शिंपली मत्स्य बीज] . . . | शून्य टक्के |
| २३ | ताजी रोपे, रोपटी आणि मोहाची फुले वगळून नैसर्गिक फुले . . . | शून्य टक्के |
| २४ | ताजा भाजीपाला आणि बटाटे, रताळी, सुरण, कांदे व ओला खजूर वगळून ताजी फळे. . . . | शून्य टक्के |
| २५ | लसूण आणि आले . . . | शून्य टक्के |
| २६ | [5][मौल्यवान धातूव्यतिरिक्त कोणत्याही द्रवापासून बनविलेल्या बांगड्या] . . . | शून्य टक्के |

[1] शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र.क्र.१३७/कराधान-१, दिनांक १ मे, २००५ याच्या कलम-एक, खंड (३) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिसूचनेच्या कलम एक, खंड (४) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिसूचनेच्या कलम एक (५) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिसूचनेच्या कलम एक (६) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] वरील अधिसूचनेच्या कलम एक, खंड (७) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## अनुसूची क—चालू

| (१) | (२) | | (३) |
|---|---|---|---|
| २७ | अनुसूची "ग" च्या नोंद क्रमांक ३९ मध्ये अनुसूचित केले असेल त्यां व्यतिरिक्त—अमूर्त आणि अस्पष्ट स्वरूपाचा माल | ... | शून्य टक्के |
| २८ | मानवी रक्त आणि मानवी रक्तद्रव (ब्लड प्लाझ्मा) | ... | शून्य टक्के |
| २९ | माती किंवा प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून बनवलेल्या देवदेवतांच्या मूर्ती. | ... | शून्य टक्के |
| ३० | राज्य शासन वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचित करील अशी हाताने बनवलेली देशी संगीत वाद्ये. | ... | शून्य टक्के |
| ३१ | बिंदी, आळता आणि सिंदूर यांच्यासह कोणत्याही स्वरूपातील कुंकू | ... | शून्य टक्के |
| ३२ | पत्रावळी आणि द्रोण | ... | शून्य टक्के |
| ३३ | गोठवलेल्या स्थितीत किंवा बंद डब्यामधून विक्री करण्यात येत असेल त्या व्यतिरिक्त मांस, कोंबडीचे मांस, मासे, कोळंबी, लॉबस्टर, खेकडे, झिंगे यांच्यासह सागरी खाद्य, कवचासह अंडी, घोडे वगळून इतर गुरे, मेंढ्या, बकऱ्या, डुकरे आणि पाळीव खाद्यपक्षी. | ... | शून्य टक्के |
| ३४ | दूध म्हणजे, द्रवरुपातील प्राणिज दूध–सेवन करण्यास दिले असेल त्याच्याशिवाय आणि–(क) गोड केलेले अथवा न केलेले संघनित दूध आणि (ख) कोणतीही घटकद्रव्ये घातलेले आणि ब्रॅण्ड नावाने विकले जाणारे दूध यांना वगळून. | ... | शून्य टक्के |
| ३५ | राष्ट्रध्वज | ... | शून्य टक्के |
| ३६ | शासकीय कोषागाराकडून विक्री करण्यात येणारे न्यायिकेतर मुद्रांक कागद, शासनाकडून विक्री करण्यात येणारी पाकिटे, पोस्टकार्डे, इत्यादीसारखी टपाल सामग्री. | ... | शून्य टक्के |
| ३७ | तेलाची पेंड आणि तेल काढलेली पेंड याच्याखेरीज सेंद्रीय खते. | ... | शून्य टक्के |
| ३८ | केळीची पाने | ... | शून्य टक्के |
| ३९ | पोहे, लाह्या, चुरमुरे | ... | शून्य टक्के |
| ४० | कच्ची लोकर | ... | शून्य टक्के |
| ४१ | [१][परंतु, ज्या बिया या अनुसूचीतील किंवा अनुसूची ग मधील कोणत्याही नोंदीत समाविष्ट असतील अशा बिया वगळून]. | ... | शून्य टक्के |
| ४२ | गोठवलेल्या रेतासह रेत | ... | शून्य टक्के |
| ४३ | अंडी देणारे रेशीम कीडे, कोष आणि कच्चे रेशीम | ... | शून्य टक्के |

[१] शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र.क्र.१३७/कराधान-१, दिनांक १ मे, २००५ याच्या कलम-एक, खंड (८) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## अनुसूची क—चालू

| (१) | (२) | | (३) |
|---|---|---|---|
| ४४ | लेखन–फळ्यांना वगळून पाटी आणि पाटीवरच्या पेन्सिली | . . . . | शून्य टक्के |
| १९५७ चा ५८. ४५ | अतिरिक्त उत्पादन शुल्क (विशेष महत्त्वाच्या वस्तू) अधिनियम, १९५७ याच्या पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये वेळोवेळी वर्णन केल्याप्रमाणे साखर, कापड आणि तंबाखू. | . . . | शून्य टक्के |
| ४६ | शहाळी | . . . | शून्य टक्के |
| ४७ | ताडी, नीरा आणि अरक | . . . | शून्य टक्के |
| ४८ | [1][आयोडीन युक्त मिठासह सर्वसामान्य मीठ] | . . . | शून्य टक्के |
| ४९ | (क) वायुमिश्रित, खनिजयुक्त, विशुद्ध, ऊर्ध्वपातित, आयोनिक बॅटरी, खनिजरहित केलेले पाणी आणि | . . . | शून्य टक्के |
| | (ख) सीलबंद पात्रातून विकले जाणारे पाणी याव्यतिरिक्त पाणी | . . . | शून्य टक्के |
| [2][५० | (क) सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरित करण्यात येणाऱ्या वस्तू (घासलेट व्यतिरिक्त) | . . . | शून्य टक्के |
| | (ख) परदेशी जाणाऱ्या जहाजांना व विमानांना बाँड मधून पुरविण्यात येणाऱ्या वस्तू. | . . . | शून्य टक्के |
| | (ग) भारतीय पर्यटन विकास मंडळातर्फे चालविण्यात येणाऱ्या मुंबई विमानतळावरील आयात शूल्क मुक्त दुकानातून प्रवाशांना (भारतात येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या) प्रवासादरम्यान विकलेल्या वस्तू. | . . . | शून्य टक्के |
| ५१ | (एक) पापड. | . . . | शून्य टक्के |
| | (दोन) गूळ. | . . . | शून्य टक्के |
| | (तीन) मिरची, हळकुंड आणि अखंड चिंच किंवा निवडलेले किंवा भुकटींच्या स्वरुपात मात्र वेगळे केलेले मिरचीचे बी व चिंचोके वगळून | . . . | शून्य टक्के |
| | (चार) धणे, मेथ्या, पार्स्ली (सुवा) अखंड किंवा भुकटीच्या स्वरुपात, | . . . | शून्य टक्के |
| | (पाच) असोला नारळ आणि सुक्या खोबऱ्याव्यतिरिक्त नारळापासून वेगळे काढलेले ओले खोबरे, | . . . | शून्य टक्के |
| | (सहा) सोलापुरी चादर, | . . . | शून्य टक्के |
| | (सात) टॉवेल्स, | . . . | शून्य टक्के |
| | (आठ) खजूर, | . . . | शून्य टक्के |
| | १ मे, २००५ ते ३१ मार्च, २००६ या कालावधीसाठी केलेली विक्री.] | | |

[1] शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. भूवक-१५०५/प्र. क्र. १३ख कराधान-१, दिनांक १ मे २००५ याच्या कलम एक, खंड (९) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिसूचनेच्या कलम एक, खंड (१०) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## अनुसूची ख

[ कलमे २ (२६), ५ व ६ पहा ]

### कराचा दर १ टक्का असलेल्या मालाची सूची

**टीप.**—" टक्के " या शब्दाचा किंवा % याचा कराच्या दरासंदर्भातील अर्थ असा की, ती कर नोंद ज्या मालासंबंधातील असेल त्या मालावरील कर, विक्री किमतीच्या आधारे लावला जाईल आणि तो, कर संबंधित मालासमोर दर्शविण्यात आलेल्या, विक्री किंमतीच्या टक्केवारी इतका असेल.

| अनुक्रमांक | वस्तूचे नाव | कराचा दर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | मौल्यवान खडे, कमी प्रतीचे मौल्यवान खडे, हिरे, खरे किंवा कल्चर केलेले मोती यांचा वापर करुन किंवा न करता, पन्नास टक्क्यांहून कमी शुद्धता असणाऱ्या मौल्यवान धातूंपासून बनवलेल्या वस्तू. | १ % |
| २ | सोने, चांदी, प्लॅटिनम, ऑस्मियम, पॅलेडियम, ऱ्होडीयम, रुथेनियम हे मौल्यवान धातू आणि त्यांच्यापासून बनविलेले संमिश्र धातू.<br>**स्पष्टीकरण.**—या नोंदीच्या प्रयोजनासाठी, मौल्यवान धातूचा संमिश्र धातू म्हणजे पन्नास टक्क्यांपेक्षा कमी नसेल इतकी शुद्धता असलेला मौल्यवान धातू होय. | १ % |
| ३ | हिऱ्यांसह मौल्यवान खडे, कमी प्रतीचे मौल्यवान खडे, आणि खरे किंवा कल्चर केलेले मोती. | १ % |

## अनुसूची ' ग '

[कलमे २ (२६), ५ व ६ पहा]

### कराचा दर ४% असलेल्या मालांची सूची

**टीप.**—" टक्के " या शब्दाचा कराच्या दरासंदर्भातील अर्थ असा की, नोंद ज्या मालासंबंधातील असेल त्या मालावरील कर विक्री किमतीच्या आधारे लावला जाईल आणि तो, संबंधित मालासमोर दर्शविण्यात आलेल्या विक्री किमतीच्या टक्केवारी इतका असेल.

| अनु-क्रमांक | वस्तूचे नाव | कराचा दर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | कर्षित्रे (ट्रक्टर्स) अनुयाने (ट्रेलर्स), अर्थ अनुयाने (सेमी-ट्रेलर्स तेल-इंजिने, विद्युत मोटारी, पंप, विद्युत पंप संच, सर्व प्रकारची धारित्रे (कॅपेसिटर्स) आणि सर्व प्रकारचे पाईप वगळून शेतीची यंत्रसामग्री आणि अवजारे. | ४ टक्के |
| २ | प्रायव्हेट ब्रँच एक्सेंज (पी.बी.एक्स.) आणि इलेक्ट्रॉनिक प्रायव्हेट ऑटोमॅटिक ब्रँच एक्सेंज (इ.पी.ए.बी.एक्स.) यांचा समावेश असलेली वायरलेसद्वारे किंवा वायरद्वारे इलेक्ट्रॉनिक दळण-वळणासाठी असलेली सर्व सामग्री. | ४ टक्के |

## अनुसूची ' ग '--चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| ३ | फलाय ॲश विटा, [१][उत्तापसाही (रिफॅक्टरी) विटा आणि मोनो लिथिक] ॲस्फाल्टची छप्पर, मातीची कौले यांसह सर्व प्रकारच्या विटा. | ४ टक्के | |
| ४ | सूती व रेशमी सूताची लड व शिलाईचा दोरा यांव्यतिरिक्त सर्व प्रकारचे सूत-मग ते कोणत्याही साहित्याने वेष्टित असो वा नसो; त्यापैकी कशाचाही टाकाऊ माल. | कित्ता | |
| ५ | पोलाद मिश्रित ॲल्युमिनियमच्या वस्तू | कित्ता | |
| ६ | ॲल्युमिनियम, आणि राज्य शासन, **राजपत्राद्वारे** वेळोवेळी अधिसूचित करील असे त्याचे संमिश्र धातू आणि उत्पादने. | कित्ता | |
| ७ | सुपारीची भुकटी व सुपारी व कच्चे काजू. | कित्ता | |
| ८ | टर्बो-टर्बो चालित विमानाला विकले जाणारे विमान चालन टर्बाईन फ्युएल. | कित्ता | |
| | **स्पष्टीकरण.**--या नोंदीच्या प्रयोजनासाठी "टर्बो चालित विमान" याचा अर्थ, एकतर टर्बाईन इंजिन किंवा पिस्टन इंजिन याद्वारे चालविल्या जाणाऱ्या प्रोपेलरकडून मुख्यतः गति मिळणारे विमान, असा आहे. | | |
| ९ | ऊसाची चिपाडे | कित्ता | |
| १० | बांबू | कित्ता | |
| ११ | बेअरिंग्स | कित्ता | |
| १२ | विडीची पाने | कित्ता | |
| १३ | बेल्टिंग्ज | ४ टक्के | |
| १४ | दुचाकी, तिचाकी, सायकल रिक्षा [२][आणि त्यांचे सुटे भाग, घटक आणि उपसाधने. टायर व ट्युब्ज] | कित्ता | |
| १५ | बायोमास ब्रिक्विट्स | कित्ता | |
| १६ | हाडांचा भुगा | कित्ता | |
| १७ | ठोक स्वरुपातील औषधिद्रव्ये, मग ती औषधिद्रव्ये व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० अन्वये देण्यात आलेल्या लायसनखाली आयात केलेली असो वा निर्माण केलेली असो. | कित्ता | १९४० चा २३. |
| १८ | अलोह धातूची ओतकामे | कित्ता | |
| १९ | अपकेंद्री (सेंट्रीफ्यूगल), मोनोब्लॉक व निमज्जनशील (सबमर्सिबल) [३][पंप व पंप सेट्स] आणि त्यांचे भाग. | कित्ता | |
| [४][२० | तांदूळ, गहू आणि डाळी अखंड, फोडलेल्या किंवा भरडलेल्या स्वरुपात. १ एप्रिल, २००६ पासून किंवा त्यानंतर सुरु होणाऱ्या कालावधीसाठी केलेली विक्री.] | कित्ता | |
| [५][२१ | राख, सूक्ष्म चिनी माती, गोळा माती सह] | कित्ता | |

[१] शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र.क्र.१३७/कराधान-१, दिनांक १ मे, २००५ याच्या कलम दोन, खंड (१) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (२) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (३) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (४) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (५) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**अनुसूची ' ग '—चालू**

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| २२ | दगडी कोळसा सर्व प्रकारचे कोक यांसह परंतु, कोळसा वगळून | कित्ता |
| २३ | कॉफीच्या द्विदल बिया व बी, कोको फळे (पौंड), चहाची हिरवी पाने व चिकोरी. | कित्ता |
| २४ | काथ्याच्या गाद्या वगळता काथ्या व काथ्याची उत्पादने | कित्ता |
| २५ | कापूस म्हणजे, टाकाऊ कापसासह सर्व प्रकारचा (देशी किंवा आयात केलेला) अनुत्पादित स्वरुपात—मग तो पिंजलेला किंवा न पिंजलेला असो, गासड्यातील असो, दाबणी केलेला असो किंवा अन्य प्रकारचा असो— | |
| २६ | मुशी (क्रुसिबल) | कित्ता |
| २७ | क्रूड तेल—म्हणजेच बिटूमेन खनिजापासून (शेल, चुनखडीचा खडक, वाळू यांसारख्या) काढलेली, कोणतीही घटक द्रव्ये असलेली, क्रूड पेट्रोलियम तेले व क्रूड तेले—मग ती नेहमीच्या किंवा घनीभूत तेलसाठ्यामधून किंवा बिटूमेन्स खनिजांच्या विघातक आसवनाद्वारे (डिस्ट्रक्टीव्ह डिस्टीलेशन) मिळालेली असोत वा नसोत, आणि पुढीलपैकी कोणत्याही किंवा सर्व प्रक्रियांच्या अधीन असोत किंवा नसोत :—<br>(१) निवळी ओतणे (डिकॅन्टेशन),<br>(२) विक्षारण (डिसॉल्टिंग),<br>(३) निर्जलीकरण,<br>(४) वाफेचा दाब नियमित करण्यासाठी स्थिरीकरण,<br>(५) निस्सारणात सुधारणा करण्यासाठी व दाब कायम ठेवण्यासाठी तेल साठ्यात पुनः ठेवण्याकरिता फार हलके भाग (व्हेरी लाईट फॅक्शन), त्यातून वगळणे,<br>(६) उपरिनिर्दिष्ट प्रक्रियांच्या वेळी भौतिक पद्धतीद्वारे, केवळ पूर्वी प्राप्त झालेल्या हायड्रोकार्बनचीच भर घालणे,<br>(७) पदार्थाचे मूळ स्वरूप बदलणार नाही अशा प्रकारची, जादा पोअर पॉइन्ट डिप्रेसन्ट व फ्लो इम्प्रुव्हर्ससह अन्य कोणतीही गौण प्रक्रिया. | कित्ता |
| २८ | निर्जलीकृत आणि संस्करित केलेला भाजीपाला आणि अळंबी | ४ टक्के |
| २९ | पुढील वर्णनाबरहुकूम तयार करून घेण्यात आलेली औषधिद्रव्ये (यात आयुर्वेदिक, सिद्ध, युनानि, स्पिरिचुअस औषधिद्रव्ये आणि होमिओपॅथीची औषधिद्रव्ये यांचा समावेश होतो.) :—<br>कोणत्याही रोगांचे किंवा व्याधींचे निदान, उपचार, सौम्यीकरण किंवा प्रतिबंध करण्यासाठी भारतात तयार किंवा आयात करण्यात आलेले, औषधिद्रव्ये व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० अन्वये देण्यात आलेल्या लायसनखाली साठवण, वितरण किंवा विक्री करण्यात आलेले. मानवजात, पशु आणि पक्षी यांनी पोटात घेण्यासाठी किंवा अंगावर लावण्यासाठी तयार करण्यात आलेले | कित्ता |

१९४० चा २३.

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | कोणतेही वैद्यकीय औषध किंवा पदार्थ ज्यात [1][* * *] डास प्रतिबंधकांचा (Masquito repellants) समावेश असणार नाही. | | |
| [2][२९क | (क) केंद्र सरकारने, औषधिद्रव्ये सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४० च्या कलम ३, खंड (ब), उप खंड (चार) अन्वये वेळोवेळी अधिसूचित केलेली साधने. | किता | १९४० चा २३. |
| | (ख) औषधिद्रव्ये व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४० अन्वये देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीनुसार भारतात उत्पादित केलेली किंवा आयात केलेली, साठवलेली, वितरित केलेली, किंवा विकलेली बँडेजेस व ड्रेसिंगस]. | कित्ता | १९४० चा २३. |
| | (ग) सिरींजेस. | कित्ता | |
| [3][३० | खाद्यतेले, अशुद्ध स्वरुपातील खाद्यतेले आणि पेंडी. | कित्ता] | |
| ३१ | इलेक्ट्रोड्स | कित्ता | |
| ३२ | वही, आलेख वही आणि प्रयोगशाळेची वही | कित्ता | |
| [4][३३ | (क) मौल्यवान धातूपासून बनवली असतील त्या व्यतिरिक्त लोह आणि अलोह धातुची घरगुती वापराची भांडी-मग त्यास कोणत्याही द्रव्याचा मुलामा दिलेला असो किंवा नसो. | कित्ता | |
| | (ख) घरगुती वापरासाठी असलेले प्रेशर कुकर्स व पॅन्स; | कित्ता | |
| | (ग) बकेटस्-मग ती लोखंड, पोलाद, अॅल्युमिनियम, प्लॅस्टिक किंवा इतर कोणत्याही द्रव्यापासून बनवले असोत] | कित्ता | |
| ३४ | खते, यात जैविक-खते, कीटकनाशके, कीटनाशके, बुरशीनाशके, तणनाशके, खारनाशके (रोडेन्टीसाईट्स), हरबीसाईट्स, अॅन्टीस्पॉऊरिंग उत्पादने, रोपांची जोमाने वाढ करणारी किंवा नियमन करणारी औषधे (रेग्युलेटर्स) [5][आणि मायक्रोन्युट्रीएन्टस] यांचा समावेश असेल परंतु जंतुनाशकांचा समावेश असणार नाही. | कित्ता | |
| ३५ | सर्व प्रकारचे तंतू आणि तंतूचा टाकाऊ भाग | ४ टक्के | |
| ३६ | फायरक्ले, कोळसा, राख, कोल बॉयलर राख, कोल सिंडर राख, कोल पावडर क्लिंकर. | | |
| ३७ | धान्य व डाळी यांचे पीठ मग ते एकाच धान्याचे किंवा मिश्र स्वरुपात असो-यात पीठ, मैदा, रवा, सुजी व बेसन यांचा समावेश होतो. | कित्ता | |
| [6][३७ | (क) गहू व तांदूळाचे पीठे, आटा, मैदा, रवा आणि सूजी यासह-मग ते एकाच धान्याचे असो किंवा मिश्र स्वरुपात असो- | कित्ता | |
| | (ख) डाळींची पीठे, बेसनासह-मग ते एकाच डाळीचे असो किंवा मिश्र स्वरूपात असो. " १ एप्रिल, २००६ पासून किंवा त्यानंतर सुरु होणाऱ्या कालावधीत केलेली विक्री " | कित्ता | |
| ३८ | ग्लुकोज-डी | कित्ता | |

[1] शासकीयअधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र.क्र.१३७/कराधान-१, दिनांक १ मे, २००५ यांच्या कलम दोन, खंड (६) द्वारे, हा मजकूर वगळण्यात आला.

[2] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (७) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (८) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (९) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (१०) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (११) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

अनुसूची ' ग '---चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ३९ | राज्य शासन, **राजपत्रात** वेळोवेळी अधिसूचित करील असा अमूर्त आणि अदृश्य स्वरुपातील माल. | कित्ता |
| ४० | गूळ, जागरी व रब गुळाचे खाण्यायोग्य प्रकार [१][१ एप्रिल, २००६ पासून किंवा त्यानंतर सुरु होणाऱ्या कालावधीसाठी.] | कित्ता |
| ४१ | सर्व स्वरुपाचे आणि वर्णनाचे कर्पूर, शिलाजित (जिप्सम) | कित्ता |
| ४२ | हाताने चालवायचा पंप, भाग व जोडणी साहित्य | कित्ता |
| ४३ | हातमागावर विणलेला गमचा | कित्ता |
| ४४ | [२][औषधी वनस्पती, काथ (कॅटशू) गॅम्बिअर] झाडांची साले, वाळलेली रोपे, वाळवलेली मुळे सामान्यपणे जडीबुटी व वाळवलेली फुले म्हणून ओळखली जाणारी. | कित्ता |
| ४५ | चामडी व कातडी, कच्ची अथवा कमावलेल्या स्थितीतील | कित्ता |
| ४६ | [३][लवचिक नळ (होज् पाईप) आणि त्याच्या फिटींग्ज.] | कित्ता |
| ४७ | होजिअरीचा माल | कित्ता |
| ४८ | कंदील, चिमणी [४][केरोसीन कंदील, पेट्रोमॅक्स कंदील, केरोसीन स्ट्रोव्ह, केरोसीन प्रेशर स्टोव्ह, पेट्रोमॅक्स प्रेशर लॅम्प्स, काचेची चिमणी आणि कंदील, पेट्रोमॅक्स गॅस मेंटल्स आणि त्यांची उपसाधने, वस्तू आणि घटक.] | कित्ता |
| ४९ | [५][भाताचे तूस व कोंडा]. | कित्ता |
| ५० | बर्फ | कित्ता |
| ५१ | कृत्रिम दागिने, काचेचे, प्लॅस्टिकचे किंवा मौल्यवान धातूखेरीज अन्य कोणत्याही धातूचे मणी, केसांचा पिना आणि या सर्वांचे भाग आणि घटक. | कित्ता |
| ५२ | अगरबत्ती, धूपकाठी किंवा धूपबत्ती म्हणून सर्वसामान्यपणे ओळखल्या जाणाऱ्या सुगंधी कांडया. | कित्ता |
| ५३ | औद्योगिक केबल्स, (हायव्होल्टेज केबल्स, प्लॅस्टिक कोटेड केबल्स् जेली फिल्ड केबल्स, ऑप्टिकल फायबर केबलस्). | कित्ता |
| ५४ | राज्य शासन, वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचित करील असा औद्योगिक कच्चा माल व आवेष्टन सामग्री. | कित्ता |
| ५५ | लोखंड आणि पोलाद म्हणजेच,--- | |
| | (एक) इन्गॉट मोल्ड्स्, बॉटम प्लेट्स्, लोखंडाची मोड, ओतीव लोखंडाची मोड, रनर मोड व आयर्नस्कल मोड यांसहित कच्चे लोखंड व ओतीव लोखंड ; | ४ टक्के |
| | (दोन) स्टील सेमिस (सर्व दर्जाचे, आकारांचे व आकारमानांचे इन्गॉट्स, स्लॅब्स, ब्लूम, लोहखंड व बिलेट्स्) ; | |
| | (तीन) स्केल्प बार्स, कथलाच्या कांबी, पत्र्याच्या कांबी, हो-बार्स व स्लिपर बार्स ; | |

[१] शासकीय अधिसूचना वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र. क्र. १३७/ कराधान-१, दिनांक १ मे २००५ याच्या कलम दोन, खंड (१२) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (१३) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र.क्र.१३७/कराधान-१, दिनांक १ मे, २००५ याच्या कलम दोन, खंड (१४) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (१५) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (१६) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | (चार) पोलादाच्या कांबी (वर्तुळाकार, कांबी, चौरस, सपाट, अष्टकोनी आणि षटकोनी, सरळ व कमानदार किंवा पीळ घातलेल्या, वर्तुळाकार वळवलेल्या तसेच सरळ लांबीच्या) ; | |
| | (पाच) पोलादी घडणीच्या वस्तू (अँगल्स, जॉईंट्स चॅनेल्स्, टीस, शीट पायलींग सेक्शन्स, झेड सेक्शन्स किंवा इतर कोणतीही रोल्ड सेक्शन्स) ; | |
| | (सहा) पत्रे, कडे (हुक्स), पट्ट्या (फाळ) आणि स्केल्प, काळे व जस्तलेपित, तापवलेल्या स्थितीत किंवा थंड स्थितीत वळवलेले (हॉट अँड कोल्ड रोल्ड), सर्व प्रकारचे सरळ व पन्हळीदार, सरळ लांबीचे व वर्तुळाकार वळवलेले व रिव्हेट केलेल्या स्थितीतील ; | |
| | (सात) सर्व प्रकारच्या सरळ व चौकटी असलेल्या (चेकर्ड) प्लेटस् ; | |
| | (आठ) चकत्या (डिस्क) ; कडी (रिंग्स), फोर्जिंग्स व पोलादाची ओतकामे ; | |
| | (नऊ) हत्यार (टूल), मिश्र लोह (ॲलॉय) व वरील प्रकारांपैकी कोणत्याही प्रकारचे खास पोलाद ; | |
| | (दहा) स्टील स्कल, टर्निंग व बोरींग्स यांसह सर्व प्रकारांतील स्टील मेल्टिंग स्क्रॅप ; | |
| | (अकरा) नलिका जोडण्यासह, सांधलेल्या (वेल्डेड) व न जोडलेल्या (सीमलेस) (अखंड) अशा दोन्ही प्रकारच्या, सर्व व्यासांच्या व लांबीच्या पोलादी नळ्या ; | |
| | (बारा) कथलाचे पत्रे, हॉट डिप्ड व इलेक्ट्रोलायटिक व कथिल नसलेल्या प्लेटस् (टिन फ्री प्लेटस्) ; | |
| | (तेरा) फिश प्लेट बार्स, बेअरिंग प्लेट बार्स, क्रासिंग स्लिपर बार्स, फिश प्लेटस्, बेअरिंग प्लेटस्, क्रॉसिंग स्लिपर्स व प्रेस्ड स्टील स्लिपर्स, रेल्स—हेवी व लाईट क्रेन रेल्स ; | |
| | (चौदा) चाके (व्हील्स), टायर्स, ॲक्सल्स व व्हील सेट्स ; | |
| | (पंधरा) वळवलेल्या (रोल्ड), ताणलेल्या (ड्रॉन), जस्तलेपित, ॲल्युमिन लेपित (ॲल्युमिनाईज्ड), कथिललेपित (टिन्ड), किंवा मुलामा दिलेल्या जसा तांब्याचा देतात–तार-शलाका (वायर रॉड्स) व तारा ; | |
| | (सोळा) वरीलपैकी कोणत्याही प्रकारच्या वस्तूचे सदोष, नाकारण्यात आलेले भाग किंवा त्यांचे तुकडे किंवा टोकांचे भाग. | |
| ५६ | राज्य शासन वेळोवेळी अधिसूचित करील अशी माहिती तंत्रज्ञान उत्पादने | ४ टक्के |
| ५७ | ताग म्हणजे कॉर्कोरस कॅप्सूलरीस व कॉर्कोरस ऑइलटोरिअस या या जातींच्या वनस्पतीपासून काढलेले तंतू आणि हिबिस्कस कॅनॅबिनस व हिबिस्कस सब्दारिफाव्हार आलटीसीमा या जातीच्या वनस्पतीपासून काढलेले व मेस्ता किंवा बिमली या नावाने ओळखले जाणारे तंतू, तसेच क्रोटालॅरिया जूनसिया या जातींच्या वनस्पती पासून काढलेले व सन किंवा सनहेम्प या नावाने ओळखले जाणारे तंतू— मग ते गासड्यातील असोत किंवा अन्य स्वरुपात असोत. | कित्ता |

## अनुसूची ' ग '—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ५८ | सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत विक्री करण्यात आलेले केरोसिन | कित्ता |
| ५९ | विणण्याची लोकर | कित्ता |
| ६० | लाख आणि लाखेच्या कांड्या | कित्ता |
| ६१ | लिग्नाईट | कित्ता |
| ६२ | चुना, चुनखडी, चुन्याची उत्पादने आणि डोलोमाईट | कित्ता |
| ६३ | [1][* * *] | कित्ता |
| ६४ | मिक्स्ड पीव्हीसी स्टॅबिलायझर | कित्ता |
| ६५ | नापा लाद्या (लाद्यांसाठी वापरावयाचे ओबडधोबड दगड) [2][आणि शहाबादी दगड] | कित्ता |
| ६६ | नवारी | कित्ता |
| ६७ | राज्य शासन, वेळोवेळी, **राजपत्रात** अधिसूचित करील असा प्राथमिक अवस्थेतील अलोह धातू आणि संमिश्र धातू. | कित्ता |
| ६८ | गळिताची धान्ये म्हणजे,—<br>(एक) भुईमूग (ग्राऊंडनट किंवा पीनट) (एराचिस हायपोजिआ);<br>(दोन) सिसामम किंवा तीळ (सेसामम ओरिएंटल);<br>(तीन) सरकी (गोसिपिअम एसपीपी);<br>(चार) सोयाबीन (ग्लायसिन सेजा);<br>(पाच) शिरस व मोहरी (रेपसीड व मस्टर्ड),—<br>(१) तोर्ता (ब्रॅसिका कॉम्पेस्ट्रीस, वार तोरिया);<br>(२) राई (ब्रॅसिका जनसिया);<br>(३) जम्बा-टॅरामिरा (इरुका सॅटिवा);<br>(४) सरसों, पिवळा व तपकिरी (ब्रॅसिका कॉम्पेरिट्रस वार सॅरसन);<br>(५) बनारसी राई किंवा चांगल्या प्रतीची (मोहरी निग्रा);<br>(सहा) अळशी (जवस) (लायनम युसिटिसियम);<br>(सात) एरंडी (रिसिनस कॉम्युनिस);<br>(आठ) नारळ (शहाळे सोडून खोबरे) (कोकोस न्युसिफेरा);<br>(नऊ) सूर्यफूल (हेलियान्थस ॲनस);<br>(दहा) कारळ (गुइझोटीया ॲबिसिनिका);<br>(अकरा) नीम, वेपा (एझाडिरॅचटा इंडिका);<br>(बारा) महुआ इलपाई, ईप्पे (माधुका इंडिका एम. लॅटिफोलिया, बॅसिआ लॅटिफोलिया व मधुका लाँगिफोलिया सिन, एम, लाँगिफोलिया);<br>(तेरा) करंजा, पोंगम होंगा (पोंगामिया पिन्नटा सिन पी ग्लॅब्रा);<br>(चौदा) कुसुम (स्कापेचेरा ओल्कोसा, सिन, एस. त्रिजुगा);<br>(पंधरा) पुन्ना अुंडी (कॅलोफिल्लम आयनोफिल्लम);<br>(सोळा) कोकम (कार्सिनिया इंडिका);<br>(सतरा) साल (शोरिया रोबस्टा); | कित्ता |

[1] शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र.क्र.१३७/कराधान-१, दिनांक १ मे, २००५ याच्या कलम दोन, खंड (१७) द्वारे, हा मजकूर वगळण्यात आला.

[2] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (१८) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | (अठरा) तुंग (ॲल्युरिटस फॉरडाई ॲण्ड ए. मोन्टॅना) ; | |
| | (एकोणीस) रेड पाम (इलेइस जिनेसिस) ; | |
| | (वीस) करडई (सॅफ्लॉवर) (कॅरथॅनस टिन्क्टोरिअस) ; | |
| ६९ | [1][* *] धातुके व खनिजे .. | ४ टक्के |
| ७० | कागद, वर्तमानपत्राचा कागद, पेपर बोर्ड, [2][रद्दी पेपर, सर्व प्रकाराची कॉम्प्यूटर पेपर स्टेशनरी, कार्बन पेपर आणि अमोनिया पेपर.] | कित्ता |
| ७१ | खाद्यान्नाच्या दर्जाचे असलेले आणि त्या दर्जाचे नसलेले पॅराफिन मेण, स्टॅण्डर्ड मेण आणि मॅच मेण, स्लॅक मेण यांसह. | कित्ता |
| ७२ | जी. आय. पाईप्स, सी. आय. पाईप्स, डक्टाईल पाईप्स, पीव्हीसी पाईप्स आणि त्यांच्या जोडण्या यांसह सर्व प्रकारचे पाईप्स. | कित्ता |
| ७३ | पिझ्झा ब्रेड .. | कित्ता |
| ७४ | [3][प्लॅस्टिक पादत्राणे (मोल्डेड), हवाई चप्पल आणि त्यांचे पट्टे (स्ट्रॅप्स)] | कित्ता |
| ७५ | प्लॅस्टिक ग्रॅनुल्स व [4][मास्टर बॅचेस, प्लॅस्टिक पावडर व स्क्रॅप] .. | कित्ता |
| ७६ | वार्षिक अहवाल, अर्जाचे नमुने, लेखा पुस्तके, दिनदर्शिका, डायऱ्या, सूच्या, रेस कार्डस् आणि मुख्यतः व्यावसायिक प्रयोजनांसाठी माल, सेवा आणि वस्तू यांची प्रसिद्धी करणारी प्रकाशने. | ४ टक्के |
| ७७ | टोनर आणि कारट्रीजेस वगळता [5][छपाईची शाई व लिहिण्याची शाई] | कित्ता |
| ७८ | [6][* * *] | कित्ता |
| ७९ | बांबू, लाकूड आणि कागद यांचा लगदा | कित्ता |
| ८० | रेल्वेचे डबे, इंजिने आणि वाधिणी [7][ आणि त्यांचे सुटे भाग] | कित्ता |
| [8][८१ | (क) तयार कपडे | कित्ता |
| | (ख) अंगावर घालण्याचे इतर कपडे, कापडापासून बनविलेले इतर सहाय्यकारी घटक आणि राज्य शासन, वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचित करील असे संच.] | कित्ता |
| ८२ | राज्य शासनाकडून वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येतील अशी नवीकरण करता येण्याजोगी ऊर्जा साधने व त्यांचे सुटे भाग. | कित्ता |
| ८३ | [9][भाजलेल्या किंवा तळलेल्या] डाळी व फुटाणे | कित्ता |
| ८४ | रबर ; जसे--- | कित्ता |
| | (क) कच्चे रबर, | |
| | (ख) लॅटेक्स ; आणि | |
| | (ग) सर्व दर्जाच्या ड्राय रिबड् शीटस् | कित्ता |

[1] शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र.क्र.१३७/कराधान-१, दिनांक १ मे, २००५ याच्या कलम दोन, खंड (१९) द्वारे, हा मजकूर वगळण्यात आला.

[2] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (२०) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (२१) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (२२) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (२३) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (२४) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[7] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (२५) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[8] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (२६) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[9] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (२७) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## अनुसूची ' ग '—समाप्त

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ८५ | आगपेट्या | कित्ता |
| ८६ | [१][* * *] | |
| ८७ | शिलाई यंत्रे [२][आणि त्यांचे सुटे भाग, घटक आणि उपसाधने] | कित्ता |
| ८८ | जहाज व इतर जलयाने | कित्ता |
| ८९ | मलईरहित दुधाची भुकटी [३][आणि युएचटी दूध] | कित्ता |
| ९० | सेंद्रिय विद्रावक तेलाव्यतिरिक्त इतर विद्रावक तेले | कित्ता |
| [४][९१ | (क) सर्व प्रकाराचे व सर्व स्वरुपातील मसाले, तसेच जिरे, हिंग, ॲनीसीड, केशर, मिरी, आणि पॉपी सीडस. | कित्ता |
| | (ख) १ एप्रिल. २००६ पासून किंवा त्या नंतर सुरु होणाऱ्या कालावधीसाठी– '' मिरची, हळद, चिंच, धने, मेथ्या आणि पार्स्ले (सुवा)-मग ते आख्खे असोत की भुकटी स्वरुपात] | |
| ९२ | पोशाख (ॲपॅरेल) व पादत्राणे वगळता क्रीडा साहित्य | कित्ता |
| ९३ | [५][खळ, साबुदाणा] (स्टार्च) आणि टॅपिओका | कित्ता |
| [६][९४ | (क) मिठाई | कित्ता |
| | (ख) राज्य शासन, वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचित करील असे फरसाणाचे प्रकार.] | कित्ता |
| ९५ | चिंच | कित्ता |
| [७][९६ | कर्षित्रे (शेतीसाठी वापरण्यात येणारे ट्रॅक्टर), ट्रेलर आणि ट्रॉली (शेतीसाठी वापरण्यात येणारी), कापणी यंत्रे, जोड यंत्रे व त्यांचे सुटे भाग, कंपोनंटस, ॲक्सेसरीज व त्यासाठी लागणारे टायर ट्यूब्स.] | कित्ता |
| ९७ | ट्रान्सफॉर्मर | ४ टक्के |
| ९८ | पारेषण मनोरे | कित्ता |
| ९९ | बागेतील छत्र्या (गार्डन अंब्रेला) व्यतिरिक्त छत्र्या | कित्ता |
| १०० | वनस्पती (हायड्रोजनची प्रक्रिया केलेली) तेले | कित्ता |
| १०१ | राज्य शासनाकडून वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल असे साखरेचे, तंबाखूचे, वस्त्रांचे आणि वस्त्रांपासून बनवलेल्या वस्तूंचे प्रकार. | कित्ता |
| १०२ | वनस्पती तेल व जिंजीली तेल, एरंडेल तेल आणि ब्रान तेल | कित्ता |
| १०३ | वॉटर पंपिंग आणि वीजनिर्मितीसाठी पवनचक्की | कित्ता |
| [८][१०४ | (क) लेखन साहित्य, बॉल पॉईंट पेन्स, फेल्ड टीप्ड आणि इतर पोरस टिप्ड पेन्स आणि मार्कर्स फाउंटन पेन्स, स्टायलोग्राफ पेन्स व इतर पेन्स, डुप्लिकेटींग स्टायलोस प्रॉपेलींग किंवा स्लाइडींग पेन्सिल्स, पेन होल्डर्स, पेन्सिल होल्डर्स आणि तत्सम होल्डर्स आणि वरील वस्तुंचे भाग (कॅप व क्लीपसहीत). | कित्ता |
| | (ख) गणितीय साधने, पेट्या त्यातील साधनासह, विद्यार्थ्यांसाठीच्या रंग पेट्या, क्रेयॉन्स आणि पेन्सिल शार्पनर्स.] | |

[१] शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र.क्र.१३८/कराधान-१, दिनांक १ एप्रिल, २००५ द्वारे नोंद क्र. ८६ वगळण्यात आली.

[२] शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र.क्र.१३७/कराधान-१, दिनांक १ मे, २००५ याच्या कलम दोन, खंड (२८) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (२९) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (३०) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (३१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (३२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (३३) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] वरील अधिसूचनेच्या कलम दोन, खंड (३४) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| १०५ | सोने, चांदी व मुलामा दिलेले धातू, बादला आणि कसव असलेली जरीची व भरतकाम केलेली सामग्री. | कित्ता |
| १०६ | [1][(क) सुके खोबरे | कित्ता |
| | (ख) असोला नारळ आणि सुक्या खोबऱ्या व्यतिरिक्त नारळापासून वेगळे काढलेल ओले खोबरे यांची १ एप्रिल, २००६ पासून किंवा त्यानंतर सुरु होणाऱ्या कालावधीसाठी केलेली विक्री.] | |
| [1][१०७ | (१) कच्च्या लोकरी व्यतिरिक्त प्राण्यांचे केस. | कित्ता |
| | (२) राज्यशासन, वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचित करीत त्यानुसार भांडवली मालमत्तेच्या वस्तू आणि त्याचे भाग व घटक. | कित्ता |
| | (३) कोल टार. | कित्ता |
| | (४) कंगवे. | कित्ता |
| | (५) कागदाचे किंवा प्लॅस्टिकचे ग्लास व कप. | कित्ता |
| | (६) फीडींग बॉटल्स व निपल्स. | कित्ता |
| | (७) परदेशी जाणाऱ्या जहाजांना पुरविलेल्या पुढील नमूद केलेल्या वस्तू– | कित्ता |
| | (क) जहाजांना लागणारी वंगणे व जहाजांना लागणारे भारतीय रंग. | कित्ता |
| | (ख) सर्व प्रकारचे खाद्य पदार्थ व खाद्य पदार्थ तयार करण्यासाठी लागणारे जिन्नस. | कित्ता |
| | (ग) मद्यार्कसहित किंवा विरहित पेये. | कित्ता |
| | (घ) बंकर ऑईल. | कित्ता |
| | (८) राज्यशासन, वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचित करील त्यानुसार वैद्यकीय साधने व रोपणे (इम्प्लांटस). | कित्ता |
| | (९) पोरीसिलीन इन्सूलेटर. | कित्ता |
| | (१०) स्क्रू, नट, बोल्ट, फास्टनर्स, कोच स्क्रू,स्क्रू हूक्स, रिबेटर्स, कॉटर्स, कॉटर पीन्स, स्प्रिंग वॉशर्ससह वॉशर्स. | कित्ता |
| | (११) (क) प्रक्रिया किंवा अंशतः प्रक्रिया केलेली फळे, भाज्या, मांस पोल्ट्री आणि मासे-मग ते हवाबंद डब्यात तसेच शीतकरण केलेले असोत किंवा नसोत. | कित्ता |
| | (ख) फ्रूट जाम्स, जेली, कॉटेज चिज (पनीर), लोणची, सॉसेस, पॉरिजि, मुरंबे, मुरविलेली फळे, मध, फळांचे सरबत, पेस्ट, फळ पेये, फळाचे रस,स्क्वाशेस, सिरप, कार्डिअल्स. | कित्ता |
| | (ग) कच्चे समुद्री खाद्य, कच्चे मांस, फळे व भाज्या जेव्हा हवाबंद डब्यातून किंवा शीतकरण केलेल्या स्थितीत विकण्यात येतील. | कित्ता |
| | (१२) बांधकामासाठी वापरावयाची सिलीका वाळू. | कित्ता |
| | (१३) चिंचोके व त्याची भुकटी. | कित्ता |
| | (१४) इलेक्ट्रोनिक खेळणी व इलेक्ट्रोनिक गेम्स व्यतिरिक्त खेळणी व गेम्स. | कित्ता |
| | (१५) मेणबत्त्या. | कित्ता |
| | १०८ (क) बेदाणा व मनुकासह सुका मेवा | कित्ता |
| | (ख) चहा पत्ती किंवा चहा पावडर इन्सटंट चहासह १ मे, २००५ पासून सुरू होणाऱ्या व ३१ मार्च २००६ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी केलेली विक्री] | कित्ता |

[1] शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/प्र.क्र.१३७/कराधान-१, दिनांक १ मे, २००५ कलम दोन खंड (३५) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## अनुसूची ' घ '

[ कलमे २ (२६), ५ व ६ पहा ]

### कराचा दर २० टक्के किंवा अधिक कर असलेल्या मालाची सूची

**टीप.**— " टक्के " या शब्दाचा किंवा " % " याचा कराच्या दरासंदर्भातील अर्थ असा की, ती करनोंद ज्या मालासंबंधातील असेल त्या मालावरील विक्री किमतीच्या आधारे लावला जाईल आणि तो, कर संबंधित मालासमोर दर्शविण्यात आलेल्या विक्री किमतीच्या टक्केवारी इतका असेल.

| अनुक्रमांक | वस्तूचे नाव | कराचा दर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम ३ (६) (१) मध्ये वेळोवेळी विदेशी मद्य या संज्ञेच्या केलेल्या व्याख्याप्रमाणे. | २०% |
| २ | महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे देशी दारु | २०% |
| ३ | महाराष्ट्र विदेशी दारु (आयात व निर्यात) नियम, १९६३ याच्या नियम ३ (४) मध्ये वेळोवेळी व्याख्या केल्याप्रमाणे, भारताच्या राज्यक्षेत्राबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून आयात केली जाणारी दारु. | २०% |
| ४ | मळी आणि विशुद्ध स्पिरीट | २०% |
| ५ | हाय स्पिड डिझेल ऑइल— | |
| | (क) (एक) बृहन्मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई या महानगर-पालिकांच्या भौगोलिक हद्दींमध्ये असलेल्या धंद्याच्या ठिकाणी व्यापार करण्यासाठी किरकोळ व्यापाऱ्यास वितरण केले असेल तेव्हा ; आणि | ३४% + प्रति लिटर एक रुपया. |
| | (दोन) बृहन्मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई या महानगरपालिकांच्या भौगोलिक हद्दींमध्ये असलेल्या धंद्याच्या ठिकाणी किरकोळ व्यापाऱ्यांव्यतिरिक्त एखाद्या व्यक्तीस वितरण केले असेल तेव्हा— | [1][३४]% + प्रति लिटर एक रुपया. |
| | (ख) वरील खंड (क) मध्ये निर्दिष्ट केले असेल त्या परिस्थितीव्यतिरिक्त. | ३१% + प्रति लिटर एक रुपया. |
| ६ | विमानचालक चक्की इंधन (शुल्क भरलेले) (अनुसूची क च्या नोंद ८ मध्ये अंतर्भूत केले असेल त्याव्यतिरिक्त) | २५% |
| ७ | विमानचालक चक्की इंधन (बॉण्डेड) | ३०% |
| ८ | विमानचालक गॅसोलीन (शुल्क भरलेले) | १०% |
| ९ | विमानचालक गॅसोलीन (बॉण्डेड) | २४% |
| १० | मोटर स्पिरीटचा इतर कोणताही प्रकार | |
| | (क) जेव्हा — | |
| | (एक) बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई महानगरपालिकांच्या भौगोलिक हद्दींत वसलेल्या व्यवसायाच्या जागेतून व्यापार करण्यासाठी किरकोळ व्यापाऱ्याला वितरित केलेला असेल ; आणि | ३०% + प्रति लिटर एक रुपया. |

[1] शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-१५०५/सीआर-१०८/कराधान-१, दिनांक १ एप्रिल, २००५ द्वारे " ३१ " या आकड्याऐवजी हा आकडा समाविष्ट करण्यात आला.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | (दोन) बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई महानगरपालिकांच्या भौगोलिक हद्दीत वसलेली व्यवसायाची जागा असलेल्या किरकोळ व्यापाऱ्याव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीला, वितिरित केलेला असेल. | ३०% + प्रति लिटर एक रुपया. |
| | (ख) वरील खंड (क) मध्ये उल्लेखिलेल्या परिस्थिती - व्यतिरिक्त. | २९% + प्रति लिटर एक रुपया. |

## अनुसूची ' ङ '

[ कलमे २ (२६), ५ व ६ पहा ]

**कराचा दर १२.५० टक्के असेल असा अन्यत्र अंतर्भूतअसलेला माल**

**टीप.**— '' टक्के '' या शब्दाचा किंवा % याचा कराच्या दरासंदर्भातील अर्थ असा की, ती करनोंद ज्या मालासंबंधातील असेल त्या मालावरील कर विक्री किमतीच्या आधारे लावला जाईल आणि तो कर, संबंधित मालासमोर दर्शविण्यात आलेल्या विक्री किमतीच्या टक्केवारी इतका असेल.

| अनुक्रमांक<br>(१) | वस्तूचे नाव<br>(२) | कराचा दर<br>(३) |
|---|---|---|
| १ | इतर कोणत्याही अनुसूचीत अंतर्भूत नसलेला सर्व प्रकारचा माल | १२.५० %. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई